
# श्री
# शाहू छत्रपतींचे
# अर्थकारण

: लेखक
प्रा. सौ. मीना कुलकर्णी
शहाजी छत्रपती, महाविद्यालय
कोल्हापूर.

प्रा. ब. शि. कुलकर्णी
कोल्हापूर.

: 'गौरी-नन्दन' पब्लिकेशन
कोल्हापूर.


कोल्हापूरसंस्थानचा नकाशा
सातारा जिल्हा
अंबाघाट
सांगली राज्य
मिरज राज्य
कोल्हापूर
इचलकरंजी
रत्नागिरी जिल्हा
सावंतवाडी राज्य
बेळगांव जिल्हा
उत्तर

श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण



राजर्षी श्री शाहू महाराज

# श्री
# शाहू छत्रपतींचे
# अर्थकारण

: लेखक

प्रा. सौ. मीना कुलकर्णी
शहाजी छत्रपती, महाविद्यालय
को ल्हा पू र.

प्रा. ब. शि. कुलकर्णी
को ल्हा पू र.

: 'गौरी-नन्दन' पब्लिकेशन
को ल्हा पू र.

* प्रकाशिका

सौ मीना कुलकर्णी
'गौरी–नंदन' पब्लिकेशन
९९८; बी वॉर्ड
रविवार पेठ
कोल्हापूर.

सौ. मीना कुलकर्णी.

* मुद्रक

श्रीकृपा प्रिंटर्स,
कोल्हापूर.

* पहिली आवृत्ती १९७५.

* किंमत

पंधरा रुपये फक्त.

ती. वहिनींस—

(श्रीमती सुधा राजुरीकर)

# अनुक्रमणिका :


| | |
|---|---|
| निवेदन | |
| पार्श्वभूमी | : १ |
| शेती व सहकार | : २३ |
| पाटबंधारे | : ५१ |
| औद्योगिक विकास | : ६१ |
| व्यापार | : ७५ |
| श्रम–कामगार संघटना–रोजगारी | : ८८ |
| मानवी गुंतवणूक | : १०१ |
| दुष्काळ | : १४४ |
| सार्वजनिक आयव्यय | : १८९ |
| परिशिष्ट–१–अन्नधान्याच्या किमती | : २१३ |
| परिशिष्ट–२–लोकसंख्या | : २२६ |
| संदर्भ ग्रंथ | : २३० |
| सूची | : २३४ |

# निवेदन—

श्री शाहू जन्मशताद्विच्या निमित्ताने हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. जन्मशताब्दिच्या कारणाने त्यांच्या कामगिरीच्या अनेकविध पैलूवर प्रकाश टाकला जात आहे. महाराष्ट्रातील समाज प्रबोधन चळवळीचा सध्या अभ्यास केला जातो. त्या चळवळीमध्ये महाराजांचा जो सिंहाचा वाटा आहे त्याची नोंद घेतली जात आहे. महाराजांच्या आमदानीतच कोल्हापूर संस्थानच्या कारभाराला स्थिरता प्राप्त झाली व संस्थानचा कायापालट झाला. काही चरित्रकार त्यांचे चरित्र प्रकाशित करत आहेत. परंतु या सर्व घडामोडीत कोल्हापूर संस्थानचा आर्थिक विकास करण्यामध्येही महाराजांचे विचार किती वाडसी, पुरोगामी, कृतीची जोड मिळालेले व आधुनिक आर्थिक कसोटयांशी किती मिळते जुळते आहेत. यावर फारसा प्रकाश टाकला गेला नाही. महाराजांच्या आर्थिक कृतीची बाह्य मानचिन्हे आजच्या कोल्हापुरास भूषणावह झालेली आहेत. उद्योग, व्यापार व शेती, पाटबंधारे, श्रम, सहकार, नैसर्गिक संकटाशी झुंज, मानवी गुंतवणूक, सार्वजनिक आयव्यय या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या क्षेत्रात त्यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. त्यामागचे त्यांचे विचार, तत्त्वप्रणाली, त्यांनी टाकलेली पाऊले ही निश्चितच अभ्यसनीय ठरतात. त्यांच्या ह्या कामगिरीचाही परिचय निदान महाराष्ट्राला तरी घडून यावा यासाठी हा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचा उपक्रम आम्ही हाती घेतला.

पुस्तक लिहिताना दृष्टीकोन वस्तुनिष्ठ ठेवला आहे. जेथे संदर्भ आवश्यक आहेत तेथे ते दिले आहेत. अेक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते व ती म्हणजे महाराजांबाबत केलेल्या प्रत्येक विधानाला आधार आहे. महाराजांच्या आठवणीवर अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत पण अेक दोन अपवाद वगळता या ग्रंथात आम्ही आठवणी दिलेल्या नाहीत, कारण आठवणी अधिकृत पुरावा होऊ शकत नाहीत.

कोल्हापूरकरांच्याच प्रेमाचा, आदराचा व श्रद्धेचा विषय अभ्यासाला घेतल्याने आम्हाला स्वखुषीने सहकार्य देणारे, मागितल्यावर सहकार्य देणारे अमाप लोक भेटले. काही कटू अनुभवही आले पण गोड अनुभवांचे पारडे इतके जड होते की कटू अनुभव आम्ही विसरूनच गेलो ! सर्वांचे ऋण फेडणे इथे या चार शब्दांच्या निवेदनात होणार नाही, पण काहींचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. या पुस्तकाबाबत विविध तऱ्हेचे प्रोत्साहन, माहिती व आधार देण्याचे कार्य आमदार श्री. पी. बी. साळुंखे यांनी वेळोवेळी केले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु बॅ. पी. जी. पाटील व प्रा. गं. बा. सरदार यांनी दिलेल्या आशिर्वादाचा, मार्गदर्शनाचा व प्रोत्साहनाचा फार मोठा आधार आमच्या या लिखाणासाठी होता. गोखले कॉलिजचे माजी प्राचार्य श्री. एम्. आर्. देसाई, राजाराम कॉलिजचे प्राचार्य डॉ. मा. ग. मराठे, गोखले कॉलिजचे व राजाराम कॉलिजचे ग्रंथपाल यांनी आम्हाला विपुल ग्रंथ सामग्री पुरविली. 'विजयी मराठा'कार कै. श्रीपतराव शिंदे यांचे नुकतेच दिवंगत झालेले पुत्र कै. मा. श्री. शिंदे यांचा हे पुस्तक लिहण्यात फार मोठा वाटा आहे. त्यांनी आपणहून इतकी पुस्तके पुरविली की त्यांच्या प्रेमातून—ऋणातून आम्ही मुक्त होऊ शकत नाही. ते हा ग्रंथ पहायला नसावेत हे आमचे दुर्दैव !

त्याच प्रमाणे करवीर नगर वाचनालयाचे पदाधिकारी, डॉ. जी. व्ही. कुलकर्णी, प्रा. जी. वाय्. कुलकर्णी, प्रा. डी. पी. कुलकर्णी, प्रा. मिरजकर, प्रा. द. उ. पवार, अजब पुस्तकालयाचे श्री. अनिलकुमार मेहता, श्री. नगारे, रेकॉर्ड ऑफिसमधील श्री. ताम्हाणे, श्री. शा. स. पाटील, श्री. लाटकर यांचेही प्रोत्साहन व साहाय्य आम्हाला मिळालेले आहे आमदार श्रीपतराव बोंद्रे, जनरल थोरात, शहाजी कॉलेजचे प्राचार्य श्री. शिंदे यांचेही मार्गदर्शन आम्हास मिळाले.

पुस्तक तयार करण्यामध्ये श्रीकृपा प्रिंटर्स संचालक श्री. आण्णा मोहिते मुखपृष्ठकार श्री. ओतारी, कंपोझर यासीन मेस्त्री, ब्लॉक मेकर श्री. बकरे व हस्तलिखिताची प्रत काढण्यात मदत करणारे श्री. अजय घोरपडे यांचा फार मोठा वाटा आहे.

सर्वांत शेवटी ऋण व्यक्त करायचे आमची मुले–नंदू व गौरी यांचे ! त्यांनी जर आम्हाला वेळ दिला नसता तर हे पुस्तक पूर्ण करणे आम्हाला केवळ अशक्यच झाले असते. वाचक पुस्तकाचे निश्चित स्वागत करतील.

विजयादशमी
१४।१०।१९७५

सौ मीना कुलकर्णी
ब. शि. कुलकर्णी

कोल्हापूर.

# पार्श्वभूमी

'The welfare of the people is the ultimate law.'

—Cicero

श्री शाहू छत्रपतींचे नांव कोल्हापूर जिल्ह्यातच नव्हे तर निदान संपूर्ण महाराष्ट्रात तरी ह्या जन्मशताब्दिच्या निमित्ताने सुपरिचित झाले आहे. महाराजांच्या कारकिर्दीत त्यांनी विविध क्षेत्रात भरघोस अशी कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्याच्या काही पैलूंवर आत्तापर्यंत प्रकाश टाकला गेला आहे. काहींनी त्यांचे चरित्र लिहिले, काहींनी त्यांच्याबद्दलच्या आठवणी प्रसिद्ध केल्या, काहींनी त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला, तर काहींनी त्यांनी केलेल्या समृद्ध अशा सामाजिक कार्याचे सिंहावलोकन केले. परंतु आधुनिक अर्थशास्त्राच्या दृष्टिने महत्वाच्या क्षेत्रांतही त्यांनी भरीव कामगिरी केलेली आहे, याकडे फारसे कोणाचे लक्ष गेलेले दिसत नाही. इतर क्षेत्रातील कार्ये पार पाडत असतानाच त्याबरोबर आपल्या प्रजेची आर्थिक भरभराट व्हावी म्हणून दारिद्र्यावर त्यांनी चौफेर हल्ला चढवला. ह्या बाबतीत त्यांनी केलेले कार्य जर अर्थशास्त्राच्या आधुनिक निकषांवर तपासून बघितले तर जितके महत्वपूर्ण कार्य त्यांनी सामाजिक बाबतीत केले आहे तेवढेच किंबहुना अधिक महत्वपूर्ण कार्य त्यांनी आर्थिक बाबतीत केले आहे असे आपल्याला म्हणता येईल. कोल्हापूर संस्थानचा संपूर्ण कायापालट करण्याचे श्रेय महाराजांकडे जाते. सध्या

कोल्हापूर जिल्ह्यात अस्तित्वात आलेल्या अनेक चळवळींचे, संस्थांचे, हरित-क्रांतीचे, जागृतीचे बीज आपल्याला महाराजांच्या कारकिर्दीत सापडते. त्याच बीजाच्या फांफावलेल्या वृक्षाची फळे आजचे करवीरवासी उपभोगत आहेत.

ही जी आर्थिक कामगिरी महाराजांनी पार पाडली तिचे मूल्यमापन करताना जो दृष्टीकोन ठेवला आहे, तो संपूर्णपणे वस्तुनिष्ठ असा आहे. त्यांच्या आठवणीतून अगर त्याजविषयींच्या इतरांना आलेल्या अनुभवावरुन जर त्यांचे चित्र रेखाटले असते तर ते अधिक चित्तवेधक, रसाळ व मनोरंजक झाले असते यात काहीच शंका नाही. परंतु अनुभव किंवा आठवणी यामध्ये व्यक्तीगत विचार महत्वाचे असतात. त्यामध्ये भावनांचा ओघ जास्त असतो. भावनांची तीव्रता जशी कमीजास्त होते तसा त्यातील सत्याचा अपलाप होण्याची शक्यता असते. म्हणून महाराजांची चरित्रे, त्यांनी इतरांना लिहिलेली पत्रे, इतरांनी त्यांना लिहिलेली पत्रे, वार्षिक अहवाल, विचार-वंतांनी प्रकट केलेली त्यांच्याबद्दलची मते इत्यादी साधने विचारात घेऊन जशी वस्तुस्थिती आढळते तसे हे चित्र रंगवण्याचे प्रयत्न केलेले आहेत. त्यात रंग जे भरलेले आहेत ते मूळ कोंदणाच्या शोभेसाठी. कल्पनाशक्तीच्या भराऱ्या येथे मारायला वावच नाही. तरीही महाराजांची प्रतिमा जी प्रकट होते ती अत्यंत उज्वल अशी आहे.

सर्वसाधारणपणे संस्थानिक म्हटले की आपल्या डोळ्यासमोर एक विशिष्ट चित्र उमटते इंग्रजी-मराठी साहित्यात आपण त्यांच्या बद्दलच्या कथा कादंबऱ्या वाचतो किंवा दिवाण जर्मानीदास यांनी लिहिलेले " महाराजा " हे पुस्तक वाचण्यात येते. संस्थानिक म्हणजे ऐश्वर्यात लोळणारा, प्रजेपासून अलिप्त असणारा, प्रजेवर जुलूम करणारा, प्रजेच्या हिताकडे लक्ष देणे तर दूरच वारंवार चैनीसाठी परदेशच्या वाऱ्या करणारा, युरोपियन पाहुण्यांसाठी थाटपाची व्यवस्था करणारा असे रंगीबिरंगी चित्र उमटते. त्यामुळे साह-जिकच कोल्हापुरचे संस्थानिक होते तरी कसे या बद्दलचे प्रश्नचिन्ह मानस पटलावर उभे राहते आणि सगळी माहिती गोळा करुन संकलन केल्यावर

एक आश्चर्याचा आणि आनंदाचा गोड असा धक्का बसतो की, हे संस्थानिक इतर संस्थानिकांपासून अत्यंत वेगळे असे होते. प्रजेच्या हिताकडे सर्वतोपरी तन–मन–धन वेचून लक्ष देणारे असे जे कांही हाताच्या बोटावर मोजता येण्याजोगे संस्थानिक होऊन गेले त्या मध्ये आपल्याला श्रीशाहू छत्रपतींचे नांव घ्यावे लागेल.

महाराजांच्या आर्थिक कामगिरीचे मूल्यमापन करताना आपल्याला महाराजांचे कार्य एका बाजूला व दुसऱ्या बाजूला आधुनिक अर्थशास्त्राच्या कसोट्या असे करून चालणार नाही. महाराजांनी काळाच्या ज्या चौकटीत काम केले ती चौकट महत्वाची आहे. ज्या पार्श्वभूमीवर महाराजांनी कार्य केले ती विसरून चालणार नाही. किंबहुना तीच प्रथम विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे आपोआपच पुढचा महत्वाचा प्रश्न निर्माण होतो आणि तो म्हणजे महाराज गादीवर येण्यापूर्वी व येतेवेळी कोणती आर्थिक व सामाजिक परिस्थिती होती ? यासाठी आपला विचार कोल्हापूर संस्थानपुरताच संकुचित ठेऊन चालणार नाही. संपूर्ण ब्रिटिश हिंदुस्थानात त्यावेळेला कोणते अर्थप्रवाह व समाजप्रवाह वहात होते, याचे सर्वव्याप्त चित्र आपल्याला डोळ्यासमोर ठेवणे भाग आहे. याचे पहिले कारण म्हणजे महाराष्ट्राच्या विचार प्रवाहात हिंदुस्थानच्या विचार प्रवाहाचे पडसाद निश्चितच उमटणार व दुसरे कारण म्हणजे हे विचार व महाराजांचे आर्थिक विचार आणि कृती हे जवळ जवळ समांतर रेषेत एकाच दिशेने धावत होते असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही यामुळे महाराजांच्या आर्थिक कामगिरीची उंची उंचावते यात कांहीच शंका नाही. त्यावेळच्या हिंदुस्थानातील आर्थिक विचार प्रवाहाची बरीचशी सूत्रे महाराष्ट्र, बंगाल व गुजरात यामधून हलवली जात होती. यामध्ये प्रामुख्याने आपल्याला न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, रावबहाद्दूर गणेश व्यंकटेश जोशी, दादाभाई नवरोजी व नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची नांवे घ्यावी लागतील. यापैकी गोखले व रानडे यांच्या बद्दल महाराजांना आदर होता. महाराजांनी कांही बाबतीत दोघांचा सल्ला विचारलेला होता आणि महाराज त्यांना गुरुस्थानी मानत असत.

त्या वेळच्या आर्थिक परिस्थितीला व मन:स्थितीला जुळणारे वर्णन पंडित नेहरूंनी आपल्या ' Discovery of India ' या ग्रंथात केले आहे. " आमचे शरीर पक्षघाताने निकामी बनले होते व मने मेली होती. शेतकरी गुलामासारखे व भयभीत झाले होते. कामगारांची स्थितिही वेगळी नव्हती. शेतकरी उपाशी होता. पण शतकानुशतके आपत्तीशी तोंड देत असल्याने तो धैर्याने व शांतपणे वागत होता... पण मध्यम वर्गाची–विशेषत: कनिष्ठ मध्यम वर्गाची–अशी स्थिती नव्हती. परंपरेत 'गुरफटलेले' असे कनिष्ठ, मध्यमवर्गीय जन्माने जुन्या वातावरणातले होते. पण जुन्या परंपरेशी त्यांचा संबंध नव्हता. आधुनिक विचारांचे त्यांना आकर्षण वाटे, पण सामाजिक व वैज्ञानिक जाणिवेच्या अभावी आधुनिकतेचा गाभा त्यांना हस्तगत करता येत नव्हता. आमच्या सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्यामुळें विषाचा फैलाव झाला होता. "[1]

त्यावेळेच्या आर्थिक परिस्थिती बाबत आपल्या देशातील पुढाऱ्यांमध्ये दोन गट पडलेले होते असे दिसून येईल. रमेशचंद दत्त, सुब्रम्हण्य अय्यर, दादाभाई इत्यादींची दृष्टी जास्त टीकात्मक होती. याउलट, रानडे यांची दृष्टी विधायक होती. दारिद्र्याचे अतिरिक्त लोकसंख्या एक कारण आहे असे त्यांनी सांगितले. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढतच होती. ब्रिटिश येथे आल्यावर पाठोपाठ त्यांच्या वस्तूही आल्या. आपले व्यवसाय करणारे लोक ब्रिटिश मालाला टक्कर देऊ शकले नाहीत. त्यांचे व्यवसाय बसल्याने तेही लोक शेतीकडे वळले. त्यामुळे दारिद्र्य जास्तच झाले. यावर त्यांनी उपाय सांगितला व तो म्हणजे, व्यापार व उद्योग हे आपण वाढवले पाहिजेत. नव्या उद्योगांमुळे शेतीवरील भार आपोआपच कमी होईल. शेतीच्या बाबतीतही त्यांनी आधुनिक उपाय सुचविले. स्वित्झर्लंड प्रमाणे जनावरे, खते, बियाणे, अवजारे, रस्ते, दुग्धव्यवसाय इत्यादी बाबतीत शेतकऱ्यांनी सहकार्याने प्रयत्न केले पाहिजेत. भूविकास बँका स्थापन करून शेतकऱ्यांना अल्प व्याजाने कर्ज दिले पाहिजे. दरवर्षी दहा विद्यार्थी इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या देशांत सुधारित शेती शिक्षणासाठी

पाठवावेत. रानडे यांनी आणखी एका बाबतीत आधुनिक दृष्टीकोन प्रतिपादन केला होता. सोन्यासारखा मूल्यवान धातू दागिन्यात वापरल्याने त्याचा मातीमोल उपयोग होतो. पण तोच जर भांडवल म्हणून वापरला तर ते जास्त उपयुक्त ठरेल असे त्यांचे मत होते. सरकारने उद्योग व्यवसायांना प्रोत्साहन द्यावे, सवलती व संरक्षण द्यावे या मताचे ते पुरस्कर्ते होते. " उपलब्ध साधनसामग्रीचे योग्य वाटप करून नियंत्रण करून कारखानदारी वाढीला लावणे हे सरकारचे कर्तव्य असल्याचे सांगून रानडे यांनी आर्थिक नियोजनाचा पुरस्कार केला. "2

रानडयांच्या विचाराने प्रेरित होऊन हिंदुस्थानच्या आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करून तर्कशुद्ध पद्धतीने मांडण्यात त्यानंतर रावबहाद्दूर गणेश व्यंकटेश जोशी ह्यांचा क्रमांक लागतो. अर्थशास्त्र व संख्याशास्त्र ह्या विषयात ते पारंगत होते. नामदार गोपाळ कृष्ण गोखले त्यांना गुरुस्थानी मानीत असत. सार्वजनिक सभेच्या " त्रैमासिक " जुलै १८८५ या अंकात त्यांचा A Note on Economic Reforms हा लेख प्रकाशित झाला. यामध्ये त्यानी आपले विचार मांडले आहेत.

" या लेखात त्यांनी, यंत्रशक्तीने चालणारे वेगवेगळ्या उद्योगाचे कारखाने या देशात उभारले न गेल्यामुळे व हिंदी लोक अनिश्चित उत्पन्न देणाऱ्या शेतकीच्या धंद्यावरच केवळ अवलंबून असल्यामुळे दिवसेंदिवस दारिद्र्य कसे वाढत चालले आहे, देशात नैसर्गिक संपत्ती विपुल असूनही पाश्चात्य यंत्रविद्येचे व तंत्रप्रधान कारखानदारीचे शिक्षण न मिळाल्याने तिचा उपयोग करून घेऊन स्वतःची समृद्धि कशी करून घेता येत नाही व ते शिक्षण द्यावे असे सरकारासहि कसे वाटत नाही व त्यामुळे हिंदुस्थानचे भवितव्य किती भीषण वाटत आहे हे दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे ही परिस्थिती पालटण्यासाठी काय करावे हेही असंदिग्धपणे सांगितले आहे."3

आवश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर कारखाने काढणे, देशातील कच्च्या मालाचा उपयोग करून घेणे, पाश्चात्य तंत्र यंत्रज्ञान मिळवणे,

कारखानदारीचा व व्यापाराचा विस्तार करणे, बाजार पेठाचे स्वदेशी व परदेशी जाळे फैलावणे, अनुकूल असे औद्योगिक धोरण आखणे हे उपाय त्यांनी सुचविले. सरकारने आपली पोलीस राज्याची (Police state) नकारात्मक भूमिका सोडून कल्याणकारी राज्याची (Welfare state) विधायक भूमिका स्वीकारायला मात्र हवी. औद्योगिक विकासासाठी अनुदाने, पारितोषिके, सवलती, स्वल्पव्याजाने भांडवल, जकातीमार्फत संरक्षण, यंत्र व तंत्रज्ञानाचा प्रसार व्यापारी शिक्षण वगैरेस सरकारनें प्रोत्साहन द्यावे. औद्योगिक मंडळे स्थापन व्हावीत. कारखान्यासंबंधीचे व्यवस्थापन शास्त्राचे शिक्षणही दिले जावे. भांडवल उभे करण्यासाठी निश्चित व्याजाची हमी देऊन हिंदुस्थानात व परदेशी, कर्जरोखे विकण्याची व्यवस्था करावी व यावर सतत लोकमताचा दबाव असावा अशी विधायक भूमिका त्यांनी घेतली.

दादाभाई नौरोजींनी दारिद्र्याचा सविस्तर अभ्यास केला. हिंदुस्थानातील दरडोई उत्पन्न निश्चित करण्याचा त्यांचा पहिला प्रयत्न होता. त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा बराच काळ इंग्लंडमध्ये गेल्याने त्यांनी व्यापार व उद्योग यांचे महत्व ओळखले होते. नामदार गोखले यांनी शिक्षणावर भर दिला. १९१० मध्ये कायदेमंडळात सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचा त्यांनी ठराव मांडला. शेतकऱ्यांचे दारिद्र्य, अज्ञान व अनारोग्य घालविण्यासाठी सारा कमी करणे, कर्ज कमी करणे व शेती बँका स्थापन करणे या तीन सूचना केल्या.

अशा तऱ्हेचे विचार महाराज गादीवर येतेपूर्वी व येतेवेळी हिंदुस्थानात होते. महाराजांच्या आर्थिक कामगिरीचे सिंहावलोकन केल्यास आपल्या हेच ध्यानात येते की, यापैकी जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपले पुरोगामी विचार मांडलेले आहेत व त्यापेक्षा जास्त महत्वाचे म्हणजे कृती केलेली आहे रानडे, गोखले नेते असल्याने, त्यांच्या हातात बोल कृतित उतरविण्यासाठी सत्ता व संपत्ती नसल्याने, त्यांचे विचार महत्वाचे ठरतात. पण महाराजांच्या बाबतीत विचार, कृती, व सत्तासंपत्ती यांचा योग घडून

आल्याने त्यांच्याइतका सत्ता व संपत्ती ह्यांचा उत्तम वापर प्रजेच्या कल्याणासाठी इतरत्र फारसा कोठे झाला नाही. याला अपवाद म्हणून बडोदा संस्थान, म्हैसूर संस्थान याना वगळायला हवे. वास्तविक माणसाच्या हातात सत्ता व संपत्ती एकवटली म्हणजे त्याचा दुरुपयोगच जास्त होतो हे आपल्याला आधुनिक काळातसुद्धा दिसून येते. लॉर्ड ॲक्टन याने म्हटल्याप्रमाणे 'Power tends to corrupt. Absolute power corrupts absolutely.' या दोन्ही पैकी एक सुद्धा माणसाच्या लहरी प्रमाणे राज्य कारभार घडवून आणते. पण दोन्हीही असून सुद्धा महाराजांनी त्यांचा वापर प्रजेच्या हितासाठी केला हे महत्वाचे.

त्या वेळेला महाराष्ट्र विचारांच्या झंझावतात सापडलेला होता. महाराष्ट्रात तीन-चार विचार प्रवाह होते. एक विचार प्रवाह होता लोकहितवादी गोपाळराव देशमुखांचा. ब्राह्मणांनी आपली सुधारणा करवून घेऊन कनिष्ठांशी बंधूप्रेमाने वागावे, त्यांचीही सुधारणा घडवून आणावी व त्यांना बरोबर घेऊन वाटचाल करावी अशा मताचे ते होते. दुसरा प्रवाह होता आगरकर व रानडे यांचा. यांचे मत सामाजिक सुधारणेला जास्त अनुकूल होते. आधी सामाजिक सुधारणा घडवून आणावी व नंतर राजकीय सुधारणा घडवून आणावी अशा मताचे ते होते. तिसरा प्रवाह होता म. फुले यांचा, त्यांनी संपूर्ण लक्ष सामाजिक सुधारणेवर केंद्रीत केले होते. समाज क्रांतीची त्यांनी तुतारी फुंकली होती. चवथा विचार प्रवाह होता विष्णूशास्त्री चिपळूणकर प्रेरित टिळक प्रवाह. यांनी लक्ष केंद्रित केले राजकीय स्वातंत्र्यावर. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर सामाजिक सुधारणा आपोआप घडवून आणता येतील असे त्यांचे मत होते.

या विचारांच्या भोवऱ्यात महाराष्ट्र होता त्यावेळी कोल्हापूर संस्थानची राजकीय व आर्थिक परिस्थितीही अनुकूल नव्हती. म्हाराजांच्या आधीचे संस्थानचे अधिपति अल्पायुषी असल्याने अल्प कारकिर्दीचे ठरले. कोल्हापूरची Mother of Minorities अशी प्रसिद्धी झाली होती.

संस्थानाधिपती अल्प कारकिर्दीचे असल्याने राज्यकारभाराला स्थिरता नव्हती. आणि राज्यकारभाराला स्थिरता नसल्याने विधायक स्वरुपाची आर्थिक प्रगती होऊ शकली नाही.[5] महाराजांनी ज्या वेळेला अधिकारसुत्रे हाती घेतली त्या वेळेला त्यांना प्रथम प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले व याच बरोबर त्यांनी विधायक कार्याकडे आपला मोहरा वळवला. शिवाजी महाराजांनाही सुरवातीला प्रतिकूल परिस्थिती आटोक्यात आणून विधायक कार्य करावे लागले. शिवाजी महाराजांचे काम राष्ट्रीय पातळीवरचे होते. त्या मानाने श्री शाहू छत्रपतींचे कार्य स्थानिक स्वरुपाचे होते. हा त्यातला फरक जर सोडला तर दोन्ही राज्यकर्त्यांना दुहेरी स्वरुपाची कामगिरी करावी लागली याबाबत दुमत होण्याचे कारण नाही. महाराजांवर आणखी एक बडपण होते आणि ते म्हणजे महाराजांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करताना महाराज एक ब्रिटिश संस्थानिक होते हे आपल्याला कधीच विसरुन चालणार नाही. महाराजांवर "स्वराज्यद्रोही छत्रपती" अशी टीका केली जाते. महाराजांना ब्रिटिशांपुढे नमते घ्यावे लागले. त्यांनी नमते घेतले नसते तर ते अधिकार पदावर राहू शकले नसते. आणि जे महान कार्य त्यांनी घडवून आणले त्याचाही लाभ प्रजेला व महाराष्ट्राला मिळाला नसता. ते म्हणत असत की, स्वराज्याच्या मी कधीही विरुद्ध नाही पण स्वराज्य उपभोगण्यासाठी प्रथम लोकांना लायक करणे आवश्यक आहे. आणखी एक बंधन आपल्याला लक्षात घ्यायचे म्हणजे आधुनिक काळात आर्थिक विकासासाठी सर्वांचे-केंद्र सरकार, राज्यसरकार, जनता आर्थिकसंस्था, इतर देश-सहकार्य मिळू शकते. त्या वेळेस महाराज हे एकांडे शिलेदार होते आणि सर्वच धुरा त्यांना सांभाळावी लागली.

महाराजांचे चरित्र लिहिण्याचा प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश नाही. परंतु त्यांच्या आयुष्यातील ठळक टप्पे दर्शविण्यास जर छोटासा चरित्रपट तयार केला तर तो अगदीच अप्रस्तुत होणार नाही. त्यामुळे त्यांची कामगिरी कळू शकणार नाही. परंतु ज्याना महाराजांबद्दल काहीच माहित नाही त्यांना त्यांच्याविषयी परिचय घडू शकेल. श्री शाहू छत्रपतींचा जन्म २६ जुलै

१८७४ मध्ये झाला. महाराज कागल जहागिरीचे (थोरली पाती) अधिपती जयसिगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे थोरले चिरंजीव. त्यांचे मूळचे नांव यशवंतराव. कोल्हापूर संस्थानचे अधिपती चवथे शिवाजी महाराज यांचा मृत्यू १८८३ मध्ये झाला. त्यानंतर महाराजांचे जन्मदाते श्री. आबा-साहेब घाटगे हे रिजंट म्हणून कोल्हापुरचा राज्यकारभार पाहू लागले. त्यांच्या कारकिर्दीपासूनच कोल्हापुरच्या राज्यकारभारास थोडी फार स्थिरता लाभू लागली. चवथे शिवाजी महाराज यांच्या धर्मपत्नी महाराणी आनंदीबाईसाहेब यांनी महाराजास दत्तक घेऊन राज्याचे वारस म्हणून जाहीर केले व त्यांचे नामाभिधान शाहू असे केले. १७ मार्च १८८४ मध्ये त्यांना कोल्हापुरच्या गादीवर समारंभपूर्वक बसवण्यात आले. २० मार्च १८८५ मध्ये महाराजांच्या जन्मदात्यांचे निधन झाले. महाराजांचे शिक्षण प्रथम राजकोट येथे व नंतर धारवाड येथे झाले. राजकोटला ते एप्रील १८८९ पर्यंत होते. त्यानंतर ४ वर्षे ते धारवाडला होते. धारवाडलाच त्यांना श्री. फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला. नियोजित अभ्यासक्रम १८९३ साली आटोपला. शिक्षणक्रम चालू असतानाच त्यांनी फार मोठा प्रवासही केला. पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रवासातील अनुभव मिळावे, संपूर्ण हिंदुस्थान नजरेखालून जावा, दृष्टी चौफेर व्हावी, परिपक्वता यावी, या साठी हा प्रवास केला गेला. १८९० मध्ये उत्तर हिंदुस्थान, नंतर सिलोन व दक्षिण हिंदुस्थान, १८९२ मध्ये वायव्य हिंदुस्थान, पंजाब, राजपुताना, सिंध या भागांचा महाराजांनी प्रवास केला. १८९१ मध्येच बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी महाराजांचा विवाह झाला. २ ॲप्रिल १८९४ ला त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली व त्याचबरोबर कोल्हापूर संस्थानला गेली ५६ वर्षे जो minority चा शाप होता तो नष्ट झाला. १८९५ मध्ये ब्रिटिशांनी महाराजांना G.C.S.I. चा मान दिला. मे १९०० मध्येच खळबळजनक वेदोक्त प्रकरण निर्माण झाले. १९०२ मध्ये सातवा ॲडवर्ड बादशहा यांच्या राज्यारोहण समारंभाकरिता महाराज इंग्लंडला गेले. राज्यारोहण समारंभ लांबणीवर पडल्याने त्यांनी इंग्लंड व कॉन्टिनेन्टची सफर केली. त्यावेळी सातव्या

अेडवर्ड बादशहाने G.C.V.O. व केंब्रिज विद्यापीठाने अेल्. अेल्. डी. ही पदवी दिली. १९०८ मध्ये महाराजांची कन्या राधाबाई (जन्म १८९५) यांचा विवाह देवासचे राजे तुकोजीराव पवार यांच्या बरोबर झाला. १ जाने. १९०९ मध्ये छत्रपतींना २१ तोफांच्या सलामीचा मान मिळाला. १९११ मध्ये G.C.I.E. हा बहुमान त्यांना प्राप्त झाला. १९१५ मध्ये १०३ मराठा लाइट इन्फंट्रीचे त्यांना ऑनररी कर्नल बनवण्यात आले. जून १९१७ मध्ये महाराजांचें धाकटे युवराज शिवाजी (जन्म १८९९) यांचा विवाह सासवडचे शंकरराव जगताप यांची कन्या इंदुमती यांच्या बरोबर झाला. पण १२ जून १९१८ ला शिकार करताना दुर्दैवाने युवराज शिवाजी यांना घोड्यावरून पडून मृत्यू आला. पहिल्या महायुद्धात महाराजांनी ब्रिटिशांना बहुमोल मदत केली १९२० मध्यें शाहू वैदिक स्कूल स्थापन करण्यात आले. १९२१ ला प्रिन्स ऑफ वेल्स पुण्याला आले असता शिवाजी मेमोरियल संस्थेचा पायाभरणी समारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. हे घडवून आणण्यात महाराजांनी फार मोठा पुढाकार घेतला होता. ६ मे १९२२ ला मुंबई येथें त्यांना मृत्यू आला. अेकूण २८ वर्षे त्यांनी राज्यकारभार केला.

महाराजांनी ज्या वेळेला १८९४ मध्ये राज्यकारभार हाती घेतला त्यावेळेला त्यांच्याबद्दल लोकांनी मोठ्या अपेक्षा धरल्या होत्या अर्थात त्या अपेक्षा मोठ्या जागी धरल्या गेल्या व त्यांना फळेही मिळाली हा दुग्ध शर्करा योग. १८९४ मध्ये पुण्याला जी सार्वजनिक सभा भरली होती त्या मध्यें ना. गोखले यांनी मोठ्या अपेक्षा महाराजांच्या बाबतीत व्यक्त केल्या होत्या. ३-४-१८९४ ला प्रसिद्ध झालेल्या " केसरी " मध्ये "करवीर क्षेत्री राजकीय कपिलाषष्टीचा योग " असा लेख आला होता. त्यामध्यें लो. टिळकांनी पुढील प्रमाणे विचार व्यक्त केले.

" गेल्या शतकात आमच्या लोकांनी जे हिंदुराज्य स्थापण्यास प्रारंभ केला आणि ते बहुतेक स्थापिले होतेच असे म्हटले तरी चालेल. त्याचें एक मूळ हल्ली करवीर क्षेत्रातच काय ते राहिले आहे एवढे येथे सांगितले म्हणजे या संस्थानची योग्यता आम्हास विशेष का वाटते व महाराष्ट्रीयांना

त्यांच्या भरभराटीबद्दल कळकळ व अभिमान का असावा ह्याचे बीज कोणच्याही अगदी सहज लक्षात येईल. असल्या संस्थानास आज जो उत्सवाचा दिवस प्राप्त झाला आहे तो सर्व महाराष्ट्रीयासही त्याचप्रमाणे आनंदाचा व उत्सवाचा वाटत आहे हे आम्ही सांगावयास पाहिजे असे नाही.

करवीर संस्थानच्या प्रजेस तर कोल्हापूर गादीवर श्री. शाहू महाराज छत्रपती ह्यांची स्थापना झालेली पाहून प्रतिपच्चंद्रदर्शनाप्रमाणे आनंद झाला असेल यात संशय नाही.

कोल्हापूरच्या प्रजेस आपल्या राज्यकर्त्यांच्या अमलाखाली राहण्याचा प्रसंग बहुतेक मुळीच आला नाही असे म्हटले तरी चालेल. श्रीमंत बाबासाहेब महाराज सन १८३७ साली गादीवर आले पण ते अज्ञान असल्यामुळे तेव्हापासून दिवाणशाही, रिजंटशाही आणि कौन्सिलशाही यांस जी सुरवात झाली आहे ती बाबासाहेब महाराज यांच्या मुखत्यारीची तीन वर्षे खेरीज करून आज तारखेपर्यंत सतत अंकसारखी चालू आहे. येवढ्या मुदतीत इंग्रजी कायदेकानू, हॉस्पिटलें, शाळा, मोजणी इमारती वगैरे बहुतेक इंग्रजी सुधारणा कोल्हापुरच्या राज्यात सुरू होऊन तेथील प्रजेस खालसा मुलुखातील प्रजेप्रमाणेंच सुयंत्रित राज्यव्यवस्थेचा अनुभव मिळाला व मिळत आहे ही गोष्ट खरी आहे. पण मराठी संस्थानच्या प्रजेचे अशा रीतीने परकीयांनी किती जरी संगोपन केले तरी बोर्डिंगात घातलेल्या मुलास केव्हाना केव्हातरी आपल्या आईबापांची आठवण होऊन त्यांच्या दर्शनाकरिता जशी उत्सुक होतात तद्वतच करवीर संस्थानच्या प्रजेची मनोवृत्ती झाली होती '[4]

कोल्हापुरच्या जनतेची महाराजांबद्दलची भावना काय होती हे ह्या मध्ये अगदी समर्पक शब्दात व्यक्त केले आहे आणि नंतर ह्याच लेखात धंदेवाईक शिक्षण (तांत्रिक शिक्षण) प्राथमिक शिक्षण, व इतर सुधारणांची महाराजांकडून कशी व किती अपेक्षा आहे हेही व्यक्त केलें आहे. अर्थात महाराजांबद्दलच्या ज्या अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या त्यापेक्षा कितीतरी

अधिक क्षेत्रात महाराजांनी भरघोस कामगिरी केलेली आहे. त्यांनी ज्या वेळेला आपल्या राज्यकारभाराला सुरवात केली त्यावेळेला आपल्या प्रजेला उद्देशून पुढील जाहीरनामा काढला.

" आमचे प्रजाजन सदासुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितासंबंधाची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे जहागीरदार, आप्तजन, सरदार, मानकरी, इनामदार, कामदार, सर्व दर्जाचे शेट सावकार व इतर प्रजाजन ह्यांच्या उज्वल राज निष्ठेची व सहकार्याची आम्हास आवश्यकता आहे. आज आमच्या आमदानीस सुरुवात होणाऱ्या दिवशी आमचा राज्यकारभार दीर्घकाळपर्यंत टिकून तो सुखद व्हावा म्हणून आम्ही त्या परात्पर जगच्चालकाच्या अनुगृहासाठी प्रार्थना करितो."5

या जाहीरनाम्यात महाराजांनी आपले राज्यकारभाराचे ध्येय स्थूलमानाने सांगितले आहे. परंतु नंतर वेळोवेळी त्यांनी अगदी स्पष्ट शब्दात आपले उद्दिष्ट स्पष्ट केले आहे. आधुनिक काळात सर्वराष्ट्रांनी विशेषत: मागासलेल्या राष्ट्रांनी आपले आर्थिक वाढीचे ध्येय स्वीकारले आहे. राष्ट्रीय उत्पादन, उत्पन्न, रोजगार वाढविणे हेच बहुतेक राष्ट्रांनी स्वीकारलेले ध्येय आहे. लोकसंख्येमध्ये होणाऱ्या वाढीपेक्षा राष्ट्रीय उत्पादनामध्ये पडणारी भर ही जास्त असायला हवी. म्हणजेच राष्ट्राचे दरडोई उत्पन्न वाढल व लोकांचे जीवनाचे राहणीमान वाढेल. महाराजांनी कारकिर्दीच्या सुरवातीला आर्थिक बाबतीत हेच ध्येय स्वीकारले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की अज्ञान, अंध:श्रद्धा व दारिद्रय हे तीन शत्रू आहेत व ते नष्ट करण्यासाठी अेकाचवेळी सर्व आघाडीवरुन हल्ला चढवला पाहिजे. प्रजाजनांचा अैहिक उत्कर्ष घडवून आणणे, संस्थानचा अैहिक भरभराट करणे, हे अेकाच वेळी घडण्यासाठी त्यांनी निरनिळया क्षेत्रातून कार्य करायला सुरूवात केली! फेब्रुवारी १९२० मध्ये महाराजांचे शिक्षक श्री. फ्रेजर यांनी निरोपाची भेट दिली होती. त्या वेळच्या भाषणात उद्देशून महाराजांनी सांगितले.

"During all this time, it has been my earnest wish and constant endeavour to do everything in my power to educate the masses, to inspire them with a higher standard of life, to root out, superstition and with it the causes that have led to the singularly artificial state of our society-the inequalities between man and man that we see on all sides. The task is not easy nor the work light. The inertia of ages has to be overcome and the old order of things has to be changed out and out." 6

ह्या वाक्यातच त्यांनी त्या काळच्या समाजातील दोष, त्यांनी ठरवलेले ध्येय व त्यासाठी करावयाची उपाय योजना ह्यावर नेमके बोट ठेवले आहे. हे त्यांच्या कारकिर्दीच्या प्रारंभापासून स्वीकारलेले उद्दिष्ट होते. त्यासाठी सबंध हिंदुस्थानचा प्रवास झाल्यानंतर त्यांनी कारकिर्दीला सुरवात केली तीच प्रथम आपल्या संस्थानचा दौरा काढून. संस्थानातील प्रजेची परिस्थिती काय आहे, शेतकरी कोणत्या स्थितीत आहेत हे समजून घेण्यासाठी त्यांनी हा प्रवास केला. प्रजेमध्ये मिसळून प्रजेची दुःखे काय आहेत हे जाणून घेण्यासाठी त्यांनी आपल्या राज्याची पाहणी केली. प्रजेपासून त्यांना अलिप्त राहायचे नव्हते. त्याउलट मधल्या इतर कोणाचीही मदत न घेता स्वतः प्रत्यक्षच त्यांना प्रजेला सामोरे जायचे होते. पूर्वीच्या काळी रात्रीच्या वेळी खलिफा वगैरे लोक वेष बदलून आपल्या राजधानीतून व राज्यातून खरी स्थिती जाणून घेण्याकरिता हिंडत असल्याच्या कहाण्या आपण ऐकतो व वाचतो. पण हा आधुनिक काळातील छत्रपती प्रजेमध्ये मिसळत असे, गप्पा मारत असे, त्यांच्या बरोबर खातपीत असे, आपले-पणाची भावना निर्माण करत असे. राजा हा प्रजेचा संरक्षक आहे ही जाणीव त्यांना निर्माण करायची होती.

" ठरीव मार्गाने मिळणाऱ्या माहितीवर विशेष विसंबून न राहता कोणत्याही बाबतीत प्रत्यक्ष माहिती मिळविण्याची महाराजांना मोठी हौस

असे. सर्वसाधारण जनता किती गाढ अज्ञानांधःकारात चाचपडत पडली आहे व निरनिराळ्या खात्यामार्फत उपलब्ध होणारी माहिती धूर्त लोकांच्या डावपेचामुळे व अधिकारी लोकांच्या पक्षपातीपणामुळे किती रंगविलेली असते, हे महाराजांना पूर्णपणे ठाऊक होते. दौऱ्यावर असताना किंवा राजधानीत असताना दलित गरीब लोकांशी आपला प्रत्यक्ष संबंध कसा येईल ह्याचकडे महाराजांचे विशेष लक्ष असे. महाराज आपला शक्यतितका वेळ जंगलामध्ये व खेडयापाडयामध्ये फिरण्यात घालवीत. जंगलात भटकल्यापासून महाराजांना शिकार करिता येऊन गरीब लोकांची स्थिति त्यास प्रत्यक्ष पाहाता येई"7

त्यांनी सुरवातीला स्वतःसाठी बरेच काम राखून ठेवले होते. परंतु ते यशासाठी की प्रत्यक्षात सर्व हाकिकत त्यांना समजून घ्यायची होती ज्याला खरोखरच प्रजेच्या हिताची तळमळ आहे तो राजा ह्या पेक्षा वेगळा कसा वागू शकणार ? हे ध्येय महाराजांनी एकदा ठरवल्यानंतर भाषणातून व त्यांच्या कृतीतून ह्या बद्दलचे पडसाद उमटू लागले. महाराजांच्या भाषणावरुन आपल्याला दिसून येते की, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक या सर्व बाबतीत महाराजांनी एकाच वेळी कार्य करायचे ठरवले होते. कारण ही सर्व एकाच समाजरथाची अनेक अंगे आहेत. प्रजेचे सर्वांगीण कल्याण त्यांना साधायचे होते, बहुजन समाजाची आर्थिक व सामाजिक विषमता, अज्ञान व अंधश्रद्धा हे आधुनिक शिक्षण व औद्योगिकरण याच्या साहाय्याने त्यांनी दूर करण्याचे ठरविले. बहुजनसमाजाची दुःखे त्यांनी ओळखली होता. बहुजनसमाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठीच त्यांनी वेगवेगळ्या प्रकारची उपाय योजना केली होती. ते एक जबाबदार व प्रामाणिक राज्यकर्ते होते. त्यांनी सर्व प्रश्नांचा विचार केला होता. त्यांच्या भाषणातून ते सांगत असत की, जातिभेद हा आपल्या समाजाचा रोग आहे व तो मुळातूनच नष्ट करून टाकणे आवश्यक आहे. जातिभेदामुळे समाज विस्कळित होतो. समाजातील, राष्ट्रातील एकीची भावना नष्ट होते व राष्ट्राची आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगति खुंटते. देशाच्या उन्नतिच्या मार्गातील तो एक मोठा अडथळा आहे. ज्या प्रमाणात जातिभेद नष्ट होईल

त्या प्रमाणावर देशाची प्रगती अवलंबून राहील. जपान मधील सामुराई जातीप्रमाणे आपल्याकडेही पुढारलेल्या ब्राह्मणवर्गाने आपल्या बहुजनसमाज बांधवांना मदतीचा हात देऊन त्याला बरोबर घेऊन प्रगती केली पाहिजे.

"खालील जातींनी आपली सुधारणा करून आपला दर्जा वाढवून घेण्याचा व वरच्या पायऱ्यांवर चढण्याचा प्रयत्न चालूच ठेवला पाहिजे. आणि वरील जातींनीहि जरूर तर काही पायऱ्या खाली येऊन त्यांना हात देऊन वर घेतले पाहिजे. असे झाले म्हणजे सुरळीतपणे व सलोख्याने हे जातीभेद मोडण्याचे बिकट काम सिद्धीस जाण्याचा संभव आहे."[8]

माणसाने आपला जात्याभिमान मर्यादित ठेवावा. अवास्तव वाढू देऊ नये असे त्यांचे मत होते. कारण आपण प्रथम हिंदी आहोत देशाच्या उन्नतीकडे आपण प्रथम लक्ष पुरविले पाहिजे अशा विचाराचे ते पुरस्कर्ते होते.

सामाजिक क्षेत्रात अस्पृश्योद्धाराच्या बाबतीतही त्यांचे कार्य मौल्यवान अशा स्वरूपाचे आहे. १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या प्रारंभी या चळवळीला प्रारंभ झाला. ह्या क्षेत्रात समाजक्रांतीची तुतारी महात्मा ज्योतिराव फुले ह्यांनी फुंकली. त्यांचे राहिलेले कार्य महाराजांनी हाती घेतले. नागपूर येथे १९२० मध्ये भरलेल्या 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या' निमित्ताने महाराज म्हणाले होते.

"अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निंद्य आहे. ह्या शब्दाचा सर्वजण उपयोग करतात म्हणूनच केवळ मी त्याचा येथे उपयोग केला आहे. तुम्ही अस्पृश्य नाही. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिवान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी, असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटकावयव आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क समसमान तरी खास आहेतच अशी भावना धरून आपणास पुढील कामास लागले पाहिजे."[9]

माणसाला पशुसारखे वागवून चालणार नाही माणसाला माणसासारखे वागविल्या शिवाय राजकारण, अर्थकारण व समाजकारण होणे शक्य नाही असे त्यांचे मत होते. ते केवळ उपदेशच करत नव्हते तर त्यांनी आपले बोल कृतीत आणण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. त्यांनी अस्पृश्यता कधीच पाळली नाही. मराठा जातीतल्या व्यक्तिनी जरी पाळायचा प्रयत्न केला तर त्यांना ते आवडत नसे. ते मागासलेल्या समाजात मिसळत व जेवत असत. त्यांनी आपले अनेक व्यक्तीगत नोकर या वर्गातून निवडले होते. त्यांच्या हातचे ते पाणी पीत असत. त्यांनी आपल्या आयुष्यभर कोणताच भेदभाव पाळला नाही. पण एवढीच भूमिका स्वीकारुन ते थांबले नाहीत तर त्यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी झटून प्रयत्न केले. त्यांना सामाजिक दास्यत्वापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. मागासलेल्या जातींसाठी वसतिगृहे काढली. त्यांच्या शिक्षणाची सोय केली. त्यामध्ये त्यांना अनेक प्रकारचा संघटित असंघटित विरोध सहन करावा लागला. परंतु त्याकडे लक्ष न देता ते आपल्या ध्येयाप्रत वाटचाल करीत राहिले. आपण जे बोलतो त्याप्रमाणे वागतो की नाही हे आपल्या राज्यात येऊन कोणीही प्रत्यक्ष पहावे असे ते म्हणत. अस्पृश्योद्धारक महर्षी वि. रा. शिंदे यांना महाराजांनी शिरोळ कॅपहून १७–७–१९२१ ला अशा तऱ्हेचे पत्र पाठवले होते.

महाराज अविश्रांत काम करणारे कार्यकर्ते होते. शिक्षण व वैद्यकीय मदत यात अस्पृश्यता पाळली जाऊ नये यासाठी महाराजांनी आपल्या संस्थानात कायदे केले. त्यांना संघटित करण्याचेही प्रयत्न महाराजांनी केले. आंतरजातीय विवाह करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. बलुता पद्धती बंद केली. या त्यांच्या सामाजिक कार्याची दखल चांगल्या प्रकारे नामवंत विचारवंतांनी घेतलेली आहे. आणि ते एकाच निर्णयास पोहोचलेले आहेत. तो म्हणजे महात्मा फुल्यांचे अपुरे राहिलेले कार्य महाराजांनी हाती घेतले. व त्यासाठी योग्य व आवश्यक ती कृतीही केली. मान्यवर अर्थशास्त्रज्ञ कै. ध. रा. गाडगीळ यांनी ' बहुजन समाजातील कर्मवीर ' या श्री. द. स.

दरेकर यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिलेली आहे त्या प्रस्तावनेत अगदी थोडक्यातच त्यांनी हा अस्पृश्योद्धाराचा प्रश्न लवकर का उकलला गेला नाही याचे अत्यंत मार्मिक विवेचन केले आहे. त्यानी असे सांगितले आहे की, सर्व क्षेत्रातील पुढारी बऱ्याच अंशी ब्राह्मण वर्गातले होते. त्यांच्या कडून बहुजनसमाज सेवेचे योग्य कार्य घडून आले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे ह्या दोन्ही समाजातील अंतर फार वाढत गेले. ब्राह्मण वर्गाने ह्या समाजाला समजून घेतले नाही, त्यांच्या अंतरंगाचा मागोवा घेतला नाही. दोघांची हिते परस्पर विरोधी वाटू लागली. ब्राह्मण कार्य-कर्ते' आपल्यातले' नाहीत ही भावना मागासलेल्या वर्गात निर्माण झाली. पुढाऱ्यांनी कधी या वर्गाला आपले मानले नाही. आपण त्या समाजातले असे समजले नाही. आपलेपणाची भावना निर्माण झाली नाही. हे मर्म महाराजांनी बरोबर ओळखले. ते नेहमी सांगत असत की, मी तुमच्या-तलाच एक आहे व कृतीनेही तसे दाखवून देत असत. त्यानी शिक्षण देऊन, नोकऱ्या देऊन त्या समाजातले कार्यकर्ते निर्माण केले. अशा तऱ्हेने महाराज लोकसंग्रहक, लोकसंघटक व लोकजागृती करणारे महान कार्यकर्ते होते या बद्दलची खालील उद्धृते बरीच बोलकी आहेत.

"२० व्या शतकांच्या प्रारंभी ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीस परत तोंड फुटले. बडोदा व कोल्हापूर येथील संस्थानिकांनी शाळा, वसतीगृहे व शिष्यवृत्या यांच्या द्वारा ब्राह्मणेतरांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले व संस्थानातील अधिकारपदावर त्यांची नेमणूक करून व निरनिराळ्या खात्यात त्यांना नोकऱ्या देऊन त्यांचा आर्थिक व सामाजिक उत्कर्षाचा मार्ग मोकळा केला. इतर जातींच्या बाबतीत त्यांचा दृष्टीकोन उदार व सर्व संग्राहक होता. मराठ्याप्रमाणे जैन, मुसलमान, लिंगायत, अस्पृश्य या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे काढून त्यांच्या शिक्षणालाही त्यांनी मदत केली.'[10]

"जोतिबांच्या मृत्यूनंतर कांही वर्षांनी कोल्हापूरचे शाहू छत्रपती यानी त्यांचे कार्य पुन्हा हाती घेतले. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी पैसा खर्च

केला. संस्थानच्या नोकरीत त्यांचा समावेश करून घेतला. आणि कोल्हापूर शहरामध्ये उपहारगृह चालविण्यासही कांही अस्पृश्याना प्रोत्साहन दिले " 11

" ...ह्या चळवळीला विशेष जोर चढला तो कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या पाठिंब्यामुळे. १८९४ साली शाहू महाराजांनी अधिकार सूत्रे हाती घेतली. आणि तेव्हापासूनच त्यांनी ब्राम्हणेतर समाजाच्या उद्धाराच्या कार्यास प्रारंभ केला. या समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतीगृहे काढली, त्यांना शिक्षणास उत्तेजन दिले. अस्पृश्यता निवारण्याची मोहीम काढली." 12

महाराजांनी समाज प्रबोधनाच्या बाबतीत केलेलेली कामगिरी सर्वश्रुतच आहे. त्याच बरोबर आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी केलेल्या कामगिरीचा सविस्तर उल्लेख या पुस्तकात वेळोवेळी येणारच आहे. त्यांच्या बद्दल अनेकांनी आपली मते व्यक्त केली आहेत. यातील काही निवडक मते जर विचारात घेतली तर महाराजांच्या व्यक्तिमत्वाची आपल्याला कल्पना येते. यामध्ये स्वकीय परकीय सर्वांचा समावेश आहे. ऑक्टोबर १९०४ मध्ये हिज् एक्सेलंसी लॉर्ड लॅमिग्टन यांनी कोल्हापुरला भेट दिली होती. तेव्हा त्यांनी आपल्या भाषणात असे सांगितले होते की, सर्वसाधारण समाज संघटनेतून जे वगळून टाकले गेलेले वर्ग आहेत त्यांना जास्त चांगले सामाजिक स्थान प्राप्त करून देणे ह्यापेक्षा जास्त मानवतावादी, दृष्टीकोनातून इतक्या वरच्या दर्जाच्या माणसाकडून कार्य केले जाईल यावर विश्वासच बसत नाही. महाराजांच्या कन्येच्या विवाहाच्या निमित्ताने अनेक व्यक्तींनी कोल्हापूरला भेट दिली. त्या वेळेला अशाच एका माणसाने आपले मत प्रगट केलेले आहे. महाराजांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी होते. कांही थोड्या राजापैकी हा असा एक राजा आहे, ज्याने आपल्या संस्थानातच आपले कार्य शोधले आहे व प्रजेच्या सुखातच आपला आनंद पाहिला आहे. महाराजांची कारकीर्द किती लाभदायक झाली हे पहावयाचे असेल तर कोल्हापुरला जावे आणि ऐहिक भरभराटीची बाह्य मानचिन्हे पाहून यावीत ! महाराजांच्या कारकिर्दीच्या शेवटी मुंबईचे गव्हर्नर हिज

एक्सेलंसी सर लॉईड्स् यांनी भेट दिली होती (१९१९-२० चा अहवाल) त्या वेळच्या समारंभात गव्हर्नरांनी उत्तरादाखल भाषण केले.

"" आपल्या कारकिर्दीत शिक्षणाच्या क्षेत्रात किती मोठी प्रगती आपल्या मार्गदर्शनाखाली झालेली आहे हे मी ऐकले आहे. आपल्या कडूनच लोकांना मोफत प्राथमिक शिक्षणाची देणगी मिळालेली आहे. वसतीगृहांची जी पद्धत आपण सुरू केलेली आहे याबद्दल मी फारसे ऐकलेले नाही. परंतु आज दुपारी मी ते प्रत्यक्षच पाहिले. हे सर्व बघून मला फार बरे वाटले. त्याचा माझ्यावर फार प्रभाव पडला. या पद्धतीमुळे सर्व जातीच्या मुलांना अडथळ्याविणा सहज शिक्षण घेता येणार आहे. शिक्षणाची संधी त्या मुलांना प्राप्त होणार आहे. याशिवाय त्यांना आपली प्रगती साध्य करून घेता येणार नाही. अन्नधान्याच्या नियंत्रणाच्या बाबतीतही आपण जे व्यक्तिगत लक्ष दिलेत त्यामुळे लोकांना चांगले मार्गदर्शन मिळाले आणि त्यामध्ये जो असंतोष आणि मतभिन्नता होती तीही निघून गेली."13

ब्रिटीश राज्यकर्त्यांकडूनही वेळोवेळी महाराजांच्या सर्वच कार्याची यथायोग्य दखल घेतली गेली. ह्याच लॉईडस्नी महाराजांच्या मृत्युनंतर कोल्हापुरला भेट दिली होती. त्या वेळेला महाराजांच्या कार्याचे मूल्यमापन करताना त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, जे जे महाराजांच्या सहवासात आले त्या सर्वांचे प्रेम व आदर महाराजांनी संपादन केला. या राज्यकर्त्याने आपल्या डोळ्यासमोर कार्यासंबंधी काही विशिष्ट ध्येये ठेवली होती, त्यांच्यामध्ये ती ध्येये प्राप्त करून घेण्याची पात्रताही होती व बळही होते. कोल्हापूर संस्थानात त्यांच्या व्यक्तिगत सामर्थ्याचा आणि उत्साहाचा ठसा उमटलेला आहे. त्यांच्या मृत्युमूळे मागासलेल्या वर्गाला आपला एक मित्रच गमावल्यासारखे झाले आहे.

श्री. मनोहर माळगावकरांनी आपल्या "छत्रपतीज् ऑफ कोल्हापूर" या पुस्तकात महाराजांसंबंधी गौरवोद्गार काढलेले आहेत, ते म्हणतात-

"Within a very few years of coming on the Kolhapur gadi this prince Shahu Maharaj, showed himself to be enlightened and progresive ruler who strove hard for the welfare of his subjec s. They remember him still with a curious mixture of reverence and awe, combining both loyalty and regard, remember him as someone who in his person truly exemplified the quality of the illustrious family title he bore: the Chhatrapati, a man who was both their prince and their protector". [14]

"The coming of Shahu Maharaj as the successor to the Kolhapur gadi ushered in Kolhapur most progressive and prosperous years"

" In his regin of exactly twenty-eight years, Kolhapur had made amazing strides both as regards industrial progress and social reforms ."[15]

महाराजांनी प्रजेचे कल्याण बघताना खेळ व मनोरंजन याकडेही दुर्लक्ष केले नाही. खेळाना राजाश्रय दिल्यानें महाराजांची लोकप्रियता वाढली ते स्वतः घोडदौड करण्यामध्ये व शिकार करण्यामध्ये अत्यंत निष्णात असे होते. लाठमारीच्या खेळाला त्यांनी प्रोत्साहन दिल. त्या करिता मैदानही बांधून घेतले. पण ज्या खेळासाठी त्यांचे नांव दीर्घ काळपर्यंत लक्षात राहील तो खेळ म्हणजे कुस्ती. हा खेळ परदेशी नव्हता व महागडा तर मुळीच नव्हता. त्यांच्या आमदानीत हा खेळ अत्यंत लोकप्रिय झाला. कारण त्याला राजाश्रय मिळाला आणि कोल्हापूर हे कुस्तीगिरांचे एक आकर्षक केंद्र झाले.

प्रो. ह. वि. मोटे यांनीही आपल्या "विश्रब्ध शारदा" या ग्रंथात महा-

राजांच्या कामगिरीची नोंद घेतलेली आहे.

"कोल्हापुरचे श्री शाहू छत्रपती महाराज हे एक प्रजाहिततत्पर, धाडसी समाजसुधारक व बहुजन समाजाच्या उद्धारासाठी झटणारे एक राजे म्हणून चालू शतकात फार गाजले. प्रजेच्या कल्याणासाठी आपली सत्ता राबविणाऱ्या फार थोडया हिंदी संस्थानिकांपैकी ते एक होते."16

"श्री शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार अठ्ठावीस वर्षे अत्यंत दक्षतेने व राजा हा प्रजेचा सर्व प्रमुख चाकर आहे ही भावना बाळगून चालविला. आपल्या संस्थानाची आर्थिक प्रगती साधण्याच्या प्रयत्नांबरोबरच त्याची सांस्कृतिक प्रगतीही साधण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतहि त्यांनी फार प्रयत्न केले. धर्म, वर्ण, जाती यांच्या संकुचित अभिमानापासून अलिप्त राहून सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी ते आयुष्यभर झटले. त्यासाठी प्रतिगामी शक्तीशी त्यांना अखेरपर्यंत झुंजत रहावे लागले. ह्या झुंजात ते आपल्या राज्यात अखेरीस यशस्वी झाले. त्यांनी केलेली झुंज आणि त्यात मिळविलेले यश हे त्यांच्या नंतरच्या काळातील महाराष्ट्रीय बहुजन समाजास प्रोत्साहक व त्यास गतिशील बनविण्यास फार मोठया प्रमाणात कारण झाले. गेल्या पन्नास वर्षांपासून, मराठी समाजात जे झपाटयाने सामाजिक परिवर्तन होत राहिलेले आहे त्याचे बव्हंशी मूळ कारण श्री शाहू महाराज हेच होत."17

महाराजांना ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून तर अनेक मान सन्मान मिळाले पण त्यांच्याच देशातील लोकांकडून व परकीय लोकांकडून ही जो सन्मानाची व पदवीची बिरूदावली त्यांना मिळाली त्यामुळे ते कोल्हापुरकरांच्या आदरास, मानास व प्रेमास पात्र झाले. त्यांनी आपले कार्य केले कोल्हापूर संस्थानात परंतु त्याचा परिणाम मात्र दूरवर संपूर्ण महाराष्ट्रात पोहचला. कोल्हापूर संस्थानाबाहेर अनेकांना त्यांच्या कार्याचा लाभ मिळाला. महाराजांच्या कारकिर्दीपासूनच कोल्हापूरच्या प्रबोधनाचा काल सुरू झाला

असे म्हंटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. अशा या तरूण छत्रपतीने आपल्या प्रजाजनांच्या आर्थिक भरभराटीसाठी आधुनिक अर्थशास्त्राच्या नानाविध महत्वाच्या क्षेत्रात जी कामगिरी बजावली त्याकडेच आपल्याला आता सविस्तर वळायचे आहे.

## संदर्भ–


1. 'नवरोजी ते नेहरू' – गोविंद तळवलकर १६८
2. 'नवरोजी ते नेहरू' – गोविंद तळवलकर ४६
3. 'विश्रब्ध शारदा' खंड १ संपादक –ह. वि. मोटे १७८
4. लो. टिळकांचे केसरितील लेख भाग १ प्रकाशक– केसरी मराठा संस्था, 'पुणे केसरी,' ३-४-१८९४; २९६
5. 'विश्रब्ध शारदा' खंड १ संपादक–ह. वि. मोटे ३०७
6. 'राजर्षि श्री शाहू महाराजांची भाषणे' संपादक– भगवानराव जाधव १७१-१७२
7. "श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र" – आ. बा. लठ्ठे ९०
8. 'राजर्षि श्री शाहू महाराजांची भाषणे' संपादक–भगवानराव जाधव ९७
9. 'विश्रब्ध शारदा' खंड १ संपादक– ह. वि. मोटे ४१९
10. 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास' – नलिनी पंडीत १९३
11. 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास' – नलिनी पंडीत १९८
12. 'महाराष्ट्र -जीवन परंपरा, प्रगती आणि समस्या' संपादक- गं. बा. सरदार 'समाजकारण' – पु. ग. सहस्त्रबुद्धे ३१४
13. Administrative Report : 1919–20 P. 6
14. "Chhatrapatis of Kolhapur," M. Malgonkar P. 587
15. "Chhatrapatis of Kolhapur," M. Malgonkar P. 588
16. 'विश्रब्ध शारदा' खंड १ संपादक– ह. वि. मोटे ३०६
17. 'विश्रब्ध शारदा' खंड १ संपादक– ह. वि. मोटे ३०८

# शेती व सहकार

" —— That whoever could make two ears of corn or two blades of grass to grow upon a spot of ground where only one grew before, would deserve better of mankind, and do more essential service to his country than the whole race of politician put together "

—Swift

## शेतीचे महत्व—

भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत शेती, तिचा विकास, तिचे आधुनिकीकरण हा विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. प्राचीन व मध्ययुगीन काळातही शेती हेच आपल्या भारतीयांच्या उदरनिर्वाहाचे व व्यापाराचे साधन होते. आधुनिक काळातसुद्धा हे चित्र अेकदम पालटलेले नाही. अजुनही राष्ट्रीय उत्पन्न समिती व सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशनच्या १९७१ च्या आकडेवारीनुसार अेकूण ७०% लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती व संबंधित उद्योगव्यवसाय ह्यावर अवलंबून आहेत व शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ४४% आहे. अशातऱ्हेने भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे. ह्याच व्यवसायामुळे प्राचीन काळात भारत सुवर्ण-भूमि म्हणून ओळखली जात होती. सध्या ह्या शेतीमुळेच नानाविध प्रश्न निर्माण झालेले आहेत. परंतु शेती सुधारणेशिवाय आपल्याला तरणोपाय नाही. आपला आर्थिक विकास आपल्याला साध्य करून घ्यावयाचा असेल

तर शेतीच्या विकासाला प्रथम प्राधान्य द्यायला हवे. ब्रिटिशांच्या कारकिर्दीत शेती सुधारणेकडे पुरेसे लक्ष पुरविले गेले नाही. भारतीय शेती परंपरागत पद्धतीनुसारच केली जात होती. ती पावसाच्या लहरीवरच अवलंबून होती. ब्रिटिशांसाठी कच्च्या मालाची बाजारपेठ अशीच त्या वेळच्या हिंदुस्थानची प्रसिद्धी जगभर झालेली होती.

## महाराजांची भूमिका–

अशा वातावरणामध्ये ज्या संस्थानामधील सर्वच्या सर्व लोक आपल्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून होते तिथे शेतीकडे दुर्लक्ष करून संस्थानाधिकाऱ्यांना चालणार नव्हते. किंबहुना ज्यांनी आपल्या प्रजेच्या ऐहिक भरभराटीचे हातात कंकण बांधून घेतले होते त्यांना शेतीकडे डोळेझाक करणे शक्य नव्हते. आणि असे जे काही अगदी मोजके लोक होते त्यामध्ये आपल्याला महाराजांचा समावेश करावा लागेल. संस्थानामध्ये अधिकार सूत्रे हातात घेतल्यापासून ते अगदी कारकिर्दीच्या शेवटापर्यंत त्यांनी शेतीमध्ये विविध प्रकारच्या सुधारणा केल्या. शेतीचा विकास व्हावा म्हणून सर्व तऱ्हेचे उपाय योजिले. संस्थानामधील नैसर्गिक व मनुष्यनिर्मित संकटांशी झगडत, अेक सतत असा प्रयत्न शेतीप्रगतीसाठी केला. हे सर्व प्रयत्न महाराजांनी १८९५–९६ पासून सुरू केले. या बाबतचे त्यांचे विचार व भूमिका त्यांच्या अनेक भाषणांवरून आपल्याला स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी शेतकऱ्यांना बियाणाच्या, खताच्या, पैशाच्या स्वरूपात मदत केली. शेतीमध्ये संशोधनाला चालना दिली. लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण स्वतः दरबारतर्फे वेगवेगळया लागवडीचे सतत प्रयत्न केले. निधी उभे करून व्यावहारिक व तांत्रिक संशोधनाला गती दिली. संस्थानतर्फे आदर्श शेती सुरू केली. शेतीविषयक प्रदर्शने भरविली. लोकांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली. हरितक्रांती घडवून आणण्यासाठी पाटबंधाऱ्याच्या योजना आखल्या, असे सर्वांगीण प्रयत्न महाराजांनी झटून केले.

## वैचारिक भूमिका--

संपूर्ण ब्रिटिश हिंदुस्थानात महाराजांच्या काळात ८० % लोक शेतीवर अवलंबून होते कोल्हापूर संस्थानचे जवळजवळ सर्वच्या सर्व लोक शेतीवर आपली उपजीविका करीत होते. ८ नोव्हेंबर १९१७ या रोजी ह्या विषया. वरच्या आपल्या भाषणात त्यांनी या प्रश्नाचे सांगोपांग विवेचन केलेले आहे· त्यांच्या मतानुसार भारतीय शेतकऱ्याला चांगली शेती करता येणार नाही असे नाही. परंतु त्याला परंपरागत पद्धतीने शेती करणे भाग पडते कारण त्याच्या आर्थिक परिस्थितीशी तीच मिळतीजुळती आहे. त्याच्या काम करण्याच्या मार्गात काही अडथळे आहेत. हे अडथळे एकूण चार प्रकारचे आहेत. (१)शेतकऱ्याचे अज्ञान-त्याचा अशिक्षितपणा (२)भांडवलाची कमतरता (३)शेतीचा अतिशय लहान आकार (४)शेतीमाल विकण्याबाबत संघटनेचा अभाव. त्या वेळच्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे अतिशय चपखल, अचूक वर्णन व तेही अगदी मोजक्या शब्दात केलेले आपल्याला दिसते.

शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा. केवळ सार्वत्रिक सर्वसामान्य शिक्षण देऊन चालणार नाही. शेतीविषयक विशेष शिक्षणही दिले गेलें पाहिजे. हे ओळखून दोन्ही तऱ्हेच्या शिक्षणाकडे महाराजांनी लक्ष पुरविले. शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. या शिवाय शेतकऱ्यांना त्यांचा परंपरागत व्यवसाय करायचा आहे. त्यांचा व्यवसाय त्यांच्यापासून हिसकावून घेतला जाऊ नये. त्याबद्दल उलट अभिमान निर्माण करायला हवा. यासाठी खेडेगावातील शाळेतच त्यांना शेतीविषयक शिक्षण देण्याचीही सोय करायला पाहिजे हेही ओळखून महाराजांनी त्या दिशेने प्रयत्न केले.

त्या वेळी शेतकऱ्यांना भांडवलाची अत्यंत कमतरता पडत होती. ती दूर करण्यासाठी संस्थानतर्फे, वेगवेगळ्या निधीमार्फत महाराजांनी शेतकऱ्यांना भांडवल पुरविण्याची व्यवस्था केली. शेतीमालाच्या विक्रीसाठी संघटनांच्या

अभाव असल्याने ब्रिटिशांच्या धर्तीवर महाराजांनी सहकारी पतपेढ्या आपल्या संस्थानात स्थापन करायला प्रोत्साहन दिले. आणखी एक दोष शेतीचा होता व तो म्हणजे शेताचा आकार अतिशय लहान होता. किफायतशीर नव्हता. त्याला मुख्य कारण म्हणजे वारसाहक्कच अशा तऱ्हेचा होता की, सगळ्या वारसांमध्ये जमिनीचे समान तुकडे होत असत. याच्यावरचे उपाय संस्थानच्या हातात नव्हते तरी सुद्धा महाराजांनी एक अतिशय धाडसी क्रांतीकारक उपाय योजला होता व तो म्हणजे त्यांनी संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य ठरविली होती. या बद्दलचे विवेचन पुढे तपशीलात येणारच आहे.

शेतीचे महत्व महाराजांना पटले होते. शेती करण्यात कमीपणा आहे अशी जर भावना शेतकऱ्यांमध्ये असेल तर तिचे समूळ उच्चाटन केले पाहिजे असे त्यांचे मत होते.

"कृषिकर्म इतके पवित्र आहे की, वैदिक काळात, वर्षातून अेकदा चक्रवर्ती राजा व त्याचा मंत्रीही (कृषिकर्माची उन्नति करण्याकरिता) नांगर हाकीत असत. ज्याच्या योगाने भूमिमध्ये अेक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते, कृषिकर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानत नाही... आपल्याला माहीत आहेच की, कृषिकर्मापासून दुहेरी उन्नति होते. स्वत:ला सुख होऊन सर्व मनुष्यजातीलाही सुख मिळते... कृषिकर्म करताना क्षात्रधर्माला बाध येतो असे नाही. ज्यावर मनुष्य समाजाची सुव्यवस्था व उन्नति अवलंबून आहे ते कर्म करणारे नीच आहेत, शूद्र आहेत हे म्हणणे मला मुळीच पटत नाही."[1]

शेतीचे महत्व त्यांना खरोखरीच पटले होते आणि म्हणूनच त्यांनी आपल्या युवराजांना कृषिविद्या शिकण्यासाठी विलायतेला व अलाहाबादला शेतीविषयक शाळेत पाठवले होते. हिंदुस्थान शेतीप्रधान देश असला, ८०%

लोक शेतीत गुंतलेले असले तरी त्यापासून जे उत्पन्न आपल्याला मिळत होते ते त्या मानाने कमी होते. इतर देशांशी तुलना केली असता ते कमी होते याची महाराजांना जाणीव होती. यावरून त्यांच्या विचारांचा टप्पा किती दूरवरचा होता याची आपल्याला साक्ष पटते. म्हणूनच हे शेतीतील उत्पन्न वाढविण्यासाठी खटपट करायला हवी याचीही त्यांनी आवश्यकता ओळखली होती. परंतु आवश्यकतेपेक्षा जास्त लोक शेतीत गुंतून फायदा होणार नाही. झाले तर नुकसानच होईल असे त्यांचे मत होते. त्यामुळ उरलेल्या लोकांनी शेतीतच न राहता उद्योगव्यवसायांकडे आपला मोहरा वळवावा अशा भूमिकेचे महाराज पुरस्कर्ते होते. महाराजांची शेतीविषयक भावना पवित्र होती. पण त्याच वेळेस ती व्यावहारिकही होती. शेतीमध्ये जेवढी गुंतवणूक केली जाते त्याच्या कितीतरी पटीने फळ आपल्या हाती येते. शेती हा अतिशय उत्पादक व्यवसाय आहे. त्याचा पुरेपूर उपयोग आपण करून घेतला पाहिजे. शेती हा व्यवसाय हीन मानता कामा नये. कारण त्यावेळेला युरोपात शेतकऱ्यांना सामाजिक स्थान होते, प्रतिष्ठा होती. आपणही योग्य ते वाजवी स्थान शेतीला दिले पाहिजे, त्याशिवाय शेतीचा व पर्यायाने लोकांचा उत्कर्ष होणार नाही ही भावना महाराजांच्या मनात वसत होती. महाराज ज्यावेळेला इटलीला गेले होते त्यावेळेला भारतीय शेतीची व इटलीतील शेतीची त्यांनी तुलना केली होती आणि भारतीय परिस्थितीशी ज्या गोष्टी जुळत होत्या त्यांच्याबद्दल त्यांनी खास चौकशीही केली होती. त्यांच्या मनातून शेती विषयक शिक्षण घेण्यासाठी अखाद्याला इटलीला पाठवावे असे होते. परंतु दुर्दैवाने कोणीही पुढे आले नाही. महाराजांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यावेळेला त्यांनी स्वतःच तत्संबंधी ज्ञान मिळविले व त्यचे प्रयोग आपल्या संस्थानात रजपूतवाडी येथे केले.

## क्रियाशील भूमिका–

महाराजांना शेतीमध्ये विशेष रस होता हे त्यांच्या कारकिर्दीच्या अगदी सुरवातीपासूनच दिसून येते. तसे महाराजांना बरेच शौक होते.

परंतु त्या बऱ्याचशा योकांचा केंद्रबिंदु होता प्रजेचे हित, प्रजेचा ऐहिक उत्कर्ष. कोल्हापुरातील पैसा कोल्हापुरातच रहावा, त्याचा फायदा प्रजेला मिळावा, लोकांना चांगल्या सवयी लागाव्यात, लोकांची शरीरसंपदा सुधारावी, जनावरांची निपज चांगली व्हावी, शेतकऱ्यांचा फायदा व्हावा, सांपत्तिक स्थिती सुधारावी यासाठीच त्यांनी काही परिपाठ घालून दिले. १८९४ ला जेव्हा महाराज अधिकार पदावर आले त्यावेळेला अगदी सुरु-वातीला त्यांनी आपल्या संस्थानची पाहणी केली. संस्थानची पाहणी करण्यामागील प्रमुख हेतू होता प्रजेची आर्थिक परिस्थिती समजावून घेणे व प्रदेश व प्रजा यांचे जवळून निरिक्षण करणे. आणि हे त्यांनी सुरवातीलाच इतके बारकाईने केले की, सामान्य प्रजा व महाराज यांच्यामध्ये अगदी जिव्हाळ्याची भावना निर्माण झाली. गारगोटी, भूधरगड, पन्हाळा, गड-हिंग्लज, कटकोळ इत्यादी पेठ्यातील गावांची त्यांनी पाहणी केली. पाहणी मध्ये त्यांना असे आढळून आले की संस्थानच्या ग्रामीण भागात छोटया छोटया खेडेगावात शेतीचे पाण्याच्या बाबतीत खूपच हाल होतात. भूधरगड, पन्हाळा, कटकोळ ह्या पेठ्यात बराचसा प्रदेश आधी मुळातच डोंगराळ व निःसत्त्व. त्यामुळे लोकांची परिस्थिती अत्यंत दयनीय, हलाखीची झाली होती. त्यामानाने गडहिंग्लज पेठ्यातील परिस्थिती बरीच समाधानकारक होती. लोक सुखी होते. पण भूधरगड पेठ्याचा भाग सह्याद्रीच्या रांगा लगतच असल्याने तो सुपीक नव्हता. सुपीक प्रदेश नसल्याने लोकांना जमिनीपासून उदरनिर्वाहापुरते उत्पन्न मिळत नव्हते. त्यामुळे त्या प्रदेशा-नजिकची जी संस्थानची जंगले होती त्यामध्ये ह्या लोकांकडून ढवळा-ढवळ होत होती. त्याबाबत तक्रारी येत होत्या. उपजीविकेचे साधन अगदी अपुरे असल्याने जंगलातील लोकांना काही वेळेला साहजिकच चोरीचा मोह होत असे. या जंगलातील लोकांना जर सवलती दिल्या तर ते जंगलाचा पुरेपूर फायदा उठवत होते त्यामुळे दरबारतर्फे त्यांना सवलती देतानाही विचार करावा लागत होता. या सगळ्या गोष्टींमुळे त्या भागांतील रयत लोकही दारिद्र्याने पिचून, गांजून गेले होते. रयत लोकांचा कर्जबाजारीपणा हा अगदी कळसाला पोहोचला होता. त्यांच्या

कर्जबाजारीपणामुळे त्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात गेल्या होत्या. रयत लोकांच्या शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांकडून काढून घेणे आवश्यक होते पण त्यासाठी इलाज नव्हता.

## शेतीसंशोधन-लागवडीचे विविध प्रयोग-

शेतीसंशोधनावर महाराजांचा प्रथम पासून भर होता. शेती संशोधन हे तात्त्विक सिद्धांतापुरतेच मर्यादित नव्हते तर त्यातील व्यावहारिक बाजूबद्दल महाराजांना विशेष आस्था होती. शेतीमध्ये नवीन नवीन लागवडीचे प्रयोग त्यांनी संस्थानतर्फे करविले. त्यामध्ये स्वतः जातीने देखरेख केली. काही वेळेला वस्तूला किमत चांगली येते म्हणून, काही वेळेला व्यवसाय किफायतशीर म्हणून तर काही वेळेला हवामान अनुकूल म्हणून त्यांनी वेगवेगळे प्रयोग केले. यामध्ये अगदी डोळ्यात भरण्याजोगा प्रयत्न त्यांनी केला तो कॉफी व चहा यांची लागवड करण्याबाबतचा. कॉफीला भाव चांगला येत असल्याने दक्षिण हिंदुस्थानातील कॉफीची लागवड फायदेशीर होत होती असे महाराजांना आढळून आले. म्हणून त्यांनी दक्षिण हिंदुस्थानच्या ज्या भागात कॉफीची लागवड होत होती तेथील भौगोलिक परिस्थितीची, हवामानाची पाहणी केली. तेथे काम करणाऱ्या अनेक युरोपीय व हिंदी तज्ञांचा सल्ला घेतला. ह्या तज्ञांचे मत असे पडले की, दक्षिण हिंदुस्थानात जेव्हढे हवामान अनुकूल आहे तेव्हढे कोल्हापूर संस्थानमध्ये नाही. सर्व वर्षभर पाऊस सारखा पडत नाही. परंतु महाराजांनी प्रयोग करायचे ठरविले. अगदी संपूर्ण यश मिळाले नाही. मर्यादित प्रमाणात प्रयोग जरी यशस्वी झाला तरी हरकत नाही असे त्यांचे मत होते. त्याला दोन कारणे होती एक म्हणजे घाटवळ भागातील जमीन पडीक ठेवण्यापेक्षा त्यामध्ये काहीतरी पीक काढून उत्पन्न करता येईल व दुसरे मुख्य कारण म्हणजे तेथील डोंगराळ भागातील लोकांना रोजगारही मिळेल. यासाठी आपल्या कारकिर्दीच्या अगदी पहिल्याच वर्षी कृत्रिम तऱ्हेने पाण्याचा पुरवठा न करता पन्हाळा पेठ्यातील पेंडाखळे या गावी कॉफीच्या लागवडीचे जंगल,

खात्यातर्फे थोड्या प्रमाणावर प्रयोग करण्याचे ठरले. हा भाग डोंगरउतारावर सुरक्षित ठिकाणी होता. आणि तिथे आत्तापर्यंत कोणत्याही प्रकारची लागवड झाली नसल्याने कोरी जमीनच अशी ती गणली जात होती. या प्रदेशाचा उत्तर भाग बराचसा थंडही होता. मृग नक्षत्राच्या सुरवातीला २००० रोपे आणवून म्हैसुरी पद्धतीने त्यांची लागवड करण्यात आली. या नंतर दोन वर्षांनी भुदरगड पेठ्यातही कॉफीच्या लागवडीचे प्रयोग केले गेले. कॉफीची लागवड महाराजांच्या कारकिर्दीत प्रतिवर्षी कसकशी होत गेली उत्पन्न किती पौंड झाले व त्यापासून किती उत्पन्न पैशाच्या स्वरुपात जंगल खात्याला मिळाले, याची सर्व आकडेवारी आपल्याला त्यावेळच्या वार्षिक अहवालावरून मिळू शकते. (तक्ता नं. १ पहा)

कॉफी प्रमाणेच चहाच्या लागवडीकडेही महाराजांनी जातीने लक्ष पुरविले. कॉफी बरोबरच चहाची लागवड सुरवातीला पन्हाळ्यास केली होती. सुरवातीची लागवड यशस्वी झाल्यावर त्याचे विस्तृत प्रमाणात प्रयोग करण्याचे महाराजांनी ठरविले होते. त्या नंतरच्या काळात चहाची लागवड त्यांनी भुदरगड पेठ्यातील शेळाप येथे करण्याचे ठरविले. तक्ता नं २ वरून चहाच्या लागवडीची कल्पना येईल. ( तक्ता नं. २ पहा )

आमदानीच्या पहिल्याच वर्षी महाराजांनी बुंदांच्या झाडांच्या लागवडीचेही प्रयोग केले. हा प्रयोग करताना ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळावा हीच अपेक्षा जास्त होती. सुरवातीला १५ एकराच्या लागवडीपासून २७५ पौंड बुंद मिळाला व त्याची किंमत २८७ रु. ८ आणे होती. तुरुकवाडी येथेही हा प्रयोग करण्यात आला. त्याच वेळेला कोरफडीची लागवडही विस्तृत प्रमाणावर करण्यास आली. तिचा कुंपणाकडे, व जंगल खात्याची हद्द ठरविण्याकडे चांगला उपयोग होण्यासारखा होता. महाराजांनी राळ तयार करण्याचा प्रयोगही केला होता. राळ तयार करण्यासाठी 'गंधन' नावाचे गवत लागत होते. ते कोल्हापूर संस्थानात बऱ्याच प्रमाणावर येत होते. त्यामुळे उत्पन्न मिळावे म्हणून व लोकांना

रोजगार मिळावा म्हणून महाराजांनी हाही प्रयोग करून बघितला. गवता-पासून राळ तयार करण्याचे तांत्रिक ज्ञान कोल्हापूर संस्थानात फारसे प्रगत नव्हते. त्यासाठी महाराजांनी खास खानदेशाहून तज्ज्ञ लोक आणवले होते. यावर कायमचा उपाय म्हणून आपल्याकडील काही लोक खानदेशला त्या व्यवसायाचे प्रशिक्षण घेण्याकरता, प्रभुत्व मिळविण्याकरिता पाठवले होते. त्याच प्रमाणे भुधरगड पेठयातील शेलाप येथे रेशीम, पन्हाळा व भुधरगड येथे वेलदोडे, कोको, इंडियन व इतर प्रकारचे रबर, ताग, अंबाडी बेळगावी बटाटे, लाख, शिंगाडे टॅपिओका, शिरोळ तालुक्यात कंबोडियन कापूस इत्यादींच्या लागवडीचे प्रयोग केले. ( तक्ता नं. ३ पहा )

झाडांची रोपे वाढवण्याच्या बागा त्यांनी जोपासल्या. प्रतिवर्षी रोप-टयांची लागवड केली जात असे. रोपटी वाढल्यावर झाडे लावण्याच्या ठिकाणी ती नेली जात असत. त्या रोपटयांवर वेगवेगळया खतांचे प्रयोग करण्यात येत असत. याबागांमध्ये हिरडा, जांभुळ, ताग, काजू, साग, अंबा, फणस, मोह इत्यादींच्या लागवडीचे प्रयोग झाले. आधुनिक काळात टॅपिओका या पिष्टमय पदार्थाला फार महत्व आलेले आहे. दक्षिण भारतात याची लागवड फार मोठया प्रमाणावर केली जाते. याचे नानाविध उपयोग करता येतात. अन्नपदार्थ म्हणुन, रसायणात, रंगात लहान मुलांच्या खाद्यपदार्थात, याचा उपयोग केला जातो. यापासून सावुदाणाही बनवतात. ह्याची निर्यात-ही बऱ्याच मोठया प्रमाणावर केली जाते. याच्या चकल्या, लगदा, पीठ, सावुदाण्यासारखा पदार्थकरून हा वापरता येतो. मध्यम व उच्च मध्यम वर्गातल्या लोकांच्या खाद्यपदार्थात उदा. पुऱ्या, इडली, बिस्किटे, चकल्या लापशी इ. याचा उपयोग करता येणे शक्य आहे. याचा अर्कही काढला जातो. झाडाच्या मुळापासून हे पिष्टसत्त्वमय अन्न मिळवले जाते. महाराजांनी याच्या लागवडीचे प्रयोग फार विस्तृत प्रमाणावर केले. याचा प्रधान हेतू जंगलातील लोकांना अन्नपदार्थ पुरविण्याचा होता. अर्थात लागवडीच्या निमीत्ताने ग्रामीण भागातील लोकांना रोजगारही मिळाला असता. ज्याचे महत्त्व व गुणवर्णन आपण आधुनिक काळात करतो, त्याच्या लागवडीचे प्रयोगही महाराजांनी केले होते व तेही जंगलातील लोकांना अन्नपुरविण्या-

साठी यामधील महाराजांची दूरदृष्टी व मानवतावादी दृष्टीकोन दिसून येतो. त्याच प्रमाणे निलगिरीहून औषधी वनस्पती आणवून, बंगलोरहून रबर व कोको आणवून, सन्हाणपूरच्या बोटॅनिकल गार्डनमधून मूल्यवान प्रतिचे 'साल' लाकूड आणवून, कांग्रा व्हॅलीमधून मोठया प्रमाणावर चहाचे बी आणवून, निलगिरीहून चहाचे बी आणवून बोरगांव व बालिग्या-जवळ लागवडी केलेल्या होत्या.

## भांडवल –

महाराजांच्या दृष्टीकोनातून शेतीतील महत्त्वाचा दोष म्हणजे शेतकऱ्यांना शेतीकरिता पुरसे भांडवल न मिळणे. शेतकऱ्यांच्या शेतीपद्धती मागासलेल्या असल्याने शेतीपासून भरपूर उत्पन्न मिळत नव्हते. शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारी पाशात अडकलेल्या होत्या. महाराजांच्या मनातून जमिनी शेतकऱ्यांच्या नावाने करून द्यायच्या होत्या. कारण त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीकरिता प्रोत्साहन मिळाले असते. म्हणून १८९५ च्या सुमारास कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी थोडया अटीवर त्याना कर्ज द्यायला सुरवात केली. तसेच व्हिक्टोरिया राणीच्या निधनानंतर गरीब व कर्जबाजारी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी एक फंड संस्थानातील लोकांनी गोळा केला व साम्राज्ञीच्या नावे एक निधी स्थापन करण्यात आला. यामधून शेतकऱ्यांना जमिनी ताब्यात घेण्यासाठी कर्ज देण्यात आले.

## किंग अेडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिटयूट –

१९११ साली सातवा एडवर्ड बादशाहा मृत्यू पावल्याने कोल्हापूर संस्थानात त्या संबंधाने शोकसभा भरलेली होती. त्या सभेमध्ये बादशहांच्या नावे एक फंड गोळा करण्याचे व त्यातून अेक संस्था स्थापन करण्याचे ठरले. प्रत्यक्षात ३४,२४१ रु. जमा झाले. ते ६% व्याजाने दरबारच्या ट्रेझरीत ठेवण्यात आले होते. या व्याजातूनच किंग अेडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिटयूट १९१२ मध्ये स्थापन करण्यात आली. महाराजांचा उदार आश्रय या संस्थेला लाभला होता. निधीकरिता महाराजांनी रु. ५,००० दिलेले होते व

संस्थेला प्रतिवर्षी १,००० रु. ची ग्रँट बांधून दिली होती. सुधारित अवजारांचे अेक म्युझियम उघडण्यात आले. यामध्ये ठेवण्यात आलेली शेती अवजारे प्रयोगाकरिता शेतकऱ्यांना देण्यात येत होती. रासायनिक खते काही शेतकऱ्यांना मोफत देण्यात आली. त्यांना यश प्राप्त झाल्यावर इतर शेतकरीही त्यांच्या प्रयोगापासून प्रेरणा घेतील अशी अपेक्षा होती. "शेतकी व शेतकरी" यांच्या पन्नास प्रती विकत घेऊन त्या सुद्धा मोफत शेतकऱ्यांमध्ये वाटण्यात आल्या. शेती क्षेत्रातील डेमॉस्ट्रेटरची नेमणूक करण्यात आली होती. सबंध कोल्हापूर संस्थानामध्ये प्रवास करून शेतकऱ्यांसमोर प्रयोग करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली होती. प्रथम त्याने गडहिंग्लज पेट्यात दौरा काढला. त्याने शेतात लोखंडी नांगर कुळव यांचे प्रयोग करून दाखवले. या हत्यारांची श्रेष्ठता त्याने शेतकऱ्यांना पटवून दिली. संस्थेला प्रथम शेतीची सुधारित अवजारे, खते, उसाचा रस उकळण्याकरिता सुधारित सिंगल व डबल फर्नेस, वेगवेगळ्या प्रकारचे निवडक बी-बियाणे या बाबतीत सुधारणा घडवून आणायची होती. संस्थेने काही सुधारित अवजारे विकत घेतली होती आणि अगदी अल्पदराने शेतकऱ्यांना ती अवजारे भाड्याने देण्याची सोय केली होती. बाँबे ॲग्रिकल्चरल डिपार्टमेंटकडून प्रकाशित होणारी पत्रके विकत घेऊन वेळोवेळी रयतेस वाटण्यात आली. १९१५–१६ या अहवालावरून असे समजते की, ही संस्था त्यावेळी कोल्हापूर शहरातून सोनतळी येथे हलविण्यात आली. संस्थेतील प्रयोग दिवसेंदिवस जास्त यशस्वी होत होते.

शेतीच्या विकासाकडे संपूर्णतया लक्ष पुरविण्यासाठी अशी ही स्वतंत्र संस्था काढण्यात आली. संस्था शेतीच्या कार्यासाठीच वाहिलेली होती. आधुनिक काळात शेतीला कर्ज पुरविण्यासाठी व शेती संशोधनाला मदत करण्यासाठी वेगवेगळ्या संस्था स्थापन झालेल्या आपण पाहतो. कृषि विद्यापीठे व महाविद्यालयेही निर्माण झालेली आहेत. शेती प्रधान अर्थव्यवस्था असल्याने परंपरागत पद्धतीने शेती करण्यापेक्षा सुधारित पद्धतीने शेती करणे आवश्यक आहे याचे महत्व आज पटलेले आहे. परंतु त्या काळात याची जाणीव असणे व त्या दिशेने स्वतः जातीने प्रयत्न करून ते अमलात

आणणे हे विशेष होते. पण महाराजांनी ते प्रत्यक्ष कृतित उतरवले. म्हणूनच दरबारच्या आश्रयाने या संस्थेचा विकास होऊ शकला. केवळ शेतीविषयक पुस्तकी शिक्षण शाळेत देऊन भागणार नाही तर त्यासाठी व्यावहारिक, प्रायोगिक संस्थाही अस्तित्वात असणे आवश्यक आहे याचे महत्व महाराजांनी ओळखले. कर्जबाजारी शेतकऱ्याला गर्तेतून वर काढण्यासाठी शेतीमध्ये सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्याची गरज होती. महाराजांनी ती ओळखली.

दुष्काळाच्या वेळीही शेतीला कर्ज देण्याकडे महाराजांनी विशेष लक्ष पुरवले. १८९७–९८ च्या अहवालावरून समजून येते की, जवळ जवळ रु. ३६,२०१ तगाईच्या स्वरुपात रयतेमध्ये वाटले गेले व त्या नंतरच्या वर्षी रु. ३०० देण्यात आले. १९०६–७ च्या अहवालात अशी नोंद आहे की रु. १२, ५०० तगाई म्हणून दिले. त्याशिवाय संस्थानच्या ट्रेझरीमध्ये जे वेगवेगळे निधी ठेवण्यात आलेले होते त्या मधून रु. २६,७६८ कर्जाऊ म्हणून दिले गेले.

## शेतीविषयक प्रदर्शने–

शेतीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महाराजांनी आणखी अेक उपाय योजिला होता. तो म्हणजे त्यांनी आपल्या कारकिर्दीत शेतीविषयक प्रदर्शने भरवली होती. चिंचलोसारख्या ठिकाणी गुरांची प्रदर्शने तर वार्षिक जत्रेमध्ये भरतच होती. पण खासकरून शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाच्या निमित्ताने लोक त्याकडे आकर्षले जातील, लोकांची केवळ करमणूकच होणार नाही तर प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर शेतकऱ्यांना शिकण्याजोग्याही काही गोष्टी तेथे असतील असा हा दुहेरी हेतू होता. तेथून काही गोष्टी आत्मसात करून काही शेतकरी त्याचा प्रयोगही स्वतःच्या शेतावर करायला प्रवृत्त होतील अशीही अपेक्षा होती. कोल्हापूर संस्थानातील जैन परिषदेने नोव्हेंबर १९०९ मध्ये अेक शेतीविषयक प्रदर्शन भरवले होते. शेतीविषयक उत्पादने, अवजारे, स्थानिक कामगारांनी बनवलेले हातमागावरच्या कापडाचे नमुने, स्त्रियांनी तयार

केलेले शिवणकाम, विणकाम. लेसचे नमुने, भरतकाम हेही प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. मोठ्या प्रमाणावरील पहिले शेतीविषयक प्रदर्शन एप्रिल १९१४ मध्ये भरले होते. उद्घाटन प्रसंगी छत्रपतींनी मोठ्या अभिमानाने सांगितले की, माझ्या प्रदेशात अशा तऱ्हेचे हे पहिलेच मोठे प्रदर्शन भरत आहे. ह्या प्रदर्शनाचा शेतकरी वर्गावर व त्यांच्या कृषिकर्म पद्धतीवर सुपरिणाम घडून येईल अशी मला आशा आहे असेही त्यांनी सांगितले. प्रदर्शनाचे तीन विभाग करण्यात आले होते. पहिला विभाग होता जनावरांचा. दुसरा विभाग शेती-विषयक होता व तिसरा कला व औद्योगिक विभाग होता. अेकूण ६७४ जनावरे प्रदर्शनासाठी आली होती शेती विभागात १९९६ वस्तू व तिसऱ्या भागात १६९० वस्तू होत्या. प्रदर्शनात पहिल्या विभागासाठी १०६४ रु. ची दुसऱ्यासाठी १७० रु. ची व तिसऱ्यासाठी १८० रु. ची बक्षिसे देण्यात आली. याशिवाय ३० चांदीची व ३० ब्रॉंझची पदकेही दिली गेली. प्रदर्श-नातच सुधारित शेतीपद्धती, खते तयार करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती यावर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. पुण्याच्या शेतकी कॉलेजचे त्यावेळचे प्राचार्य डॉ. हॅरॉल्ड मॅन यानी या प्रदर्शनाला भेट दिली होती. त्यावेळेस महाराज तुकोजीराव होळकर कोल्हापुरास आले होते. त्यांच्याच हस्ते बक्षिस समारंभ करण्यात आला. यानंतर युद्धामुळे प्रदर्शन भरवले जाणे शक्य नव्हते. १९१९-२० च्या अहवालात अशाच तऱ्हेचे प्रदर्शन भर-वल्याची नोंद आढळते. यामध्येही जनावरांना प्रवेश देण्यात आला होता. आण्णासाहेब कागलकरांच्या अध्यक्षतेखाली हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ५५० रु. ची बक्षिसे वाटण्यात आली. प्रदर्शनातील जनावरांना मोफत गवत पुरविण्यात आले होते. प्रत्यक्ष शेतीशिक्षणापेक्षा अशा तऱ्हेचे प्रदर्शनांचे शैक्षणिक मूल्य जास्त असते, हे हल्लीच्या काळात पटवून देण्याची गरज नाही.

## आदर्श शेतीचे प्रयोग–

शेती संशोधनाला व लागवडीला जोड म्हणून आदर्श शेती (मॉडेल फार्म) हेही प्रयोग महाराजांनी करविले. राजाराम हायस्कूललाच जोडून

आदर्श शेतीचा विभाग काढण्यात आला होता शेतीच्या पुस्तकी शिक्षणाबरोबरच त्याची प्रात्यक्षिकेही केली जात असत त्यामुळे विद्यार्थ्यांना दुहेरी फायदा होत असे. या आदर्श शेतीवर प्रतिवर्षी रु. १,००० च्यावर रक्कम खर्च होत होती. केवळ शिक्षण व प्रात्यक्षिकांपुरतीच आदर्श शेती मर्यादित ठेवली गेली नव्हती. तर फळभाज्या, पालेभाज्या, फळे व इतर बाबतीत तेथे वेगवेगळे प्रयोग करुन बघितले जात असत. प्रयोग यशस्वी झाल्यावर त्याची अंमलबजावणी इतरत्र होत असे. या शेतावर भात, ऊस, गहू, कापूस कडधान्ये, डाळी, कोबी, बटाटे, मिरच्या, ज्वारी, भुईमूग, इतर भाज्या केळी इत्यादींच्या लागवडीचे प्रयोग केले जात. अमेरिकेहून भुईमूग आणून लावण्यात आला आणि ते पीक चांगलेही आले. या आदर्श शेतीकरिता आलिंग्टन नांगर, हँड व चॉफ कटर विकत घेण्यात आले होते. त्याचा चांगला उपयोग करण्यात आला. इथे वेगवेगळया खतांचेही प्रयोग करण्यात आले. माशापासून तयार करण्यात आलेले खत, राखेपासून तयार झालेले खत व शेणखत इत्यादी वापरण्यात आले. बेळगावी बटाट्यांची लागवड करण्यात आली. शेती संशोधनाला या आदर्श शेतीवरील प्रयोगांमुळे बराच हातभार लागला.

## शेतीचे आधुनिकीकरण–

परंपरागत पद्धतीने शेती करण्यावर महाराजांचा फारसा भर नव्हता. शेती ज्या पद्धतीने पाश्चात्य देशात केली जाते त्या पद्धतीने आपल्याकडे करता येईल का या दिशेने त्यांचे विचार वाटचाल करीत होते. शेतीमध्ये वेगवेगळया प्रकारच्या सुधारणांची अम्मलबजावणी झाली पाहिजे, शेतीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. यासाठी शेताचा आकार किमान बाजवी असायला हवा. त्यावेळी सर्वसाधारण शेताचा आकार हा बाजवीपेक्षा लहान होता. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्यप्रकारे काटकसरीने शेती करता येत नसे व त्यांना शेतीपासून भरपूर उत्पन्नही मिळत नसे यावर मूलभूत असा उपाय महाराजांना करता येणे शक्य नव्हते. परंतु शेतकऱ्यांजवळ असणाऱ्या शेताचा आकार मोठा असणे आव-

श्यक आहे असे त्यांचे ठाम मत होते. २२-३-१९२० ला माणगांव येथे जी महाराष्ट्रातील अस्पृश्य जनतेची परिषद भरली होती त्यामध्ये याचा ओझरता उल्लेख आपल्याला आढळतो. बलुते पद्धती महार वतने महाराजांना रद्द करायची होती. सर्व लोक वतनांच्या मागे लागलेले होते. ते वतने तरी किती ? ½ आरे जमीन किंवा पाटीभर धान्य ! यामुळे सर्वांच्याच उदर निर्वाहाच्या साधनावर ताण पडत असे. उपजीविकेचे साधन कमी पडल्याने पोट भरण्याकरिता वाममार्गाचा स्वीकार करावा लागत असे त्यामुळे महाराजांनी असे त्या परिषदेतील भाषणात सांगितले की,

"मी सर्व बलुतेदारास व महार वगैरे वतनदारास अशी विनंती केली की, अशी लहान लहान वतने व बलुती त्यांच्या मागे तुम्ही लागू नका. ती सोडून द्या व विशेष करून महार लोकांना मी अशी विनंती केली की, तुम्ही साधारण माणशी दहा ॲकर जमीन वाटधाला येईल असे तुमच्या महारकीचे तुकडे करा व हे उत्पन्न तुमच्यातील जे वडील असतील त्याच्याकडे जसे पाटील, सनदी, शिलेदार यांच्याकडे चालते तसे चालवा... बाकीच्या महार लोकांना गावात अगर बाहेरगावी कोणताही धंदा करण्यास मोकळीक होईल आणि सर्वांनीच जे अर्धपोटी रहावयाचे तेही वाचेल."[2]

शेतीवर जो लोकसंख्येचा अवास्तव, अवाजवी ताण पडत होता तो त्यांना टाळायचा होता. त्यादृष्टीने महाराजांनी मे १९१३ मध्ये संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य ठरविली. हा उपाय अतिशय क्रांतिकारक होता. पूर्वी इनामे बहुदा जमिनीच्या स्वरूपात दिली जात असत. प्रत्येक पिढीबरोबर त्यांचे तुकडे होत असत. त्यामुळे काही वेळेला हिस्से इतके लहान होत होते की, त्यापासून फायदा काहीच होत नसे. इनाम असल्याने त्यावरच लोक अवलंबून रहात असत. इतर उद्योग व्यवसाय करण्याची प्रवृत्ति निर्माण होत नसे. लोकांची ऐदीपणाची, आळशीपणाची भावना वाढीला लागत होती. हे सगळे झाडून टाकण्यासाठी महाराजांनी इनामे अविभाज्य ठरविली. त्यामुळे इनाम थोरल्याकडे जाऊन बाकीच्यांना काहीतरी व्यवसाय शोधणे

भाग पडे. लोकांच्या उद्योगीपणाला प्रोत्साहन देण्याचा हा अेक उपाय होता.

राजाराम इंडस्ट्रिअल स्कूलचे उद्‌घाटन करतानाही महाराजांनी शेती करिता सुधारित अवजारांच्या गरजेचे प्रतिपादन केले. त्यांनी सांगितले,

" आपल्या देशातील लोकांनी जुन्या शेती पद्धती अैवजी सुधारलेल्या शेतीशास्त्राचा आणि अवजारांचा अवलंब केला पाहिजे. सुधारलेले तंत्रविज्ञान शिकण्याच्या दृष्टीने कारागिरांनी पुढे आले पाहिजे...शेतकी सुधारणेस सुधारलेल्या औतांची फार जरूरी आहे व आपले लक्ष इकडे आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. नांगर व विहिरीचे पाणी काढण्याची मोट यांची सुधारणा ही आमच्या प्रत्येक शेतकऱ्याचे हित करणारी आहे. आपले प्रयत्न यशस्वी होण्याचे कामी मजकडून योग्य ती मदत अवश्य मिळेल या विषयी शंका नको."[3]

## शेतीला पाण्याची जोड –

याशिवाय इतर बाजूनींही सुधारित शेतीवर महाराजांनी भर कसकसा दिला हे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. शेतीमध्ये सुधारणा घडवून आणायची असेल, शेती उत्पादन वाढवायचे असेल तर शेतीला पाण्याची जोड मिळणे आवश्यक आहे याचे महत्व महाराजानी जाणले होते. दुष्काळात छोटया मोठया तलावांची बांधणी करणे, जुने तलाव दुरुस्त करून नवीन तलाव बांधणे, कच्च्या व पक्क्या विहिरी तयार करणे इत्यादी किरकोळ सुधारणा तर महाराजांनी केल्याच होत्या. पण त्यासाठी अेक दीर्घकालीन योजनाही त्यांनी कार्यवाहीत आणली की, ज्याचा फायदा हल्लीच्या कोल्हापूर जिल्ह्यालाही मिळतो. ही योजना सर्व योजनांचा कळस शोभते. ही योजना म्हणजे राधानगरी धरण होय. याबद्दलची कल्पना महाराजांना ते १९०२ च्या सुमारास राज्यारोहण प्रसंगी इंग्लंडला गेले असताना स्फुरली. पावसाळयात पाणी आपण वाया जाऊ देतो. अेरवी शेतीला पाणी कमी पडते. आपली नैसर्गिक साधनसंपत्ती आपण चांगल्याप्रकारे वापरत नाही. इंग्लंड-

मध्ये त्यांनी तेथील औद्योगिकक्रांतीचे चांगल्याप्रकारे अभ्यासपूर्वक निरीक्षण केले होते. तसा साधनसंपत्तीचा उपयोग आपल्याला का करता येऊ नये हा प्रश्न त्यांच्या मनात घोळत होता. आपल्याकडे डोंगराळ प्रदेशालगत पाऊस भरपूर पडतो पण देशावरच्या जमिनीला त्याचा काही उपयोग होत नाही. यासाठी या वाहून जाणाऱ्या पाण्याला बांध घालून ते साठवून ठेवले पाहिजे. हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांनी यावर सर्व बाजूंनी विचार केला. दरबारच्या खजिन्याला हे ओझे पेलवेल का नाही ही आणखी एक अडचण होती. योजना मनात पक्की झाल्यावर त्यांनी एप्रिल १९०७ मध्ये तज्ञाकडून जागेची पाहणी करवली. १९०९ मध्ये योजनेचे प्रत्यक्ष कामकाज सुरू झाले. दुर्दैवाने त्यांच्या हयातीत ही योजना पूर्ण होऊ शकली नाही. योजनेचे बांधकाम प्रतिवर्षी किती व कसे झाले, किती खर्च करण्यात आला व कामगार किती कामावर आले याबद्दलची सर्व माहिती आपल्याला वार्षिक अहवालांवरून मिळू शकते. या योजनेद्वारे त्यांनी कोल्हापुरातील हरितक्रांतीचा पाया घातला असे म्हणायला हरकत नाही. या योजनेतील पाणी कमी पडल्यास भोगावती नदीच्यावरच्या बाजूला दूधगंगेवर आणखी अेक धरण, हल्लीचा 'काळम्मावाडी प्रकल्प' बांधण्याचे त्यांनी ठरविले पण महाराजांचे हे स्वप्न अपुरेच राहिले.।

## जोडव्यवसाय –

शेतीबरोबरच शेतीच्या जोडव्यवसायाकडेही महाराजांचे लक्ष होते. शेती हा हंगामी व्यवसाय असल्याने १२ महिने उत्पन्न मिळविण्यासाठी काही पूरक व्यवसाय शेतीबरोबरच करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. महाराज १९०२ च्या सुमारास इंग्लंडला जाणार होते तेव्हा तिकडील व्यवस्था करण्यासाठी महाराजांनी सर ल्लॉड हिल यांना एक पत्र लिहिले. हिंदुस्थानातील एक संस्थानिक सबंध इंग्लंड-युरोपची सफर करणार, त्यात तरुण वय, राज्यारोहणाचा समारंभ, खरे म्हणजे इतर संस्थानिकांप्रमाणे डामडौल, ऐषआराम, चैनविलास, सुखोपभोग याला भरपूर वाव होता. परंतु महाराजांच्या पत्रातील मजकूर फार उद्बोधक आहे.

"शेतकीच्या जनावरांची व कोंबडी, बदकांची पैदास, दूधदुभत्याची उत्पत्ति इत्यादी शेतकीचे धंदे लहान मोठ्या प्रमाणावर ज्या ठिकाणी चालले आहेत असे एखादे स्थळ पाहावे असे मला वाटते."[4]

छत्रपतींचा विचारप्रवाह कोणत्या दिशेने वहात होता हे यावरुन त्वरीत समजून येते. अशाच तऱ्हेचे विचार त्यांनी अखिल भारतीय कुर्मी-क्षत्रियांची १३ वी सामाजिक परिषद कानपूरला भरली असता प्रमुख पाहुणे या नात्याने काढले.

"कृषिकर्माबरोबर पशुपालन व रक्षण याचाही संबंध येतो. याकरिता आपल्याला पशुपालनासंबंधीही पुष्कळ काम करावयाचे आहे. दूध तूप, वगैरेंची समृद्धी देशामध्ये झाली पाहिजे."[5]

## सहकारास प्रोत्साहन—

शेतकऱ्यांचा शेतीमाल तयार होत असे पण त्यासाठी विक्री संघटना नव्हती. ही अडचण दूर करण्यासाठी महाराजांनी सहकारी पतपेढ्या काढण्याचा मंत्र लोकांना दिला. अर्थात महाराजांचा हा उपदेश केवळ शेती क्षेत्रापुरताच मर्यादीत नव्हता तर व्यापार, उद्योगव्यवसाय, औद्योगिक कामगार इत्यादी क्षेत्रेही तो व्यापून राहिला होता. आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा सहकाराच्या बाबतीत अग्रेसर ठरला आहे. याचे कारण म्हणजे महाराजांनी सहकाराचे बीज आपल्या कारकिर्दीत पेरले, खतपाणी घालून जोपासना करुन अंकूर वाढवला आणि म्हणून ही चळवळ आज आपल्याला खोलवर रुजलेली दिसते, दूरवर फोफावलेली दिसते. सहकाराचा मंत्र महाराजांनी आपल्या भाषणातून दिला व तो कृतीतही उतरवला. पीपल्स युनियन व राजाराम इंडस्ट्रियल स्कूलच्या उद्घाटन प्रसंगी, शाहू मिलच्या उद्घाटनप्रसंगी महाराजांनी सहकाराचे महत्व समजाऊन सांगितले व सहकारी सोसायट्या स्थापन करा असा आदेश दिला. त्यांनी विणकामगारांना पीपल्स युनियनच्या उद्घाटन प्रसंगी २४-११-१९१८ ला जाणीव करुन दिली की, त्यांच्याच व्यवसायातील काही कामगारांनी सुमारे ६० वर्षा-

पूर्वी एकत्र येऊन सहकारी दुकान सुरु केले. राजाराम इंडस्ट्रियल स्कूलच्या उद्घाटन प्रसंगी १५-८-१९२० मध्ये त्यांनी सांगितले की, सहकारी कारखाने, सहकारी संस्था, सहकारी दुकाने, पतपेढ्या काढा. त्यास हवी ती मदत देईन. राजाश्रयापेक्षा लोकाश्रय महत्वाचा आहे. शाहू मिलच्या उद्घाटन प्रसंगीही महाराजांनी हेच सांगितले की, लोकांनी स्वतःहून पुढे येऊन सहकार्याच्या तत्त्वावर औद्योगिक व्यवसाय स्थापन करायला हवा. यासाठी महाराजांनी १९१२ मध्ये सहकारी कायदा मंजूर केला व सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले. त्यामुळेच अर्बन को-ऑपरेटिव्ह व बलभिम को-ऑपरेटिव्ह सोसायटी. यासारख्या संस्था निघू शकल्या. १९१८ मध्ये कोल्हापुरातच सहकारी कोठार काढण्यात आले. १९२०-२१ च्या अहवालानुसार कोल्हापूर संस्थानातील सहकारी सोसायट्यांची संख्या ३७ पर्यंत पोहचली होती. या सर्व सोसायट्या स्वतःच्या पैशांवरच काम करत होत्या. त्यांना कोल्हापूर अर्बन सोसायटीकडून कर्जही आवश्यक तेव्हा मिळत असे.

महाराजांनी सहकाराविषयी आपल्या भाषणातून वेळोवेळी आपले विचार प्रगट केलेले आहेत. असे वर सांगितलेलेच आहे. यावरील महाराजांचे मत पुढील प्रमाणे होते.

" आपण असुशिक्षित व अडाणी आहा. आपणाला सुव्यवस्थित रीतीने काम करण्याची सवय लागणे जरुर आहे. त्यासाठी आपल्याला पहिल्या शाळा म्हणजे चाळी चाळीतील किंवा कारखान्या-कारखान्यातील सहकरी पतपेढया ह्या होण्यास योग्य आहेत. त्या दिशेनेहि आपण प्रयत्न करावेत. आपणापैकी बरेच लोक गिरणीत कापड विणण्याचे काम करितात. आपल्याच धंद्यातील लोकांनी सुमारे ६० वर्षांपूर्वी राचडेल येथे सहकारी तत्व शोधून काढून दुकान सुरु केले. त्याचा परिणाम इंग्लडच्या व जगाच्या प्रगतीवर झाला आहे हे आपण विसरता कामानये अशा सर्वोपयोगी तत्त्वाचा अवलंब आपण करुन त्याची वाढ केली म्हणजे आपणास आपले हक्क मिळविण्यास सामर्थ्य येणार आहे."[6]

"या कालात बहुजन समाजाच्या हाती सत्ता जात असल्याने.... राजाश्रयापेक्षा लोकाश्रयच विशेष श्रेयस्कर आहे. तसेच आता प्रत्येकाने निरनिराळे काम करण्याचे दिवस गेले. पुष्कळ लोकांनी आपली कुशलता अक्कल, पैसा, व अंगमेहनत एकत्र केली पाहिजे, म्हणजे सहकार्य केले पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटुंब एका ठिकाणी काम करीत व येणारा नफा त्या कुटुंबातील माणसास उपयोगी पडे. आता ही आपली त्या कुटुंबाची व्याख्या पुष्कळ विस्तृत केली पाहिजे. १०।२०।५० कुटुंबे या उद्योगधंद्या-करीता एक झाली पाहिजेत. त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे व होणारा नफाही वाटून मिळाला पाहिजे. यासाठी आपण सहकार्य करण्यास शिका. आपली सहकारी पतपेढी काढा. इतकेच नव्हे तर सहकारी-कारखाने व सहकारी दुकानेही काढा."[7]

या अतिशय साध्या शब्दात महाराजांनी सहकाराचा मूलभूत मंत्र लोकांना समजाऊन सांगितला व महत्त्व पटवून दिले. अशा प्रकारची चालना मिळाल्याने कोल्हापूर संस्थानांत अनेक सहकारी पतपेढ्या अस्तित्वात आल्या रावबहादूर डोंगरे हे कोल्हापूरात सहकारी पतपेढ्यांचे रजिस्ट्रार म्हणून काम पहात असत.

यासर्व सोसायट्यांचे सभासद व खेळते भांडवल पुढीलप्रमाणे होते.

| वर्षे | सभासद | खेळते भांडवल (रूपये) |
|---|---|---|
| १९१७-१८ | ७७७ | १,०३,३४८ |
| १९१८-१९ | १२९९ | १,५७,६४९ |
| १९१९-२० | १२७५ | ३,७९,९४१ |

कोल्हापुरमध्ये सहकारी पतपेढयाची वाढ कसकशा प्रमाणात झाली हे आपल्याला तक्ता नंबर ४ वरुन कळेल (तक्ता नं. ४ पहा.)

महाराजांच्या सहकारा संबंधीच्या कार्याचे मूल्यमापन सुप्रसिद्ध चरित्रकार श्री. धनंजय कीर यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे केले आहे. ते म्हणतात " कोल्हापूर हे भारतातील सहकारी क्षेत्रात अग्रेसर ठरले आहे. सहकाराची जननी ठरली आहे. कोल्हापुरातील सहकारी जीवनांचे यश शाहू महाराजांनी रूजविलेल्या सहकाराच्या व समाज समतेच्या प्रेरणेत आहे असे म्हटले तर योग्यच होईल. "[8]

अशा तऱ्हेने महाराजांनी शेती व सहकाराच्या बाबतीत जी जी पाऊले उचलली त्यामुळे कोल्हापूर संस्थानाचा कायापालट होण्यात मदत झाली. शेती हा संस्थानाचा प्रमुख व्यवसाय आहे, लोकांचे प्रमुख उदरनिर्वाहाचे साधन यामुळेच मिळते हे महाराजांनी ओळखले. महाराजांच्या सर्व आर्थिक प्रयत्नांचे ध्येय होते प्रजेचे जीवनाचे राहणीमान वाढविणे. यामुळे शेतीच उत्कर्ष झाल्याशिवाय संस्थानचा उत्कर्ष होणार नाही, आर्थिक वाढ होणार नाही याची महाराजांना जाणीव होती. त्यामुळे शेती उत्पादन वाढविण्याकरीता सर्वांगिण उपाय योजना महाराजांनी केली. यामध्ये कांही तात्पुरते, कमी मुदतीच्या काळातले उपाय होते. काही दीर्घकालीन उपाय योजना होती शेती विषयक संशोधनाला किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इंस्टिटयूट मार्फत व आदर्श शेतीव्दारा चालना दिली. सुधारीत शेती अवजारे लोकप्रिय करण्याची योजना आखली. शेतीला कायम स्वरुपाचा पाणीपुरवठा होईल अशा तऱ्हेच्या फार भव्य पाटबंधाऱ्याच्या योजना महाराजांच्यामुळे अस्तित्वात आल्या. शेतीप्रदर्शनें लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली. यामधील जास्त वैशिष्टयपूर्ण घटक म्हणजे व्यावहारीक बाजूवर त्यांनी भर दिला. यामध्ये महाराजाचा दूरदर्शीपणा, संयोजकत्व उद्योगीपणा व प्रजेबद्दलची कळकळ आपल्याला दिसून येते.

## कोल्हापूर संस्थानातील कॉफीच्या लागवडीचा तक्ता (१)

| वर्ष | विभाग | जमिनीचे क्षेत्र एकर | गुंठे | उत्पादन (पौंड) | मिळकत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १८९३–९४ | | १४ | – | ६५८ | ४१२ |
| १८९४–९५ | | १४ | – | – | ५५४ |
| १८९५–९६ | | १५ | – | ४७६ | २८८ |
| १८९६–९७ | | १५ | – | २४४ | १४१ |
| १८९७–९८ | | १५ | ३८ | ५७३ | २७६ |
| १८९८–९९ | | १६ | १४ | ४१६ | २१६ |
| १८९९–१९०० | | ❋ | ❋ | ❋ | ❋ |
| १९००–०१ | | १५ | – | ६६० | २३८ |
| १९०१–०२ | | १५ | – | २६६ | ❋ |
| १९०२–०३ | | १९ | – | ३६१ | ❋ |
| १९०३–०४ | | १५ | – | १५५ | ❋ |
| १९०४–०५ | | १५ | ६ | ३५८ | ❋ |
| १९०५–०६ | पन्हाळा व भुदरगड | १४ | ७ | १७० | ❋ |
| १९०६–०७ | | १४ | ७ | १०० | ❋ |
| १९०७–०८ | | १२ | २ | १६२ | ❋ |
| १९०८–०९ | | ❋ | ❋ | ५१४ | ❋ |
| १९०९–१० | | ❋ | ❋ | १७८ | २४० |
| १९१०–११ | | ४ | १८ | २४२ | ❋ |
| १९११–१२ | | ४ | १८ | १२० | ४५ |
| १९१२–१३ | | ४ | १८ | ३३६ | १२६ |
| १९१३–१४ | | ४ | १८ | १८८ | ७० |
| १९१४–१५ | | ४ | १८ | १०८ | ४१ |
| १९१५–१६ | | ४ | १८ | ५४३ | २०४ |
| १९१६–१७ | | ४ | १८ | ३३५ | १३५ |
| १९१७–१८ | | ४ | १८ | ९१८ | ३४४ |
| १९१८–१९ | | ४ | १८ | ३८४ | १४४ |
| १९१९–२० | | ४ | १८ | ५७ | २१ |
| १९२०–२१ | | ४ | १८ | २१० | ७९ |
| १९२१–२२ | | ४ | १८ | ५० | १९ |

( Source :- Administrative Reports from 1893 to 1922 )

❋ आंकडे उपलब्ध नाहीत.

तक्ता नं. २

## कोल्हापूर संस्थानमधील पन्हाळा व भुधरगड पेट्यात केलेल्या चहाच्या लागवडीचा तक्ता

| अ. नं. | वर्ष | क्षेत्र एकर | क्षेत्र गुंठे | उत्पादन (पौंड) | उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९०५–०६ | | * | २३ | * |
| २ | १९०६–०७ | | * | ६३ | * |
| ३ | १९०७–०८ | १ | २० | १८० | * |
| ४ | १९०८–०९ | ४ | ९ | * | * |
| ५ | १९०९–१० | ६ | २१ | १७१ | ६४ |
| ६ | १९१०–११ | | * | * | * |
| ७ | १९११–१२ | | * | * | * |
| ८ | १९१२–१३ | ७ | ३६ | २७९ | १०५ |
| ९ | १९१३–१४ | १० | | २७४ | १०३ |
| १० | १९१४–१५ | १० | | २८८ | १०८ |
| ११ | १९१५–१६ | १० | | ३६६ | १४४ |
| १२ | १९१६–१७ | ११ | ३१ | ३३३ | १६६ |
| १३ | १९१७–१८ | ११ | | ५६० | २५० |
| १४ | १९१८–१९ | ११ | २१ | ७६८ | ३८४ |
| १५ | १९१९–२० | ११ | २१ | २४० | १२० |
| १६ | १९२०–२१ | ११ | २१ | १७६ | ८८ |
| १७ | १९२१–२२ | ११ | ३१ | ५५२ | २७६ |

(Source :- Administrative Report 1905 to 1922)

* आकडे उपलब्ध नाहीत.

तक्ता नं. ३

## कोल्हापूर संस्थानमधील पन्हाळा, भुधरगड पेट्यात केलेल्या वेलदोड्याच्या लागवडीचा तक्ता

| अ. नं. | वर्ष | क्षेत्र एकर | क्षेत्र गुंठे | उत्पादन (पौंड) | उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८९३–९४ | १ | ०० | ९३ | १८६ |
| २ | १८९४–९५ | १ | ०० | ❋ | ❋ |
| ३ | १८९५–९६ | १ | ०० | २० | ४५ |
| ४ | १८९६–९७ | १ | ०० | ६ | १२ |
| ५ | १८९७–९८ | १ | ०० | ६ | २५ |
| ६ | १८९८–९९ | १ | ०० | २१ | २५ |
| ७ | १८९९–१९०० | १ | ०० | ३६ | १७१ |
| ८ | १९००–०१ | १ | ०० | ❋ | ❋ |
| ९ | १९०१–०२ | १ | ०० | १० | २६ |
| १० | १९०२–०३ | १ | ०० | १० | ❋ |
| ११ | १९०३–०४ | १ | ०० | १२ | ❋ |
| १२ | १९०४–०५ | ० | ३७ | १४ | ❋ |
| १३ | १९०५–०६ | ० | ३७ | २३ | ❋ |
| १४ | १९०६–०७ | ० | ३७ | ❋ | ❋ |
| १५ | १९०७–०८ | ० | ३७ | ❋ | ❋ |
| १६ | १९०८–०९ | | ❋ | ❋ | ❋ |
| १७ | १९०९–१० | ० | १० | २१ | ४१ |
| १८ | १९१०–११ | ० | १२ | ४२ | ❋ |
| १९ | १९११–१२ | १ | ०७ | ४३ | ❋ |
| २० | १९१२–१३ | १ | २२ | ८० | २०० |
| २१ | १९१३–१४ | १ | २२ | ९९ | ३१० |
| २२ | १९१४–१५ | १ | २२ | ६८ | २१२ |
| २३ | १९१५–१६ | १ | २२ | ४० | १२३ |
| २४ | १९१६–१७ | १ | २२ | ८३ | २६० |
| २५ | १९१७–१८ | १ | २२ | २७५ | ५१७ |
| २६ | १९१८–१९ | १ | २२ | ❋ | ❋ |

( **Source** :- Administrative Reports from 1893 to 1919 )

❋ आकडे उपलब्ध नाहीत.

## तक्ता नं. ४

### कोल्हापूर संस्थान मधील सहकारी संस्थांची माहिती

| पेटा | शेती विषयक | | | | | | बिगर शेती विषयक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पत संस्था वर्ष | | | बि. पत संस्था वर्ष | | | पत संस्था वर्ष | | | वि. पत संस्था वर्ष | | |
| | १८-१९ | १९-२० | २०-२१ | १८-१९ | १९-२० | २०-२१ | १८-१९ | १९-२० | २०-२१ | १८-१९ | १९-२० | २०-२१ |
| कोल्हापूर | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ६ | ९ | १ | १ | २ |
| करवीर | ३ | ४ | ४ | — | — | — | — | — | — | — | — | — |
| हातकलंगडे | ७ | ८ | १० | — | — | — | — | — | — | — | — | — |
| पन्हाळा | ५ | ६ | ७ | — | — | — | — | — | — | — | — | — |
| चंदगड | १ | १ | १ | — | — | — | — | — | — | — | — | — |
| गडहिंग्लज | २ | २ | २ | — | — | — | — | — | — | — | — | — |
| एकूण | १९ | २२ | २५ | १ | १ | १ | ६ | ६ | ९ | १ | १ | २ |

( आधार :– Administrative Reports from 1918 to 1921 )

## महाराजांच्या कारकिर्दीत शेतीयोग्य जमिनीत केलेल्या सुधारणा व त्याचा तक्ता

| वर्ष | शेती योग्य जमीन (एकर) | प्रत्यक्ष शेतीखाली आणलेली जमीन (एकर) |
|---|---|---|
| १८९३-९४ | १४,४९,९४९ | १२,९४,१९६ |
| १८९४-९५ | १४,९८,८०९ | १२,८९,१०१ |
| १८९५-९६ | १४,२८,८२७ | १२,९४,८७० |
| १८९६-९७ | १४,२८,०१० | १२,९२,१६९ |
| १८९७-९८ | १४,२८,२६३ | १२,८८,५६३ |
| १८९८-९९ | १४,२८,९०९ | १२,८६,६३० |
| १८९९-१९०० | १४,४२,८३७ | १२,८७,९९० |
| १९००-०१ | १४,९६,७५६ | १४,९३,१३० |
| १९०१-०२ | १४,९३,५१८ | १२,९२,२६५ |
| १९०२-०३ | १४,९६,८७५ | १२,९२,१४८ |
| १९०३-०४ | १५,०९,३५९ | १२,९२,४७२ |
| १९०४-०५ | १५,०९,२७५ | १२,८८,०६२ |
| १९०५-०६ | १६,२४,००० | १३,२९,६५० |
| १९०६-०७ | १५,५१,३०६ | १३,३१,९५९ |
| १९०७-०८ | १५,७३,०९० | १३,३२,७१३ |
| १९०८-०९ | १५,७५,५२८ | १३,३८,६८८ |

| वर्ष | शेतीयोग्य जमीन (एकर) | प्रत्यक्ष शेतीखाली आणलेली जमीन (एकर) |
|---|---|---|
| १९०९-१० | १५,८६,२८९ | १३,४७,६७९ |
| १९१०-११ | १५,८६,९६३ | १३,५५,९१५ |
| १९११-१२ | १५,८६,४९४ | १३,५८,९५७ |
| १९१२-१३ | १५,८८,१७८ | १३,६३,०३२ |
| १९१३-१४ | १६,२५,५०९ | १३,६३,९६२ |
| १९१४-१५ | १६,६३,८८१ | १३,६६,०२३ |
| १९१५-१६ | १७,२६,३३६ | १४,२५,३९२ |
| १९१६-१७ | १७,३२,२१३ | १४,३०,८५८ |
| १९१७-१८ | १७,३०,४८९ | १४,२७,०२१ |
| १९१८-१९ | १७,२९,४१६ | १४१७,६७२ |
| १९१९-२० | १७,३४,२९९ | १४,३१,१७९ |
| १९२०-२१ | १७,३६,५७८ | १४,२३,६५२ |
| १९२१-२२ | १७,३५,८५१ | १४,२६,५३५ |

वरील तक्त्यावरून आपल्याला असे दिसून येते की, प्रतिवर्षी दोन्ही प्रकारच्या जमिनीचे प्रमाण महाराजांच्या कारकिर्दीत वाढत होते. शेतीसाठी कुरणासाठी, जंगलासाठी महाराजांनी जे प्रोत्साहन दिलेले होते त्याचाच हा परिणाम म्हणावा लागेल.

(आधार:- Administrative Reports from 1893 to 1922 )

## संदर्भ

१. 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणें' – भगवानराव जाधव. ४९
२. 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे' - भगवानराव जाधव. ५२,५९
३. 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे' – भगवानराव जाधव
११६, ११९, १२०
४. 'श्रीमछत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र' – आ. बा. लठ्ठे १९२
५. 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे' – भगवानराव जाधव ४९
६. 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे' – भगवानराव जाधव २६,२७
७. 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणें' – भगवानराव जाधव १२२
८. 'प्रेषित राजर्षी श्री शाहू छत्रपती–व्याख्याने.' धनंजय कीर– २१

★ ★

# पाटबंधारे

सेतुबन्धः संस्यानां योनिः ।
नित्यानुषक्तो हि वर्षगुणलाभः सेतु वापेषु ।।

—कौटिलीय अर्थशास्त्रम्

---

## कोल्हापूरातील हरितक्रांतीचे जनक—

कोल्हापूर जिल्ह्यात जो शेती विषयक प्रगती, आर्थिक भरभराट झालेली दिसून येते त्यातील बरेचसे श्रेय आपल्याला श्री शाहू महाराजांना द्यायला हवे. कोल्हापूरातील आजच्या हरितक्रांतीचे जनक म्हणून त्यांचा उल्लेख केला तर ते चुकीचे होणार नाही. भावी काळात कोल्हापूर संस्थानची आर्थिक प्रगती व्हावी म्हणून द्रष्टेपणाने त्यांनी अनेक प्रकल्प सुरू केले, नावारुपाला आणले. अेकदा वाट रूळली म्हणजे त्या रूळलेल्या वाटेवरुन अनेक जण जातात व स्वतःला श्रेय घेतात. पण मुळात ती वाट रूळवण्याचे जे कार्य असते ते आगळेच असते. खरा मान असतो तो प्रकल्प सुरु करणाऱ्याचा. असे प्रकल्प सुरू झालेच नसते तर अनेकांना मार्गदर्शनच मिळाले नसते. म्हणूनच ज्या द्रष्टेपणाने, धाडसाने व संयोजकत्त्वाने श्री शाहू महाराजांनी हरितक्रांतीचा पाया घातला ती त्या काळाच्या संदर्भात खरोखर कौतुकास्पद होय. त्यांच्या भाषणात, त्यांनी व्यक्त केलेल्या विचारात वाचण्यात, मित्रांना लिहिलेल्या पत्रात असे अनेक उल्लेख सापडतात. सध्या

कोल्हापूरात साखर कारखान्याची जी भरभराट झाली आहे, सहकारी चळवळ जी रुजून फोफावली आहे, ऊसाची लागवड जी भरपूर प्रमाणात विस्तरली आहे व त्यामुळे जो व्यापाराला चालना मिळाली आहे याचे अनेक संदर्भ आपल्याला वरीलप्रमाणे मिळतात. लोकांनी कोणत्या दिशेने प्रयत्न करावेत याचे अचूक व योग्य मार्गदर्शन त्यांनी वेळोवेळी केलेलेच आहे. पण ते तेवढ्यावरच थांबले नाहीत तर धाडसाने पहिले पाऊल त्यांनी स्वतः उचलले आहे

वरील विधानांचे स्पष्टीकरण आपल्याला महाराजांच्या अनेक विचारांमध्ये दिसून येते. अनेक छोट्या व मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या योजनेची सुरवात झालेली आपल्याला आढळून येते केवळ त्यांनी मोठमोठ्या प्रकल्पा-कडेच लक्ष पुरविले असे नाही तर छोट्या छोट्या विहिरी व तलाव काढण्याकडेही त्यांनी जातीने लक्ष पुरविले. ज्या वेळेला महाराजांनी नुकतेच राज्याधिकार ग्रहण केलेले होते. त्या वेळेला संस्थानमधील परिस्थिती व जनता सुरवातीला समजून घेण्याच्या दृष्टीकोनातून त्यानी संस्थानाचा दौरा केला होता. संस्थानाच्या गारगोटी भागात जेव्हा ते गेले होते तेव्हा त्यांना असे दिसून आले की, पिण्याच्या पाण्याचा तेथे पुरवठा पुरेसा होत नाही, तेव्हा तेथून दोन मैलावर असलेल्या एका झऱ्याचे पाणी गावांत नेण्याच्या योजनेला त्यांनी चालना दिली. १८९५-९६ साली कोल्हापूर संस्थानात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडलेला होता. त्याला अनेक प्रकारे तोंड देण्यासाठी महाराज झगडत होते. धान्याचा तुटवडा होता. वस्तूच्या किंमती वाढत होत्या. जनावरांना खायच्या गवताचे दुर्भिक्ष भासत होते. पाण्याची टंचाई जाणवत होती. त्यावेळी लोकाना जाणवणारे पाण्याचे दुर्भिक्ष दूर करण्यासाठी महाराजांनी वडगांव, रूकडी व शिरोळ येथे नवीन तलाव बांधण्याचे आणि त्याच वेळेला जुने तलावही दुरुस्त करायचे ठरवले. या कामासाठी त्यावेळी चार लक्ष रुपये खर्च केले गेले. ज्या वेळेला परिस्थिती जास्त गंभीर झाली त्या वेळेला महाराजांनी मामलेदारांना हुकूम सोडला की, जिथे जिथे नदीला बांध घालून लोकांच्या सोयीसाठी पाणी अडविणे शक्य आहे तेथे तेथे तसे करण्यात यावे. लोक स्वतःहून पुढे आले तर

त्यांना मदत करावी, प्रोत्साहन द्यावे अशी नोंद १८९९-१९०० च्या अहवालात सापडते. पाऊस कमी, तुटपुंजा पडला तरी पाण्याचा दुष्काळ जाणवला नाही कारण तात्पुरत्या पाटबंधाऱ्याच्या योजना आखल्या गेल्या. जुन्या विहिरींची खोली वाढवण्यात आली आणि नवीन विहिरी खणण्यात आल्या आणि ह्या योजनेला यशही समाधानकारक मिळाले. दुष्काळाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी ह्या पाटबंधाऱ्याच्या योजनांचा विस्तार करण्याचाही महाराजांचा विचार होता. अशा योजना कुठकुठे सुरु करणे शक्य आहे ते पाहण्यासाठी त्यांनी एका खास अधिकाऱ्याची नेमणूकही केलेली होती. कळंबा तलावाचा बांध रु. ३८,५२२ खर्चून सुधारण्यात आला. शिरोळ जवळील काळेश्वर तलावावरही रु. ७,६५७ खर्चण्यात आले. व त्यामुळे तलावात पाणी येण्याची वाट मोठी झाली. कळंब्याच्या तलावापासून कोल्हापूरातील पाण्याच्या साठ्यापर्यंत नऊ इंची पाईप टाकण्यात आला. त्यासाठी रु ४,१४० खर्च करावे लागले. अतिग्रे व रंकाळा येथील तलावाची catchment area ही रु. २४०० खर्चून वाढवण्यात आली. रंकाळ्यातील पाण्याचा फायदा ११७ एकर जमिनीला मिळत होता असे १९१३–१४ च्या अहवालावरुन समजते. त्या तलावाची दुरुस्ती करण्यासाठी रु. २०० खर्च करण्यात आला.

१९१५–१६ च्या अहवालावरुन असे समजते की एकूण ७९,८६० एकर जमिनीला पाटबंधाऱ्याच्या या योजनेचा फायदा उठवता येत होता. विहिरीपासून ३९,८४५ एकरांना, नद्यांपासून ३९,७८३ एकरांना व तलावापासून २३२ एकरांना पाणी मिळत होते.

| सन | अेकूण बागाईत (एकर) | विहिरी (एकर जमीन) | नद्या (एकर जमीन) | तलाव (एकर जमीन) |
|---|---|---|---|---|
| १९१८–१९ | ३०,०४१ | * | * | * |
| १९१९–२० | ३०,१९५ | २१,०२१ | ८,९३३ | २४१ |
| १९२०–२६ | २३,३१९ | १७,२८४ | ५,८६३ | १७२ |

याच काळामध्ये संस्थानमध्ये विहिरीचे कामही सुरु होते. विहिरी दोन दृष्टीनी महत्वाच्या होत्या. एक म्हणजे लोकांना प्यायला पाणी हवे म्हणून व जास्त महत्वाचा उद्देश म्हणजे शेतीला पाणी पुरवठा भरपूर व वेळेवर करता यावा म्हणून, ह्या दृष्टीकोनातून तलाव, पाटबंधारे याच्या बरोबरच नवीन विहिरी खणण्याचे काम व जुन्या विहिरी दुरुस्त करण्याचे कामही चालू होते त्या संबंधीची उपलब्ध आकडेवारी आपल्याला बरीच माहिती देऊन जाते.

## राधानगरी योजना–

ही जी सर्व कामे महाराजांनी हाती घेतली होती ती काही कमी महत्त्वाची नव्हती किंवा किरकोळ स्वरुपाची नव्हती. केवळ ह्या सर्वाचा जरी फक्त विचार केला तरी दुष्काळ निवारणार्थ शेतीच्या कामासाठी व पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी यांचे यश स्पृहणीय ठरते. परंतु ह्या सर्वाचा मुकुटमणी ठरावी अशी अेक योजना महाराजांनी हाती घेतली. बरीचशी तडीला नेली व त्याच्या फळाचा लाभ मात्र होतो त्यानंतरच्या करवीरकरांच्या पिढीला फार विचार करून, सांगोपांग फायदे तोटे विचारात घेऊन संस्थानच्या खजिन्यावर पडणारा ताण लक्षात घेऊनच त्यांनी हा प्रकल्प हाती घेतला. महाराजांनी या योजनेचा पाया घातला म्हणून कोल्हापुरवासीयांना दोन वर्षापूर्वीच्या दुष्काळात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा तडाखा बसला नाही. ऊसाची लागवड विस्तृत प्रमाणावर करता येते, शेतीला पाण्याचा पुरवठा होऊ शकतो, बीजपुरवठा उपलब्ध होऊ शकतो. हे सर्व फायदे आपल्याला मिळत आहेत ते श्री शाहू महाराजांनी राधानगरी–श्री लक्ष्मीतलावाची योजना व्यवहारात आणल्याने आणि ह्यामुळे त्यांना 'हरितक्रांतीचे जनक' ही पदवी योग्य ठरते. पाऊस असेल तेव्हा आणि नसेल तेव्हाही संस्थानला पाण्याचा भरपूर पुरवठा झाला पाहिजे. पाणी असेल तरच भरभराट शक्य आहे हा महाराजांचा दृष्टीकोन होता.

महाराजांची राज्यारोहणासंबंधाने झालेली इंग्लंड व युरोपची सफर ही त्यांच्या संस्थानवासीयांच्या दृष्टीने लाभदायक ठरलेली आहे. प्रवासात त्यांनी तेथील सर्व गोष्टींचे बारकाईने निरीक्षण केले होते. इटलीमधील शेती व उद्योग व्यवसायांचे निरीक्षणकरून तसे प्रयत्न आपल्या संस्थानामध्ये त्यांनी सुरु केले. शाहू मिलचे उद्‌घाटन करताना त्यांनी तसे उद्‌गार काढलेले आहेत, त्याचप्रमाणे राधानगरी सारखा मोठा प्रकल्प सुरु करण्याची स्फूर्ती, त्यांना तेथील प्रवासातच मिळाली. जिज्ञासूवृत्तीने ते प्रवासात माहिती गोळा करीत असत. इंग्लंडमध्ये लोक त्यावेळी औद्योगिकक्रांतीची फळे उपभोगत होते. तेथील लोक आपल्या साधनसंपत्तीचा व शक्तिचा उपयोग दूरदृष्टी ठेऊन व अत्यंत तळमळीने कसे करत होते ह्याचा प्रभाव त्यांच्या मनावर फार झाला होता. आपल्याकडे शेतीला भरपूर प्रमाणात पाणी हवे असते. पाऊस भरपूर पडतो. पण नद्यांना पूर येऊन ते पाणी शेवटी सागराला मिळते व उन्हाळ्यात आपल्याला अेकूणच पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. अजूनही महाराजांच्यानंतर पन्नासवर्षानीसुद्धा आपल्या ह्या दृष्टीकोनात फारसा फरक झाला आहे असे वाटत नाही. इस्त्रायलमध्ये वार्षिक पाऊस राजस्थान सारखा प्रदेश पडणाऱ्या पावसाइतका असूनसुद्धा त्यांनी नंदनवन फुलवले आहे. चीनच्या काही वैराण भागात मनुष्यबळाच्या सहाय्याने मैलामैलावरून पाणी आणून त्यांनी शेती यशस्वी केलेली आहे. पण आपण मात्र पाऊस भरपूर पडूनही दुष्काळाच्या चटक्यांनी होरपळत बसतो! महाराजांनी हे मर्म बरोबर ओळखूनच राधानगरी प्रकल्पाची आखणी केली होती. यामुळे कोल्हापूर संस्थानचा कायापालट झाला.

इंग्लंडहून आल्यापासून त्यांच्या मनात ही योजना घोळत होती. यावर सतत ४–५ वर्षे ते विचार करीत होते. त्यानंतर १९०७ मध्ये मनात त्या योजनेला निश्चित आकार दिल्यावर व तसा मनाचा निश्चय झाल्यावर त्यांनी पुढील हालचाल त्या दिशेने करायला सुरवात केली. आणि ही भव्य योजना साकार होऊ लागली. कोल्हापूर पासून पश्चिमेकडे ३० मैलावर फेजिवडे नावाच्या गावी भोगावती नदीला बांध घालून जमिनीला पाणी पुरवठा

करण्याची योजना आखली गेली. १७०७ च्या आरंभी ही योजना कार्यान्वित होऊ लागली. एप्रिल १९०७ मध्ये तेथील जागेची पाहणी करण्यात आली. यासाठी एक खास इंजिनियर नेमण्यात आला होता. नोव्हेंबर १९०९ मध्ये महाराणी लक्ष्मीबाई ह्यांच्या हस्ते ह्या महान कार्यास आरंभ झाला आणि तलावाला त्यांचेच नांव देण्यात आले. ह्या तलावाचे काही काम मक्ते देऊन व काही काम संस्थानच्या खात्यामार्फत करण्यात आले. संस्थानातर्फे या कामावर महाराजांचे बंधू देखरेख करीत होते.

सुरवातीच्या काळात पायाच्या खोदाईचे काम त्वरित सुरु करण्यात आले. अतिशय खोलभागात चांगले खडक लागले. त्याठिकाणी बांधकाम सुरु केले गेले. पहिले वर्ष दगडाच्या खाणी सुरू करणें, छोटासा रेल तयार करणे चुना कांडण्यांच्या गिरण्या बांधणे, सोयीच्या ठिकाणी कंकर वाळू इत्यादीचा अंतरामंतरावर साठा करुन ठेवणे, यालाच लागले. सुरवातीला या कामावर २००० मजूर काम करीत होते. मार्च १९१० पर्यंत एकूण ६६००० रु. खर्च झाला. १९१०-११च्या सुमारास कामाची गती खंडित झाली. योजना लाभदायक होईल का नाही इथपर्यंत प्रश्न येऊन ठेपला. याबद्दल महाराजांना बराच मानसिक त्रास सहन करावा लागला. करवीर व आळते तालुक्यातील सुपीक जमीन लागेपर्यंत डोंगराळ भागातून कित्येक मैलापर्यंत कालवा काढल्याने फायदा होणार का नाही हा प्रश्न होता. नदीतील पाण्याचा ओघ वळवून कोल्हापूरच्या हद्दीत नसलेल्या प्रदेशातूनच कालवा काढणे हा दूसरा उपाय होता. जानेवारी १९११ मध्ये महाराजांनी सर जार्ज क्लार्क यांना पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी लिहिले होते– "आमच्या योजनेसाठी दोन कालवे आम्हास हवे होते. परंतु हा माझा विचार आता बदलला असून भोगावती व दूधगंगा यांच्या काठावरील दोन भिन्न दरीतून मला हे दोन्ही कालवे काढावयाचे आहेत. या बंधाऱ्यातील पाणी जर आम्हास पुरेनासे झाले तर भोगावतीवर दूधगंगेला आणखी एक छोटासा बंधारा बांधण्याचा माझा विचार आहे."[1]

त्यांना मध्यंतरी बंधाऱ्याच्या टिकाऊपणा बद्दलची शंका आली होती. कारण त्या भागात पावसाचे प्रमाण भरपूर सुमारे २०० इंच होते त्याशिवाय संस्थानची आर्थिक स्थिती लक्षात घेतली तरीही हे काम बरेच मोठें होते. सर जॉर्ज क्लार्क ह्यांनी महाराजांच्या कन्येच्या विवाहानिमित्ताने कोल्हापूर संस्थानला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी या योजनेचा आवर्जून उल्लेख केला होता. त्यांनी असे उद्‌गार काढलें होते की, " पाटबंधाऱ्याची एक मोठी योजना आपल्या मनात घोळत आहे. हे मला माहित आहे. या योजनेमुळे आपल्या संस्थानच्या बऱ्याच भागातून गरीब शेतकऱ्यांना अतिशय गोत्यात आणणाऱ्या अवर्षणाची भीती कायमची दूर होईल...... आणि ही योजना म्हणजे जमिनीची उत्पादकता सुधारण्याची व तुमच्या लोकांना जास्त भरभराट प्राप्त करून देण्याची खरी इच्छा आहे याचा पुरावाच आहे."2

१९१२–१३ च्या अहवालावरुन महाराजांनी ह्या कामाकडे विशेष लक्ष दिले होते असे दिसून येते. वर्षाअखेरपर्यंत ४,८६,१०७. रु खर्च केले गेले. ह्या वर्षात ४,१०,५७७ घनफूटाचे बांधकाम करण्यात आले. सुरवातीपासूनचे बांधकाम १५,४१,६१२ घनफूट झाले होते. एकूण ३१०० कामगार या कामावर काम करीत होते. या वर्षी अनेक इंग्लिश लोकांनी ह्या प्रकल्पाला भेट दिली होती आणि प्रशंसोद्‌गारही काढलेले होते.

१९१३–१४ च्या अहवालात त्या वर्षी रु. २०७,९६८ बंधाऱ्याच्या कामावर खर्च केल्याची नोंद आहे. एकूण खर्च रु. ६,९४,०७६ होता. ९,१२,९७७ घनफूट बांधकाम त्या वर्षी झाले आणि सुरवाती पासून अेकूण बांधकाम २४,५४,५८९ घनफूट होते ह्या वर्षी तलावाच्या कामाची देखरेख श्री. बी. पी. जगताप करीत होते. कामावर एकूण ३१०० कामगार होते. १९१५–१६ च्या अहवालानुसार या कामात बरीच प्रगती झाल्याचे दिसून येते. वार्षिक खर्च २,२५,२१९ होता. गतवर्षीच्या अहवालात (१९१४–१५) हाच खर्च १,९९,१६७ रु. असल्याची नोंद आहे. १९१५–१६ मध्ये बांधकाम

६००००० घनफूट झाले. अहवालाच्या गेल्यावर्षी हेच काम ७६,१,००० घनफूट होते. सुरवाती पासूनचे बांधकाम ३८,१५,५८९ घनफूट होते १९१६-१७ च्या अलवालात वार्षिक खर्च १,८३,७४० रू. होता. कामाला सुरवात झाल्यापासूनचा खर्च १३,०२१६६ रु. होता. वार्षिक बांधकाम ५०९,३०० घनफूट झाले होते व सुरवातीपासूनचे बांधकाम ४३,२४,९०० घनफूट होते. कामगारांची संख्या मात्र आपल्याला कमी झालेली आढळते. २०६० कांमगार कामावर होते. १९१८-१९ च्या अहवालावरून आपल्याला असे समजते की राधानगरी प्रकल्पाचे बांधकाम थंडावलेले आहे.

दुर्दैवाने महाराजांच्या हयातीत हे काम पूर्ण होऊ शकले नाही. हे पूर्ण करण्याची जबाबदारी श्री. राजाराम महाराज यांच्यावर होती. त्यांच्या कारकीर्दीतच हे काम पूर्ण झाले. या धरणामुळे शेतीला मोठया प्रमाणावर पाणी पुरवठा होऊ लागला आणि कोल्हापूर संस्थानाचे स्वरूप पालटले. या बरोबरच महाराजांनी दूसरे सुमारे २० तलाव बांधले. लक्ष्मी तलावा जवळच महाराजांनी आपल्या मुलीच्या नावाने एक नगरी वसविली.

हरित क्रांतीबद्दलचा अगदी 'हरितक्रांती' ह्या शद्बात जरी नसला, तरी महाराजांचा दृष्टीकोन त्यांचे विचार हे आपल्याला महाराजांच्या अेका भाषणावरून समजून येतात. कागल आधिपतीनी यमगे येथे अेक तलाव बांधला होता त्याचे उद्‌घाटन शाहूमहाराजांच्या हस्ते झाले. तेथील लोकांनी महाराजांना मानपत्र अपर्ण केलें होते. त्या मानपत्राला उत्तर देताना महाराजांनी आपले विचार मांडले आहेत. बापूसाहेब महाराजांनी हा जो तलाव बाधला होता त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सोय तर केलीच गेली, पण ऊस भात इ. पिकांची वाढ होण्याच्या दृष्टीनेही फार महान कार्य केले गेले. त्याचा जर ऊस शेतीला उपयोग झाला तर गूळ तयार करण्यासाठी व साखर कारखाने उघडण्यासाठीही चांगले कार्यक्षेत्र निर्माण केले जाईल. यामुळे व्यापाराची वाढ होईल.

हया सगळया द्रष्टेपणाचे फळ आता कोल्हापूर जिल्हयातील लोकांना मिळत असून महाराजांचे श्रम सार्थकी लागल्याचे आपल्याला दिसून येते. इतक्या दूरदृष्टीने जनतेचे हित पाहणारा, जपणारा व करणारा संस्थानिक तर विरळाच !

## राधानगरी प्रकल्प

| वर्ष | वर्षातील बांधकाम (घनफूट) | अेकूण बांधकाम (घनफूट) | वर्षातील खर्च (रूपये) | अेकूण खर्च (रूपये) | कामगार |
|---|---|---|---|---|---|
| १९११-१२ | २,५२,७०० | ८,६६,४०० | १,२९,१७३ | ‡ | ३१०० |
| १९१२-१३ | ४,१०,५७७ | १५,४१,६१२ | १,४७,०६७ | ४,८६,१०७ | ३१०० |
| १९१३-१४ | ९,१२,९७७ | २४,५४,५८९ | २,०७,९६८ | ६,९४,०७६ | ३१०० |
| १९१४-१५ | ७,६१,००० | ३२,१५,५८९ | १,९९,१६७ | ८,९३,२४३ | ३००० |
| १९१५-१६ | ६,००,००० | ३८,१५,५८९ | २,२५,२१९ | ११,१८,४६२ | ‡ |
| १९१६-१७ | ५,०९,३०० | ४३,२४,९०० | १,८३,७०४ | १३,०२,१६६ | २०६० |
| १९१७-१८ | ६१,१२८ | ४३,८६,०२८ | ३३,९६४ | १३,३६,१३० | ‡ |

‡ आकडे उपलब्ध नाहीत.

वरील तक्त्यावरून राधानगरीचे बांधकाम प्रतिवर्षी कसकसे होत गेले व त्यासाठी संस्थानला त्यावर किती खर्च करावा लागला हे आपल्याला समजून येते.

( आधार :- Administrative Reports 1911 to 1918 )

## तक्ता नं. १

### कोल्हापूर संस्थानमधील एकूण बागाईत जमीन, पक्क्या विहिरी व कच्च्या विहिरींचा तक्ता

| वर्ष | बागाईत जमीन (एकर) | पक्क्या विहिरी | कच्च्या विहिरी |
|---|---|---|---|
| १९०६-०७ | ❋ | ५,४८४ | ८३९ |
| १९०७-०८ | ❋ | ५,५६३ | ७७७ |
| १९०८-०९ | ❋ | ११,२१५ | ८७६ |
| १९०९-१० | ❋ | ११,०५२ | ८७८ |
| १९१०-११ | ❋ | १०,६६८ | ९६२ |
| १९११-१२ | १५,५५७ | १०,६६९ | ९६५ |
| १९१२-१३ | १५,५०६ | ११,००६ | १३८७ |
| १९१३-१४ | २९,९२६ | १०,८९५ | १३०९ |
| १९१४-१५ | ३२,४६९ | १०,८४८ | १३३२ |
| १९१५-१६ | ७९,८६० | ११,००५ | ९७५ |
| १९१६-१७ | ५५,८४३ | ११,००५ | १०४० |
| १९१७-१८ | ३५,४८५ | १०,६३६ | ९९० |
| १९१८-१९ | ३०,०४१ | १०,८१८ | ९८४ |
| १९१९-२० | ३०,१९५ | १०,८९६ | १०२७ |
| १९२०-२१ | २३,३१९ | १०,८६८ | ११२२ |
| १९२१-२२ | २९,९९५ | १०,९३० | ११२७ |

❋ आकडे उपलब्ध नाहीत.

## संदर्भ

1 ' श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र '

— आ. बा. लठ्ठे २५७

2 ' श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र '

— आ. बा. लठ्ठे २७१

★ ★

# औद्योगिक विकास

" The purpose of industry is obvious. It is to supply man with things which are necessary useful or beautiful and thus to bring life to body or spirit "

**—R. H. Tawney**

## महत्व–

देशाच्या अर्थव्यवस्थेत औद्योगिक विकासाला अत्यंत महत्वाचे स्थान असते. विशेषत: भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांना ह्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. आधुनिक अर्थव्यवस्थेचा हा कणाच आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे मोजमाप हे बऱ्याच अंशी औद्योगिकरणावर अवलंबून असते. ह्या औद्योगिक विकासाचा परिणाम अनेक क्षेत्रावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष असा होत असतो. औद्योगिकरण राष्ट्राचे उत्पन्न वाढविण्यास मोठाच हातभार लावते. औद्योगिक विकासा-बरोबरच लोकांना रोजगार देण्याचा प्रश्न सोडविणे शक्य असते. माणसाच्या गरजा अनंत असल्याने त्या भागविणेसही औद्योगिक विकास मदत करतो. शेतीसारख्या क्षेत्रातही औद्योगिकरणामुळे आधुनिक उत्पादन तंत्रे यंत्रे वापरल्यास अन्नधान्याचाही प्रश्न सोडविणे सुलभ होते. आधुनिककालात कोणताही देश स्वयंपूर्ण राहू शकत नाही. प्रत्येकाला आपल्या उत्पादनाच्या

व उपभोगाच्या गरजा भागविण्यासाठी कांही अंशी तरी दुसऱ्या देशावर अवलंबून रहावे लागते. ह्यासाठी जितक्या जास्त वस्तू आपण निर्माण करू शकतो तितक्याच त्या देशात व देशाबाहेर विकू शकतो. म्हणजेच ओघाओघाने अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारावरही ह्याचा अनुकूल परिणाम होतो.

औद्योगिक विकास हा जरी प्रथम पासून खाजगी क्षेत्राचा विषय असला तरी सुद्धा भारतामध्ये ज्या वेळेला औद्योगिक क्रांतीची पाऊले नुकतीच कोठे पडू लागतील असे वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळेला स्वतंत्र्यपूर्व कालात राज्यकर्त्यांवर याची बरीच जबाबदारी होती. त्यावेळेला भारतात दोन प्रकारचे राज्यकर्ते होते. अेक म्हणजे परकीय ब्रिटिश सरकार व दुसरे म्हणजे खाजगी संस्थानिक. खाजगी संस्थानिकांना अंतर्गत व्यवहारापुरते स्वातंत्र्य देण्यात आलेले होते. त्यामुळे प्रत्येक संस्थानची भौतिक प्रगती आर्थिक भरभराट ही त्या त्या संस्थानिकांवर बऱ्याच अंशी अवलंबून होती आणि सध्या कोल्हापूरात आपल्याला जी औद्योगिक प्रगती झालेली दिसून येते तिचे मूळ शाहू छत्रपतींच्या कारकिर्दीत आढळून येईल. महाराजांनी ह्या क्षेत्राकडे विशेष लक्ष पुरवलेले दिसून येते. राज्याधिकार प्राप्त होऊन जरा स्थिरस्थावर झाल्यानंतर शेतीच्या विकासाबरोबरच औद्योगिक विकास व व्यापार ह्यांची भरभराट झाली पाहिजे असे त्यांचे विचार होते. औद्योगिक विकासाशिवाय देशाला तरणोपाय नाही. देशाच्या दृष्टीकोनातून औद्योगिक विकास दुहेरी महत्त्वाचा आहे. अेक म्हणजे औद्योगिक विकासामुळे आपल्याला आपली साधन संपत्ती, राष्ट्रीय उत्पन्न व व्यापार वाढवता येतो दुसरा जास्त महत्त्वाचा घटक म्हणजे शहरी व ग्रामीण भागात कारखाने निघाल्यास तिथल्या लोकांना रोजगारही मिळवून दिला जातो. त्यासाठी खेड्यातील लोकांनी आपला ओघ सतत मोठ्या शहराकडे वळवण्याची आवश्यकता नाही. हस्तव्यवसायात व तत्सम कौशल्यात आपली परंपरा फार मोठी आहे. लोकांना ते आहेत तेथेच रोजगार उत्पन्न करून दिल्यास पुढचे आर्थिक प्रश्न फारसे निर्माण होणार नाहीत. राष्ट्राची आर्थिक प्रगती करून घेण्यास उद्योगधंद्याची वाढ फार महत्त्वाची आहे.

अशातऱ्हेचे उद्गार त्यांनी राजाराम इंडस्ट्रियल स्कूल, शोरूम व बोर्डिंग हाऊस यांचे उद्घाटन करताना १५-८-१९२० रोजी काढलेले आहेत.[1]

अशातऱ्हेचे केवळ उपदेशात्मक विचार मांडूनच महाराज थांबले नाहीत तर त्या दृष्टीने त्यांनी जारीने प्रयत्न सुरु केले. कारकिर्दीच्या अगदी सुरवातीला ज्यावेळेला कोल्हापूर स्टेट रेल्वे लाईन बांधणीचा समारंभ केला गेला त्यावेळेलाच अशा तऱ्हेच्या विचारांचा उगम झालेला आपल्याला आढळून येतो. रेल्वे बांधणी महत्वाची का तर त्यामुळे व्यापार वाढतो, संस्थानची साधन संपत्ती वाढते, औद्योगिक विकासाला हातभार लागतो. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षाचे हे विचार पुढील आयुष्यातील कृतीच्या दृष्टीने उल्लेखनीय ठरतात.[2]

औद्योगिक विकासाच्या दृष्टीकोनातून महाराजांच्या कारकिर्दीकडे दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्याला असे दिसून येईल की, औद्योगिक विकास होण्यासाठी महाराजांनी हर प्रकारचे, हर तऱ्हेचे प्रयत्न केलेले आहेत. केवळ शहरी, केवळ ग्रामीण, केवळ शेतीवर आधारित असलेले व शेतीवर आधारित नसलेले उद्योगधंदे इ. असा फरक त्यांनी केला नाही. किंवा केवळ एकाच उद्योगधंद्याच्या विकासावर त्यांनी भर दिलेला नाही. संस्थानची औद्योगिक वाढ सर्वांगिण व्हावी व त्यामध्ये मानवी घटकांना मान व स्थान देऊन ती केली जावी याकडे त्यांनी जातीने लक्ष पुरविले. विविध प्रकारच्या व्यवसायांना त्यांनी हस्ते परहस्ते नानाप्रकारची मदत केली. उद्योगधंद्यांना स्वतःच्या पायावर भरभक्कमपणे उभे राहता यावे यासाठी त्यांनी योग्य प्रकारे पोषक परिस्थिती निर्माण केली. ह्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले त्यात त्यांची दूरदृष्टी, धाडस, सयोजकत्व आढळून येते हे सर्व महाराजांनी कसकसे केले हेच सविस्तरपणे आपल्याला ह्या प्रकरणात बघायचे आहे.

## शाहू मिल–

कोल्हापूर संस्थानच्या औद्योगिक विकासातील त्या काळातला महत्वाचा टप्पा म्हणजे शाहू मिल, तिची स्थापना, वाढ व तिला काही

काळानंतर मिळालेला दरबारचा आश्रय. श्री शाहू छत्रपतींची स्पिनिंग अणि वीव्हिंग मिलचा पायाभरणी समारंभ महाराजांच्या हस्ते करण्यात आला. सुरवातीला ही गिरणी सामायिक भांडवलाच्या तत्त्वावर आधारित होती. पण अनेक बदल होऊन ती शेवटी राजाश्रयाखाली आली. ह्या गिरणीसाठी महाराजांनी जागा व तलाव मोफत देऊन शिवाय भांडवलाची मदतही केली होती. कांही वर्षांचा मक्ता कारखान्याच्या चालकांना दिलेला होता. परंतु गिरणीची भरभराट मात्र ती जेव्हा दरबारच्या आश्रयाला आली तेव्हाच झाली.

ह्या मिलच्या उद्घाटन प्रसंगी महाराजांनी आपले काही विचार ह्या बाबतीत प्रकट केले आहेत. कोल्हापूरच्या औद्योगिक विकासाचे अेक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या वेळेला महाराज इंग्लंडच्या प्रवासात होते त्याच वेळेला त्यांना बऱ्याच प्रकल्पाचे मूळ स्फुरले व तसे त्यांनी स्पष्ट आपल्या भाषणामध्ये व्यक्त केलेले आढळते. 'गिरणीला मदत करण्यात मी विशेष असे काहीच केले नाही. कारण कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणारा हा अशा तऱ्हेचा पहिला प्रकल्प माझ्या संस्थानामध्ये सुरू होत आहे.[3] 'राज्यारोहणाप्रसंगी जेव्हा ते इंग्लंडला गेले होते त्यावेळेला इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे ते प्रभावित झाले होते. अशातऱ्हेचे कोल्हापूर संस्थानमध्ये काहीतरी केले पाहिजे आणि संस्थानची साधनसंपत्ती अत्यंत चांगल्या तऱ्हेने उपयोगात आणली गेली पाहिजे, आणि त्याच वेळेला कोल्हापूरातील सधन लोकांनी ती गिरणी उभारण्याचा प्रयत्न केला. महाराजांच्या मतानुसार असे प्रयत्न लोकांनी केले पाहिजेत, सहकाऱ्याच्या तत्त्वावर उभे राहिले पाहिजे आणि गरज असेल तरच मदतीचा हात दरबारने द्यायला हवा याचे कारण म्हणजे संस्थानावर आधीच इतर बऱ्याच जबाबदाऱ्या असतात, आणि अशा वेळेला आणखी संपूर्ण जबाबदारी संस्थानावर टाकणे अन्यायाचे होईल. लोकांनी आपण होऊन सहकारी तत्त्वावर अशा प्रकारच्या गिरण्या काढाव्यात आणि मग त्याला लागेल ती मदत द्यायला मी तयार आहे असे आश्वासन महाराजांनी दिले.[4]

ह्या गिरणीचा व्याप नंतरच्या काळात कसकसा वाढत गेला हे आपल्याला दरबारच्या वार्षिक अहवालावरून समजून येते. १९०६-७ च्या अहवालात आपल्याला असे दिसून येते की, ह्या गिरणीचे रजिस्ट्रेशन १९०५-६ मध्ये झालेले होते व गिरणीचे सुरवातीचे भांडवल १५ लाख रुपयांचे होते. त्यानंतर गिरणीच्या इमारतीचे बांधकाम सुरू झाले, इमारत बांधणी व यंत्राची व्यवस्थित मांडणी पूर्ण झाली आहे, थोडयाच काळात गिरणीचे कामकाज सुरू होईल अशी नोंद आपल्याला १९०९-१० च्या अहवालात मिळते. प्लेगचे संकट जरी संस्थानात वावरत होते तरी गिरणीच्या बांधकामात काहीही अडचणी आल्या नाहीत. गिरणीच्या कामकाजाला १९०९ च्या फेब्रुवारीत आरंभ झाला. गिरणीच्या १०,००० शेअर्सपैकी मार्च १९११ पर्यंत ५,४८३ विकले गेले. ११,३८८ स्पिंडल्स काम करीत होत्या. दररोज २१७ कामगार कामावर येत होते. १९१२-१३ च्या अहवालानुसार गिरणीमध्ये स्पिंडल्सची संख्या वाढलेली नव्हती. पण उत्पन्न ६,००,८७१ रुपयांचे झाले. त्याच्या गतवर्षी हेच उत्पादन ५,५२,११० रु. होते. कामगारांची संख्या ४४५ होती. मार्च १९१३ पर्यंत १०,००० शेअर्स पैकी ५,९२४ शेअर्सची (प्रत्येक शेअर १०० रु. चा) विक्री झालेली होती.[5]

नोव्हेंबर १९१३ पासून रेशाच्या कमतरतेमुळे गिरणीचे कामकाज बंद पडलेले होते. १९१८-१९च्या अहवालात मात्र गिरणीचे काम सुरू झाल्याची नोंद आपल्याला आढळते व वर्षभरात धाग्याचे अेकून १८७३ गठ्ठे तयार झाले. प्रत्येक गठ्ठा १०० पौंडांचा होता. त्याच्या पुढच्याच वर्षी गठ्ठ्यांची संख्या २३३४ इतकी वाढली. त्या नंतरच्या वर्षात हीच संख्या २३०० होती.[6]

## काताचा कारखाना –

महाराजांनी अधिकारग्रहण केल्यानंतर १८९५ साली संस्थानच्या परिस्थितीचे आकलन होण्यासाठी संस्थानच्या निरनिराळ्या भागामध्ये दौरा काढला होता. शेणगाव हे गारगोटी पासून काही मैलाच्याच अंतरावर आहे,

त्या ठिकाणी काताचा अेक कारखाना होता महाराजांनी त्याची पहाणी केली व काताचे उत्पादन वाढण्यासाठी प्रयोग सुरु केले. हे उत्पादन वाढवल्यावर त्यांनी आणखी काही कारखाने काढण्याचे ठरवले. अर्थात हा व्याप फार मोठ्या प्रमाणावर वाढवता येणे शक्य नव्हते. परंतु आगदी थोड्या प्रमाणावर जरी हे सर्व सुरु झाले असते तरी ते किफायतशीर ठरले असते कारण त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळाला असता. त्यांना उत्पन्नाचे अेक साधन मिळाले असते.

## नवीन व्यवसाय –

संस्थानात जे उद्योगधंदे होते त्यांना उत्तेजन देण्याचा प्रयत्न महाराजांनी केला पण हे प्रयत्न तेवढ्यावरच थांबले नाहीत तर आवश्यक तेथे व्यवसाय सुरु करण्यासाठीही विधायक उपाय त्यांनी योजले. त्यासाठी अगदी सुरवातीला त्यांनी चहा कॉफीची लागवड करण्यास सुरुवात केली. ह्याचे कारण म्हणजे चहा-कॉफीच्या किमती वाढत असल्याने त्यांची लागवड किफायतशीर ठरली असती. ह्या संबंधीचे सविस्तर विवेचन 'शेती' ह्या प्रकरणात प्रथम येऊन गेलेलेच आहे. पुण्यातील कापसाची व रेशमाची गिरणी त्याचप्रमाणे पुण्याला जी स्वदेशी कागदाची गिरणी होती त्यांचे महाराज आश्रयदाते होते. स्वतः ते स्वदेशी कागदच वापरत असत. या वरून आपल्याला असे दिसून येते की त्यांचे लक्ष केवळ कोल्हापूर संस्थानपुरतेच मर्यादित नव्हते तर औद्योगिक वाढीला हातभार लावण्याच्या उपक्रमात त्यांनी आपला दृष्टीकोन विशाल ठेवला होता. महाराज ज्या वेळेला इटलीला गेले होते तेव्हा त्यांनी तेथील उद्योगधंद्यांची पाहणी केली होती व ते उद्योग व्यवसाय आपल्या इथे सुरु करण्यासाठी काय करता येईल या संबंधी योजनाही त्यांच्या मनात घोळू लागली होती. रेशीम, काचसामान, कृत्रिम मोती तयार करणे हे ते व्यवसाय होत. त्यांनी ज्या वेळेला इटलीला भेट दिली होती तेव्हा इटलीतील शेती व उद्योग व्यवसाय याची तुलना त्यांनी भारतातील शेती व उद्योगव्यवसाय ह्यांच्याशी केली

होती. प्रत्यक्ष तेथें जाऊन शिक्षण घेणारा व वेगवेगळे प्रयोग करून पाहणारा माणूस त्यांना हवा होता पण दुर्दैवाने त्यांना कोणी मिळू शकले नाही. मात्र मधव्यवसायात त्यांनी स्वत: जातीने लक्ष घातले व त्यातील ज्ञान मिळवले. रजपुतवाडी येथे सतत दोन वर्षे हा व्यवसाय सुरु होता आणि जो मध मिळत असे तो ते सर्वांना दाखवित असत.

## जिनिंग फॅक्टरी –

ज्या वेळेला शाहू मिलची स्थापना व वाढ सुरु होती त्याच वेळेल शिरोळ रोड येथील जिनिंग फॅक्टरीलाही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मदत महाराजांनी दिली होती. १९०८–९ ह्या वर्षात इचलकरंजी येथेही जिनिंग फॅक्टरी सुरु करण्यात आली. शिरोळ तालुक्यात २ जिनिंग फॅक्टरीज् होत्या. त्यातील चिंचली येथील फॅक्टरी समाधानकारकपणे काम देत होती. १९१०–११ च्या अहवालावरून असे दिसून येते की शिरोळ रोड येथील फॅक्टरी वर्षभर बंदच होती. याच कालात लक्ष्मण बाबाजी कोरेगावकर यांनी नवीन जिनिंग फॅक्टरी गडहिंग्लजला सुरु केली. कापसाच्या हंगामात ४ महिने म्हणजे फेब्रुवारी ते जून ह्या काळात फॅक्टरीचे काम चालत असे. ह्या कारखान्यात कामगारांची संख्या ५० पर्यंत होती १ लाख रुपयांचे उत्पादन त्या काळात झाले. इमारत बांधणीकरिता व यंत्र खरेदीकरिता रु. २०,००० खर्च झाले होते. महाराजांनी मोठ्या कृपेने ह्या फॅक्टरीकरीता २ अेकर जागा गडहिंग्लज मध्येच दिलेली होती. आणखी एक विशेष सवलत त्यांनी ह्या फॅक्टरीकरिता दिलेली होती व ती म्हणजे पुढील १० वर्षा पर्यंत गडहिंग्लज मध्ये कोणतीही जिनिंग फॅक्टरी सुरु करण्यास त्यांनी बंदी घातली होती. ह्या बाबतीत महाराजांनी उचललेले पाऊल अत्यंत सूचक व महत्त्वपूर्ण होते ह्यात शंका नाही. उद्योगधंदे ज्या वेळेला बाल्यावस्थेत असतात त्या वेळेला त्यांची वाढ होण्यास त्यांना संरक्षण देणे अत्यावश्यक असते. ज्या प्रमाणे लहान मुलांची निरोगी वाढ होण्यास त्यास आईबापाकडून संरक्षण, मदत आवश्यक आहे तसेच उद्योग-

धंद्याचे आहे. ज्या वेळेला उद्योगधंदे अजून स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभे नसतात त्या वेळेला जर व्यवसायात स्पर्धा निर्माण झाली तर ते व्यवसायांना हानिकारक असते. नफा निर्माण होऊ शकत नाही. ते कोलमडून पडण्याची शक्यता असतात" हा विचार मनात ठेऊनच महाराजांनी नवीन जिनिंग फॅक्टरी सुरु करण्यास बंदी घातली होती.

इचलकरंजी येथे नवीन जिनिंग फॅक्टरी सुरु करण्यात आली असे १९१०-११ च्या अहवालावरून दिसून येते. फेब्रुवारी महिन्यात श्री व्यंकटेश जिनिंग फॅक्टरी ह्या नावाने ती सुरु करण्यात आली. यामध्ये ५६ कामगार काम करीत होते. त्या मध्ये अेकूण २,५९,००० रू. किंमतीचे उत्पादन झाले आणि कारखान्याला रू ८००० चा नफा झाला होता. इमारत, यंत्रे यावर रू. २३,००० खर्च करण्यात आले होते.

१९१२-१३ पर्यंत संस्थानात अेकूण ६ जिनिंग फॅक्टरीज् होत्या. त्यांची विभागणी खालील प्रमाणे होती. २ कोल्हापूर, १ इचलकरंजी, १ शिरोळ-रोड, १ चिंचली व १ गडहिंग्लज. कच्च्या मालाचा तुटवडा जाणवत होता. तरीही कारखान्यांचे काम समाधानकारकपणे चाललेले होते. ह्या फॅक्टरीज्मध्ये १९१५-१६ पर्यंत आणखी अेकाची भर पडली. १९१६-१७ मध्ये ह्या कारखान्यांना कामाचा तुटवडा जाणवू लागला. १९१८-१९ च्या अहवालानुसार ह्या कारखान्यांची संख्या ७ वरून ४ वर आली. १ कोल्हापूर मध्ये, २ गडहिंग्लज मध्ये आणि १ शिरोळला असे त्यांचे वाटप होते. परंतु ही संख्या परत ७ पर्यंत वाढली असे १९२०-२१ चा अहवाल सांगतो. २ कोल्हापूर, ३ गडहिंग्लज १ शिरोळ, व १ इचलकरंजी.

## विव्हिंग फॅक्टरीज्--

जिनिंग फॅक्टरीत जशी वाढ झाली तशाच प्रमाणात विव्हिंग फॅक्टरीचीही हालचाल होत होती. रायबाग येथे अेका ब्राह्मण सज्जाने हातमागाचा कारखाना सुरु केला होता. त्यालाही महाराजांनी

मदत सढळ हाताने दिलेली होती. या कारखान्याला लागणारे सर्व भांडवल महाराजांनी दिलेले होते. बरीच वर्षे हा कारखाना सुरु होता. रायबाग हे त्या काळामध्ये ह्या व्यवसायाचे फार मोठे महत्वाचे केंद्र होते. तेथे काम करणारे कामगार आपापसात कलह झाल्याने रायबाग सोडून मधोळ, महालिंगपूर अशा ठिकाणी जाऊन तेथे कायमचे स्थाईक झाले होते. ह्यामुळे महाराजांचे लक्ष तिकडे वेधले गेले. त्यांनी रायबाग येथे येऊन कायमपणे स्थायिक होणाऱ्या कामगारांना फार मोठ्या प्रमाणावर सवलती दिल्या. यावरुन उद्योगधंद्यासाठीं श्रमाची आवश्यकता, कुशल कामगारांचा व्यवसायाला पुरवठा ह्या बाबतीतला महाराजांचा दृष्टी-कोन आपल्याला दिसून येतो. ह्या कामगाराना बिनव्याजी भांडवल, राहण्यासाठी जागा व कसण्यासाठी थोडी जमीन ह्या प्रकारच्या सवलती होत्या. ह्याठिकाणी साड्या,धोतरे,खण इ.चे उत्पादन होत असे.[7] रायबागला Shri Shahu weavers'Association ची स्थापना केलीहोती. १९१०-११ च्या अहवाला नुसार कामगारांना वेतन म्हणून रु. २,३२५ वाटण्यात आले आणि रु. १०,१७४ किमतीच्या मालाची विक्री करण्यात आली. ५० हातमागावर २०० कामगार काम करीत होते.१८६ रु. निव्वळ नफा झाला.[8] इचलकरंजी येथेही अशा प्रकारचा व्यवसाय सुरु झाला. असे १९२०-२१च्या अहवाला वरुन दिसून येते. येथे ६० कामगार काम करीत होते. रु. १,२५००० किमतीचा माल तयार करण्यात आला.

## रंगकाम —

ह्या दोन्ही व्यवसायांबरोबरच रंगकामाकडेही महाराजांनीं दुर्लक्ष केले नाही. रायबाग येथे व्यवसायाची प्रगती उत्तम व्हावी ह्याकरीता व तेथील विणकामाच्या व्यवसायाला मदत होण्याकरिता देखील रंगकामाचा कारखाना सुरु करता येईल की नाही ह्यासाठी रसायनशास्त्रज्ञ पाठवला होता. इचलकरंजी येथील विणकाम व्यवसायाला मदत म्हणून श्री व्यंकटेश रंगतंतु कारखाना सुरु करण्यात आला. ह्याची देखभाल श्री. व्ही. के. दातार पहात होते. रु. ४०,००० किमतीचा धागा रंगविला गेला होता. ३५ काम-

गार कारखान्यात काम करीत असून वार्षिक नफा रु. २५०० ते ३००० होता.[१] १९१२–१३ च्या अहवालानुसार ह्या कारखान्यात ४० कामगार काम करीत होते. व कारखान्याचा वार्षिक नफा रू. ३००० होता. १९१६–१७ साली याच कारखान्यातील कामगारांची संख्या तेव्हढीच होती. पण नफा रु. ४००० होता. उत्पादीत मालाचे मूल्य रु. ६०००० होते १९१८-१९च्या अहवालात ह्या कारखान्याची जास्त प्रगती झालेली आढळून येते उत्पादित मालाची किंमत रु. १००,००० होती.

## इतर उद्योगधंदे –

महाराजांनी राळ तयार करण्याच्या बाबतीतही प्रयत्न करून बघितले. संस्थानच्या जंगलामध्ये राळ तयार करण्यासाठी गंजन गवत भरपूर प्रमाणावर होत असल्याने हा प्रयोग केला गेला. यासाठी खास खानदेशाहून तज्ञ माणूस बोलविण्यात आला होता. कारण व्यवसाय किफायतशीर वाटत होता. परंतु ह्या नंतरच्या वर्षात आखेरचा पाऊस न पडल्याने गंजन गवत चांगले आलें नाही. त्यामुळे प्रयोगाची व्याप्ती मर्यादितच राहिली. दोन ठिकाणी गवताची लागवड व राळ तयार करण्याचे प्रयोग करण्यात आले. २४ शेर राळ तयार झाली. प्रत्येक शेराची किंमत २ रु ८ आ. पै. ० होती. १९००–१९०१ ह्यावर्षी प्रयोग जास्त यशस्वी झाला. गतवर्षी २४ शेर उत्पादन झाले होते. अहवालाच्या वर्षी १०० शेर झालेले होते. ह्यासाठी अेकूण उत्पादन खर्च रु. २६६ आला होता. व अेकूण उत्पन्न रु. ४६७ मिळाले. खानदेशात हा व्यवसाय चांगल्या प्रकारे होत असल्याने एका इन्स्पेक्टरला तेथे जाऊन व्यवसायावर प्रभुत्व मिळविण्यासाठी दरबारतर्फे पाठविण्यात आले. म्हणजे व्यवसायाची वाढ होण्यासाठी अनेक तऱ्हेचे प्रयत्न महाराज करीत होते हे आपणाला दिसून येते. हे जे उत्पादन संस्थानात होत होते त्यासाठी पुण्याचे श्री. युसूफ वालाद इब्राहिम बोहरी ह्यांच्याशी करार करण्यात आला. श्री. के. जी. आपटे ह्यांच्याशी गडहिंग्लज पेट्यासाठी स्वतंत्र करार करण्यात आला. ह्या पासून रु. ३२० उत्पन्न मिळाले.

१९१२–१३ च्या अहवालावरुन मेसर्स शिरगांवकर ब्रदर्स ह्यांनी १ लाख रुपये भांडवलावर तेलाची गिरणी सुरु केल्याचे समजून येते. इमारत बांधणी व यंत्रखरेदी ह्यांच्यासाठी रु. ७५००० खर्च केले होते. ही अशा प्रकारची पहिलीच गिरणी असल्याने महाराजांनी मोठ्या प्रमाणावर व महत्त्वपूर्ण सवलती दिल्या होत्या.

शहरात १९०९ च्या सुमारास दोन ग्राइंडिंग फॅक्टरीज् नविनच सुरु करण्यात आल्या होत्या. त्यांचे कार्यही समाधानकारक होते. ह्यांची संख्या १९१२–१३ च्या अहवालानुसार ५ झालेली होती. ४ शहरात होत्या व १ शाहूपुरी मध्ये होती. ह्या नंतर पुढच्या वर्षी हीच संख्या ७ पर्यंत वाढली. १९१८–१९च्या अहवालानुसार ह्यांची संख्या ५ पर्यंत खाली आली व वर्षातून १० महिनेच त्या काम करीत असत.

१९१२–१३ च्या अहवालानुसार इचलकरंजीच्या दानार कंपनीने शाहूपुरी मध्ये शिवाजी महाराज सॉ मिल ही नव्याने अस्तित्वात आणली परंतु सुरवातीच्या काळातील प्रगती असमाधानकारक होती. १९१६-१७ च्या अहवालावरुन काम नसल्यामुळे ही जवळ जवळ बंदच होती असे दिसून येते.

करवीर पेट्यातच चिखलीला १ व पन्हाळा पेट्यातील कोडोलीला १ असे दोन पाण्याचे पंप होते. [10] त्याच प्रमाणे अेक ऑईल इंजिनचा व अेक स्टीम इंजिनचा असे दोन मोटर पंप्सहि होते. ह्यामुळे २८ अेकर जमिनीला नदीपासून पाणी मिळत होते. [11]

संस्थानात अेकूण ११ शेंगदाण्याच्या गिरण्या होत्या. १० शाहूपुरी मध्ये व १ गडहिंग्लजला होती. [12] त्या नंतरच्या काळात काम कमी असल्याने हीच संख्या ७ वर आली. १९१८-१९ च्या अहवालानुसार फक्त २ गिरण्या काम करीत होत्या व त्याही वर्षातून सहामहिन्यासाठीच. ह्या शिवाय शाहूपुरी मध्ये साखर कारखाना, इंडियन सायकल अॅन्ड मोटर कं लि. इ. कारखानेही सुरु झाले होते.

१९०६-७ च्या शेवटी १८६२ च्या इंडियन कंपनीज अॅक्ट VI नुसार ३ कंपन्यांचे रजिस्ट्रेशन झालेले होते. ह्या मधील अेक बँक व्यवसाय करणारी होती, अेक व्यापार करणारी होती व अेकी तर्फे श्री शाहू छत्रपती स्पिनिंग व विव्हिंग मिल सुरु होणार होती. १९०९-१० च्या अहवालावरुन "कोल्हापूर को-ऑपरेटिव्ह युनियन लि." ह्या कंपनीचेही रजिस्ट्रेशन झाल्याचे आढळून येते.

आणखी एक महत्वाचा प्रयोग महाराजांनी केला. १९२०-२१ च्या अहवालात ह्या संबंधी माहिती मिळते. राधानगरी येथे लाकूड शुद्धीकरण (सत्व, अर्क काढणे) कारखाना प्रयोगात्मक म्हणून सुरु केला. त्यांचे काम ३-१-१९२० पासून सुरु झाले. ८५ दिवस काम चालू होते. कोळशाचे १०० पोत्यांचे (३० टन) उत्पादन झाले. त्याची विक्री तावडतोब तेथेच ४० रु. टना प्रमाणे करण्यात आली. त्यापासून मिळणारे द्रवरुप घटक-Pyroligneous Acid व डांबर वेगळे करण्यात आले डांबराची दोन पिपे-सुमारे १२०० पौंड कोल्हापूरला लिलावाने विक्री करण्यासाठी पाठविण्यात आली. मेथिल अल्कोहोल अॅसेटिक अॅसिड पासून स्वतंत्र करण्यासाठी Pyroligneous Acid चा साठा करुन ठेवण्यात आला.

ह्या प्रायोगिक कारखान्यातून जे पदार्थ निर्माण झाले ते म्हैसुरच्या प्रदर्शनात पाठविण्यात आले. ते मान्य केले गेले. व त्यांना चांदीचे पदक देण्यात आले. सरकारच्या भूगर्भ शास्त्रीय पाहाणी खात्यातर्फे सी. अेस फॉक्स कारखान्याला भेट द्यायला आले होते. त्यांना कारखान्याचे काम पसंत पडले.[13]

शुद्ध अॅसेटिक अॅसिड, लेड, कॅलशियम, सोडियम आणि ऑसिलेटस् ह्या पदार्थांना जास्त मागणी होती, म्हणून त्यांचे उत्पादन कारखानदारांनी करावयाचे ठरविले.

## जिनगर समाज —

महाराजांचा औद्योगिक विकासा बद्दलचा दृष्टीकोन त्यांनी जिनगर समाजाबद्दल घेतलेल्या प्रवृतीवरुनही दिसून येतो. कारजगर अगर जिनगर या नांवाने ते ओळखले जात असत. त्यांच्या करिता स्वतंत्र बोर्डिंग हाऊस स्थापिले गेले. त्याच प्रमाणे त्यावेळेस प्रिन्स राजाराम औद्योगिक शाळाही स्थापन केली गेली. हे लोक मराठे सैनिकांच्या घोड्यासाठी जीन (खोगीर) तयार करीत असत व त्याद्वारे त्यांनी भरपूर पैसा मिळविला. महाराजांनी ह्या जमातीच्या व्यवसायाला खूपच उत्तेजन दिले. निपाणी येथील अेक गृहस्थ श्री. यमनाजीराव आंबले ह्यांना महाराजांनी शाहूपुरी येथे धातू गाळण्याची भट्टी उघडायला परवानगी व मदत दिली. महाराजांचा औद्यो गिक चळवळीवर मोठा विश्वास होता. जिनगरांनी तयार केलेले जिन्नस मी स्वत: वापरेन असे त्यांनी सांगितले. जिनगरांच्या चळवळीला त्यांनी औद्योगिक स्वरुप प्राप्त करून दिले.

महाराज औद्योगिक विकास केवळ नविन व्यवसाय सुरु करून किंवा जुन्याना प्रोत्साहन देऊन करत होते असे नाही तर ह्या औद्योगिक विकासापासून ज्या वस्तू तयार होतात त्यांच्या विक्रीची व्यवस्था बघण्यासाठी त्यांची बाजारपेठ तयार करण्यासाठी व विकसित होण्यासाठी योग्य ती परिस्थिती निर्माण करत असत. औद्योगिक विकास व व्यापार हे अेकमेकांवर अवलंबून आहेत.व्यापारा शिवाय औद्योगिक विकासाला काही अर्थ नाही आणि औद्योगिक विकास नसेल तर व्यापार फार मोठ्या प्रमाणावर करताच येणार नाही. हे लक्षात ठेवून व कोल्हापूर संस्थानची भावी काळातील आर्थिक भरभराट लक्षात घेऊन त्यांनी स्टेशनजवळच शाहूपुरी ही बाजारपेठ वसवली. ह्यात त्यांचा द्रष्टेपणा व साहस दिसून येते. ह्या संबंधी सविस्तर माहिती, आपण व्यापार ह्या प्रकरणात घेणारच आहोत. अशा तऱ्हेने महाराजांच्या कारकिर्दीत झालेल्या औद्योगिक विकासाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर स्पष्ट होते.

## संदर्भ


1 "राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे' सं. भगवानराव जाधव ११६

2. "राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे" सं. भगवानराव जाधव १८१

3. "राजर्षी श्री शाहू छत्रपती यांची भाषणे" सं. श्याम येडेकर १९

4. "राजर्षी श्री शाहू छत्रपती यांची भाषणे" सं' श्याम येडेकर २०

5. Report on the General Administration of Kolhapur State 1920-22 P. 24

6. Report on the General Administration of Kolhapur State 1920–21 P. 38

7. Report on the General Administraton of Kolhapur State 1909-10 P. 32

8. Report on the General Administration of Kolhapur State 1910-11 P. 34

9. Report on the General Adiministration of Kolhapur State P. 34

10. Report on the General Administration of Kolhapur State 1912-13 P. 35

11. Report on the General Administration of Kolhapur State 1913-14 P. 40

12. Report on the General Adiministration of Kolhapur State 1912-13 P. 35

13. Report on the General Administration of Kolhapur State 1919–20 P. 36


★ ★

# व्यापार

' No nation was ever ruined by trade '

—**Benjamin Franklin**

ज्या वेळेला महाराजांनी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन द्यायला सुरवात केली त्याच वेळेला त्यांनी व्यापाराकडेही लक्ष दिले. व्यापार व उद्योग हे परस्परावर अवलंबून आहेत. उद्योग धंद्याच्या विस्ताराच्या योजना आखल्यास त्यातून तयार होणारा माल खपविण्यासाठी बाजारपेठा पाहिजेत. व्यापार वाढवायचा असल्यास औद्योगिक उत्पादनही हवे. याशिवाय महाराजांनी शेतीमध्येही अनेक सुधारणा हाती घेतल्या होत्या. शेती मालासाठीही बाजारपेठ हवीच आणि व्यापारा शिवाय संस्थानचा आर्थिक उत्कर्ष अवघड आहे हे मर्मही त्यांनी ओळखले होते. संस्थानला उत्पन्न हवे असेल, औद्योगिक व शेतीविषयक प्रगती साधायची असेल तर त्याला व्यापाराचीही जोड हवी. महाराज ज्यावेळेला १९०२ च्या सुमारास राज्यारोहणप्रसंगी इंग्लंडला गेले होते त्यावेळी तेथील औद्योगिक क्रांतीचा प्रभाव त्यांच्या मनावर व विचारावर पडलेला होता. इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत व्यापाराचे महत्व अतुलनीय होते. इंग्लंडची अर्थव्यवस्था त्यावेळेला व्यापारावर अवलंबून होती. आपली आर्थिक भरभराट साधायची असेल तर व्यापाराकडे आपण लक्ष दिले पाहिजे. जेव्हढे लक्ष व्यापाराकडे द्यायला हवे तेव्हढे लक्ष आपण देत नाही.

त्यासाठी संस्थानात लोकांचे लक्ष व्यापाराकडे वळवणे आवश्यक आहे असे महाराजांचे मत होते. महाराजांची व्यापारा बाबतची वैचारिक भूमिका व त्याला कोंदणासारखी शोभणारी कृती ह्या दोन्हीही त्याकाळच्या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. त्यावेळचा हिंदुस्थान, मध्ययुगीन अर्थव्यवस्थेच्या चौकटी-तून हळूहळू जागा होत होता, ब्रिटिशांच्या राज्यामुळे नवनवीन शोधांकडे, शास्त्राकडे, प्रगतीच्या द्वाराकडे तो डोळे किलकिले करून बघत होता. परंपरागतित्त्वाचे झापड फेकून देण्यास अजून त्याची तयारी झालेली नव्हती त्याकाळात महाराज पुरोगामी स्वरूपाचे विचार मांडत होते हे महत्त्वाचे आहे.

महाराजांनी व्यापारबाबतची जी भूमिका घेतलेली होती ती ठाम स्वरूपाची, विधायक व उत्कर्षाप्रत नेणारी होती. त्यांनी आपल्या भाषणा-तून वारंवार ती मांडलेली आहे. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे खामगाव येथे २७-१२-१९१७ मध्ये अधिवेशन भरले होते त्यामध्ये महाराज म्हणतात,

" हल्ली व्यापार व उदीम यात आम्ही पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नति व्यापार व तत्संबंधी चळवळ यावर अवलंबून आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्मच झाला आहे. येथे धर्म म्हणजे बुद्धियुक्त स्वहित साधणे असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील "1

याच परिषदेत महाराजांनी सांगितले की, व्यापारात आपण पडले पाहिजे. याचा अर्थ प्रथम आपण त्यासंबंधी ज्ञान मिळविले पाहिजे. तत्संबंधी शिक्षण मिळविले पाहिजे. केवळ पुस्तकी शिक्षणाच्या मागे न लागता व्याव-हारिक शिक्षणही आपण घेतले पाहिजे. शिक्षण केवळ ठराविक चाकोरीतले न घेता शिक्षणाच्या वेगवेगळ्या पैलूकडे आपण लक्ष पुरविले पाहिजे. ह्यामध्ये व्यापाराचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले आणि हे सांगतानाच

त्यांनी ' आधी केले मग सांगितले ' ह्या उक्तीनुसार आपल्या संस्थानात त्या दिशेने पाऊले फार आधीच उचलली होती हे लक्षात घेणे महत्वाचे, आहे.

महाराजांनी राज्याधिकार ग्रहण करायच्या आधीच ज्या वेळेला ३ मे १८८८ रोजी कोल्हापूर स्टेट रेल्वेच्या बांधकामाचा शुभारंभ केला त्यावेळेला राज्याच्या विकासात रेल्वेचे महत्व इतक्या लहान वयात त्यांना समजलेले होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, व्यापार व संस्थानची साधन संपत्ती वाढवण्याच्या बाबतीत रेल्वेची फार मदत होत असते. कोल्हापूर शहरापासून दूरवर रेल्वेस्टेशन बांधण्यात आले रेल्वेमधून झालेल्या व्यापाराचा तक्ता शेवटी दिलेला आहे.

ह्या नंतर १८९५ साली म्हणजे राज्यारोहण केल्यानंतर एकच वर्षाने महाराजांनी व्यापाराच्या बाबतीत एक अत्यंत दूरदर्शीपणाचा उपाय केला आणि तो म्हणजे शाहूपुरी ही व्यापारपेठ स्थापन करण्याचा. ह्याचा फायदा त्या नंतरच्या कित्येक करवीरकर व्यापाऱ्यांच्या पिढ्यांना मिळालेला आहे. १८९५ मध्ये शहरापासून दूर व रेल्वे स्टेशनजवळ ही व्यापारी पेठ वसविण्यात आली. यामुळे दोन फायदे मिळाले एक म्हणजे त्यामुळे होणाऱ्या गर्दीने शहराच्या गर्दीत भर पडू नये म्हणून ही दूरवर वसवली गेली व दुसरा फायदा म्हणजे स्टेशन जवळ व्यापार पेठ वसविल्याने बाजार पेठेला वाहतुकीचे अनेक फायदे मिळू लागले. सुरवातीला ह्या योजनेने बाळसे धरले नाही. तिचा विकास रेंगाळतच होऊ लागला. या वसाहतीला महाराजांचे नांव देण्यात आले. याकरिता जितीच्या ओढ्याच्या व कोल्हापूर रेल्वेस्टेशनच्या दरम्यान असलेल्या विस्तृत मोकळ्या जागेत व्यापाऱ्यांना वखारी स्थापन करण्यासाठी मोठमोठे प्लॉटस् दिले गेले. त्या काळात निपाणी ही इकडच्या भागातील एकच मोठी बाजारपेठ होती. म्हणून फेब्रुवारी १८९९ मध्ये महाराज ज्या वेळेला युवराजांसह कागलला गेले होते त्या वेळेला महाराजांनी निपाणीच्या व्यापारी लोकांना मुलाखतीकरिता बोलावले होते. कोल्हापूर हे व्यापाराचे केंद्र करायचे असल्याने त्या संबंधी

विचारविनिमय महाराजांनी निपाणीच्या व्यापाऱ्यांशी केला आणि व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी व शाहूपुरीचा विकास करण्यासाठी महाराजांनी निपाणीच्या व्यापाऱ्यांना असे आश्वासन दिले की, त्यांच्यापैकी काही येऊन जर शाहूपुरीत स्थाईक झाले तर त्यांना विविध प्रकारच्या सवलती देण्यात येतील. निपाणीच्या व्यापाऱ्यांना सुरवातीला येथील प्लॉट मोफत देऊ केले. इतर व्यापाऱ्यांनाही सर्व प्रकारच्या सवलती व प्रत्येक प्रकारची मदत करण्याचे ठरविले. त्यामुळे काही व्यापारी निपाणीहून आले, काही इतर ठिकाणाहून आले व त्यांनी वखारी बांधून व्यापाराला सुरवात केली. अशा तऱ्हेने व्यापाराचे केंद्र शहरामधून दूरवर स्टेशनजवळ हलविण्यात आले. व्यापाऱ्यांना जे प्लॉटस्, गुदामे व दुकाने बांधण्यासाठी मोफत मिळाले होते ते त्यांनी बांधून काढले. स्टेशनजवळ बांधल्याने सुरवातीच्या काळात ज्या वस्तू आणून विकल्या जात होत्या त्या म्युनिसिपालिटीच्या जकात करापासून मुक्त होत्या. अशा तऱ्हेने शाहूपुरीचा विकास सुरू झाला. १९०१-२ च्या वार्षिक अहवालावरुन समजते की, नवीन इमारती व दुकाने बांधण्यात आली. व्यापाऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठी शाहूपुरीमध्ये पोस्ट व टेलिग्राफ ऑफिस उघडण्यासंबंधीही पोस्टखात्याला सांगण्यात आले. यावरून योजनेच्या किती बारीकसारिक बाजूकडे व तपशीलाकडे महाराजांनी लक्ष पुरविलें होते हे दिसून येते. व्यापारासाठी अशा तऱ्हेच्या अनुषंगिक सोयी पुरवूनही व्यापाराला प्रोत्साहन दिले पाहिजे हेही महाराजांनी लक्षात वेळीच घेतले होते. व्यापाराची वाढ करण्यामध्ये व व्यापाराला सवलती देण्यामध्ये महाराजांनी खास वैयक्तिक लक्ष घातले होते. त्यामुळे व्यापाराला चालना मिळाली आणि कोल्हापूर एक महत्वाचे व्यापारी केंद्र होणार याची चाहूल दिसू लागली.

१८९५ ला व्यापारपेठेची स्थापना झाली. १९०१-२ च्या सुमारास योजनेला वेग प्राप्त झाला व १९०५ पर्यंत या योजनेला परिपक्व स्वरूप प्राप्त झाले. गूळ, भुईमूग व इतर धान्याचा व्यापार येथे मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. त्या वस्तूंना बाजारात चांगली किंमत मिळू लागली. चांगली किंमत मिळू लागल्याने कोकण प्रदेशालगत उसाची लागवड विस्तृत प्रमाणा

वर होऊ लागली व शेतकऱ्यांची सांपत्तिकस्थिती सुधारून संपन्न शेतकऱ्यांचा नवा वर्ग उदयास आला महाराजांच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षी म्हणजे १९२१ साली शाहूपुरी पेठेतून गूळ व साखरेची निर्यात सुमारे ४,७०,२२४ मण झाली. याची किंमत अंदाजे रु. ३०,००,००० होती. १८९४-९५ साली या मालाची निर्यात अवघी रु ६,००,००० ची होती. सध्या शाहूपुरी हे व्यापाराचे व उद्योगधंद्याचे केंद्र झालेले आहे. कोल्हापूर शहरातील वस्ती वाढल्याने शहराचा विस्तार वाढू लागला. सुरवातीला सधन लोकांनी या भागात बंगले बांधायला सुरवात केली. पण आता मात्र हा भाग शहरातच गणला जातो. महाराजांच्या या चालत्या बोलत्या स्मारकाची देणगी करवीरवासीयांना महाराजांकडूनच मिळाली आहे.

कोल्हापूर संस्थानात किती माल बाहेरून आणवला जातो व किती माल कोल्हापूर संस्थानातून बाहेर पाठवला जातो याची आकडेवारी मिळविण्यासाठी, याबद्दलची माहिती मिळविण्यासाठी महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या सरहद्दीवर नाक्यांचे अेक कडेच स्थापन करण्याचे ठरवले. तोपर्यंत कोल्हापूरच्या व्यापाराबद्दल कोणत्याही प्रकारचा अचूक आकडा वर्तवणे अवघड होते. किती वस्तू पाठवल्या जातात, कोणत्या वस्तू पाठवल्या जातात, त्या कोठे कोठे पाठवल्या जातात, या बरोबरच कोल्हापुरात किती, कोणत्या व कोठून वस्तू आणवल्या जातात याबद्दलची माहिती गोळा होणे महाराजांच्या मतानुसार आवश्यक होते. यावरून केवळ व्यापार वाढवण्याचीच महाराजांची व्यावहारिक वृत्ती होती असे नव्हे तर त्यामागे अेक शास्त्रशुद्ध वैचारिक बैठकही होती. त्याकरिता त्यांनी संस्थानच्या अंदाज पत्रकात यासंबंधीं तरतूदही केली होती. कोल्हापूरचा व्यापार प्रामुख्याने निपाणी, दट्टी, चिपळूण, राजापूर, सांगली, मिरज, जमखिंडी ह्या भागाशीं होत होता. व्यापारामध्ये विणलेले कापड, रेशमाचे कापड. ब्लँकेटस्, गालिचे काच सामान, साखर, गूळ, भुईमूग, यांचा जास्त समावेश होता

व्यापाराच्या शिक्षणाच्या बाबतीत महाराजांनी केवळ लोकांनाच उपदेश केला नाही तर स्वतःच्या मुलांनाही त्यांनी त्याच दिशेने मार्गदर्शन

केले. युवराजांनी व्यापारात लक्ष घालावे अशी महाराजाची फार तीव्र इच्छा होती. स्वतःच्या मित्रांच्या मदतीने युवराजांनी व्यापार सुरू करावा यासाठी महाराजांनी त्यांचे मन वळवले. मे १९१८ मध्ये युवराज महाराजांना भागीदार करून आर. बी. अेन् अँड को. नावाची कंपनी अस्तित्वात आणली या कंपनीचे भांडवल १ लाख रु. होते. राजकुमार शिवाजी महाराजांनी अेस्. अे. बी ही कंपनी काढली.

अशा तऱ्हेने उद्योग व व्यापार यांच्या बाबतीत महाराजांनी अेकाच वेळी प्रयत्न केल्याने दोन्हीचीही परस्परपूरक अशी वाढ झाली. आणि दोन्हीचीही वाढ झाल्याने त्यांची मदत संस्थानचा आर्थिक उत्कर्ष होण्यात झाली. उद्योग व्यवसायाची वाढ झाल्याने बऱ्याच लोकांना संस्थानात रोजगारी मिळाली. संस्थानचे औद्योगिक उत्पादन वाढले. संस्थानातील साधनसामग्रीचा वापर चांगल्या व योग्य प्रकारे होऊ लागला. न वापरली गेलेली साधनसामग्री वापरात आणली. व्यापारामुळे संस्थानचे व लोकांचे उत्पन्न वाढले व व्यापार वाढल्याने शेती व औद्योगिक उत्पादनाला चालना मिळाली. यासाठी वाहतूक व्यवस्था सुधारली गेली. या प्रकारे आधुनिक अर्थव्यवस्थेचे जे दोन आधारस्तंभ उद्योगव्यवसाय व व्यापार या बाबतीत महाराजांनी त्यांच्या काळीच संस्थानात प्रगती करण्याचा उपक्रम केला होता.

तक्ता नं. १ यावरून रेल्वेपासून मिळणारी मिळकत कसकशी वाढत गेली हे दिसून येते. १८९३-९४ साली मिळकत रु. ४७,००३ इतकी होती १९२२-२३ च्या सुमारास ती रु. २,०९,४४५ इतकी झाली. महाराजांच्या व्यापार व वाहतुक विषयक योग्य धोरणाचाच तो भाग होता हे मान्य करावेच लागेल.

रेल्वेपासून होणारी निव्वळ मिळकत (तक्ता नं. १)

| वर्ष | उत्पन्न (रुपये) |
|---|---|
| १८९३-९४ | ४७,००३ |
| १८९४-९५ | ४३,७३७ |
| १८९५-९६ | ५३,८५१ |
| १८९६-९७ | ५०,१४५ |
| १८९७-९८ | ३६,४८१ |
| १८९८-९९ | २७,६०४ |
| १८९९-१९०० | ३९,३९० |
| १९००-०१ | ४०,५६९ |
| १९०१-०२ | २८,३१६ |
| १९०२-०३ | ३८,०२२ |
| १९०३-०४ | ५९,६९९ |
| १९०४-०५ | ५५,२११ |
| १९०५-०६ | ७३,५५८ |
| १९०६-०७ | ७१,८११ |
| १९०७-०८ | ७७,२४९ |
| १९०८-०९ | ८८,१५३ |
| १९०९-१० | ९१,६११ |
| १९१०-११ | * |
| १९११-१२ | १,२३,३९४ |
| १९१२-१३ | १,४७,२७२ |
| १९१३-१४ | १,५३,८४४ |
| १९१४-१५ | १,३८,४४९ |
| १९१५-१६ | १,५६,२२३ |
| १९१६-१७ | १,६२,१२२ |
| १९१७-१८ | १,९६,०४२ |
| १९१८-१९ | २,१८,६०३ |
| १९१९-२० | १,९७,७८९ |
| १९२०,२१ | १,७२,००७ |
| १९२१-२२ | १,५८,११३ |
| १९२२-२३ | २,०९,४६५ |

* आकडा उपलब्ध नाही.

## ❀ रेल्वेतून झालेली आयात (मण–हमार) (तक्ता नं. २१)

| वर्ष | कापसाचा धागा | तंबाखू | डाळी आणि धान्य | धातू, लोखंड पोलाद, तांबे | तेल | तेल-बिया | रंगविलेले कातडे | साखर व गूळ | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९११-१२ | २२ | १ | २१३ | १९ | २७ | ३२ | ३१ | २६ | २८४ | ६५५ |
| १९१२-१३ | ३४ | ·४ | ३९० | ३६ | ५७ | ५ | १ | ३० | ४०५ | ९५८.४ |
| १९१३-१४ | ४० | ·१ | २९३ | ४८ | ६५ | १३ | ७ | ४४ | ३३० | ८४०.१ |
| १९१४-१५ | ४० | ·६ | ११ | ३८ | ६६ | १२ | ३ | २९ | ६५१ | ८५०.६ |
| १९१५-१६ | ३६ | ·३ | ३७४ | २९ | ८४ | २१ | २ | २९ | ३६७ | ९४२.३ |
| १९१६-१७ | २८ | ८ | ३२९ | १५ | ६१ | १९ | १ | ६५ | २९६ | ८२२ |
| १९१७-१८ | २० | २ | ६३० | ९ | ७२ | २९ | १ | २९ | ३७४ | ११६६ |
| १९१८-१९ | २५ | १ | ६९२ | ७ | ६५ | ४६ | १ | ६० | २७५ | ११७२ |
| १९१९-२० | २२ | २ | ७४६ | ७ | ६६ | २१ | १ | २६ | ३९३ | १२८४ |
| १९२०-२१ | ३२ | ३ | ५८७ | २१ | ५८ | ३७ | २ | ३९ | ४४४ | १२२३ |
| १९२१-२२ | ३१ | ३ | ६०१ | ७० | ७८ | ९५ | २२ | ३३ | ४१६ | १३४९ |

❀ शिरोळी रोड, हातकणंगले, रूकडी व कोल्हापूर रेल्वे स्टेशन.

( Source :- Administrative Report from 1911 to 1922 )

## ❈ रेल्वेतून झालेली निर्यात ( मण-हजार ) (तक्ता नं. ३)

| वर्ष | कापसाचा धागा | तंबाखू | डाळी आणि धान्य | धातू, लोखंड पोलाद तांबे | तेल | तेल-बिया | रंगविलेले कातडे | साखर व गूळ | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९११-१२ | २५ | २१ | ७१ | ·६ | १ | २४४ | २ | २८० | ६० | ७०४.६ |
| १९१२-१३ | ६२ | १९ | १६ | ३ | २ | १४७ | ११२ | ३'५२ | ६११ | १३२४ |
| १९१३-१४ | ७२ | १८ | १० | ३ | २ | ६७९ | ३५ | २२४ | ६९ | ११११२ |
| १९१४-१५ | २६ | ६७ | ·७ | ३ | २ | ४७० | १३६ | ३२४ | ८१ | १०६९.७ |
| १९१५-१६ | ३२ | २२ | २० | ५ | ५ | ३७८ | ६७ | ४२६ | ६६ | १०२१ |
| १९१६-१७ | २३ | २९ | २४ | ६ | २ | २७५ | १३४ | ४८७ | ६४ | १०४४ |
| १९१७-१८ | १३ | २७ | १८ | ५ | ५ | २६६ | ४९ | ५८७ | ९८ | १०६८ |
| १९१८-१९ | ११ | १९ | २९ | १६ | ७ | २४१ | ९२ | ६४८ | १४३ | १२०६ |
| १९१९-२० | २४ | ६ | ३९ | ·२ | ५ | ८४ | ७८ | ५९९ | १११ | ९४६.२ |
| १९२०-२१ | १३ | ३६ | २४ | ३ | २ | १३६ | ६६ | ४९३ | २०० | ९७३ |
| १९२१-२२ | १९ | २६ | २८ | १२ | ५ | २३२ | ९ | ४७२ | १७३ | ९७६ |

❈ शिरोळी रोड, हातकणंगले, रुकडी व कोल्हापूर रेल्वे स्टेशन.

( Source :- Administrative Report from 1911 to 1922 )

( तक्ता

महत्वाच्या अन्नधान्य व शेती वस्तूंचे

(१ मण = ८२ शेर)

| वस्तू | उत्पादन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ९४-९५ | ९५-९६ | ९६-९७ | ९७-९८ | ९८-९९ | ९९-१९०० |
| कापूस | ४० | ३७ | २७ | ४० | ४५ | ११ |
| तंबाखू | ४८ | ५१ | ४३ | ५० | ७२ | ३५ |
| गूळ | ३८३ | ३६५ | २२६ | ३०२ | ३८९ | ३५२ |
| बाजरी | ४८ | ४९ | २४ | ५२ | ५६ | १८ |
| तांदूळ | ५८१ | ६११ | ३५७ | ६५० | ६३० | २४३ |
| ज्वारी | ५०५ | ५१७ | २९८ | ४७२ | ४९२ | २९४ |
| गहू | १९४ | ४६ | ८ | १६ | २५ | ६ |
| हरबरा | ४६ | ४६ | २२ | ३१ | ३६ | १३ |
| तूर | ४३ | ७४ | २२ | ५९ | ७० | २९ |
| बटाटा | ३७ | ३८ | ४ | ३० | ३५ | ४ |
| लसूण | २५ | २७ | १७ | २१ | २३ | १२ |
| भुईमूग | २८३ | २३२ | ७२ | ४४ | ३३ | २६ |
| कोथिंबीर | ७ | ५ | १ | २ | ४ | ४ |
| अंबाडी | १५ | १९ | १८ | १३ | १२ | ५ |
| नागली | २२६ | २२२ | ८९ | १६९ | १९८ | १६९ |
| मिरची | ५३ | ३८४ | २६ | ४० | ५४ | ४१ |

( Source–Administrative Reports

नं. ४ )

अंदाजे उत्पादन व निर्यात

(मण-हजार)

| निर्यात | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९४-९५ | ९५-९६ | ९६-९७ | ९७-९८ | ९८-९९ | ९९-१९०० |
| २९ | २४ | ३२ | १९ | ३० | ७ |
| ३६ | ३९ | ३१ | ३८ | ५३ | २२ |
| ३०२ | ३१३ | १६१ | २२४ | ३१२ | २४५ |
| १२ | १३ | ३ | ११ | १३ | २ |
| १७५ | ९३ | ७० | २७० | १९१ | ५४ |
| ९३ | १०१ | ३४ | ८९ | ७७ | ३४ |
| ७ | १० | २ | ५ | १० | १ |
| १८ | १३ | १० | ११ | १२ | ३ |
| ११ | १६ | ५ | १९ | २३ | ७ |
| १२ | १२ | ·४ | ७ | १२ | ·४ |
| २१ | १७ | १४ | १८ | २० | १० |
| १८८ | १६३ | ३३ | १८ | १४ | ११ |
| ५ | ३ | १ | २ | २ | २ |
| ८ | ११ | ९ | ६ | ४ | १ |
| ३४ | ४६ | १३ | २९ | ३८ | ३५ |
| २५ | १८ | १० | १५ | २४ | १८ |

from 1894 to 1900 )

(तक्ता नं. ५)

## कोल्हापूर संस्थानात झालेल्या महत्वाच्या औद्योगिक वस्तूंचे उत्पादन व निर्यात

( रूपये – हजार )

| वर्ष | उत्पादन | | | | | | निर्यात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कापड | चादरी | मातीची भांडी | साखर | गूळ | तेल | कापड | चादरी | मातीची भांडी | साखर | गूळ | तेल |
| १८९३-९४ | २३४ | ४४ | ४५ | १२ | १२६२ | १२३ | १३९ | १२ | ३ | ११ | १०४५ | ५८ |
| १८९४-९५ | २५१ | ४४ | ३८ | १३ | ८१८ | ❋ | १५५ | २१ | ९ | १० | ६३८ | ❋ |
| १८९५-९६ | २९९ | ५५ | ४४ | १४ | ८५७ | १३४ | १९४ | २७ | ११ | १३ | ५३१ | ६२ |
| १८९६-९७ | २५० | ५० | ५१ | ३ | ६९८ | १२८ | १६९ | ३० | १५ | ३ | ४४३ | ५५ |
| १८९७-९८ | ३५९ | ४८ | ४४ | ❋ | ७३७ | ९१ | २८७ | २५ | १३ | ❋ | ५३८ | ३५ |
| १८९८-९९ | ४०८ | ६१ | ६४ | ५ | १०११ | ११४ | ३३० | ३५ | १८ | ५ | ८०५ | ३९ |
| १८९९-१९०० | ३६७ | ४७ | ४८ | ६ | ७८० | ७३ | २९५ | २१ | १५ | ६ | ६०२ | २५ |
| १९००-०१ | ३५० | ४५ | ३८ | १ | ६५० | ७५ | २०० | २० | १२ | ·५ | ·५०० | ३६ |
| १९०१-०२ | २२१ | ४४ | ४३ | १ | ६६४ | ७६ | १४० | १९ | १६ | ·६ | ४८६ | ३९ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०२-०३ | १८३ | ४२ | ३७ | १ | ७६० | १९ | ११८ | २२ | १२ | ·५ | ५८३ | ७ |
| १९०३-०४ | १६४ | ४४ | ३८ | ·०५ | ७७८ | ६७ | ९९ | २१ | १३ | ·०३ | ५९० | ३३ |
| १९०४-०५ | १६० | ४८ | ९२ | ⚜ | १९४० | ६८ | ९० | २३ | ३४ | ⚜ | १२४८ | ३३ |
| १९०५-०६ | ११२ | ३७ | ८१ | ⚜ | ७०७ | ५९ | ६३ | १९ | ३२ | ⚜ | ५३२ | ३२ |

( Source :- Administrative Reports from 1893 to 1906 )

⚜ आकडे उपलब्ध नाहीत.

## संदर्भ


1. 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे' सं. भगवानराव जाधव ७


* *

# श्रम-कामगार संघटना-रोजगारी

" ——The proletarians have nothing to lose but their chains. They have a world to win. Workers of the world, unite."

—Karl Marx

**श्रम-उत्पादनाचा अेक घटक –**

अर्थशास्त्राच्या उत्पादनाच्या क्षेत्रात या घटकाला महत्वाचे स्थान आहे. २० व्या शतकात श्रमाची महत्वाची भूमिका ओळखली गेली आहे व तशीच वागणूक श्रमाला दिली जाते. औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीचे उत्पादन लहान प्रमाणावर परंपरागत पद्धतीने असल्यामुळे कोणत्याच प्रकारचे गुंतागुंतीचे प्रश्न या क्षेत्रात निर्माण झाले नाहीत. जे प्रश्न होते त्याचे स्वरुप नंतरच्या प्रश्नांपेक्षा खूप वेगळे होते. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर उत्पादनाच्या क्षेत्रात मूलभूत बदल घडून आले. यंत्रसामग्री, भांडवली वस्तू, अवजारे वापरली जाऊ लागली. भांडवलही मोठ्या प्रमाणावर लागू लागले. उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. श्रम हा घटक खेड्यामधून, ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे वळला. उद्योगधंद्याचा जसजसा विकास होऊ लागला तसतसा शेतीपासून अलग होऊन श्रम हा घटक मोठ्या व्यवसायाकडे व, उद्योगधंद्याचे केंद्र असलेल्या मोठ्या शहराकडे जास्त मजुरीच्या आकर्षणाने ओढला गेला आणि त्यामुळे बरेच प्रश्नही निर्माण झाले. मजूर फार मोठ्या

संख्येने एकत्र आले तरी सुरवातीला त्यांना वागणूक चांगली मिळाली नाही. भरपूर काम करवून घ्यावे कारण कामाच्या तासाचे कोणतेही बंधन नव्हते. कामगारांच्या बाबतीत वयाचीही कोणती मर्यादा नव्हती. जेव्हढी मजुरी कारखानदार देतील तेव्हढीच मजुरी घ्यावी आणि ती खूपच कमी असल्याने जसे जगता येईल तसे अर्धपोटी जगावे अशी परिस्थिती होती. ते कामाच्या ओझ्याने व ताणानेच इतके दुबल होत असत की, एकत्र येऊन संघटना करणेही शक्य नव्हते. मग मजुरांच्या कल्याणाचा, कार्यक्षमतेचा, उत्पादन-क्षमतेचा व मनोरंजनाचा, सुखाचा प्रश्न विचारात घेण्याची कोणाची तयारी असणार ! इतर घटकांप्रमाणेच मजूर हा निर्जिव घटक मानला जात होता व राबवला जात होता. परंतु औद्योगिक क्रांती जसजशी पाश्चात्य देशात पूर्ण होत होती त्याच वेळेला मजुरांच्या विचारात जागृती होऊ लागली होती. मजूर हा सजीव, स्वतंत्र मन असलेला घटक आहे, इतर घटकासारखे त्याला न वागवता त्याच्या मनाची तमाही बाळगली पाहिजे. कारखानदार मजुरांचे श्रम विकत घेतो. त्याला विकत घेत नाही असे विचार फैलावू लागले. त्यातच १९ व्या शतकाच्या मध्याला मार्क्सवादी तत्त्वाचा प्रसार होऊ लागला. उत्पादनाचे श्रेय मजुरालाच आहे. ते वास्तविक त्यालाच मिळाले पाहिजे. पण ते भांडवलदार गिळंकृत करतात. मार्क्सने जगातील कामगारांना एकत्रित, संघटीत होण्याचा आदेश दिला. श्रमाला आपले महत्व जाणवू लागले त्यामुळे इंग्लंडमध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कामगार संघटनांचे वारे वाहू लागले. भारतामध्ये ह्या चळवळीचा प्रवाह २० व्या शतकाच्या सुरवातीला सुरू झाला आणि ह्याच संक्रमणाच्या काळात महाराजांनी श्रम व भांडवल यांच्या संबंधाने श्रमाच्या संघटित शक्तिच्या संबंधाने व भावी काळात जगाचा अर्थप्रवाह व राजप्रवाह हा कोणत्या दिशेने जाणार आहे या संबंधाने मांडलेले विचार त्या काळाच्या चौकटीत अत्यंत मौलिक आहेत.

## महाराजांची भाषणे –

महाराजांच्या श्रमाच्या वैचारिक भूमिकेच्या दृष्टीकोनातून महा॰

राजांनी मुंबईला दिलेली दोन भाषणे अत्यंत महत्वाची आहेत. " A prophet ahead of time " हे वचन त्यांच्या बाबतीत अगदी योग्य ठरले या बद्दल वादच नाही. या दोन्ही भाषणांत पाश्चात्य देशातील श्रम व भांडवल ह्यांच्या प्रश्नाचे व भारतातील त्या संदर्भातील प्रश्नाचे उत्तम व सांगोपांग विवेचन त्यांनी केले आहे आणि म्हणून या दोन सभा त्या दृष्टीने महत्वाच्या ठरतात. १० नोव्हेंबर १९१८ ला मुंबईला भरलेली परळ कामगार सभा व मुंबईलाच २४ नोव्हें. १९१८ ला भरलेली पीपल्स युनियनच्या उद्घाटन प्रसंगी भरलेली सभा ह्या त्या दोन सभा होत. या दोनही सभांमध्ये ब्रिटिशांचा अेक संस्थानिक असून सुद्धा भारतीय कामगारांना आपल्या हक्कांचे जपण्यासाठी संघटना करण्याचा उपदेश महाराजांनी केला. जागतिक भांडवलशाहीची रूपरेषा त्यांनी कामगारांना स्पष्ट करून सांगितली. त्यांनी परळ कामगार सभेतील आपल्या भाषणात सांगितले की, पाश्चात्य देशात भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग आहेत. तेथेही सुरुवातीला भांडवलदार मजुरांवर अफाट सत्ता चालवत असत. पण नंतर मजुरांनी आपले संघ बनवले.

"गवताच्या अेकेका काडीची ताकद जास्त नसते पण अशा अनेक काड्यांची वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येईल."

श्रमिकांना पाश्चात्य देशात मजुरी वाढवण्यासाठी झगडावे लागले. परंतु श्रमिकांना त्यांसाठी खूप त्रास झाला. कोणत्याही दर्जापर्यंत जाण्यास मजुरांना त्यांच्या जन्मपरिस्थितीचा अडथळा येत नव्हता. तेथे आपल्या-कडल्या परिस्थितीच्या तुलनेत श्रमिकांचे महत्व ओळखले गेले होते. त्यांच्या संघटनांना मान प्राप्त झाला होता, मजुरांच्या प्रतिनिधीचा पार्लमेंट-मध्ये व प्रधानमंडळातही शिरकाव झालेला होता आणि ते प्रतिनिधी आपल्या वर्गाच्या हितसंबंधाचे संरक्षण करीत होते. त्यांनी आपली उन्नति आपला विकास संघटनांच्या मार्फत करून घेतला. मजुरांनी आपल्या संघटना स्थापन करून अेकजूट करून आपली प्रगती करून घेतली. संघटनेमुळे त्यांना आपल्या मागण्या अेकमुखाने मांडता आल्या व त्यांच्या अेकत्रित;

संघटित शक्तिमुळे कारखानदारांना, भांडवलदारांना त्या मान्यही कराव्या लागल्या. पाश्चात्य देशातील हा प्रश्न स्पष्ट करून महाराजांनी मग हिंदुस्थानातील परिस्थितीचे, प्रश्नांचे विवेचन केले.

मुंबई शहर हे पहिल्यापासून व्यापार व उद्योगधंदा यां बाबतीत सुप्रसिद्ध होते. हिंदुस्थानातील मागासलेलावर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा. हे शेतकरी शेतीपासून पुरेसे उपजीविकेचे साधन न मिळाल्याने कारखान्याकडे, मोठ्या शहराकडे वळले. त्यामुळे श्रमिकांचा, कामगारांचा वर्ग हा सुरवातीला शेती-मजुरातूनच निर्माण झाला. ज्याप्रमाणे पाश्चात देशात मजुरांच्या हिताचे संरक्षण केले जाते तसेच आपल्याकडेही करणे आवश्यक होते. परंतु आपल्याकडचा प्रश्न हा अधिक गुंतागुंतीचा होता. कारण त्यामध्ये जातीभेदाच्या प्रश्नाने डोके घातले होते. हा प्रश्न सोडविण्यासाठी पाश्चात्य देशाच्या धर्तीवर आपल्याकडेही संघटना स्थापन करणे महत्त्वाचे होते. भारतात मजूर व भांडवलदार असे दोन वर्ग होते. ब्राह्मणेतर लोकांचा मजूर वर्गात भरणा होता त्यामुळे ह्या वर्गाची ब्राह्मण वर्गाकडून व भांडवलदार वर्गाकडून पिळवणूक होत होती. त्यातच ब्राह्मणेतर वर्गामध्ये शिक्षणाचाही प्रसार झालेला नव्हता त्यांना गुलामासारखे वागवले जात असे. ही स्थिती सुधारण्यासाठी संघटित प्रयत्न जोराने व स्वार्थत्यागपूर्वक करणे गरजेचे होते. परळ कामगार सभेमध्ये महाराजांनी संघटना स्थापन करण्याचा मंत्र दिला. त्यानंतर पीपल्स युनियन किंवा लोकसंघ या नावाची संस्था रावबहादूर सीताराम केशव बोले यांनी स्थापली. महाराज त्या संस्थेचे आश्रयदाते होते त्याच्या उद्घाटनप्रसंगीही महाराजांनी मुंबईला भाषण केले व त्यामध्ये संघटना स्थापनकरून प्रयत्न योग्य दिशेने चालत आहेत याबद्दल कामगारांचे अभिनंदन केले.

या उद्घाटन प्रसंगी महाराजांनी आता जगाचा मतप्रवाहाचा कल कोणत्या दिशेने झुकणार आहे हेही स्पष्ट केले. त्यांनी मजुरांना सांगितले की, रशिया व जर्मनी ही निरंकुश राजसत्तेची दोन मोठी पीठे होती.

पण पहिल्या महायुद्धाचा परिणाम मजूर पक्षाच्या हाती राज्यकारभार बहुतांश आण्यामध्ये झाला. मजूर पक्षाच्या नेतृत्वाखाली तेथे, राज्यस्थापना झाली. इंग्लंडमध्येही मजूर पक्षाचा प्रभाव जास्त वाढत होता. इतर तटस्थ राष्ट्रावरही याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नव्हता. मग ह्या दृष्टीने आपल्या कामगारानीही आपल्याला संघटित करून घेऊन आपले बळ व महत्त्व वाढवून आपला जोर वाढवायला पाहिजे असा महाराजांनी उपदेश केला. त्यामुळे सर्व कामगारांना आपल्या हक्काची जाणीव होईल असे त्यांचे मत होते.

अशा प्रकारे महाराजांनी या प्रश्नाचे विवेचन या दोन सभांमध्ये केले. यामध्ये त्यांनी अेकीचे बळ समजावून सांगितले. गवताच्याकाडीचे अत्यंत समर्पक असे, मजुरांना पटणारे उदाहरण त्यांनी सांगितले. संघटनेने मजुरांचे फायदे होतात व त्यांची उन्नतीही होते. ते सर्व लाभ मजुरांनी उठवले पाहिजेत तरच आधुनिक अर्थप्रवाहात मजुरांचा टिकाव लागणार आहे हे महत्त्वाचे तत्व त्यांनी समजावून सांगितले. आपल्याकडचा प्रश्न आणखीनच बिकट होता. कारण जातीयतेच्या प्रश्नाच्या फांद्या तेथपर्यंत पोचल्या होत्या. आपली परिस्थिती सुधारण्याकरिता मजुरांनी संघटनामार्फत झटले पाहिजे असे महाराजांनी सांगितले. जास्तीत जास्त संघटना स्थापन करा असा आदेश दिला. ब्रिटिशांचा अेक संस्थानिक, राजपुरुष, वैभवात वावरणारा राजा, राजसत्तेचा प्रतिनिधी, कामगारांना असा उपदेश करतो हे महत्त्वाचे आहे. याबाबत ब्रिटिशांची अप्रियता त्यांना निश्चितच सहन करावी लागली असणार. तसेच युरोपात मजुरांच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताके स्थापन होत आहेत, मजुरांचा प्रभाव व पक्ष वाढत होता, तेव्हा तुम्हीही योग्य तो बोध घ्या असे सांगणारा राजा! ब्रिटिश साम्राज्यातील अेक संस्थानिक यापेक्षा जास्त स्पष्ट काय सांगणार? कामगारांच्या राज्याचे स्वप्न पाहणारा हा संस्थानिक! ज्यावेळेला भारताच्या इतर पुढाऱ्यांचे रशियनक्रांतीकडे व जगाच्या अर्थप्रवाहाकडे अजून लक्ष जायचे त्यावेळेला महाराजांचे हे मार्गदर्शन होते.

महाराजांची केवळ तात्त्विक भूमिकाच महत्वाची नव्हती तर व्यावहारिक भूमिकाही महत्वाची होती. केवळ श्रमाचे महत्वच ओळखून चालणार नाही तर श्रमाला योग्य तो वाजवी मान द्यायला हवा असे त्यांचे मत होते. पाश्चात्य देशात श्रमाला मान होता, प्रतिष्ठा होती. श्रमिकाला तुच्छ मानले जात नसे. चांभार असो, सुतार असो, अगर शिल्पकलेतील कारागिर असो कोणालाही कमी लेखले जाऊ नये असे महाराजांना वाटत होते. आपल्याकडचे कामगारही कमी कुशल नाहीत, त्यांच्या अंगी श्रेष्ठ दर्जाचे कलाकौशल्य जरूर होते. पण ते यांत्रिक चढाओढीच्या काळात टिकणारे नव्हते. त्यासाठी नवीन् प्रकारचे तंत्रज्ञान कामगारांनी आत्मसात करणे आवश्यक आहे आणि त्याच वेळेला देशाची, आपल्या संस्थानची प्रगती आपल्याला करून घ्यायची असेल तर जेथे कामगार आहेत तेथेच त्यांच्या-शक्तिचा उपयोग करून घ्यायचा असे त्यांचे मत होते. कामगारांनी शहरात गर्दी करून आणखी तेथले प्रश्न वाढवण्यात काय हशील आहे ?

" भांडवलवाल्यांच्या मर्जीवर व स्वार्थ बुद्धीवर–न्याय बुद्धीवर नव्हे-हजारो माणसांचे जीवन अवलंबून रहावे ही स्थिती बरोबर नाही. याकरिता अशा प्रकारचे पश्चिमेच्या धर्तीवर सर्वस्वी चालणारे कारखाने आपल्या देशात फारसे फायदेशीर होणार नाहीत. शेतकीत पुरेशी प्राप्ती होत नाही. पोट भरत नाही. म्हणून मोठ्या शहरात मजुरी करण्यास जावे लागणारे लोक दिवसेदिवस वाढत चालले आहेत. या योगाने खेड्यातील वस्ती कमी पडून शहरात वस्ती फार दाट होत आहे. तेथील आरोग्य अगदी बिघडून गेले आहे व त्यामुळे खेड्यातही रोगांचा प्रसार जास्त होत आहे. "[2]

याकरिता कामगार लोक जेथे उपलब्ध असतील तेथेच त्यांना रोजगार उपलब्ध करून दिल्यास अनेक प्रश्न सुटतील. कामगारांना रोजगार मिळेल, मोठ्याशहराचे प्रश्न निर्माण होणार नाहीत. लोकांचे उत्पन्न वाढेल. उपजीविकेचे साधन मिळेल असेच धोरण महाराजांनी आपल्या संस्थानात उद्योग धंद्याच्या बाबतीत स्वीकारले. यामध्ये अेक अत्यंत महत्त्वाचे तत्व

महाराजांनी सांगितले की, ज्याचे मार्गदर्शन आपल्याला सध्याच्या काळातही होणारे आहे. महाराजांनी सांगितले, की, आपल्याला आपला आर्थिक विकास साधायचा असेल, आपले आर्थिक प्रश्न सोडवायचे असतील तर पाश्चात्यांचे अनुकरण करून चालणार नाही. पाश्चात्यांचे उपाय आपल्या अर्थव्यवस्थेला लागू पडणार नाहीत. कारण दोन्हीमध्ये मूलभूत फरक आहे. पश्चिमेच्या धर्तीवरचे कारखाने आपल्याला मानवणारे नाहीत. सध्या १९७५ मध्ये आपण जर महाराजांचा हा उपदेश स्वीकारला तर भारताचे आर्थिक हितच त्यापासून होईल. महात्मा गांधी, विनोबा भावे, जयप्रकाश नारायण या लोकांनीही हेच तत्त्व सांगितले आहे. आपले मार्ग व पाश्चात्यांचे मार्ग भिन्न हवेत. सध्या चीनच्या अर्थव्यवस्थेवरही नवनवीन प्रकाश टाकला जात आहे. चीनची राजकीय तत्त्वप्रणाली जरी भिन्न असली तरी आर्थिक बाबतीत आपल्याला लोकशाहीच्या चौकटीत राहून निष्ठेने, प्रामाणिकपणे व चिकाटीने त्यांचे अनुकरण करणे हितावह आहे. चीननेही पाश्चात्यांचे अनुकरण न करता आपल्या अर्थव्यवस्थेला झेपेल अशीच प्रश्नांची सोडवणूक केली. श्रमाचा पुरेपूर वापर करून घेतला. विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्वीकारले. ग्रामीण पातळीवर 'कम्यून्स' स्थापन केले व आपल्या लोकांचा दैनंदिन जीवनावश्यक गरजांचा प्रश्न सोडवला. महाराजांनी अशयाच तऱ्हेचे तत्त्व सांगितले. खेडवळ प्रदेशांत व्यवसाय काढून रोजगार देऊन उत्पादन वाढवले पाहिजे. भरपूर श्रमाचा पुरेपूर वापर करून घेतला पाहिजे व शहरात गर्दी होऊ देता कामा नये, नाहीतर त्याचे दुष्परिणाम होतात हेच ते तत्त्व. नाहीतरी हल्ली शहरातील गर्दी अतोनात वाढल्याने सामाजिक, नैतिक, प्रदुषीकरणाचे प्रश्न पाश्चात्य राष्ट्रांना व भारतालाही प्रचंड प्रमाणात सतावत आहेतच. आधुनिक काळात भारतीय परिस्थितीशी आर्थिक वाढीला सुसंगत जुळणारी अशीच सोडवणूक महाराजांनी सांगितली. त्यांनी आपल्या अर्थव्यवस्थेची अचूक नाडी ओळखली होती असेच म्हणावे लागेल.

महाराजांची श्रमांच्या शोषणाबाबतही ठाम भूमिका होती आणि त्या दृष्टीने हुजेरी रद्द करणे, वेठबरळा रद्द करणे वतन रद्द

करणे, या घटना बोलक्या ठरतात. महाराजांनी अस्पृश्याची हजेरी रद्द करण्याचे ठरविले. माणगाव येथील अखिल भारतीय अस्पृश्य जनता परिषदमध्ये त्यांनी आपले या बाबतचे विचार सांगितले आहेत अस्पृश्यावर हजेरी लादणे अन्यायाचे आहे हजेरी लादणे व ती न दिली तर त्यांचे मागे पोलीसांचा ससेमिरा लावणे हे अन्यायाचे आहे त्या मोबदल्यात त्यांच्याकडून मोफत वाटेल तेव्हढे काम करून घेणे, गावात श्रमाला देण्यात येणारा मोबदला न देणे हे सर्व अत्यंत अयोग्य आहे. त्यांच्याकडून बळजबरीने श्रम करून घेण्यात येतात. आजारी असलेल्या नातेवाईकांकडे, मुलांकडे त्यांना जाता येत नाही. काही वेळेला लक्ष न दिसल्याने मुले मृत्यूमुखीही पडतात आणि मग एवी तेवी हजेरी मागे लागलीच आहे, गुन्हेगारीचा शिक्का लागलाच आहे मग आपण तरी का चांगले वागा अशी प्रवृती साजिकच त्यांच्या मध्ये बळावते. हे शोषण बंद करण्यासाठी महाराजांनी हजेरीची पद्धत बंद केली. तसेच हजेरी बंद करून महाराजांनी त्यांना सुधारण्याची संधीही दिली. असा मानवतावादी दृष्टीकोन महाराजांचा श्रमाबद्दल होता; तीच गोष्ट महार वतनाच्या बाबतीतली. बलुते पद्धतीमुळे, महार लोक वतनाच्या मागे लागत असत. वतन तरी कीती असे ? थोडेसे धान्य अथवा जमिनीचा छोटा तुकडा. त्यात परत शेतीवर जास्त माणसांचा मजूरांचा ताण. त्यामुळे पुरेसे उपजीविकेचे साधन कोणाच्याच मिळत नसे. शेतीवरील हा अवास्तव मजुरांचा ताण कमी करण्यासाठी महाराजांनी महारांना हा उपदेश केला की वतनाच्या मागे लागू नका. जमीन अेकाच्या नांवावर राहू द्या, बारीक बारिक तुकड्यानें विभागू नका म्हणजे शेताचा आकार वाजवी राहील व उत्पादन फायदेशीर होईल. जमीन अेकाच्या नावावर ठेवून बाकीच्यांनी उद्योग व्यवसायात पडणे फायदेशीर होईल. आणि त्यासाठी त्यांनी महार वतने रद्द करण्याचे ठरविले.

श्रमाच्या केवळ संख्येकडेच महाराजांचे लक्ष होते असे नव्हे तर श्रमाच्या गुणवत्तेकडेही त्यांनी लक्ष पुरविले होते श्रमाची कार्यक्षमता व उत्पादन क्षमता वाढविणे जरूरीचे आहे आणि त्यासाठी मानवी गुंतवणूक महत्वाची आहे. यासाठी आरोग्यावर व शिक्षणावर खर्च करणे अगत्याचे आहे याची जाणीव त्यांना होती. याकडे महाराजांनी किती तळमळीने आग्रहाने व सातत्याने लक्ष दिले या बद्दलचे विवेचन मानवी गुंतवणूक या प्रकरणात येणारच आहे. त्या बद्दल त्यांनी परळ कामगार सभेत सांगितले.

"आपल्या मुलाबाळांस शिक्षण देऊन व आपले आरोग्य वाढविण्याचे प्रयत्न करून आपली उन्नती आपणच करून घेतली पाहिजे."[3]

त्यांनी श्रमाला प्रोत्साहनही दिले. रायबाग हे विणकामाचे महत्वाचे केंद्र होते. तेथील कामगारामध्ये आपसात कलह झाल्याने काही कामगार रायबाग सोडून संस्थाना बाहेर गेले होते. कामगारांना तेथे आकर्षित करण्यासाठी महाराजांनी त्यांना भरपूर सोयी व सवलती दिल्या. जे रायबागला येऊन स्थायिक होतील त्यांना रहायला घरे,जमिनी व इतर सवलती दिल्या. उद्योगधंद्यासाठी कुशल कामगारांचा पुरवठा आवश्यक आहे. व त्यासाठी संस्थाननेच प्रयत्न केले पाहिजेत या दृष्टीने महाराज प्रयत्नशील राहिले. अशा तऱ्हेने महाराजांचा श्रमाबद्दलचा दृष्टीकोन शास्त्रशुद्ध परिस्थितीशी सुसंगत, आधुनिक, पुरोगामी व मानववादी होता

२९ मे १८९५ मधील ग्याझेट मध्ये महाराजांनी अेक जाहिरात दिली आहे. कामगारांच्या हिताकडे महाराजांचे किती लक्ष होते ते यावरून समजते.

# कोल्हापूर सरकारचे ग्याझिट १८९५

## जाहिरात ( जनरल खाते )

### ( ऊसाच्या घाण्या संबंधी )

ता. २९ मे १८९५

" घाण्यामध्यें हात सांपडणार नाही अगर सांपडलाच तर त्यास इजा होणार नाहीं अशा तऱ्हेची त्यांत कांहीं यांत्रिक युक्ती तारीख १ जानेवारी १८९६ च्या आंत कोणी शोधून काढल्यास ज्यांची युक्ती सोपी थोडक्या खर्चात होणारी व पसंत अशी ठरेल त्यांस चांगले बक्षिस देण्यात येईल. अशा तऱ्हेची युक्ती शोधून काढणारांनी तिचा नमुना तयार करून तो खाली सही करणार यांजकडे वर नमूद केल्या मुदतीच्या आंत हजर करावा"

एम् कुंवरजी.
दिवाण निसबत सरकार करवीर

( Source :- करवीर सरकारचे ग्याझिट-१८९५ पान १२४ )

खाली दिलेल्या तक्त्यांवरुन महाराजांच्या काळी कोल्हापूर संस्थानांत कुशल व अकुशल कामगार संख्येने किती होते, त्यांचे वेतन किती होते हे समजून येते. अकुशल कामगारांचे कमीत कमीं वेतन ६ पै होते व जास्तीत जास्त ते १० आण्या पर्यंत गेले. कुशल कामगाराचे वेतन कमीतकमी १आणा ६ पै व जास्तीत जास्त दीड रुपाया पर्यंत होते. कुशल कामगारांची संख्या कमी झालेली दिसते यांचे प्रमुख कारण म्हणजे महाराजांनी कुशल कामगारांना लहान लहान उद्योगधंदे काढण्यास दिलेले प्रोत्साहन व सक्रीय मदत.

## तक्ता नं. १

### कोल्हापूर संस्थानातील कुशल व अकुशल कामगारांचा पुरवठा व त्यांना मिळणारे अेक दिवसाचे वेतन (रु. आ. पै.)

| वर्ष | अकुशल कामगार संख्या (हजारो) | अकुशल कामगार वेतन रु. आ. पै. | ते | रु. आ. पै. | कुशल कामगार संख्या (हजारो) | कुशल कामगार वेतन रु. आ. पै. | ते | रु. आ. पै. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९३-९४ | ४८ | ०-०१-६ | | ०-०५-० | २३ | ०-०३-० | | १-००-० |
| १८९४-९५ | ५१ | ०-०१-६ | | ०-०५-० | २० | ०-०१-६ | | १-०३-० |
| १८९५-९६ | ५३ | ०-०१-६ | | ०-०५-० | २४ | ०-०२-० | | १-००-० |
| १८९६-९७ | ५९ | ०-००-९ | | ०-०५-० | २७ | ०-०४-० | | १-००-० |
| १८९७-९८ | ५८ | ०-००-६ | | ०-०५-० | २० | ०-०२-० | | १-००-० |
| १८९८-९९ | ६१ | ०-००-६ | | ०-०४-० | २४ | ०-०२-० | | १-००-० |
| १८९९-१९०० | ७१ | ०-०१-० | | ०-०३-० | २२ | ०-०२-० | | ०-१२-० |
| १९००-०१ | ७० | ०-०१-३ | | ०-०३-० | २१ | ०-०१-६ | | ०-१२-० |
| १९०१-०२ | ७८ | ०-०१-३ | | ०-०३-० | २२ | ०-०१-६ | | ०-१२-० |
| १९०२-०३ | ७४ | ०-०१-० | | ०-०३-० | २१ | ०-०२-० | | ०-१२-० |
| १९०३-०४ | ६० | ०-०१-० | | ०-०४-० | २० | ०-०४-० | | ०-१२-० |
| १९०४-०५ | ६७ | ०-०१-० | | ०-०४-० | २० | ०-०४-० | | ०-१२-० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९०५-०६ | ६५ | ०-०१-० | ०-०३-० | २० | ०-०४-० | ०-१०-० |
| १९०६-०७ | ७० | ०-०२-० | ०-०४-० | २० | ०-०४-० | ०-१२-० |
| १९०७-०८ | ❋ | ० ०२-० | ०-०४-० | ❋ | ०-०४-० | ०-१२-० |
| १९०८-०९ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ |
| १९०९-१० | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ |
| १९१०-११ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ |
| १९११-१२ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ |
| १९१२-१३ | ❋ | ०-०६-० | ०-०७-० | ❋ | ०-१२-० | ०-१४-० |
| १९१३-१४ | ❋ | ०-०५-० | ०-०७-० | ❋ | ०-१२-० | ०-१४-० |
| १९१४-१५ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ | ❋ |
| १९१५-१६ | ❋ | ०-०५-० | ०-०७-० | ❋ | ०-१२-० | ०-१४-० |
| १९१६-१७ | ❋ | ०-०६-० | ०-०७-० | ❋ | ०-१२-० | ०-१४-० |
| १९१७-१८ | ❋ | ०-०६-० | ०-०७-० | ❋ | ०-१०-० | ०-१२-० |
| १९१८-१९ | ❋ | ०-०६-० | ०-०७-० | ❋ | ०-१०-० | ०-१२-० |
| १९१९-२० | ❋ | ०-०८-० | ०-१०-० | ❋ | १-००-० | १-०४-० |
| १९२०-२१ | ❋ | ०-०८-० | ०-१०-० | ❋ | १-००-० | १-०४-० |
| ९२१-२२ | ❋ | ०-०८-० | ०-१०-० | ❋ | १-००-० | १-०८-० |

❋ आकडे उपलब्ध नाहीत

## संदर्भ

1. " राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे "
सं. भगवानराव जाधव १४

2. " राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे "
सं. भगवानराव जाधव १२०

3. " राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे "
सं. भगवानराव जाधव १५

# मानवी गुंतवणूक

"If you are planning for one year, plant grains;
if you are planning for ten years, plant trees;
If you are planning for a hundred years, plant men"

—Chinese Proverb

---

**महत्व–**

देशाच्या आर्थिक वाढीच्या प्रक्रियेत भांडवल संचय व भांडवल गुंतवणूक हे दोन घटक अत्यंत महत्वाचे आहेत. गुंतवणूक आर्थिक वाढीला हातभार लावत असते. ह्यासाठी ज्यांना आपला आर्थिक उत्कर्ष साधून घ्यायचा आहे त्यांना ह्या घटकाकडे दुर्लक्ष करून चालत नाही. आपल्या जवळ जी जो साधन संपत्ती असते ती सर्वच रोजच्या तावडतोब निकडीच्या गरजा भागवण्याकडे वापरली जात नाही, तर त्यातला काही भाग भांडवली वस्तूंचे उत्पादन करण्यात वापरली जाते. ही गुंतवणूक कधी यंत्रखरेदीच्या स्वरुपात असेल, कधी कच्चा माल विकत घेण्याच्या प्रकारात असेल, कधी कारखान्यासाठी, गिरणीसाठी, भाडे मिळविण्यासाठी, इमारत बांधणीच्या स्वरुपात असेल, कधी वाहतुकीच्या साधनांबाबत असेल तर कधी नगद पैशाच्या स्वरुपात असेल. आधुनिक अर्थशास्त्रात ह्या गुंतवणुकीच्या

घटकाला फार महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार गुंतवणुकीच्या प्रमाणावर आपले राष्ट्रीय उत्पन्न, रोजगारीची पातळी व राष्ट्रीय उत्पादन अवलंबून असते. ह्या गुंतवणुकीमुळेच आपल्या समाजातील सूप्त उत्पादकता वाढवली जाते, जोपासली जाते.

परंतु वरील विधानामध्ये एका घटकाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो की, ज्याचे महत्व आता अर्थशास्त्रज्ञांना पटले आहे. त्यावर भरपूर चर्चा होत आहे. याचे महत्व महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीतच जाणून घेऊन त्या दिशेने फार मोठे प्रयत्न सर्व आघाड्यांवरून केले होते. तो घटक म्हणजे "मानवी गुंतवणूक." लोकांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर जो खर्च केला जातो ती एक प्रकराची मानवी गुंतवणूकच होय. यामुळे समाजाची सूप्त उत्पादकता वाढविली जाते आणि ह्या दृष्टीकोनातून मानवी गुंतवणूक महत्वाची ठरते आणि त्या बद्दलचा विचार हा कृतिसह आवश्यक ठरतो. ह्या प्रकारच्या गुंतवणुकीमुळे दीर्घकालात समाजाच्या पिढीची कार्यक्षमता, उत्पादकता, दर्जा वाढवला जातो. आपण जिचा नेहमी गुंतवणूक म्हणून उल्लेख करतो तिची मूर्त फळे आपल्याला कदाचित कमी मुदतीच्या काळात तर कधी दीर्घ मुदतीच्या काळात भोगायला मिळतात. एखादी कापडाची गिरणी सुरू केली तर २–५ वर्षात आपण पैशाच्या स्वरुपात नफा मिळवू शकतो. एखादी लेथ टाकली तर १-२ वर्षात आपल्याला तिचा फायदा आपल्या आवाक्यात येतो. एखादे हायड्रोइलेक्ट्रिक प्रॉजेक्ट सुरु केले तर २०-२५ वर्षात आपल्याला त्या पासून अनेक प्रकारचे फायदे मिळू शकतात. पण मानवी गुंतवणूक ही जरा निराळ्या प्रकारची आहे. तिची मूर्त फळे आपल्याला ताबडतोब दिसणार तर नाहीतच, पण कदाचित दीर्घकालातही मूर्त स्वरुपात आपण ती अनभवू शकणार नाही. पण ह्या प्रकारच्या गुंतवणुकीचा परिणाम अत्यंत दूरगामी व अप्रत्यक्ष होत असतो. सबंध समाजाला सगळ्या प्रकारच्या शिक्षणाचा फायदा मिळतो. सर्व साधारण शिक्षणाने सर्वसाधारण कार्यक्षमता, तांत्रिक शिक्षणाने तांत्रिक कार्यक्षमता, एकूण उत्पादकता व कुशलता वाढते. समाजाची सूप्तशक्ति जागृत होते व

एकूण समाजच उत्तम दर्जाचा असा तयार होतो. सर्व बाजूनी तज्ञ, कुशल, कार्यक्षम अशी समाजाची आघाडी तयार होते, व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे देशांत ज्या ज्या वस्तू व सेवा तयार होतात त्यांचे प्रमाण वाढते, त्यांचा दर्जा वाढतो. आर्थिक वाढीसाठी नवनवीन उत्पादन तंत्रे व साधनेही आत्मसात करणे आवश्यक असते. कदाचित सुरवातीच्या काळात आपल्याला ही आयात करणे शक्य व योग्यही होईल. परंतु यंत्राचा, साधनांचा, तंत्राचा जर चांगला उपयोग करायचा असेल तर आपल्याच देशामधील लोकांना कला, तंत्रकला, उपयुक्तकला, शास्त्र, इंजिनियरिंग, वैद्यक वगैरे ज्ञान देणे आवश्यक आहे. भारतामध्ये दोन्ही प्रकारच्या गुंतवणुकीची गरज आहे हे निश्चित. मानवी गुंतवणूक ही दीर्घकालातील योजना आहे. इतर प्रकारच्या गुंतवणुकीत जर काही चुका झाल्या तर त्या आपल्याला थोडेसे नुकसान सोसून देखिल दुरुस्त करता येतात पण मानवी गुंतवणुकीच्या बाबतीत जर काही चुका झाल्या तर त्याचे परिणाम सबंध पिढीला भोगावे लागतात. हे लक्षात ठेवूनच तसे शैक्षणिक धोरण आपल्याला स्विकारायला हवे सरकारने प्रथम ठरवायला हवे की दीर्घकाळात आपला समाज आपल्याला कसा तयार करायचा ते. आणि मग त्या दृष्टीकोनातून जे धोरण योग्य त्याचा साधकबाधक विचार करून गुणदोष विचारात घेऊनच स्विकारायला हवे. नाहीतर सबंध पिढीलाच व सबंध देशालाच ते नुकसान भोगावे लागते. ज्या तऱ्हेची उत्पादक शक्ति आपल्याला दीर्घकाळात हवी आहे त्या तऱ्हेचा प्रशिक्षित समाज निर्माण करणे आवश्यक आहे.

## आधुनिक सिद्धांत-

विसाव्याशतकात विकसनशील राष्ट्रांनी आपले नियोजनाचे उद्दिष्ट प्रगतराष्ट्राचे कल्याणकारी राज्याचे ध्येय हेच स्वीकारले.प्रगतराष्ट्रे आपल्या नियोजनात आरोग्य आणि शिक्षण यांना प्राधान्य देतात. विकसनशील राष्ट्रात आरोग्यापेक्षा शिक्षणाला जास्त प्राधान्य दिले जाते. आरोग्यासंबंधी लोकांच्या अंधश्रद्धा, जुन्या समजुती, चालीरिती ह्यांचशाशी झगडणे हीच पहिली समस्या असते. सर्वसाधारणपणे ह्या दोन्ही क्षेत्राकडे दुर्लक्ष करून

आतापर्यंत इतर प्रकारच्या गुंतवणुकीवरच जास्तभर दिला जात होता. गतराष्ट्रामध्येसुद्धा भांडवल-उत्पादन गुणोत्तर महत्त्वाचे मानले जात होते. हेच उदाहरण अप्रगत राष्ट्रांनी सुरवातीला तहीसही उतरवण्याचा प्रयत्न केला. भांडवल संचय हेच एक आर्थिक वाढीचे मुख्य कारण मानले गेले आर्थिक घटकांना अवास्तव महत्व दिले गेले व आर्थिक नसलेले घटक दुर्लक्षित झाले. परंतु नंतर अर्थशास्त्रज्ञांना कळून चुकले की आर्थिक वाढीला जेवढे आर्थिक घटक जबाबदार आहेत तेवढेच इतरही घटक जबाबदार आहेत. हे इतर घटक कोणते असावेत याबद्दल तर्कवितर्क सुरू झाले आणि मग असा शोध लागला की भांडवल संचयाबरोबरच मानवी गुंतवणूक महत्वाची आहे. आर्थिक प्रगती व शिक्षणाची प्रगती यात निश्चित असा संबंध आहे.

" Much of the past discussion of economic grow h-in developed as well as in underdeveloped countries–appears to be as obsolete as the abandoned and useless furniture in the attic of an old family homestead... clearly... ... a new concept of capital -and a new political economy– is in the process of formulation since the old concepts, which were limited to tangible property, are now manifestly inadequate. The main shift in the present development is characterised by the tendency to think of the cause of economic growth as the capacity to create wealth rather than the creation of wealth itself. The direction of the change in thought is suggested by the question: Can we formulate a theory of human capital which accounts for economic growth in terms of changes in the quality of human beings ? " 1

सर्वसाधारणपणे जे देश मागासलेले असतात त्यामधील लोक मागासलेले असतात. ज्यावेळेला मागासलेले गरीब देश शेती व उद्योगधंदे

यांच्या मार्फत आर्थिक प्रगतीचा प्रयत्न करतात त्यावेळेला ते देश इतर प्रकारच्या गुंतवणुकीच्या मानाने मानवी गुंतवणूक फार कमी करतात. त्यामुळे एक प्रकारचा असमतोल निर्माण होतो व आर्थिक वाढीचा वाजवी दर मिळविण्यामध्ये हे देश अयशस्वी होतात.

ह्या गुंतवणुकीच्या संबंधाची हकीकत एकदम नवी नाही. १९ व्या शतकाच्या सुरवातीला स्कॅन्डेनेव्हियन राष्ट्रांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्यानंतर अमेरिकेतील राज्यांनी आपल्या घटनेद्वारे मुलांना मोफत प्राथमिक शिक्षणाची तरतूद केली. १८७०-७१ च्या युद्धात फ्रेंचांचा जर्मनीकडून पराभव झाला. ह्याचे कारण जर्मन लोक त्यांच्या शिक्षणामुळे श्रेष्ठ आहेत ही समजूत फ्रेंचानी करून घेतली आणि आपल्या शिक्षण पद्धतीत सुधारणा केली. जपाननेही ही विचार पद्धती स्वीकारली. अशा तऱ्हेचे विचारमंथन मानवी गुंतवणुकीच्या बाबतीत सुरू होते. पण ते तुरळक स्वरूपाचे होते व अर्थशास्त्राच्या गुंतवणुकीच्या चौकटीत बसवलेले नव्हते. २० व्या शतकात ह्या विचारसरणीचा प्रभाव पडला व अर्थशास्त्रज्ञांना याचे महत्त्व कळून चुकले.

शिक्षण, आरोग्य व मनोरंजन हे मानवी गुंतवणुकीचे तीन पैलू आहेत. शिक्षणाने उत्पादन क्षमता वाढवली जाते हे आता वादातीत आहे. पूर्वीची सामाजिक चौकट कितपत बदलते, त्यामध्ये किती सुधारणा होतात यावर ही वाढ अवलंबून आहे. सामाजिक व आर्थिक विषमता कितपत आहे ह्यावरही शिक्षणाचे भावी परिणाम अवलंबून असतात. याउलट शिक्षणाची पातळी वाढल्याने विषमता कमी होण्यास मदत होते. शिक्षण व आरोग्य परस्परावलंबी आहेत. मुलाला शिक्षणाचा पुरेपूर फायदा करून घ्यायचा असेल तर ते त्याच्या आरोग्यावर अवलंबून राहील. मोठ्या माणसाने जे ज्ञान व कुशलता मिळविलेली असते तिचा वापरही त्या माणसाच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर अवलंबून राहतो. आरोग्य सुधारता येईल का नाही हे माणसाच्या आरोग्याबाबत असणाऱ्या ज्ञानावर

व प्रवृत्तीवर अवलंबून असते. शिक्षणाचा व आरोग्याचा दर्जा सामाजिक-संस्था व सामाजिकप्रवृत्तीवर अवलंबून असतो. दोन्हीमधील सुधारणा या समाजसुधारणा आहेत. ह्या सुधारणा मोठयाप्रमाणावर व पूर्वनियोजित असतील तरच हवे ते परिणाम घडून येतात. प्रत्येक माणसाला आपले आरोग्य व कुटुंबातील व्यक्तींचे आरोग्य हे महत्वाचे वाटते. कारण त्यांच्या जीवनाच्या राहणीमानाच्या पातळीत आरोग्यला महत्वाचे स्थान आहे याचा समावेश जागतिक आरोग्य संघटनेने आपल्या घटनेत केला आहे. आरोग्य सुधारण्याला स्वतंत्र मूल्य तर असतेच पण त्याशिवाय त्याचा परिणाम सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर होतो. शिक्षणालाही स्वतंत्र मूल्य आहे. यामुळे वैयक्तिक लाभ होतो, व्यक्तित्वाचा विकास होतो, उत्पन्न व जीवनाचे राहणीमान वाढते व राष्ट्राचे जीवन व संस्कृती यामध्ये भाग घेण्याची संधी मिळते. यासाठी देशातील सर्वांना प्राथमिक शिक्षण उपलब्धकरून घ्यायला हवे व शिक्षणाची शिडी चढण्याची समानसंधी मिळवून द्यायला हवी. म्हणून शिक्षणाचाही मानवीहक्कात समावेश केला गेलेला आहे.

## महाराजांची कामगिरी –

ह्या सर्व विवेचनाच्या आधारे आण जर महाराजांच्या कारकिर्दीचे सिंहावलोकन केले तर सर्वच बाजूंनी त्यांनी विधायक कामगिरी पार पाड-लेली आहे असे आपल्याला दिसून येईल. त्यांच्या योजनेचा, दृष्टीचा, विचारांचा पल्ला हा संस्थेच्या व कालाच्या दृष्टीने संकुचित नव्हता. त्यांनी आर्थिक उत्कर्षासाठी जे जे प्रयत्न केले ते अतिशय दूरगामी पल्ल्याचे होते.यात त्यांचे धाडस, संयोजकत्व, आणि दूरदृष्टी दिसून येते. यात आणखी महत्त्वाचे वैशिष्ट असे की, ज्या घटकाकडे–मानवागुंतवणुकीकडे-भारतात त्यावेळी कोणीही फारसे लक्ष पुरविले नव्हते, ज्याचे विवेचन आधुनिक अर्थशास्त्रात महत्त्वाचे ठरते, त्याचा त्यांनी सतत आयुष्यभर अत्यंत तळमळीने, कळकळीने, निःपक्षपातीपणाने पुरस्कार केला, पाठपुरावा केला

मानवी गुंतवणुकीच्या सर्व पैलूंकडे-मानवी शिक्षण, आरोग्य, पिळवणूकी-पासून मुक्तता - त्यांनी लक्ष पुरविले आणि त्या साठी सर्व आघाडया लढवल्या. सक्तिचे प्राथमिक शिक्षण, शाळांची वाढ, कॉलिजची वाढ, बक्षिसे व शिष्यवृत्या, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, रोगांच्या साथीशी झगडण्याची प्रवृती वसतीगृहांचे जाळे इत्यादी आनेक बाबतीत त्यांनी जे जे करता येणे शक्य होते ते ते केले आणि ह्याबाबतीत केवळ कोल्हापूर संस्थानची मर्यादा किंवा केवळ मराठा जातीचे हित ही मर्यादा त्यांनी घालून घेतली नाही कोल्हापूरा-बाहेरही व सर्व जातींना याचा भरपूर प्रमाणात लाभ झाला. त्यांनी गुंतवणूकीच्या दोन्ही पैलूंकडे योग्य प्रकारे लक्ष पुरविले. राधानगरी धरणाची योजना, शाहूमिलची वाढ, शेतीला मदत व त्यातील विविध सुधारणा, शहूपुरीची योजना, इत्यादी प्रकाच्या गुंतवणूकी बरोबरच त्यांनी मानवी गुंतवणुकीकडेही तितकेच लक्ष जातीने पुरविले. ह्या दोन्हीमधील समन्वय जो अलिकडच्या काळात महत्वाचा मानला जातो तो त्यांनी त्याच काळात साधला हे निश्चित भुषणावह आहे. आधुनिक काळात आपलेच राष्ट्रीय सरकार असल्याने त्या दृष्टीने सर्व प्रकारची पोषक परिस्थिती जनता व सरकार एक जुटीने, एका दिलाने निर्माण करु शकते. पण महाराजांच्या वेळची परिस्थिती प्रतिकूलच होती असे म्हणावे लागेल. त्यांच्या काळपर्यंत कोल्हापूर संस्थानचीही फारशी आर्थिक भरभराट झालेली नव्हती त्यांच्यावर ब्रिटीश सत्तेचा अंकुश होता. ह्या पार्श्वभूमीवर इतके व्यापक कार्य निश्चितच कौतुकास्पद वाटते. प्रजेला त्यांनी आपल्या मुलाप्रमाणे वाढवले. तिचे सर्वप्रकारे संगोपन केले

## शिक्षणाचे महत्व-

त्यांनी ओळखले की, अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य हे माणसाराचे मोठे शत्रू आहेत. आणि ह्या तिघांशीही एकाचवेळी झगडण्याचे त्यांनी ठरवले. बहुजन समाज जो अज्ञानी आहे, त्यांना जर प्रथमपासून शिक्षण द्यायला सुरवात केली तर सगळ्याच शत्रूंना नायनाट करायला मदत होईल याची त्यांना खात्री होती. समाजाच्या अगदी खालच्या थरापासून जर

शिक्षणाला आरंभ केला तर त्यांना आपल्या जबाबदाऱ्यांची, कर्तव्यांची, हिताची जाणीव होईल. ह्यासाठी कारकिर्दीच्या अगदी प्रारंभापासूनच्या काळात त्यांनी या दिशेने प्रयत्न सुरू केले, त्यासाठी त्यांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. बहुजन समाज अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडत होता. त्यांना हाताला धरून त्या अंधःकारातून बाहेर प्रकाशात आणण्याची जरूरी होती हे त्यांनी आपले प्रथम कर्तव्य मानले आणि आयुष्याच्या शेवटपर्यंत ते तडीस नेण्याचा सर्वांगीण प्रयत्न केला. शिक्षणाच्या ह्या आवश्यकतेवर त्यांनी आपले विचार अगदी स्पष्टपणे खामगाव येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे जे, अकरावे अधिवेशन भरलेले होते त्यामध्ये व्यक्त केले आहेत.

" शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नति झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाही. म्हणूनच सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे."[2]

त्यांनी शिक्षणसंस्था ज्या काढायला सुरवात केली त्या प्रामुख्याने गरीब लोकांसाठी. त्यांचे म्हणणे असे की कर गोळा करताना आपण सगळ्या लोकांकडून गोळा करतो मग त्याचा फायदाही सर्वांना मिळाला पाहिजे. ह्यामध्ये एक उत्तम प्रशासकही डोकावलेला आपल्याला दिसतो. त्या वेळेला समाजातील सर्व थरांना शिक्षणाचे महत्व पटू लागले होते असे आपल्याला दिसते आणि त्यासाठी त्या सर्व लोकांनी-सैनिक शेतकरी-औद्योगिक कामगार, व्यापारी - शिक्षणाच्या प्रसारासाठी वेगवेगळ्या संघटनाही त्या काळात स्थापन करायला सुरवात केली होती. ह्या शिक्षण प्रसाराच्या कार्यासाठी त्यांनी अनेक प्रकारची मदत केली. लोकांकडून कर रुपाने पैसे गोळा होतच होते. आणखी एक नवा दृष्टीकोन त्यांनी सुचवला आणि तो म्हणजे आपण धार्मिककार्यात बराच पैसा खर्च करतो. तो पैसा आपण धार्मिक कार्याकरिता न खर्च करता जर शिक्षणासाठी वापरला, तर

त्यांचा जास्त सार्थ उपयोग केला असे होईल आणि हे धोरण त्यांनी नंतर प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत अमलात आणले. कारण त्यांचा मूलभूत विचार असा होता की, विद्यार्थ्यासाठीच माझे हे राज्य आहे. त्यांची प्रजेसाठी असणारी प्रवृत्ती ही परोपकारी होती असे दिसून येते. महाराजांनी आपले जे शिक्षण विषयक धोरण आखले होते, त्यात दोन महत्त्वाची वैशिष्ठ्ये आपल्याला दिसून येतात. त्यातले पहिले वैशिष्ठ्य म्हणजे त्यांचा नि:पक्षपातीपणा. त्यांनी शिक्षण विषयक जे सर्व प्रयत्न केले ते बहुजन समाजाच्या हितासाठी. श्री. तोफखान्यांनी आपल्या पुस्तकात असे स्पष्टपणे नमूद केले आहे. ते महाराजांच्या सहवासात आलेले असल्याने त्यांचे पुस्तक उत्तम आधार म्हणून वापरायला हरकत नाही.

"बहुजन वर्गातील तरुणांनी वरच्या वर्गातील तरुणांशी होणाऱ्या चढाओढीत त्यांच्या बरोबरीने तरी असावे असे महाराजांचे मला निश्चित सांगणे असे. केवळ बहुजन समाजाच्या नावावर सर्व फायदे सवलती आपणास मिळाव्यात अशी अपेक्षा करण्यात अत्यंत हीनपणा आहे असे ते नित्य म्हणत "3

म्हणजे कोणत्याही जाती जमातीला लाडावून न ठेवता त्यांना आवश्यक व योग्य त्या सवलती देण्याचे महाराजांनी काटेकोर धोरण ठरले होते. दुसरे वैशिष्ठ्य म्हणजे त्यांनी शिक्षण विषयक धोरण आखताना त्या क्षेत्रामधील लोकांचा कै.रानडे, कै. गोखले, श्री. जॉईल्स यांचा वेळोवेळी सल्लाही घेतला होता. ज्या लोकात जे चांगले होते त्याची गुणग्राहकताही महाराजांकडे होती.

## सर्वांगीण विचार–

शिक्षण विषयक विचार करताना त्यांनी त्याचा विचार एकांगी केला नव्हता. केवळ सर्वसाधारण शिक्षण बहुजन समाजाला पुरेसे आहे एव्हढाच मर्यादित दृष्टिकोन त्यांचा नव्हता. शिक्षणाची विविध रूपे - त्याचे विविध पैलू त्यांनी आपल्या भाषणातून पुढे मांडले आणि प्रत्यक्ष कार्यवाहीत

जाणतानाही हेच धोरण चालू ठेवले. खामगांव येथे २७-१२-१९१७ ला अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे ११ वे अधिवेशन भरले होते. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, शिक्षणाच्या प्रश्नांच्या विविध बाजूंकडे आपण लक्ष दिले पाहिजे. केवळ शेतकरी किंवा सैनिक म्हणून राहून आपल्याला चालणार नाही. व्यापारातही ज्ञान मिळवणे आवश्यक आहे. शेतात जरी खूप लोक गुंतले असले तरी सुद्धा त्यातीलही आपण शिक्षण घेतले पाहिजे. कारण शेती हा व्यवसाय सुद्धा शास्त्रशुद्ध झालेला आहे. त्यातील तांत्रिक बाजूही समजावून घेतली पाहिजे. केवळ अंदाजावरच ते थांबले नाहीत तर त्यांच्या मतानुसार सैनिक होण्यासाठीही शिक्षणाची आवश्यकता आहे. कारण आधुनिक युद्धशास्त्र हेही प्रगत अवस्थेप्रत पोचले आहे. सैनिकांना जर चांगले शिक्षण मिळाले तर ते जास्त कार्यक्षम सैनिक बनू शकतात. त्यांनी उदाहरण देऊन सांगितले की, सफल व्यापारील लोक हे उत्तम गणिती असले पाहिजेत.

१३ ते १६ फेब्रुवारी १९२२ ला दिल्लीला अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे तिसरे अधिवेशन भरले होते. महाराज तेथे अध्यक्ष होते. अध्यक्ष-पदावरून बोलताना त्यांनी शिक्षणाच्या प्रश्नाबद्दल असेच उद्गार काढले होते. त्यांच्यामते अेकाच व्यवसायाला चिकटून राहणे योग्य नाही. समाजातील विविध लोकांनी विविधप्रकारचे व्यवसाय करणें आवश्यक आहे. वकील, बॅरिस्टर, डॉक्टर, व्यापारी यासारख्या स्वतंत्र व्यवसायातही प्राविण्य मिळविले पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षणासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या शैक्षणिक संस्था उघडणे आवश्यक होते आणि ह्याकडे त्यांनी डोळेझाक केली नाही.

"निरनिराळ्या जातींना निरनिराळ्या तऱ्हेच्या शिक्षण संस्था पाहिजेत. मराठ्यांना एखादे सँडर्स्ट कॉलेज जरूर होईल. साक्षरजातींना आर्टस् कॉलेज आवडेल परंतु औद्योगिक शिक्षणाकडे मात्र फार थोड्या लोकांचे लक्ष आहे."4

असे उद्गार त्यांनी १९१९ अखेर कोल्हापुरात मुंबईचे नवे गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड ह्यांच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या सभेत काढले. शैक्षणिक धोरणामध्ये समतोल असणे आवश्यक आहे. कोणत्या विभागांकडे जास्त लक्ष पुरवले जाते आणि कोणत्या व्यवसायांकडे दुर्लक्ष केले जाते याची त्यांनी दखल घेतली होती. आणि समतोल राखण्यासाठी योग्य धोरण स्वीकारले होते.

## सुरवातीचे कार्य-विविध प्रकारच्या शाळा–

कारकिर्दीच्या सुरवातीला महाराजांनी संस्थानची पाहणी केली होती. ज्यावेळेला ते गारगोटीला गेले होते तेव्हा तेथील लोकांनी मुलींच्या अेका शाळेसाठी मागणी पुढे मांडली होती. महाराजांनी ताबडतोब ती मागणी मान्य केली आणि शाळा उघडण्यासाठी हुकूम सोडला. त्याचप्रमाणे सह्याद्रि-लगतच्या भागात मुलींच्या शाळेची व मुसलमान लोकांकरिता शाळेची महाराजांना गरज वाटल्याने त्यांनी शाळा उघडण्याकरिता हुकूम केले १९११ साली स.तवे अेडवर्ड बादशाहा ज्यावेळेला मरण पावले त्यावेळेला त्यांच्या स्मरणार्थ फंड गोळा केला तो अंदाजे रु. ३२,००० झाला. त्यातून किंग अेडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट नावाची संस्था काढली. हिच्या विकासा-करिता महाराजांनी खूप प्रयत्न केले व चांगलीच मदत केली. शेतीविषयक कामासाठी ही संस्था वाहिलेली होती. त्याचे सविस्तर विवेचन शेती ह्या प्रकरणात येऊन गेलेच आहे. तसेच १५ मे १९१२ च्या सुमारास महाराजांनी 'पाटील शाळा' नावाची शाळा काढली. खेडेगावातील पाटलांना त्यांच्या कारभाराचे ज्ञान, माहिती-शिक्षण देता यावे यासाठी ही शाळा सुरू करण्यात आली. जून १९१० च्या सुमारास श्री. कँडी ह्यांनी कोल्हापुरात 'सरदार-शाळा' उघडली. पुण्याहून सरदार श्री. अेम्. अे. रास्ते ह्यांना मुद्दाम शिकवण्यासाठी ह्या शाळेत पाठवण्यात आले. महाराजांनी ह्या शाळेला इमारतीच्या रूपाने मदत केली. जुन्या चर्चची जी इमारत होती त्याचा वापर करायला संस्थेला परवानगी देण्यात आली. सातवी पास झालेले जे शिक्षक होते त्यांच्या प्रशिक्षणासाठी अेक प्रायोगिक वर्ग उघडण्यात आला.

ह्यामध्ये शिक्षकांचा दर्जा सुधारण्याचा हेतू होता. ह्याबद्दलची माहिती आपल्याला १९१२-१३ च्या वार्षिक अहवालांवरून मिळते. सुरवातीला हा वर्ग फक्त ६ महिन्यांसाठीच सुरू करण्यात आला होता परंतु वर्ग यशस्वी झाल्याने महाराजांनी आणखी ५ वर्षे वर्ग चालवण्यासाठी मोठ्या खुषीने परवानगी दिली. प्रत्येक वर्षी कोल्हापूर दरबारच्या चाकरीत असलेले परंतु प्रशिक्षित नसलेले १० शिक्षक ह्या वर्गासाठी पाठवले जात प्रत्येक शिक्षकाला अेका वर्षाकरिता ५ रु. भत्ता ही देण्यात येत असे. १९२०-२१ च्या अहवाला-वरून आणखी अेक महत्त्वाची वैशिष्ठ्यपूर्ण घटना घडल्याची नोंद आपल्याला सापडते. मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त परीक्षा मंडळाने शालांत परीक्षेसाठी कोल्हापुराची केंद्र म्हणून निवड केली होती. हा अेक प्रयोगच करण्यात आला होता. ही परीक्षा दरबाराने जो खास भव्य व मोठा मंडप खासबाग मैदानामध्ये उभारला होता या मंडपे घेण्यात आली. ह्याचा खर्च दरबारने सोसला होता. ह्या बाबतीत पाहिजे त्या सवलती महाराजांनी विद्यापीठाला खासगीतून दिल्या होत्या. जे विद्यार्थी दूरवरच्या भागातून परीक्षेसाठी आले होते त्यांच्या सोयीसाठी व सुखासाठी राहण्याची व जेवण्याची सोय महाराजांनी केली होती व त्यासाठी विद्यार्थ्यांकडून काहीच पैसे घेण्यात आले नव्हते.

महाराजांच्या ह्या विधायक हालचालीवरून त्यांच्या शैक्षणिक धोरणावर प्रकाश पडतो. त्यांनी शिक्षणाच्या अेकाच अंगाकडे लक्ष दिल नाही तर त्याच्या इतर बाजूही विचारात घेतल्या. ज्या वेळेला शाळांची निकडीची गरज भासली त्या वेळेला त्या उघडण्यासाठी तातडीने पाऊले उचलली पाटील शाळा उघडण्याची त्यांची कल्पना ही अगदी नाविन्यपूर्ण म्हणावी लागेल. अशा प्रकारच्या शिक्षणाकडे आत्तापर्यंत फारसे कोणाचे लक्ष गेले नव्हते व त्याची कोणाला गरजही भासली नव्हती. परंतु महा-राजांच्या हे दोन्हीभाग लक्षात आले कारण त्यांना समाजसुधारणा जी करायची होती ती अगदी तळापासून करायची होती पाटलांच्या हातामध्ये संपूर्ण खेड्याचा-गावचा कारभार जाणार होता मग त्या दृष्टिने त्यांना

कुशल, कार्यक्षम बनविणे अगत्याचे होते. महाराजांच्या बुद्धीचा आणखी अेक उन्मेष दिसून येतो आणि तो म्हणजे शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी त्यांनी अेक वर्ग उघडला. आधुनिक काळात शिक्षकांनी केवळ पुस्तकी शिक्षण घेऊन उपयोगी नाही. त्यांनी मुलांना शिकवावे कसे याचेही शिक्षण घेणे आवश्यक आहे. ह्या विचारांचे व्यावहारिक महत्त्व पटले आहे व त्या दृष्टीने बी. अेड्. कॉलेजची वाढही झपाट्याने होत आहे. पण ह्या विचारांचे महत्त्व त्याकाळात जाणून तशी कृतीही महाराजांनी केली. शिक्षकांचा दर्जा, कार्यक्षमता, गुणवत्ता सुधारण्यासाठी हे आवश्यक आहे याचे महत्त्व महाराजांना त्याकाळात उमगले होते. तीच कथा किंग अेडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची शेती हा आपला प्रमुख व्यवसाय होता व अजूनही आहे. त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. यासाठी खास संशोधनासाठी काही संस्था निर्माण केल्या पाहिजेत. त्या हेतूने त्यांनी ह्या संस्थेला चांगलीच मदत केली. मुंबई विद्यापीठाने कोल्हापुरची निवड परिक्षेचे प्रायोगिक केंद्र म्हणून का होईना केले होते याचे श्रेय आपल्याला महाराजांच्या शिक्षण प्रसाराच्या प्रयत्नानाच द्यावे लागेल आणि म्हणूनच महाराजांनी हे कायम स्वरूपाने व्हावे ह्यासाठी विद्यापीठाला व विद्यार्थ्यांना सवलती दिल्या होत्या.

## प्राथमिक शिक्षण –

यानंतर महाराजांची ज्या क्षेत्रात अत्यंत ठळकपूर्वक, अेक महत्त्वाचा टप्पा म्हणून कामगिरी दिसून येते ते क्षेत्र म्हणजे प्राथमिक शिक्षणाचे. ह्याबद्दल जितके लिहावे तितके थोडेच आहे. सुरवातीच्या काळात महाराजांनी भाषणामधून ह्याबद्दल आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्या बाबतीतील त्यांची नंतरच्या काळातील कृतीही महत्त्वाची आहे. ह्यासाठी कोणतेही प्रयत्न करायचे त्यांनी बाकी ठेवले नाहीत. त्यांनी जे अविश्रांत परिश्रम घेतलेले आहेत त्याची आठवण करवीरकर तरी विसरू शकणार नाहीत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधीचा सरकारचा कायदा १९१७ चा आहे, पण त्या दिशेने प्रयत्न त्या आधीच करवीरच्या

या राजाने केले होते. नानाविध हुकूम सोडले होते. त्यांची अंमल बजावणी होते का नाही याकडे जातीने लक्ष पुरविले होते. या विषयीचे त्यांनी आखलेले धोरण अतिशय सुसंगत असे होते.

या संबंधी त्यांनी आपले मत असे प्रकट केले होते की, सध्या राज्यकारभाराचे सगळे काम मलाच करावे लागत आहे. प्रजेकडून कर रुपाने पैसा मीच गोळा करतो व सध्या त्याचा विनियोगही मीच करतो. परंतु कालांतराने ही जबाबदारी प्रजेवर पडणार आहे. प्रजेला जर ही जबाबदारी पेलायची असेल तर पात्रता निर्माण व्हायला हवी. म्हणजेच सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे. " No cake to a few until all are served with bread. असे त्यांचे समर्पक धोरण होते. प्रजेचा पैसा आपण गोळा करतो म्हणजे त्याचा खर्चही योग्य झाला पाहिजे ही जबाबदारीची जाणीव त्यांना होती. हळूहळू प्रशासनाचे काम प्रजेकडे सोपविण्याची त्यांची तयारी होती तसे वेळोवेळी त्यांनी व्यक्तही केले होते. पण त्यासाठी प्रजेला प्रथम लायक बनविण्याची आवश्यकता होती. ब्रिटिशांच्या काळातील एक संस्थानिक राजा इतकी सावधानतेची जाणीव ठेवतो, इतके लोकशाहीयुक्त विचार व्यक्त करतो हे महत्वाचे ! महाराजांनी समाजाचा रोग त्या वेळीच अचूकपणे ओळखला होता. समाजाचा जर ऐहिक उत्कर्ष साधायचा असेल तर त्यातला पहिला अडथळा होता शतकानुशतके मुरलेला जातीभेद. हा जर अडथळा ओलांडायचा असेल तर सर्वांना प्रथम शिक्षण दिले पाहिजे. म्हणजे लोकांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव होईल.

" जातीभेदामुळे पछाडलेल्या हिंदू समाजाचे रोग नाहिसे करण्यास मोफत आणि सक्तीचे शिक्षण हे एकच औषध उपलब्ध आहे " 5 असे उद्‌गार त्यांनी १५-४-१९२० ला नाशिक येथे एका सभेत काढले.

" हल्ली सर्व वर्गातील प्रजाजनांकडून घेतलेला वसूल साक्षर वर्गाच्या गरजा भागविण्यासाठीच खर्च होत आहे. पण अशा पैशाचा विनियोग सर्वच

वर्गांच्या उपयोगासाठी हल्ली केला पाहिजे असे माझे मत आहे. म्हणूनच मी अलीकडे सार्वत्रिक सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न हाती घेतला आहे. औद्योगिक व्यापार विषयक वगैरे सर्वच सुधारणा होण्यास सामर्थ्याचा ओघ न वळविता सर्व शिक्षण प्रसारक संस्थानी तो प्राथमिक शिक्षणाकडे वळवावा असे मला वाटते "[6] या शब्दात त्यांनी आपले शिक्षण विषयक धोरण १९१९ अखेर मुंबईचे नवे गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड यांनी जेव्हा कोल्हापुरास भेट दिली त्या वेळच्या सभेत काढले.

कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा विचार त्यांच्या मनात १९१२-१३ च्या सुमारास घोळू लागला. इतर खात्यापेक्षा शिक्षणखात्याकडे महाराजांचे विशेष लक्ष होते. महाराजांचे औदार्य शिक्षण खात्याच्या वाट्याला जास्त येत होते. परंतु जी प्रगती झाली होती ती त्यांना असमाधानकारक वाटत होती. शिक्षणक्षेत्राचा पाया रुंद करण्याची आवश्यकता त्यांना भासत होती. प्रत्येक गावात किमान अेक शाळा असलीच पाहिजे व ज्या जातीचे लोक गावात जास्त असतील त्यांच्यापैकी अेका प्रतिनिधीने ती चालविली पाहिजे असे त्यांचे मत होते. सुरवातीला नवीन शाळा काढून तेथे वतनदार इनामी शिक्षक नेमण्याची योजना १९१२ च्या अखेरीस त्यांनी काढली. परंतु ही इनामी योजना अमलात येणे कठीण आहे हे त्यांना १९१४ मध्ये समजून आले. कारण या योजनेमुळे विशेष प्रगती झाली नाही. नंतर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची जी योजना सुरू झाली ती मात्र पगारी शिक्षक नेमण्याच्या तत्त्वावरच. पगारी मास्तर नेमून शाळा सुरु कराव्यात व वतनी जमिनी दिल्यानंतर पगार बंद करावा असा त्यांनी हुकूम केला. १९१६ साली महाराजांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दोन बाबतीत पाहणी करून अहवाल सादर करण्याबद्दल हुकूम केला. अेक म्हणजे शिक्षकांना देण्यायोग्य अशा सरकारी जमिनींची उपलब्धता. दुसरा जास्त महत्त्वाचा म्हणजे देवस्थानचा खर्च भागून शिल्लक उरण्याजोगी जी देवस्थाने आहेत त्यांची यादी. १९१७ नंतर वतनदार शिक्षकांची योजना त्यांनी सोडून दिली आणि प्रत्येक वर्षी १ लाख रुपये प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करायचे ठरवले. या अेक लाख रुपयांपैकी २०,००० रुपये देवस्थानच्या शिल्की

उत्पन्नातून व ८०,००० रु. संस्थानच्या उत्पन्नातून यावयाचे होते. हे अेक लाख रुपये कशा तऱ्हेने खर्च करावयाचे यासंबंधी योजना आखण्याची जबा. बदारी त्यांनी अेका कमिटीवर टाकली होती. कमिटीच्या शिफारशीनुसार कोल्हापूर शहरात व संस्थानात सक्तीचे शिक्षण देण्याची त्यांनी सप्टे. १९१६ मध्ये आज्ञा केली. १९१८-१९ या वर्षात योजना विस्तृत स्वरुपाची होऊन अेकून ९६ शाळा ठिकठिकाणी उघडण्यात आल्या. ४ मार्च १९१८ला करवीर पेठ्यात चिखलीला पहिली सक्तीच्या शिक्षणाची शाळा महाराजांच्याच हस्ते उघडण्यात आली. या योजनेच्या टप्प्यात सुमारे पाऊण लाख रु. खर्च झाले आणि ४,६३१ मुले शाळेत येऊ लागली. सुरवातीच्या काळात १लाख रुपयांपैकी फक्त रु. ६००० खर्च झाले. परंतु हाच खर्च महाराजांच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षी ३ लाख रुपयापेक्षाही जास्त होता. यावरून शैक्षणिक कार्याचा खूपच विस्तार झालेला दिसून येतो. प्रथम मुख्य गावात शाळा सुरू करण्यात आल्या. कारण शिक्षणाची सोय नव्हती व लोकांमध्ये शिक्षणाबद्दल आवडही निर्माण झाली नव्हती. तालुक्याच्या गावी मराठी व इंग्रजी तीन इयत्ता पर्यंत शिक्षणाची तजवीज केली. शेतकऱ्यांच्या मुलांना शाळेची फी माफ केली. पहिल्या दोन नंबरापर्यंत विद्यार्थ्यांना पुस्तके बक्षिस देण्याचा नियम केला. महाराजांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ व राज्यारोहणसमारंभ प्रित्यर्थ दरवर्षी प्राथमिक शाळेतील मुलांना खाऊवाटण्यासाठी खर्चास काही रक्कम मंजूर केली. मुलकी परिक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळामास्तर व कारकुनाची नोकरी देण्याचे आश्वासन दिले. नुसतेच शिक्षण प्राप्त करून विद्यार्थी बाहेर पडून, भवितव्य अनिश्चित राहण्यापेक्षा त्यांना नोकरीचे आश्वासन दिले. अशा तऱ्हेने सोयी उपलब्ध करून दिल्यास जास्त विद्यार्थी आकर्षिले जातील हे मर्म त्यांनी ओळखले. शिक्षणाची व व्यवहाराची सांगड घालून दिली. हा व्यावहारिक दृष्टीकोन त्यांनी ठेवला. यामुळे शिक्षण प्रसारास चालना मिळाली.

## वसतीगृहांचे जाळे —

शिक्षणप्रसार आणखी वेगाने होण्यासाठी लोकांना शिक्षण घेणे जास्त सोईचे व्हावे यासाठी आणखी अेका प्रजेच्या दृष्टीने किफायतशीर

होणाऱ्या योजनेला महाराजानी चालना दिली, वेग दिला. आणि ती योजना म्हणजे वेगवेगळया जमातींकरिता होस्टेल्सची – वसतीगृहांची स्थापना. ही योजना अत्यंत वैशिष्टपूर्ण होती. इतर कोठेही अशी योजना इतकी विचारपूर्वक आखलेली व प्रसारात आलेली आढळून येत नाही. केवळ अेकाच जातीचे, केवळ कोल्हापूर संस्थानाचेच हित ह्या बाबतीत विचारात घेतले गेले नाही. महाराजांनी आपला दृष्टीकोन या बाबतीत व्यापक, विशाल, उदार असा ठेवला होता. सर्व जातीकरता संस्थानात विद्यार्थी वसतीगृहे स्थापिली गेली आणि संस्थानाबाहेर सुद्धा महाराजांनी आपला हात सढळपणे पुढे केला.

या चळवळीला जो प्रारंभ झाला तो थोडा प्रासंगिकपणे. १८९६-९७ च्या दुष्काळाचे चटके कोल्हापूर शहराला बसू लागले होते. जसजसे दुर्भिक्ष वाढू लागले, जसजसा दुष्काळ तीव्र होऊ लागला तसतसे खानावळीचे दर ५ रुपयावरुन ७ रुपयापर्यंत पोचले. अशा परिस्थितीत मध्यम स्थितीतील लोकांना आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठवणे जड जाईल हा विचार येऊन एक वसतीगृह स्थापन करण्यात आले. पण याचा फायदा सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना मिळेनासा झाला आणि मग सर्वांसाठीच अशी वसतीगृहे स्थापन करण्याची योजना आकार घेऊ लागली.

महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरवातीला १४-१२-१८९५ ला महाराजांच्या पणजी अहिल्याबाई राणीसाहेब स्वर्गवासी झाल्या. महाराजांना यांच्याबद्दल आदर वाटत होता. तो व्यक्त करण्यासाठी यांच्या नावाने १५-१०-१८९६ ला एक दवाखाना उघडण्यात आला. यातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी खर्च यावा म्हणून १८९६–९७ मध्ये एक वसतीगृह काढण्यात आले.

या नंतर मात्र ही चळवळ पक्की रुजली आणि महाराजांच्या प्रयत्नाने, पालनपोषणाने हिचे चांगले संवर्धनही झाले, सुरवातीला दुष्काळामुळे जे वसतीगृह स्थापन झाले होते ते खरे म्हणजे सर्व जातीच्या

शाळा कॉलिजच्या विद्यार्थ्यांसाठी स्थापन झाले होते. पण त्याचा फायदा मिळाला फक्त ब्राह्मण जातीच्या विद्यार्थ्यांना. तेव्हा सुरवातीला महाराजांनी काही मराठा विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था राजवाड्यात केली. जेवायला उत्तम अन्न व न्यायला आणायला गाड्या यामुळे त्या मुलांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले व अभ्यासात त्यांची प्रगती झाली नाही. हीपण व्यवस्था महाराजांनी बंद केली. त्यानंतर त्यांनी विविध जातीतील कार्यकर्ते हाताशी धरून, त्यांना मार्गदर्शन करून वसतीगृहे काढली त्यांना सर्व प्रकारच्या सोयी दिल्या. आणि कोल्हापुरला वसतीगृहांच्या जननीचे स्वरूप (Mother of Boarding Houses) प्राप्त झाले.

अगदी सुरवातीला ५-४- १९०१ ला जैनपरिषदेने जैन विद्यार्थ्यां-करिता वसतीगृह सुरु केले. महाराजांनी या वसतीगृहाला भरघोस मदत केली. प्रारंभी हे वसतीगृह जुन्या इमारतीतच सुरु झाले. पण १९०४ साली मराठा वसतीगृहासमोर चोफाळा माळावर जैन बोर्डिंगच्या मुख्य इमारतीचा पायाभरणी समारंभ महाराजांच्या हस्ते झाला. दक्षिण महाराष्ट्र जैनसभेला ही जागा महाराजांनी बक्षिस दिली. मुख्य इमारतीच्या बांधकामाला जो खर्च आला त्यातला बराचसा भाग मुंबईचे व्यापारी शेठ माणिकचंद हिराचंद यांनी उचलला होता. महाराजांनी जागेशिवाय या वसतीगृहासाठी काही फंड दिला व वार्षिक ३५० रुपयांची देणगी दिली. मराठा विद्यार्थ्यांना ज्यासवलती संस्थानच्या शाळेत मिळत असत त्या सवलती जैन विद्यार्थ्यांनाही दिल्या. या वसतीगृहानंतर १८-४-१९०१ ला मराठा विद्यार्थ्यांच्या संस्थेला मूत स्वरूप प्राप्त झाले. हिला महाराजांचा फार भक्कम आधार मिळाला होता. जुन्या इमारतीजवळ नवीन इमारती बांधण्यात आल्या. महाराजांनी ह्या संस्थेची देणगी वाढवत वाढवत ४७,००० रु. पर्यंत नेली. याशिवाय वार्षिक ५५० रुपयांची देणगी व वार्षिक २००० रुपयांचे जमिनीचे उत्पन्न ह्या संस्थेला दिले. महाराजांचा दृष्टीकोन केवळ आपल्या जातीपुरता मर्यादित नव्हता तर सर्वव्यापक, उदार होता. त्यांनी सर्व जातीकरता वसतीगृहे अस्तित्वात आणताना मुसलमानांचाही विचार केला होता. नोव्हेंबर १९०६

ला मुसलमानांसाठीही वसतीगृह सुरु करण्यात आले. या वसतीगृहाच्या इमारतफंडाकरिता महाराजांनी रु. ५५०० दिले. जून १९०७ मध्ये इमारतीसाठी जागा मोफत दिली. याशिवाय २५० रु. ची वार्षिक अनुदाने व ६७४५ रुपयांचे स्थावर उत्पन्न देऊन या वसतीगृहाला महाराजांनी आपला बळकट आधार दिला. यानंतर क्रम येतो वीरशैव लिंगायत वसतीगृहाचा. जून १९०७ मध्ये हे वसतीगृह रंकाळ्याच्या पश्चिम काठावर सुरु करण्यात आले. महाराजांच्या दातृत्वाचा लाभ ह्याही वसतीगृहाला देणगी व अनुदान यांच्याद्वारे झाला. रविवार पेठेतील अंकेश्वरीच्या देवळात अेक लहानसें वसतीगृह अस्पृश्य लोकांकरिता फेब्रुवारी १९०८ मध्ये काढण्यात आले. याचे नामाभिधान मिस्. क्लार्क वसतीगृह असे करण्यात आले.कारण मिस् क्लार्कना अस्पृश्यवर्गाच्या चळवळीबद्दल अतिशय तळमळ,कळकळ वाटत होती.काही कालानंतर हे वसतीगृह नवीन इमारतीत हलवण्यात आले. महाराजांनीच हल्लीची जागा व इमारत या संस्थेच्या ताब्यात दिली. नवीन इमारत बांधण्यासाठी जो खर्च आला त्यातील अर्ध्याहून जास्त खर्च महाराजांनी केला होता. नंतर नामदेव शिंपी व दैवज्ञब्राह्मण जातीसाठी स्वतंत्र वसतीगृहे अस्तित्वात आली. सारस्वतलोकांच्या वसतीगृहालाही महाराजांची मदत मिळाली. संस्थेसाठी अेक वर्षासन बांधून दिले. महाराजांकडून या वसतीगृहाच्या इमारत फंडाकरिता ५००० रु. ची मदत मिळाली होती. प्रभू लोकांच्या वसतीगृहाकरितासुद्धा महाराजांनी १५०० रुपयांची देणगी दिली होती. ऑगस्ट १९२० मध्ये कोल्हापुरला जिनगर ( आर्यक्षत्रिय ) विद्यावर्धक समाजाची अेक परिषद भरली होती. महाराजांनी राजाराम औद्योगिक स्कूल व कारजगर विद्यार्थी वसतिगृह स्थापन होण्यास बरीच मदत केली. या संस्थाना महाराजांनी जी मदत केली तिचे वर्णन " टाइम्स ऑफ इंडिया " ने खालील प्रमाणे केले आहे.

" महाराजांनी मोठ्या उदार अंतःकरणाने यांना कोल्हापूर मध्ये अेक विस्तीर्ण इमारत दिली आहे. या इमारतीची किंमत ३०,००० हजार पेक्षाही अधिक असून या जातीच्या विद्यार्थ्यांकरिता ही इमारत, वसतिगृह,

या जातीच्या निरनिराळया कलाकौशल्याचे "प्रदर्शन नगर" आणि औद्योगिक स्कूल अशा विविध रितिने उपयोगात येणार आहे. या वसतिगृहाच्या चरितार्थासाठी महाराजांनी काही वर्षासन करून दिले आहे. या प्रित्यर्थ जितका फंड गोळा झाला असेल तितकीच रक्कम स्वतः देण्याचे महाराजांनी अभिवचन दिले आहे."[7]

जिनगरांच्या चळवळीला महाराजांनी औद्योगिक स्वरुप प्राप्त करून दिले. हे ह्या चळवळीचे प्रमुख वैशिष्ठ्य आहे.

वेगवेगळया जातींसाठी ही वसतीगृहे जी स्थापण्यात आली व त्यांची वैयक्तिक व्याप्ति मर्यादित होती पण त्यांचा परिणाम कोल्हापूर संस्थानात व संस्थानाबाहेरही झाला. नाशिक येथे उदाजी विद्यार्थीगृहाचा पाया महाराजांनी घातला व १५,००० रु. इमारतीच्या बांधकामासाठी दिले. त्याचप्रमाणे पुणे येथे निघालेल्या ताराबाई विद्यार्थिगृहाला त्यांनी रु. १५ हजार दिले. अहमदनगरला आपले दत्तक वडील चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ निघालेल्या वसतीगृहालाही महाराजांनी आश्रय दिला. कोल्हापूरलाच प्रिन्स शिवाजी विद्यार्थीगृह नावाची मराठा विद्यार्थ्यांसाठी आणखी एक संस्था निघाली होती. तिला फेब्रुवारी १९२१ मध्ये महाराजांनी रु. ७००० दिले. ह्या ७,००० रु. वर जे व्याज मिळणार होते त्यातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती व गरीब होतकरू विद्यार्थ्यांना अन्न व कपडे देण्यात येणार होते. १९११ मध्ये पुण्याला मराठा हायस्कूल स्थापन करण्याचे घाटत होते. त्यासाठी महाराजांनी १५,००० रु. दिले. १९१२ ला या रकमेतून यासाठी जागाही खरेदी केली गेली. देवासचे राजेसाहेब श्री तुकोजी महाराज यांनी या कार्यात पुढाकार घेतला. परंतु त्या वेळेस दुर्दैवाने ही योजना कार्यवाहीत आणली गेली नाही. काही कालानंतर शिवाजी मराठा हायस्कूलची पुण्याला स्थापना झाली.

अगदी सुरवातीच्या काळात सर्व जातीकरिता निरनिराळी वसतीगृहे स्थापन करणे अशक्य वाटले. म्हणून सर्व जातीच्या विद्यार्थ्यांकरिता श्री शाहू दयानंद मोफत गुरुकुल हे एक वसतीगृह स्थापन करण्यात आले. परंतु आपल्या दूरदृष्टीमुळे १९२१-२२ पर्यंत महाराजांनी योजनाबद्ध अशा तऱ्हेने वसतीगृहाचे जाळेच अस्तित्वात आणले. ह्या वसतीगृहांना महाराजांनी जी मदत केली होती ती सर्वांगीण केली होती. इमारतीकरिता जागा, इमारतबांधणीच्या खर्चासाठी फंडाच्या रूपाने मदत, त्या वसतीगृहांना आपला दैनंदिन खर्च करता यावा म्हणून काहींना वर्षासने बांधून दिली, काहींना वार्षिक अनुदान दिले, जमिनी दिल्या. म्हणजे कोठूनही काही कमी पडू नये असा विचार होता. ह्या वसतीगृहांना आपले काम सतत चालू ठेवता यावे असा दृष्टीकोन होता. वेगवेगळ्या वसतीगृहांचे जे फंड जमा झाले होते ते संस्थानच्या खजिन्यात द. सा. द. शे. ८ व्याजाने ठेवले होते. वसतीगृहांची वाढ करताना जातीधर्मनिरपेक्ष अशी भूमिका महाराजांनी स्वीकारली होती. कोल्हापूर संस्थान व संस्थानाबाहेरही त्यांनी आपल्या मदतीचा हात पुढे केला होता. वसतीगृहांचा विस्तार करताना ज्या विद्यार्थ्यांना पालकाजवळ पैसे नसल्याने शिक्षण घेता आले नसते त्यांची सोय व्हावी, केवळ कोल्हापुरातील विद्यार्थ्यांचे नव्हे तर सबंध संस्थानभर, ज्यांची कोल्हापूरला येऊन शिक्षण घेण्याची खरी कळकळीची इच्छा आहे अशा सर्वांचे कल्याण व्हावे आणि पर्यायाने शिक्षण प्रसाराला मदत व्हावी. शिक्षण अगदी समाजाच्या खालच्या स्थरापर्यंत झिरपावे असा महाराजांचा विचार होता आणि तो सफल झाल्याचे आपल्याला दिसून येते. शेकडो विद्यार्थ्यांनी याचा फायदा घेतला व त्यातूनच काही नामवंत कार्यकर्ते व हुशार बुद्धिमान लोक पुढे आले. आधुनिक काळात ह्या वसतीगृहांचे महत्व ओळखले गेले आहे. पण त्या काळात इतके विचारपूर्वक वसतीगृहाचे जाळे इतरत्र कोठेच इतके विणलेले आढळून येत नाही. १९२० पर्यंत महाराजांच्या छोट्या संस्थानात जवळजवळ अकरा भिन्न जातींसाठी वसतीगृहे स्थापन करण्यात आली होती. आणि त्या काळातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या विधायक कार्याचे यश काही थोडके नव्हते.

## राजाराम कॉलेज–

ह्यापेक्षा थोडे विशाल क्षेत्र की जिथे ही महाराजांची शिक्षणाविषयीची तळमळीने काम करण्याची प्रवृत्ती दिसून येते, ते म्हणजे अगदी सुरवातीपासूनच कोल्हापुरचे भूषण असलेले राजाराम कॉलेज. १८५१ मध्ये एक इंग्रजी शाळा कोल्हापुरात स्थापन झाली. तिची वाढ आणि विकास होता होता तिचे रूपांतर राजाराम कॉलेजमध्ये झाले ही शाळा संस्थानतर्फेच स्थापन करण्यात आली होती. १८६७ मध्ये शाळेचा दर्जा वाढवण्यात आला. ती हायस्कूल म्हणून काम करु लागली. १८८० मध्ये याच शाळेचे रूपांतर राजाराम कॉलेजमध्ये - आर्टस् कॉलेज - करण्यात आले. श्री छत्रपती राजाराम महाराजांच्या हस्ते पायाभरणी समारंभ झाला व इमारत १८७४ मध्ये पूर्ण झाली. सुरवातीला मुंबई विद्यापीठाने फक्त पहिल्या वर्षाकरिता त्याला मान्यता दिली होती. १८८३ मध्ये इंटरच्या परिक्षेकरिता कॉलेजला परवानगी देण्यात आली. ह्या कॉलेजची वाढ आणि त्याचे झालेले रूपांतर हा महाराजांच्या धोरणातील एक महत्वाचा भाग होता. संस्थानातील जहागिरदारांकडून कॉलेजला आर्थिक मदत मिळेल अशी अपेक्षा होती. कारण संस्थानला कॉलेजचा संपूर्ण खर्च झेपणे अवघड होते. सुरवातीला जहागिरदारांकडून कॉलेजला वर्षासने मिळत, पण महाराज अधिकारपदावर आल्यावर जहागिरदारांनी ही मदत बंद केली. जहागिरदारांनी आपली मदत चालू ठेवावी, बंद करू नये असे दरबारने व मुंबई सरकारने वेळोवेळी सुचवले. पण त्यांनी मदत बंद केल्याने कॉलेजच्या खर्चाचा बोजा संस्थानवरच पडला. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाकडेही द्यायचे होते तसे लक्ष देता येईना. त्याच वेळेला धारवाड व सांगली येथेही कॉलेजे उघडण्याची शक्यता दिसू लागली होती. त्यामुळे महाराजांनी १९१९ च्या सुमारास आपल्या मनाशी असा निर्णय घेतला की राजाराम कॉलेज बंद करायचे व त्याच्यावर जो खर्च संस्थानतर्फे केला जातो तो प्राथमिक शिक्षणाकडे वळवायचा व जून १९१८ पासून राजाराम कॉलेज बंद करावे असा त्यांनी हुकूम केला. महाराजांच्या वरील हुकमामुळे दोन अडचणी

निर्माण झाल्या. विद्यापिठाकडून यावर आक्षेप येण्याची शक्यता होती आणि कोल्हापुरात जे वसतीगृहांचे जाळे विणले जात होते त्यालाही धक्का बसण्याची शक्यता होती. त्यानंतर महाराजांनी संयुक्त प्रांतातील आर्य प्रतिनिधी सभा नावाच्या एका आर्यसमाजी संस्थेच्या हवाली कॉलेज देण्याचे ठरविले. राजाराम कॉलेज बरोबरच राजाराम हायस्कूलही आर्यसमाजाकडे देण्यात आले. या दोन्हीसाठी दरबारने प्रतिवर्षी रु. २०,००० देण्याचे ठरविले व बाकीचा खर्च आर्यसमाजाने स्वतः करायचा होता. परंतु नंतर महाराजांनी कॉलेजला देण्यात येणारी मदत वाढवायचे ठरवले. ह्या कॉलेजचे कार्यक्षेत्र विस्तृत व्हावे, प्राध्यापक वर्ग उच्च दर्जाचा असावा यासाठी महाराजांनी खूप प्रयत्न केले. कै. डॉ. बाळकृष्ण यांच्या सारखे प्राचार्य राजाराम कॉलेजला महाराजांमुळेच मिळाले. ह्या कॉलेजात शिक्षण घेणाऱ्या मुलींना महाराजांनी फी माफी दिलेली होती. ती राजाराम महाराजांनी तशीच चालू ठेवली. महाराजांच्या कॉलेज बाबतच्या धोरणावरून आपल्याला असे दिसून येते की महाराजांचे लक्ष सर्व प्रकारच्या शिक्षणाकडे होते. कोणत्याही टप्प्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. अगदी प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत त्यांनी शिक्षण प्रसारासाठी व दर्जा सुधारण्यासाठी अविश्रांत परिश्रम केले व केवळ शिक्षणाची प्रत्यक्ष बाजू बघितली असे नव्हे तर विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवण्याची, कपड्यालत्त्याची सोयसुद्धा शक्यतो वसतीगृहामध्ये केली. त्यांनी केलेल्या ह्या मानवी गुंतवणूकीचे फळ आता आपल्याला दिसून येते.

## इतर उपाय –

आतापर्यंतची जी महाराजांची कामगिरी आपण बघितली ती शिक्षण प्रसाराला प्रत्यक्षपणे कारणीभूत होत होती. पण काही अप्रत्यक्ष उपाय योजनाही त्यांनी लोकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी केली होती. अनेक बक्षिसे, शिष्यवृत्या, नादारी विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. संस्थानाबाहेर ही विविध प्रकारच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पाठवण्यात येत होते. क्वचित, प्रसंगी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशातही पाठवण्यात

झाले होते आपल्या बुद्धिमत्तेला असा आकार व आधार देणारा, तिची कदर करणारा राजा आहे, आपल्याला योग्य तो वाव मिळतो आहे असे दिसताच ह्याचा फायदा शिक्षणासाठी करून घेण्यास तरुण विद्यार्थी वर्ग पुढे न आला तरच नवल ! महाराजांनी विद्यार्थ्यांमधले गुण ओळखून, त्यांचा कल ओळखून त्यांना शिक्षणाला प्रवृत्त केले. विद्यार्थ्यांमधील बुद्धिमत्ता तशीच पडून होती. तिला पुढे आणून पैलू पाडण्याचे रत्नपारख्याचे काम महाराजांनी केले. अशा तऱ्हेची अनेक उदाहरणे आपल्याला महाराजांच्या कारकिर्दीत आढळतात.

२१ मार्च १९०८ ला महाराजांच्या कन्येचा विवाह मोठ्या थाटामाटाने पार पडला. त्या प्रित्यर्थ महाराजांनी आपल्या प्रजेसाठी अनेक चांगल्या गोष्टी केल्या. त्यापैकी अेक म्हणजे कोल्हापूर शहराबाहेरील संस्थानच्या शाळेतील होतकरू मुलींना देण्याकरिता तीन शिष्यवृत्या ठेवल्या. त्या वेळेस त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तिचे करायचे ठरवले. त्या वेळेला ठिकठिकाणी शाळा उघडल्या गेल्या. विद्यार्थी शाळेत यावे, त्यांनी झटून अभ्यास करावा, वरचा क्रमांक मिळवावा यासाठी त्यांनी पहिल्या दोन नंबर पर्यंत विद्यार्थ्यांना पुस्तके बक्षिस देण्याचा नियम केला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेतील व कॉलेजातील फी माफ करून उत्तेजनार्थ शिष्यवृत्या ठेवल्या. हुषार विद्यार्थ्यांसाठी गुणानुसार शिष्यवृत्या ठेवल्या कुमारी कृष्णाबाई केळकर ह्या मुंबईच्या ग्रेट मेडिकल कॉलेजातून अेल. एम्. अॅन्ड अेस्. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्या होत्या. त्याचा खर्च दरबारनेच सोसला होता. उत्तीर्ण झाल्यावर त्यांची नेमणूक ए. ई. हॉस्पीटल मध्ये स्त्री डॉक्टर म्हणून संस्थानातच झाली होती. त्यांना इंग्लंडची शिष्यवृत्ती मिळाली म्हणून त्या महाराजांच्या परवानगीने इंग्लडला गेल्या, तेथील डिप्लोमा मिळविण्यासाठी. दुसरी हकिकत आहे राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्याची. श्री. शंकर बाळाजी ढवळे यांची. ही नोंद आपल्याला १९१२ च्या वार्षिक अहवालावरून समजते. श्री ढवळे यांना आय्. सी. एस्च्या परिक्षेला बसायचे होते. या साठी इंग्लंडला जाण्याकरिता कॉलेजच्या स्टाफने सरदार वर्गाच्या

व राजाराम कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांकडून निधी गोळा केला.महाराजांनी ह्या निधीला रु. २००० ची भरघोस मदत केली होती. एका पदवीधर मराठा विद्यार्थ्याला सॅनिटरी ॲंजिनियरिंगच्या अभ्यासासाठी इंग्लंडला जायचे होते,त्यालाही महाराजांनी ४००० रु.ची मदत केली होती.१९१३-१४ च्या अहवालावरून समजते की, जैन जातीतर्फे दोन विद्यार्थ्यांना इटलीला चित्रकलेच्या पुढील अभ्यासासाठी पाठवण्यात आले. अशा प्रकारे अनेक विद्यार्थ्यांना वैयक्तिक प्रोत्साहन दिलेले आपल्याला आढळून येते.

त्याच प्रमाणे महाराजांची उदार मदत वेगवेगळ्या ग्रंथालयांनाही मिळाल्याचे दिसून येते. फेरिस मेडिकल लायब्ररीला १९१०-११ सालच्या अहवालात रु. २५० दिलेले दिसतात. १९१३-१४ च्या अहवालानुसार लॉ लायब्ररीला ३६६ रु. दिले होते. गरीब विद्यार्थ्यांच्याकरिता एक ग्रंथालय निधी निर्माण केला होता. त्याच्यावरच्या व्याजातून शाळा, कॉलेजातील गरीब विद्यार्थ्याला पुस्तके दिली जात होती. मुंबई, पुणे अशा इतर ठिकाणी विद्यार्थी शिक्षणासाठी पाठवले जात होते. १९१०-११ च्या अहवालात १५ विद्यार्थी असे पाठवल्याची नोंद आहे.एक विद्यार्थिनी पुण्याच्या फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये, एक विद्यार्थी (श्रीपतराव शिंदे) मद्रास आर्टस् स्कूलमध्ये ट्रेनिंगच्या शिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. यासाठी ८४० रु. खर्च करण्यात आले होते. शिवाय वेगवेगळ्या संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यां-करिता ९ मासिक शिष्यवृत्त्या -एकूण १२२ रु. च्या - महाराजांनी दिल्या होत्या. २ विद्यार्थी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये, १ पुण्याच्या मेडिकल स्कूलमध्ये, ३ पुण्याच्या मेन ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकत होते. याची माहिती आपल्याला १९१२-१३ च्या अहवालावरुन मिळते. १९१३-१४ च्या सुमारास राजाराम कॉलेजमध्ये एक शास्त्रीय मेळावा (conversazione) आयोजित करण्यात आला होता. यामध्ये १२१ डेमॉन्स्टेटर्स व ४६४ शास्त्रीय उपकरणे होती.महाराजांनी ५०० रू ची मदत यासाठी दिली होती. राजाराम कॉलेजातील विद्यार्थ्यांना रु. १५० च्या १२ शिष्यवृत्त्या, १ बक्षिस व २ मेडल्स देण्यात आली. राजाराम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना मासिक ७० रु

च्या ११ शिष्यवृत्त्या व कागलला ५ रु. ची महिन्यासाठी एक शिष्यवृत्ती देण्यात आली. कोल्हापूर येथील 'तांत्रिक शाळेसाठी (J. G Technical School) दर महिन्याला १२० रु. च्या ४० शिष्यवृत्त्या ठेवल्या होत्या. याशिवाय दरबारकडून प्रत्येक वर्षी पुण्याच्या डेक्कन असोसिएशनला रु. ४५० पाठवले जात असत.मराठा जातीच्या विद्यार्थ्यांना इंग्लिश शिक्षण घेता यावे यासाठी कोल्हापुरच्या अहिल्यादेवी गर्ल्स हायस्कूलच्या ५ वीच्या परिक्षेत जी पहिली येईल त्या विद्यार्थिनीला ३ रु. महिना शिष्यवृत्ती होती. ज्या विद्यार्थीनीचे ड्रॉइंग सर्वात चांगले होते तिला दरमहा १० रु. देण्यात येणार होते ह्या सर्व मार्गांनी सर्व थराच्या सर्व जातींना महाराजांनी या ना त्या प्रकाराने शिक्षणासाठी उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे लक्ष केवळ विद्यार्थ्यांकडे म्हणते तर शिक्षकांकडेही होते. कारण विद्यार्थी जरी आले तरी चांगले शिक्षक असल्याशिवाय विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळणार कसे ? ह्यासाठी केवळ शिक्षकांवर अटी घालून चालत नाही तर त्यांनाही या व्यवसायात आणण्यासाठी व आल्यावर टिकविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे लागते. यासाठी महाराजांनी शिक्षकांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी अगदी तळच्या शिक्षकांचा पगार ७ रु. वरून ९ रु. पर्यंत वाढविला. अशातऱ्हेने शिक्षणाच्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करुन त्या धोरणाने त्यांनी तो प्रश्न हाताळला होता. शिक्षणाच्या कक्षेत आणखी प्रसार करता यावा म्हणून, बहुजन समाजाच्या अगदी खालच्या स्तरापर्यंत प्राथमिक शिक्षण पोहोचावे म्हणून महाराजांनी ½% शिक्षणकर आकारायचे ठरवले असे १९१८-१९ च्या वार्षिक अहवालावरून समजते. रावबहादुर एस्. जी. डोंगरे यांना कर गोळा करण्याचे अधिकार देण्यात आले होते. रु ३१८७४ कर गोळा व्हावा अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात २२,४६३ रु. गोळा झाले. पुढच्या वर्षी हे अधिकार रावसाहेब टी. एम्. जोशी ह्यांना देण्यात आले. अपेक्षा होती रु. ५६,९८१ ची, कराच्या रूपाने गोळा झाले ३२,०१७ रुपये....

## मानवी दृष्टीकोन –

मानवी गुंतवणुकीत शिक्षणाला, त्यातील धोरणाला व कृतीला अतिशय महत्त्वाचे व प्रथम दर्जाचे स्थान आहे. पण मानवी गुंतवणुकीमध्ये शिक्षणाशिवाय इतरही काही घटकांचा समावेश केला पाहिजे आणि तो म्हणजे महाराजांचा प्रत्येक गोष्टीकडे बघण्याचा मानवी दृष्टीकोन की ज्याचे चांगले आर्थिक परिणाम जाणवत असत.

महाराजांचे जीवनाच्या राहणीसंबंधाचे जे विचार असत ते जर त्या काळच्या व पूर्वीच्या संस्थानिकांच्या चष्म्यातून पाहिले तर अत्यंत विरोधाभासाचे वाटत पण ते तितकेच प्रजेच्या हिताचे वाटत. पूर्वीच्या काही संस्थानिकांची चरित्रे जर वाचली तर असे दिसून येते की त्यांनी फक्त आपल्या सुखोपभोगासाठी पृथ्वीवर दुसरी विलासनगरी उभी केली. स्वत:चे शोक चैन भागविण्यासाठी त्यांनी काहीही करायचे शिल्लक ठेवले नाही. ह्या पार्श्वभूमीवर जर महाराजांचे विचार व कृती जाणून घेतली तर प्रजेचे हित हे त्यांचे अंतिम ध्येय होते असे दिसून येते. महाराजांच्या जवळपास नेहमी वावरणाऱ्या लोकांना असे वाटत असे की त्यांच्या पदरी एक दोन तरी रोल्सरॉईस गाड्या असाव्यात, कोल्हापूरला काही मोक्याच्या ठिकाणी उत्तम प्रेक्षणीय इमारती असाव्यात. त्यामुळे शहराचे सौंदर्य वाढले असते व नेहमी मोठमोठे ब्रिटिश अधिकारी संस्थानला भेट देत असत त्यांच्याकडून प्रशंसाही मिळाली असती. त्या काळात ब्रिटिशांकडून शाबासकी मिळवणे म्हणजे मोठी बिरूदावली मिळवण्याजोगे असे. याबाबत लोक महाराजांना बोलून दाखवत असत. पण महाराज म्हणत की एका रोल्सरॉइसच्या किमतीत ओव्हरलँड किंवा समान किमतीच्या १५–१६ गाड्या खरेदी करता येतात. म्हणजे जास्त लोकांच्या उपयोगी पडण्याची संधी आपल्याला मिळते. इमारत बांधकामाच्या बाबतीत तर त्यांचे विचार जास्त स्पृहणीय वाटतात. उत्तमोत्तम मोठमोठ्या इमारती बांधून ब्रिटिशाकडून शाबासकी मिळविण्याचा मोह त्यांना कधीच झाला नाही. त्याऐवजी

छोटी छोटी अनेक बांधकामे सतत चालू ठेवून कामगार व त्यांच्या कुटुंबियांकडून दुवा मिळविण्यात त्यांना खरा आनंद वाटे. त्याबद्दल त्यांचे मत असे होते.

" वरकरणी दिसणाऱ्या इमारतीच्या सौंदर्यातच मी समाधान मानून बसू की आज कामावर असलेल्या हजारो मजुरांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या मिळणाऱ्या आशिर्वादात आनंद मानू. तुम्हाला खरेच का वाटते, ही इतकी माणसे जेवल्याने मिळणाऱ्या आशिर्वादापेक्षा इमारतीचे सौदर्य साधणे अधिक महत्वाचे आहे?... माझ्या या सर्व इमारती कमी खर्चात होत असल्याने मजुरांना सतत काम देणे मला परवडते."8

महाराजांच्या मुक्कामाची व जेवणाची ठिकाणे कोल्हापुरच्या जवळपास बरीच असत.ज्या दिवशी जिकडे काम असेल किंवा लहर फिरेल तिकडे ते जात असत. पण स्वयंपाक मात्र सर्व ठिकाणी करावा लागे. कारण महाराज कोठे येतात याचा नेम नसे. त्यातच सोनतळीचा समावेश असे. तिथे ९००–१००० माणसे असत. महाराजांबरोबर सगळयांच्या जेवणाची तयारी करावी लागे. कांही लोक त्यावर टीका करीत. महाराज म्हणत-

" सोनतळीस किमान ९०० ते १००० माणसे दररोज जेवतात. हा खर्च फार होत असल्याने माझ्यावर ऑडिटही आहे. पण सोनतळीस चालू असलेल्या कारखान्यातून काम करणाऱ्या नोकर लोकांचे स्वतःचे देखील पोट भरणार नाही इतका थोडा पगार त्यांना आहे मग त्यांच्या बायकापोरांनी उपाशी का रहायचे याचा विचार ऑडिट काढणारे हे टिकाकार कधीच करीत नाहीत...

...माणसांना पाठीवर मारले तर खपते तोफखाने, पोटावर मारून कसे खपेल !"9

प्रजेसंबंधी, कामगारांसंबंधी इतका सखोल विचार मानवी दृष्टीकोनातून करणारा व ते विचार अमलात आणणारा धनी मिळाल्यावर प्रजेचे व कामगारांचे भले न झाले तरच नवल !

## अस्पृश्यांची हजेरी-

ह्याच संदर्भात आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो आणि तो म्हणजे हजेरीच्या बाबतीत. त्यावेळी अस्पृश्य लोकांवर हजेरीचे बंधन होते. ज्या वेळेला मानवी स्वातंत्र्याचे डंके पिटायला सुरवात झाली होती, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांचे रणशिंग फुंकले जात होते त्या वेळेलाच भारतामध्ये अशा प्रकारची गुलामगिरी नांदत होती. अस्पृश्यांची ही हजेरी महाराजांना बंद करावीशी वाटली. कारण हजेरी असल्याने या गरीब लोकांवर गावकामगार व अधिकारी यांचा फारच जुलूम होत असे. गावात मजुरीचा दर होता १२ आणे पण गैरहजेरीचा धाक दाखवून लोक ह्यांच्याकडून फुकट काम करवून घेत असत. अस्पृश्यांना हजेरीसाठी रोज हजर रहावे लागे. त्यावेळच्या परिस्थितीच्या वर्णनावरून असे समजते की, त्यांना जर आजारी असलेल्या नातेवाईकांना, संबंधितांना भेटायचे असेल तर भेटता येत नव्हते. आईबापांना जबरदस्तीने कामाला लावले जात असे. त्यावेळी त्यांची लहान, आजारी मुले असतील तर त्यांच्याकडे दुर्लक्ष होत असे आणि त्याबद्दल तक्रार केल्यास त्यांना गैरहजेरीचा धाकदपटशा दाखवला जात असे. एकदा हजेरी पाठीमागे लागली म्हणजे सुटका नसे गावात काही गुन्हा वगैरे घडल्यास ह्या लोकांवरच वहीम घेतला जात असे आणि मग हजेरी मागे लागलीच ! लोक आपल्याशी वाईट रीतीने वागवतात. मग आपण तरी चांगले का वागा अशी ही प्रवृत्ती त्यांच्या मनात साहजिकच निर्माण होत असे. म्हणून महाराजांनी ही हजेरीची पद्धत बंद केली. एका तऱ्हेने श्रमाची ही पिळवणूकच होत असे. ती महाराजांनी बंद करण्याचा प्रयत्न केला. कोणासही फुकट राबवून घेऊ नये. प्रत्येकाच्या श्रमाचा मोबदला प्रत्येकाला मिळालाच पाहिजे. असा त्यांचा साधा पण न्याय्य विचार होता, आणि त्यांनी तो अमलात आणला. याच प्रकारचा आणखी एक प्रश्न महाराजांनी सोडवण्याचा प्रयत्न केला आणि तो म्हणजे बलुते पद्धती रद्द करण्यासंबंधीचा. पूर्वी महार लोक आपल्या गावातील गुन्ह्याचा तलाश लावीत असत व त्याबद्दल त्यांना काही जमिनीचे तुकडे

देण्यात आलें होते. त्याशिवाय हे महार लोक गावकऱ्यांचे इतरही काही काम करीत असत. जमिनीचे तुकडे लहान असल्याने त्यांच्या उदरभरणासाठी त्या अपुऱ्या पडू लागल्या. त्यामुळे गावकऱ्यांनी त्यांना बलुते देण्याची पद्धती सुरु केली. परंतु ह्याचे काहीच निश्चित प्रमाण ठरलेले नव्हते. संदिग्ध असा हा प्रश्न तसाच लोंबकळत ठेवण्यात आला. यामुळे बलुते देणारे रयत व घेणारे महार यांच्यात सतत तंटे बखेडे निर्माण होत असत. त्यासाठी ही बलुते पद्धती बंद करायचा महाराजांनी हुकूम दिला. फेब्रुवारी १९१८ मध्ये महार सोडून ही बलुते पद्धती बंद करण्यात आली. परंतु २५ जून १९१९ ला असा हुकूम काढला की, महाराकडून सक्तिने काम करुन घेण्याचा अधिकार कोणासही नाही व महारकी वतनाच्या जमिनी इतःपर रयताच्या समजण्यात याव्यात. महार लोकांनी स्वतःच्या इच्छेविरुद्ध इतर कोणाचीही नोकरी करू नये. अशा तऱ्हेने खेडेगावात श्रमिकांची जी पिळवणूक होत होती ती थांबवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## गुन्हेगार जमातीसंबंधी –

महाराजांच्या त्या काळच्या आणखी एका घटनेत महाराजांची आधुनिक विचारसरणी दिसून येते. सर्वसाधारणपणे समाजात सत्प्रवृत्तीने काम करून आपला निर्वाह करणारे जे लोक असतात त्यांच्याबद्दल कोणीही चांगले कार्य करायचा प्रयत्न करील. पण समाजाच्या ज्या गटाकडे सर्व जगाने पाठ फिरविली आहे अशा काही लोकांच्या बाबतीतसुद्धा महाराजांनी आपला दृष्टीकोन विशाल असा ठेवला. त्यांच्या हितासाठीसुद्धा महाराजांनी काही पाऊले उचलली. समाजातील असा गट म्हणजे गुन्हेगार समाज. मध्यप्रदेशातील दरोडेखोरांचे मन व मत परिवर्तन करायचा प्रयत्न हल्ली चाललेला आहे. त्यात काही प्रमाणात यशही आलेले आहे. पण नुसतेच मनःपरिवर्तन करून भागत नसते. त्यांनी तो व्यवसाय सोडल्यानंतर त्यांच्यासाठी दुसरी काहीतरी तरतूद करून द्यावी लागते आणि महाराजांनी अशी तरतूद करण्याचा प्रयत्न केला होता. १९०९–१० चा जो वार्षिक अहवाल आहे त्यामध्ये या संबंधीची हकिकत दिलेली आहे. गुन्हेगार जमातीची २०

कुटुंबे त्यावेळेला संस्थानामध्ये आली होती. स्त्रिया व पुरुष मिळून जवळजवळ १०० माणसे होती. त्यांचा आपल्या कोल्हापुरातील प्रजेला काही त्रास होऊ नये म्हणून महाराजांनी त्यांना कायमच्या वास्तव्यासाठी राधानगरी महालात काही सवलती दिल्या. आणि महाराणी लक्ष्मी तलावावर (राधानगरी) त्यांना नोकरीस लावले. संस्थानच्या खर्चामधून त्यांच्यासाठी कायमच्या राहण्यासाठी २० झोपड्या उभारण्यात आल्या. परंतु पावसाळ्यात त्यांना रोजगार देता येईना. त्यामुळे त्यांच्या खर्चासाठी दरबारमधून पैसे देण्यात आले, कपडे वगैरे स्वरूपातही त्यांना मदत देण्यात आली. ह्या सोयीसवलती त्यांना का देण्यात आल्या तर त्यांनी आपले पूर्वीचे गुन्हेगारीचे जीवन सोडून द्यावे व आता नव्या चांगल्या जीवनाला सुरवात करावी म्हणून. त्यांची गुन्हेगार प्रवृत्ती नष्ट व्हावी व त्यांनी सन्मार्गाला उद्युक्त व्हावे म्हणून. माणसाच्या जर किमान गरजा भागू लागल्या तर माणूस चांगले काम करून पोट भरायला प्रवृत्त होतो. पण जर त्यांच्या किमान गरजाही भागल्या नाहीत तर मात्र तो गुन्हेगारीकडे वळतो. हे लक्षात घेऊन त्यांच्या हितासाठी त्यांनी शांततेच्या मार्गाकडे वळावे यासाठी महाराजांनी हे प्रयत्न केले. चांगल्यासाठी कोणीही काम करील पण अशातऱ्हेचा धाडसी मार्ग गुन्हेगार जमातीसाठी स्वीकारणे हे खरोखरच कौतुकास्पद व आदर्श ठरण्यायोग्य आहे! ह्या कुटुंबाना या सोयी दिल्याने आपलीही काही चांगली सोय होईल, आपल्यालाही काही काम मिळेल अशा आशेने आणखी अशा तऱ्हेची ५० कुटुंबे नंतर कोल्हापूरच्या संस्थानात आली. जशी सोय महाराजांनी गत वर्षीच्या २० कुटुंबाची लावली तशीच ह्या ५० कुटुंबाचीही लावली. राधानगरी धरणावर काम करायला कामगारही मिळाले, त्यांचे जुने वाईट जीवन सोडून ते गुन्हेगार चांगल्या मार्गाकडे वळले याबद्दल महाराजांना निश्चितच त्यांच्या बायकामुलांचा दुवा मिळाला असेल. अशातऱ्हेची विधायक भूमिका सततच महाराजांनी आपल्या धोरणात स्वीकारली. आपल्या मागून येणाऱ्या लोकांना त्यांनी उदाहरण घालून दिले.

## आरोग्य –

मानवी गुंतवणुकीचा विचार करताना आरोग्यावर केला जाणारा खर्च, तद्विषयक उपलब्ध केलेल्या सोयी, दिलेल्या सवलती, व आकारलेले धोरण ह्याचाही विचार करणे आवश्यक आहे. याबाबतीतही महाराजांनी कोणती उणीव ठेवली नव्हती. आरोग्याचे महात्म्य त्यांना किती वाटत होते हे त्यांनी स्वतःसाठी स्वीकारलेल्या जीवनपद्धतीवरून व मिळालेल्या शरीर संपत्तीवरून, निकोप प्रकृतीवरून दिसून येते. प्रजेसाठीसुद्धा हीच विचार-सरणी त्यांनी स्वीकारली होती. संस्थानची भरभराट व्हायची असेल तर प्रजेची मानसिक व शारीरिक शुद्धता आवश्यक आहे. पहिली सोय त्यांनी शिक्षण प्रसाराद्वारे केली, प्रजेचे आरोग्य सुधारण्यासाठीही त्यांनी विविध प्रकारचे प्रयत्न केले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांना दोन साथींशी झगडावे लागले. इन्फ्लूएंझा व प्लेग. इन्फ्लूएंझाची साथ १९१९ च्या सुमारास झाली होती. त्या वेळेला श्री. तोफखान्यांच्या नेतृत्वाखाली इन्फ्लूएंझा स्वयंसेवक मंडळ स्थापन झालेले होते. त्यांना महाराजांनी सर्वतोपरी मदत केली, मोटरसह सर्व सरकारी वाहने आवश्यक असल्यास त्यांच्या दिमतीला देण्याचा महाराजांनी हुकूम केला. ज्या ज्या प्रकारची मदत श्री. तोफखान्यां-कडून मागविली जाईल ती ताबडतोब त्यांना दिली गेली पाहिजे असाही हुकूम महाराजांनी सोडला होता. एवढेच करून महाराज थांबले नाहीत तर राजवाड्यावरून राजकुटुंबाला पुरेसे दूध ठेऊन सरकारी थट्टीतील सर्व दूध साथीतील लोकांच्याकरिता पाठविण्यात आले. महाराजांच्या उदाहरणाने प्रवृत्त होऊन कोल्हापुरातील व्यापारी वर्गानेही साबुदाण्याची व साखरेची पोती या साथीतील लोकांसाठी पाठविली. राजा स्वतः पुढे होऊन मदत करायला आल्यावर प्रजेला स्फूर्ती झाली नाही तरच नवल! कोल्हापूर शहरात केंद्रे उघडली गेली. गरीब व गरजू लोकांना मोफत औषधे वाटण्यात आली. अलबर्ट एडवर्ड हॉस्पिटलला १००० रु. औषध खरेदीसाठी दरबार-तर्फे देण्यात आले. ग्रामीण भागातही तात्पुरते दवाखाने उघडण्यात आले. याशिवाय वैद्यकीय निधीतून यासाठी आणखी रु. २००० खर्च करण्यात

आले. याला म्युनिसिपालिटी आणि प्रजाजनांचे स्वयंस्फूर्त संघटन याची जोड मिळाली. या सर्व संघटित प्रयत्नांमुळे रोगाला बराच आळा बसला.

स्वतःच्या पणजी अहिल्याबाई राणीसाहेब यांच्या स्मरणार्थ महाराजांनी एक देशी दवाखाना १५-१०-१८९६ साली उघडला. हिंदी वैद्यकशास्त्राने जी प्रगती केली होती त्याला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा प्रयत्न होता. तो एका अनुभविक वैद्याच्या ताब्यात देण्यात आला. त्याचप्रमाणे कारकिर्दीच्या अगदी सुरवातीला महारोग्यांचा प्रश्नही त्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडला नरसोबाच्या वाडीजवळ महारोग्यांचे वास्तव्य होते. ते तीर्थक्षेत्र असल्याने तेथे बरेच लोक यात्रेच्या निमित्ताने येत असत. महाराजांचा असा विचार होता की, त्यांच्यासाठी एक स्वतंत्र रुग्णालय स्थापन करायचे. स्त्री व पुरुषांचे स्वतंत्र विभाग ठेवायचे. प्रथम या दवाखान्यात कोल्हापूर शहरातले रोगी घ्यायचे व नंतर इतर विभागातले घ्यायला सुरवात करायची. मांडलिक जहागिरदारांकडून त्यांच्या जहागिरीतील महारोग्यांच्या खर्चाकरिता रक्कम वसूल करायची. कोल्हापुरात मिशन हॉस्पिटल सुरु करण्याच्या दृष्टीनेही महाराजांनी पाऊल उचलले. १९०९-१० च्या अहवालात याचा उल्लेख सापडतो. ५,००० रु. खर्च करून कावळ्याचा बंगला व जुने मिलिटरी हॉस्पिटल दुरुस्त केल्यानंतर महाराजांनी हे बंगले अमेरिकन प्रेस्बिटेरियन चर्चच्या हवाली केले इमारत दुरुस्त करण्यासाठी ५,००० रु. त्यांना दिले. या शिवाय रु.३००० संस्थानची मदत म्हणून देण्यात आले.

## प्लेग –

महाराजांना इन्फ्ल्यूएंझाशिवाय आणखी एका फार मोठ्या साथीशी झगडावे लागले व ती म्हणजे प्लेगची साथ. इन्फ्ल्यूएंझाची साथ १९१८-१९ च्या सुमारास संस्थानात पसरली. म्हणजे कारकिर्दीच्या शेवटी शेवटी. पण प्लेगची साथ जी संस्थानात सुरू झाली ती कारकिर्दीच्या अगदी सुरवातीला. संकटे कधी एकटी येत नाहीत ही म्हण नेहमीच खरी ठरते. महाराजांची

कारकीर्द ह्याला अपवाद नव्हती. प्लेगचे व दुष्काळाचे संकट हातात हात घालून थैमान घालू लागले. अधिकारपदावर आल्यावर तावडतोबच महाराजांना या दोन संकटांना तोंड द्यावे लागले. आणि महाराजांनी लहान वयातच फार मोठ्या धडाडीने व चिकाटीने ह्या दोन्ही नैसर्गिक संकटांशी सामना दिला. ऑक्टोबर १८९६ मध्ये ब्रिटिश भागात प्लेगची लागण झाली. जंतुनाशके वापरून गाव स्वच्छ ठेवण्याचा कोल्हापूर म्युनिसिपालिटिला सक्त आदेश देण्यात आला. गटारे व रस्ते स्वच्छ करण्यात आले. लोकांनी स्वतःहून घरांना आतून बाहेरून चुना लावून घेतला. रेल्वेमधून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी करण्यात येत होती. व शहराच्या प्रमुख प्रवेशद्वारावरही तपासणी ठेवली होती. तपासणी झाल्यावरच शहरात प्रवेश देण्यात येत होता. संस्थानच्या जहागिरदारांनाही सावधगिरी घेण्याची सूचना देण्यात आली. लोकांना रोगाचे स्वरुप, लक्षणे समजाऊन देण्यासाठी आणि सावधगिरि घेण्यासाठी मोफत पत्रके वाटण्यात आली. ही पत्रके पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य श्री. गोळे यांनी काढली होती. महाराजांनी ज्योतिबाची यात्रा बंद केली. रोग संस्थानात पसरू नये म्हणून त्यासंबंधीच्या हिंदुस्थान सरकारच्या १८९७ च्या कायद्यावर आधारित कायदा करण्यात आला. पुण्यामध्ये प्लेग पसरू लागल्यानंतर कडक बंधने अंमलात आणली गेली. शिरोळरोडला २२ फेब्रुवारी १८९७ ला निरीक्षण कॅम्प काढण्यात आला. मुंबई पुण्याकडून यणाऱ्या प्रवाशांना कॅम्पमध्ये तीन दिवस ठेवण्यात येत असे व त्यांची संपूर्ण वैद्यकीय तपासणी केली जात असे. कॅम्पमधील लोकांसाठी अन्नाची सोयही होती व प्रत्येक कॅम्पसाठी खास पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. यासाठी दरबारला बराच खर्च करावा लागला. रेल्वे प्रवाशी कमी झाल्याने नुकसानही सोसावे लागले.

फेब्रुवारी १८९७ मध्ये कोल्हापुरचे दिवाण कुंवर्जी यांची महाराजांकडून प्लेग कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात आली. प्लेगच्या सर्व व्यवस्थेवर त्यांना संपूर्ण नियंत्रण देण्यात आले. पूर्वी शिरोळरोड किणी, कागल, रायबाग, अंबा, बाजीपूर, कटकोळ, मुईवावडा ही कोल्हापूर संस्थानाची प्रवेशद्वारे

होती. प्लेग संस्थानात येऊ नये म्हणून यासर्व प्रवेशद्वारांवर कडक पहारा ठेवणे आवश्यक वाटू लागले. म्हणून ठिकठिकाणी कँप स्थापन करण्यात आले. कँपमध्ये हॉस्पिटल मदतनीस, नर्स, पोलीस पार्टी व इतर नोकर असत, सारे रोगी व संशयित यांना वेगळे ठेवले जाई. वाजवी किमतीला अन्नधान्य व खाद्य पदार्थ मिळत असत. कपडे, ब्लँकेट भांडी इ. दरबारकडून आणवले गेले. सुरवातीला अन्नधान्याचा व खाण्याचा खर्च संस्थानने केला पण नंतर हेच पदार्थ वाजवी किमतीला विकण्यात आले. कँपमध्ये पुरेसा औषधाचा साठाही ठेवलेला असे. कँपमध्ये राहणाऱ्यासाठी ज्या ज्या काही सोई करता येणे शक्य होते तेवढया केल्या होत्या.

सुरवातीला संस्थानच्या पूर्व आणि दक्षिण-पूर्व भागात प्लेग पसरला. प्लेगची लागण १८ खेडयामधून झाली. शिरोळ व गडहिंग्लजमध्ये ह्याचा जोर जास्त होता. प्लेगच्या छायेमध्ये या १८ खेडयातील जवळजवळ ३१,१३१ लोक वावरत होते. ह्या प्लेगच्या संकटाचे निवारण करणे जास्त त्रासदायक होते. कारण आधी सुरवातीला लोकांच्या मनात ज्या भोळ्या व चुकीच्या समजुती होत्या त्या काढून टाकणे आवश्यक होते व त्यानंतर मग प्रत्यक्ष उपाययोजनेचा प्रश्न निर्माण होत होता. प्लेगबद्दल शास्त्रशुद्ध माहिती देणारी पत्रके संस्थानने विकत घेऊन लोकामध्ये वाटली होती. कोल्हापूर शहरातसुध्दा दोनदा प्लेगची लागण नजरेस आली होती. परंतु ताबडतोब उपाय केल्याने मूळच उखडले गेले. संस्थानच्या नोकरांकडून व स्वयंसेवकांकडून लोकांची रोज हजेरी घेण्यात येत असे. शिरोळरोडवर जे क्वारंटाईन होते त्यामध्येच दहा रोगी सापडले. जर ते कोल्हापूर शहरात आले असते तर तेथेही रोगाचा प्रादुर्भाव व फैलाव होऊन हाहाःकार माजला असता. याशिवाय संस्थानातील सगळ्या जत्रा थांबवल्या गेल्या. संस्थानात नवीन बाजार पेठा निर्माण केल्या होत्या. प्लेगाची लागण झालेल्या भागातल्या बाजार पेठात प्रजेने जाऊ नये म्हणून हा प्रतिबंधक-उपाय होता. पण तरीही काही माणसे अशी होती की त्यांना या रोगाची संसर्गजन्यता व तिचे वाईट परिणाम माहीत नव्हते किंवा ते प्रेमाने आंधळे झाले

होते. त्यांचे काही नातेवाईक, निकटवर्ती स्नेही जेव्हा रोगाने आजारी पडले तेव्हा त्यांना भेटण्यासाठी, शेवटची नजर भेट होण्यासाठी किंवा धान्य विकण्यासाठी म्हणून ज्या भागात रोग पसरला आहे त्या भागात ते लपून छपून जात असत. अशा लोकांना शोधून काढण्यासाठी ५ ते १५ रु. बक्षिस जाहीर केले होते. खेडेगावातील अधिकाऱ्यांना अशी सक्त ताकीद दिली होती की जर त्यांना दिलेले हुकूम पाळले गेले नाहीत व अमलात आणले गेले नाहीत तर त्यांचे उत्पन्न बंद करण्यात येईल. आणि अशा तऱ्हेची १-२ उदाहरणेही घडली, काहींना तात्पुरते कामावरून दूर करण्यात आले, इतरांनी त्यापासून धडा घेतला. आणखीही काही उपाय योजना दरबारने केल्या. घराघरामधून हवा जास्त खेळती ठेवण्यात आली. खेडेगावातील लोकांच्या घरावर पहारा ठेवण्यासाठी जास्त लोकांना कामावर घेण्यात आले. गरिबांना साहित्य मोफत पुरवण्यात आले व इतरांना त्याची विक्री करण्यात आली. पोष्टमनना-सुद्धा रोगग्रस्त भागात जाऊ दिले नव्हते. कारण त्यांच्यामुळे सुद्धा गावागावातून रोगाचा फैलाव झाला असता, खेडेगावातील लोकांनीच पोष्टमन-कडून पत्रे घेऊन त्यांचा बटवडा केला. लोकांचे टोचून घेण्याचे प्रमाण मात्र अगदी कमी होते. त्याच वेळेला कोल्हापुरात एक डेपो स्थापन करण्यात आला. त्यामध्ये तात्पुरत्या झोपड्या उभारण्याचे साहित्य मिळत असे. जंगल खात्याकडे साहित्य मिळविण्याचे काम देण्यात आले होते. हे साहित्य काही लोकांना मोफत देण्यात आले व इतरांना वाजवी किमतीला पुरवण्यात आले. सुरवातीला लोकांचा संस्थानने जे उपाय केले होते त्याला योग्य प्रतिसाद मिळाला नाही. थोडेसे विरोधी स्वरुपाचेच वातावरण होते. जंतुनाशकाबद्दल लोकांना असे वाटले की यामुळे आपल्याला मृत्यू येईल. जेव्हा लोकांना कळले की प्लेग संसर्गजन्य आहे आणि स्थलांतर केले तरच सुटका आहे, तेव्हा लोकांनी इतक्या घाईघाईने घरे सोडली की त्यांनी आपले कपडे व इतर साहित्याबरोबर जंतूही वाहून नेले. त्यामुळे मुळातला हेतू साध्य झालाच नाही. प्लेग अधिकाऱ्यांना स्वतः हे सर्व करवून दाखवावे लागे आणि मग गांवकऱ्यावर चांगला

परिणाम होई. लोकांचा सुरवातीला स्थलांतरावरही विश्वास नसे,त्यांना पटल्यानंतर मात्र स्थलांतराला स्वखुषीने तयार झाले. दबावाची गरज भासेनाशी झाली. ज्यांनी घरे सोडली त्यांची घरे व मालमत्ता याबाबत संस्थानने योग्य व चांगली काळजी घेतली. रात्री घरावर पहारा असे. कँपमध्ये किंवा खेडयात दरोडे, चोऱ्या घडल्या नाहीत, प्लेगचे स्वरूप, त्याच्यामुळे होणारा धुमाकूळ, कमीत कमी परिणाम कसा घडेल हे समजावून घेण्यासाठी शाळा मास्तरांची मदत घेण्यात आली. नंतर लोकांनीही उत्तम सहकार्य दिले. काही वेळेला रोग्यांना दवाखान्यात हालवताना लोकांचा विरोध जास्तच होत असे. लोक रोग्यांना लपवून ठेवत असत. एक तर उदाहरण असे घडले की, जेव्हा रोग्याला दवाखान्यात नेण्यात येत होते तेव्हा जमाव जमा झाला. दवाखान्याच्या झोपडयांना आग लावण्यात आली आणि जमावाने रोग्याला ताब्यात घेतले. पोलीसांनी येऊन जमाव आटोक्यात आणला. महाराज आल्यावर गर्दी हटली व रोग्याला दवाखान्याच्या ताब्यात देण्यात आले. महाराजांनी येऊन समयोचितपणा दाखवला नसता तर प्रकरण आटोक्याबाहेर गेले असते. १८९९-१९०० च्या सुमारास एकूण ५,६०४ केसीस प्लेगच्या होत्या आणि प्लेगमुळे ४,५०७ मृत्यू झाले होते. १०१३ लोकांनी एकदा व ३४१ लोकांनी दोनदा टोचून घेतले होते. यावर रु. ४८,७६८ खर्च झाले होते. १९१०-११ च्या पावसाळयात प्लेगचा जेव्हा शेवटचा टप्पा होता त्यावेळेला महाराजांनी लोकांना टोचून घ्यायला उद्युक्त केले. संस्थानच्या नोकरांना टोचून घेण्यासाठी तीन दिवसांची खास रजा देण्यात आली. श्रमाचे काम करणाऱ्या कामगारांना प्रत्येकी ८ आण्याचे बक्षिस देण्यात आले. त्यांच्या कुटुंबियांनाही अशातऱ्हेचे बक्षिस द्यायचे ठरले. जे संस्थानचे नोकर नव्हते त्यांना टोचून घेण्याबद्दल प्रत्येकी ४ आण्याचे बक्षिस देण्यात आले. इतरांना प्रोत्साहन देण्यासाठी घरातल्या सर्व नोकरांसकट महाराजांनी स्वतः टोचून घेतले.

या सर्व कामगिरीमध्ये दरबार सर्जन सिक्लेअर व त्यांचे मदतनीस डॉ. व्ही. जी. आपटे, रावसाहेब बी. व्ही. जाधव, के. ए. गायकवाड, राव-

साहेब गोळवलकर, रावसाहेब तावे, रावसाहेब विचारे, कोल्हापूर म्युनिसिपालिटीचे आरोग्याधिकारी डॉ. टेंगशे व प्रमुख पोलीस अधिकारी रावसाहेब वेंडारकर यांची महाराजांना फार महत्वपूर्ण मदत झाली. प्लेग सुरु होण्याआधी व सुरु झाल्यानंतर महाराजांनी जे प्रतिबंधक व विधायक उपाय योजले त्यामुळे कोल्हापूर संस्थानात प्लेग फारसा थैमान घालू शकला नाही. त्या वेळी ब्रिटिश भागात, विशेषत: पुणे व नाशिक जिल्ह्यात प्लेगने प्रचंड धुमाकूळ माजवला होता. त्याभागात गोऱ्या शिपायांनी हिंदी लोकांवर अनन्वित अत्याचार प्लेगच्या नावाखाली केले होते. त्यामुळे लोकांच्या मनात सर्वंच प्रकाराबद्दल कटुता निर्माण झाली होती. लोकांनी एक प्रकारची दहशत घेतली होती. हे सर्व प्रकार कोल्हापूर संस्थानात झाले नाहीत. याचे कारण ब्रिटिश सरकारवर विसंबून न राहता महाराजांनी प्लेगचे संकट निवारण्यासाठी स्वत: जातीने लक्ष घालून उपाय योजना केली. सर्वच प्रकारचे उपाय एकाचवेळी योजून प्लेगच्या संकटावर महाराजांनी चौफेर हल्ला चढवला व ही साथ आटोक्यात आणली.

वर विवेचन केलेल्या प्रमुख कार्याबरोबरच महाराजांनी इतर स्वरुपाचेही काही उपाय लोकांना मिळणारी वैद्यकीय मदत सुधारण्यासाठी केले. दरबारकडून प्रत्येक वर्षी वैद्यकीय खर्च करण्यात येत होता. याबद्दलची आकडेवारी 'सार्वजनिक आयव्यय' ह्या प्रकरणात येणारच आहे १९०९-१० ह्या वर्षामध्ये वैद्यकीय विषयावर काही व्याख्याने आयोजित करण्यात आली. या वेळी डॉ. खेडकर व डॉ. टेंगशे या दोघांनीही यात भाग घेतला होता. याच वेळेला मिशन हॉस्पिटलही सुरु करण्यात आले होते. त्याची वाढ करण्यामध्ये महाराजांचा बराच मोठा वाटा होता. 'व्हिक्टोरिया डायमंड ज्युबिली लेपर असायलम' स्थापन करण्यात आले होते. संस्थानातील महारोग्यांची स्वतंत्र व्यवस्था यामध्ये केली होती. ते यावेळी उचगाव येथील जुन्या इमारतीतून कोल्हापूरपासून ३५ मैलावर असलेल्या अणुस्कुरा घाटाजवळ हलविण्यात आले. त्यामध्ये कोल्हापूर शहरातील लोकांना संसर्ग पोहचू नये हाच हेतू होता. त्याचप्रमाणे शाहुपुरी, सदरबझार, पन्हाळा व गारगोटी येथे

दरबारच्या खर्चाने आरोग्य विषयक सवलती उपलब्ध करण्यात आल्या. या साठी रू. ३,९९६ खर्च करण्यात आले. १९१२-१३ च्या सुमारास मिशन हॉस्पिटल मध्ये अद्यावत ऑपरेशन रूम उघडण्यात आली. यासाठी रू. ६,९७३-१२ आणे खर्च झाले. याचवेळी स्त्रियांच्या वॉर्डसाठी दरबारने रु. ३००० दिले व त्याचे नाव पाचवे किंग जॉर्ज कॉरोनेशन वॉर्ड ठेवण्यात आले आणि हॉस्पिटलला रु. ५००० देणगी देण्यात आली. १९१८-१९ सुमारास दरबार सर्जनच्या देखरेखीखाली सर क्लॉड हिल आरोग्य भुवनाची बांधणी सुरू झाली.

## मनोरंजन–

मानवी गुंतवणुकीच्या तिसऱ्या भागाकडे म्हणजेच मनोरंजनाकडेही महाराजांनी लक्ष पुरविले. युरोपियन खेळावर अवलंबून न राहता देशी खेळांची आवड त्यांनी लोकांमध्ये निर्माण केली. शिकार व कुस्ती हे महाराजांच्या—खास आवडीचे खेळ. या दोन्ही खेळांना त्यांनी राजाश्रय दिला. कुस्ती खेळ खरोखरच सर्व समाजाचा होता. गरिबातल्या गरिबांनाही हे खेळ परवडण्याजोगे होते. कुस्त्यासाठी आखाडे बांधून घेतले. साठमारी बांधून घेतली, पैलवानांना प्रोत्साहन दिले, चित्रकला, नाटयकला व संगीत कला यांना प्रोत्साहन दिले. यावरुन आपल्याला असे म्हणता येईल की प्रजेचा शारीरिक व मानसिक विकास होण्यासाठी महाराजांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मानवी गुंतवणुकीचा पहिला विभाग म्हणजे शिक्षण. ह्या बाबतीत सक्ती व प्रबोधन हे दोन्हीही मार्ग त्यांनी अनुसरले. महाराजांनी ओळखले होते की सक्ती करून लोकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होणार नाही. त्यासाठी लोकांमध्ये शिक्षणाची उत्सुकता, आवश्यकता व आवड निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी त्यांनी विविध प्रकारचे प्रोत्साहन, उत्तेजन दिले. परंतु याचबरोबर सक्तीची आवश्यकता होती. म्हणून मोफत व सक्तीचा प्राथमिक शिक्षणावरचा कायदाही त्यांनी पास केला. लोकजागृति झाल्याशिवाय बहुजन समाजाचा विकास होणार नाही हे त्यांनी जाणले होते. ह्या लोकजागृतीसाठी सर्व प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता होती. त्या दृष्टीने महाराजांनी रचनात्मक पावले

उचलली. शिक्षणाबरोबरच आरोग्याकडेही महाराजांनी दुर्लक्ष केले नाही. साथींना तोंड देण्यासाठी प्रतिबंधक उपाय व प्रजेचे आरोग्य सुधारण्यासाठी विधायक उपाय त्यांनी योजिले. अशा तऱ्हेने आपल्या प्रजेच्या आर्थिक उत्कर्षासाठी भांडवली गुंतवणुकीबरोबरच महाराजांनी जी मानवी गुंतवणूक केली ती आधुनिक अर्थशास्त्राच्या कसोटीनुसार अत्यंत मोलाची ठरते.

खाली दिलेल्या शैक्षणिक देणगी निधी, त्यावरील दरबारने दिलेले व्याज, व दरबारच्या ताब्यात असलेल्या निरनिराळ्या निधीवरून महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आवाका सहज समजून येईल.

तक्ता नं. १

## दरबारच्या ताब्यात असलेले शैक्षणिक देणगी-निधी

| क्र. | निधीचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | आल्फरेड स्कॉलरशिप | ५२,००० |
| २ | भिकाजीपंत गोखले स्कॉलरशिप | १,५०० |
| ३ | जयसिंगराव घाटगे स्कॉलर शिप (श्री. टी. एम. मराठेकडून) | १,५०० |
| ४ | वॉलर प्राईज आणि मेडल | ९०० |
| ५ | कृष्णाजी बचाजी सोवनी प्राईज | १,५०० |
| ६ | राजाराम स्कॉलरशिप | २१,००० |
| ७ | छत्रे मेमोरियल प्राईज | ५०० |
| ८ | जयसिंगराव घाटगे स्कॉलरशिप | १,५०० |
| ९ | फर्ग्युसन स्कॉलरशिप | २०,००० |
| १० | जयसिंगराव घाटगे टेक्निकलस्कूल फंड | २६,९०० |
| ११ | मिसेस् पार फंड | ३०० |
| १२ | जहागिरदार स्कूल फंड | १८,५०० |
| १३ | घोरपडे फेलोशिप आणि लेक्चररशिप | १५,००० |
| १४ | राधाबाई घाटगे प्राईज फंड | ५०० |
| | एकूण – | १,६१,६०० |

( आधार – १९१७–१८ चा वार्षिक अहवाल )

## तक्ता नं. २

## शैक्षणिक देणगी निधीवरील दरबारने दिलेले व्याज

| | |
|---|---|
| १९००–०१ | ,१२५ |
| १९०१–०२ | ,१८३ |
| १९०२–०३ | ,८१६ |
| १९०३–०४ | ,१५१ |
| १९०४–०५ | ,४८६ |
| १९०५–०६ | ७७ |
| १९०६–०७ | ,६७७ |
| १९०७–०८ | ,८६४ |
| १९०८–०९ | * |
| १९०९–१० | ,४८१ |
| १९१० ११ | ,८२३ |
| १९११–१२ | ,९७४ |
| १९१२–१३ | ,०८६ |
| १९१३–१४ | ३,७९५ |
| १९१४–१५ | ७,४२० |
| १९१५–१६ | ,०१७ |
| १९१६–१७ | ,८८४ |
| १९१७–१८ | ७,८६१ |
| १९१८–१९ | २,७९६ |
| १९१९–२० | ,२६८ |
| १९२०–२१ | ७ |
| १९२१–२२ | २१ |

* आकडा उपलब्ध नाही

( आधार – १९०० ते २२ चे वार्षिक अहवाल )

तक्ता नं. ३

## दरबारच्या ताब्यात असलेले इतर निधी

| क्र. | निधीचे नांव | दरबारने दिलेला व्या. दर (टक्के) | ठेवीची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | व्हिक्टोरिया मेमोरियल फंड | ४ | ४६,०२४ |
| २ | मराठा एज्युकेशन सोसायटी फंड | ८ | ११,००० |
| ३ | विठ्ठल सदाशिव देसाई फंड | ४ | १०,००० |
| ४ | एस्. एम्. जैन फंड | ८ | १०,००० |
| ५ | वीरशैव लिंगायत फंड | ८ | ३,१५१ |
| ६ | श्री केदारलिंग फंड | ४ | ५,००० |
| ७ | महाराजा ऑफ भावनगर फंड | ४ | ३,००० |
| ८ | सौ. रमाबाई शिरगांवकर फंड | ६ | ५०० |
| ९ | मोहॅमिडन् फंड | ८ | २,१०० |
| १० | रावसाहेब रघुनाथ आर. शिरगांवकर फंड | ६·५ | २०० |
| ११ | कै. प्रल्हाद नारायण भोग | ६ | २०,५०० |
| १२ | पुअर बॉइज् लायब्ररी फंड | ८ | १,५०० |
| १३ | लक्ष्मण, शिवराम, अक्काबाई-वडील विठ्ठलराव देसाई फंड | ६ | १०,००० |
| १४ | किंग एडवर्ड मेमोरियल फंड | ६ | ३४,७४९ |
| १५ | म्युनिसिपल फंड | ४·५ | ६५,००० |
| १६ | प्रभु बोर्डिंग इन्स्टिटयूट फंड | ८ | १,८९० |
| १७ | अहमद अल्ली पोलोमास्टर | ६ | ५०० |
| १८ | आर्. आर् शिरगांवकर फंड | ६ | २०० |
| १९ | खंडेराव गोपाल बागल फंड | ६ | ४१७ |
| २० | श्री युवराज स्वागत फंड | ८ | ६,१०० |
| २१ | श्री युवराज मराठा हुजरे फंड | ८ | २,२०० |
| २२ | श्री युवराज मराठा शिलेदार फंड | ८ | १,००० |
| २३ | सौ. कमलाबाई खंडेराव बागल फंड | ५ | १०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | सौ. जानकीबाई सबनीस फंड | ८ | ५७५ |
| २५ | पांचाल बोर्डिंग इन्स्टिटयूट फंड | ८ | २,५०० |
| २६ | प्रिन्स शिवाजी फ्री मराठा बोर्डिंग फंड | ९ | ७,००० |
| २७ | रोहीदास बोर्डिंग फंड | ८ | १,००० |
| | | | एकूण – २,४६,२०६ |

( आधार – १९२०–२१ चा वार्षिक अहवाल )

## संदर्भ


1. Asian Drama - An Inquiry into the Poverty of Nations'
- Vol. III Gunnar Myrdal 1543

2. " राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे "
सं. भगवानराव जाधव २

3. " राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग "
वा. द. तोफखाने १३२

4. " श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र "
आ. बा. लठ्ठे ३९८

5. " श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र "
आ. बा. लठ्ठे ३९६

6. " श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र "
आ. बा. लठ्ठे ३९८

7. " श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र "
आ. बा. लठ्ठे १३९, १४०

8. " राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग "
वा. द तोफखाने - ११५

9. " राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग "
वा. द. तोफखाने ११५


★ ★

# दुष्काळ

" ऋणरोगादिदारिद्र्य पापक्षुदपमृत्यवः ।
भयशोकमनस्तापा नश्यन्तु मम सर्वदा ।।

—ऋग्वेद

अवर्षण, दुष्काळ, दैन्य, दारिद्र्य या गोष्टी आपल्या देशामध्ये फार पुरातन काळापासून आलेल्या आहेत. निसर्ग तर इथे इतका लहरी आहे की चुकूनच पाऊस जसा पाहिजे तसा, जितका पाहिजे तितका व जिथे हवा आहे तसा पडलेला आपल्याला दिसेल. अतिवृष्टी अगर अनावृष्टी याच गोष्टी आपल्याला जास्त परिचित आहेत. ऋग्वेदामध्ये निरनिराळ्या देवदेवतांना पाऊस वेळेवर व भरपूर पडावा अशा प्रार्थना केलेल्या आपल्याला आढळतात. रामायणामध्ये, जातक कथेमध्ये चाणक्याच्या अर्थशास्त्रात सुद्धा अशा तऱ्हेचे संदर्भ आपल्याला मिळतात.

पूर्वी दुष्काळाचा अर्थ ठराविक चौकटीतून केला जात असे. नेहमीच्या खाण्यात येणाऱ्या अन्नधान्याच्या पुरवठ्यात जेव्हा तीव्र तुटवडा येतो व त्यामुळे एखाद्या प्रदेशातील जनता जेव्हा भुकेने तळमळते तेव्हा त्या स्थितीस दुष्काळ म्हणतात.

' ... a state of extreme hunger suffered by the population of a region as a result of the failure of the accustomed food supply' - Southard - " Famines " Encyclopaedia of Social Sciences Volume VI P-85. )

आधुनिक काळात दुष्काळाकडे पहाण्याचा दृष्टीकोन निराळा आहे. उद्योगधंदे, व्यापार व विशेषत: वाहतुकीमध्ये झालेल्या सुधारणामुळे अन्नधान्याच्या पुरवण्यात तीव्र तुटवडा येणे व त्यामुळे दुष्काळ होणे यापेक्षा अन्नधान्याच्या किमती प्रचंड वाढणे व त्यामुळे गरीब माणसाला त्याच्या अपुऱ्या उत्पन्नात त्या त्याला विकत न घेता येणे व त्यामुळे उपासमार होणे असा अर्थ हल्ली आपण दुष्काळास लावतो. दुष्काळात आधुनिक व्याख्येनुसार अन्नधान्य बाजारात भरपूर उपलब्ध असूही शकेल पण त्याच्या किमती इतक्या वाढलेल्या असतील की त्या गरीब माणसाला परवडणाऱ्या नसतील.

वरील दोन्ही दृष्टीकोनातून दुष्काळाकडे पाहिल्यास आपल्याला असे दिसून येईल की अगदी आधुनिक काळात १९ व्या शतकापासून फार मोठ्या प्रमाणावर भारतात सर्व ठिकाणी दुष्काळाची छाया पडलेली होती. १८६० ते विसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत काही मोजकी वर्षे सोडल्यास भारताचा आर्थिक इतिहास आपल्याला दुष्काळाच्या, दारिद्र्याच्याच कथा सांगतो. छत्रपती शाहू महाराजांचा जन्म १८७४ सालचा. १८९४ मध्ये वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी कोल्हापूर संस्थानचा कारभार पहावयास सुरवात केली. त्या काळी सामाजिक, राजकीय परिस्थिती अनुकूल नव्हतीच पण आर्थिक परिस्थिती तर फारच प्रतिकूल होती. कारभारात नुकतेच कुठे लक्ष घालण्यास महाराजांनी सुरवात केली होती तोच संस्थानावर दुष्काळाची गडद छाया पसरली! १८९६ मध्ये फार मोठ्या प्रमाणावर कोल्हापूर संस्थानवर अवर्षण व दुष्काळ यांचा अंमल सुरू झाला. बावीस वर्षाच्या छत्रपती शाहू महाराजांनी ज्या पद्धतीने दुष्काळाशी झुंज दिली ती पाहिली म्हणजे खरोखर आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही!

दुष्काळाची वार्ता आल्याबरोबर महाराजांनी प्रथमतः काय केले तर प्रत्यक्ष संस्थानची, रयतेची पाहणी व विचारपूस. नोव्हेंबर १८९६ मध्ये महाराजांनी गडहिंग्लज, रायबाग, कटकोळ या भागांना भेटी दिल्या. या प्रदेशात अखेरचा पाऊस न झाल्याने लोकांची स्थिती बरीच हलाखीची झालेली होती. प्रत्यक्ष शेतावर जाऊन घोड्यावरून, प्रसंगी पायीसुद्धा जाऊन महाराजांनी लोकांची दुःखे जाणून घेतली. पिकांचे किती नुकसान झाले आहे, कशा तऱ्हेची त्यांना मदत केली पाहिजे हा हेतू मनात ठेवूनच ते दुष्काळी दौऱ्यावर निघाले होते. दुष्काळात लोकांचे संकटाला तोंड देण्याचे मनोधैर्य मोठे असावे, संकटाचा गैर फायदा घेणाऱ्यांना वचक बसावा, हा सुद्धा हेतू दौऱ्यापाठीमागे होता. कर्नल रे यांना लिहिलेल्या पत्रावरून असे समजते की महाराजांचे लोकांना दुष्काळात पुरेसा रोजगार मिळतो की नाही याकडे फार लक्ष होते. अन्नधान्याच्या किंमती वाढत होत्या त्या कोणत्या उपायांनी खाली आणता येतील हा महत्त्वाचा प्रश्न महाराजांच्या पुढे होता. खेड्यात तर परिस्थिती फारच बिकट होती. शेतमजुरांची तर फारच हलाखीची परिस्थिती होती. दुष्काळ अवर्षणाचा सर्वच अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. पण त्यातल्या त्यात शेतमजुरावर[1] आकाशातून कुऱ्हाड कोसळल्या सारखे होते. कोल्हापूर संस्थानात सुद्धा दुष्काळाचा जोर खेड्यात जास्त होता. संस्थानातील शेतमजुरावर दुष्काळाचा परिणाम विशेष करून होता. शिवाय शेतमजूर बहुतांशी मागासलेल्या वर्गाचे होते. महाराजांनी केलेला संस्थानातला दौरा, जवळून पाहिलेली लोकांची गरीबी, प्यायच्या पाण्याचीही सोय नसलेली स्थिती, अज्ञान, शिक्षणाचा अभाव, उच्च वर्गीयांच्या कडून होत असलेली आर्थिक व सामाजिक पिळवणूक, शेतीतला मागासलेपणा, धड रस्तेही नसलेली खेडी, जिराईत शेती, अशा सगळ्या गोष्टींचा महाराजांच्या मनावर फार खोलवर असा परिणाम झाला. आपल्या प्रजेचे कल्याण व्हावे म्हणून त्यांनी सर्व मार्गांनी आर्थिक व नैसर्गिक संकटांना तोंड द्यायचे ठरविले. १९०२ मध्ये महाराज इंग्लंडला गेले होते. तेथील औद्योगिक प्रगती त्यांनी स्वतः पाहिली. तेथील नद्यावरची धरणे, कालव्यातून शेतीला घेतलेले पाणी, शास्त्रीयपद्धतीने केलेली शेती, व्यापारामध्ये मारलेली त्यांची भरारी या सगळ्या गोष्टी

त्यांनी अगदी जवळून पाहिल्या व अभ्यासिल्या. माझ्या संस्थानात, माझ्या देशात असे कां नाही हा विचार त्यांच्या मनात घर करून राहिला व त्याचेच रूपांतर त्यांच्या सर्वव्यापी कृतीत दिसून येते.

दुष्काळाशी झुंज देण्यासाठी महाराजांनी अनेक उपाय योजना अंमलात आणल्या. प्रशासकीय, कमी मुदतीच्या व तावडतोब मदतीच्या दीर्घ मुदतीच्या क्रांतीकारक, नैतिक या त्या योजना होत.

## ( अ ) प्रशासकीय उपाय योजना -

दुष्काळाच्या वार्ता आल्या बरोबर महाराजांनी आपल्या सर्व महसूल अधिकाऱ्यांना प्रत्यक्षपणे दुष्काळाची स्थिती पाहण्याचा व त्या प्रमाणे ठिकठिकाणची माहिती दरबारला देण्याचा हुकूम सोडला. लोकांची सर्व-साधारण परिस्थिती कशी आहे, जनावरांची स्थिती कशी आहे, पाण्याचा पुरवठा किती आहे व कितपत पुरणारा आहे, कडबा, गवत याची स्थिती कशी आहे या संबंधी माहिती स्वतः महसूल अधिकाऱ्यानी मिळवायची व तावडतोब कोल्हापुरला कळवायची असा तो आदेश होता.दुष्काळ अधिकारी म्हणून स्वतःच्या दिवणांची त्यांनी नेमणूक केली. १८७७ च्या मोठ्या प्रमाणावरच्या दुष्काळामध्यें त्यांनी यशस्वी काम केल्याने या दिवाणांचा पुरेसा अनुभव होता. ज्योतिबाची यात्रा नेहमी प्रमाणे या वर्षी करू नये असाही हुकूम सुटला. चिंचलीची जत्रा न भरविण्याचा हुकूम सुटला. दुष्काळा बरोबरच प्लेगने धुमाकूळ घालावयास सुरवात केली त्यामुळे लोकांच्या दुःखात भर पडू लागली व महाराजाची चिंता वाढू लागली. भुधरगड पेटा व पन्हाळा पेटा या भागात स्वतः महाराजांनी जानेवारी ते मार्च १८९७ दरम्यान फेरफटका केला लोकांच्या पीकपाण्याची चौकशी केली व अर्धपोटी जनतेवर गरीब माणसांच्या दुःखावर फुंकर घातली व त्यांचा परिणाम इतका चांगला झाला की दाजीपूरहून महाराज गेल्यावर जवळपासच्या खेड्यातल्या लोकांनी आपसूकपणे आपापल्या देवदेवतांना महाराजांना भरपूर आयुष्य

मिळावे म्हणून शपथा व प्रार्थना केल्या.[2] १९०० साली पडलेल्या दुष्काळांत सुद्धा महाराजांनी फारच चोख व्यवस्था ठेवली होती. त्या वेळचे पोलिटिकल एजंट जॅक्सन यांनी प्रशंसोद्‌गार काढले ते म्हणतात " डोंगरी लोकांसंबंधीचे आपले तर्क खरे आहेत यात शंका नाही. चाऱ्याची निर्यात खुली राखण्या-बद्दलचा आपला प्रत्येक शब्द मला मान्य आहे. रस्त्यात कटकोळ येथील मामलेदाराची मला गाठ पडली. त्यांच्या सांगण्यावरून चालू साली या तालु-क्यातील लोकांची स्थिती इतकी वाईट नाही. तोरगळ येथे अशाच प्रकारची हकीगत मी ऐकली आपल्याला संस्थानात दुष्काळ कामाची तरतूद करण्याकडे आपण प्रत्यक्ष जे लक्ष पुरवित आहा, त्या बद्दल व आपले प्रयत्न जे यशस्वी झाले आहेत त्याबद्दल मी आपलें अभिनंदन करणे अत्यंत जरूर आहे." [3]

दुसऱ्या एका पत्रात ते म्हणतात "सोबत ठेवलेला दुष्काळ व प्लेग या संबंधी रिपोर्ट व नकाशा पाहण्यासाठी मला पाठविला याबद्दल मी आपला फार आभारी आहे. त्या वरून आपली व्यवस्था अत्यंत चोख आहे असे दिसून येते. १८९६ ते ९७ च्या दरम्यान स्वस्तधान्याचे दुकान कसे चालले आहे या संबंधीचा प्रांताधिकाऱ्यांचा अभिप्राय विशेष मनोरंजक आहे कारण दुष्काळाच्या दिवसांत सरकारने धान्याचा व्यापार केला, तर त्या पासून हितापेक्षा अनहितच जास्त होते हे तत्व त्यांच्या मनावर पूर्णपणे बिनले आहे असे दिसून येते. हे तत्व आता सर्वमान्य झाले आहे. परंतु साठवर्षांपूर्वी जनरल स्टीमनने असाच अनुभव स्पष्टपणे लिहून ठेवला असूनही कित्येकवर्षे त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते."[4]

महाराजांनी कधीही पुस्तकी सिद्धांतावर व दरबारातील लोकांच्या सांगण्यावर संपूर्ण विश्वास ठेवला नाही. प्रत्यक्ष पाहणी करणे व तेथील परिस्थिती जाणून अभ्यासून तिथल्या तिथें नवीन योजना आखणे व निर्णय घेणे हा महाराजांचा अत्यंत आवडता मार्ग. दुष्काळ मदतकेंद्रांना अचानक भेटी देऊन कामाची प्रगती पाहणे हा त्यांचा नित्याचा क्रमच. महाराज प्रत्यक्ष केव्हा येतील याची काहीच आगाऊ सूचना नसल्याने हाताखालील माणसे नेहमी तत्पर असत. १८९९–१९०० या काळात वर

महाराजांनी दरबारतर्फे ' दुष्काळ विभाग ' निर्माण केला. दुष्काळ आयुक्त म्हणून दिवाण सारख्या अत्यंत मोठ्या हुद्यावरच्या माणसाची नेमणूक महाराजांनी केली. हेतू हाच होताकी, दुष्काळाची छाया गरीब लोकांवर पडता कामा नये. शिवाय युद्धपातळीवर महाराजांना ही, समस्या सोडवायाची होती हेही दिसून येईल.

पन्हाळा पेटयात १८९७ मध्ये फार मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला होता. पन्हाळा पेटा गांव संख्येच्या मानाने मोठा. या पेटयात मोठा दुष्काळ पडला म्हणून महाराजांचा मुक्काम पन्हाळयास होता. दुष्काळ निवारण्याची योजना महाराजांनी तिथल्या तिथे राहून तयार केली व तिची अंमलबजावणी प्रत्यक्ष केल्याची पाहणी केली. प्रशासकीय दृष्टीकोनातून या गोष्टीकडे पाहिल्यास महाराजांच्या कृतीचे महत्व पटते. इंग्लंडमध्ये सुद्धा महाराज फार काळ राहिले नाहीत. परत आल्यावर मानपत्राला उत्तर देताना त्यांनी म्हटले आहे की " माझ्या संस्थानात डोकावू पाहणाऱ्या दुष्काळाच्या व प्लेगाच्या भीतीने मला अधिक दिवस तेथें राहता आले नाही "

संस्थानच्या प्रशासनाकडे महाराजांचे लक्ष कशातऱ्हेचे होते व प्रजेच्या दुःखात स्वतःचे दुःख ते कसे मानीत हे त्यांच्या प्रशासकीय कामगिरी वरून कळून येते.

## (ब) कमी मुदतीची योजना–

प्रशासकीय उपायाबरोबरच दुष्काळ हटविण्यासाठी इतर अनेक प्रकारचे उपाय योजावे लागतात. हे विविध उपाय व वेगवेगळ्या पातळीवर योजावे लागतात. काही उपाय असे योजावे लागतात की ज्यांची अंमलबावणी त्वरित होऊन त्याचा परिणाम तात्काळतोब घडवून आणावा लागतो. त्यामुळे लोकांना तात्पुरता का होईना दिलासा मिळतो. तात्पुरते उपाय जसे लवकर अंमलात येतात तसे त्याचे परिणाम दीर्घकाळ पर्यंत टिकू शकत

नाहीत काही बाबतीत तावडतोब फळ न देणारे परंतु दीर्घ कालीन व कायम स्वरुपाचे अुपायही योजने आवश्यक असते पुढच्या काळात दुष्काळ पडू नये यासाठी ही सावधगिरीची उपाय योजना असते. दुष्काळाची मूलभूत कारणे शोधून काढून ती नष्ट करण्यासाठी अशा प्रकारची उपाय योजना केली जाते.

## १) स्वस्त धान्याचे दुकान—

कमी मुदतीच्या उपाययोजनेमध्ये महाराजांचे प्रथमतः लक्ष धान्य-दुकानाकडे व वस्तूच्या रास्त किंमतीकडे वळले. वस्तूंच्या किंमती खाली कशा येतील व रयतेला झळ कशी कमी पोहोचेल या विषयी महाराजांची उपाय योजना सध्याच्या काळात सुद्धा अुपयोगी पडेल अशीच होती दुष्का-ळामध्ये महाराजांनी धिसाडघाईने धान्याचा व्यापार दरबाराकडे कधीच सोपवला नाही. व्यापाऱ्यांना त्यानी विश्वासात घेतले. खरेदीच्या किंमतीला मालाची विक्री करावी असे आवाहन केले. फायद्याचे प्रमाण कमी ठेवावे व वेळप्रसंगी आलाच तर तोटयात मालाची विक्रीकरावी व तोटयाची दरबार-कडून भरपाई करून घ्यावी. महाराजांच्या प्रयत्नाने किंमती परत खाली आल्याचे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

( तक्ता नं. १ )

| (१ मण ४० शेर) | १८९६ | १८९७ | १८९८ |
|---|---|---|---|
| मण | रु. आ. पै. | रु. आ. पै | रु. आ. पै, |
| १) तांदूळ | ३ ०७ ९ | ४ ०८ ११ | ३ ०७ ७ |
| २) गहू | २ ११ ३ | ४ ०८ ०९ | ४ ०२ ०९ |
| ३) तुरडाळ | ३ ०२ १ | ५ ०७ ०१ | ३ १० ०६ |
| ४) हरबऱ्याची डाळ | २ ०८ २ | ४ ०६ ०४ | ३ ०७ १० |
| ५) ज्वारी | १ १४ ७ | ३ १३ ०४ | २ १० ०० |
| ६) बाजरी | १ १४ ७ | ४ ०१ ०० | २ ११ ०४ |

१८९७ मध्ये अन्नधान्याच्या किमती फार मोठ्या प्रमाणावर वाढत होत्या. त्या १८९८ मध्ये परत कमी झालेल्या दिसून येतील. महाराजांच्या प्रेरणेमधून कोल्हापूर गावातील व्यापारी व सुखवस्तू लोकांनी रु. ८५०० जमविले व स्वस्त धान्याचे दुकान कोल्हापुरला काढले. याचा परिणाम इतर व्यापाऱ्यांवर फार चांगला झाला. त्यांना ना नफा ना तोटा या तत्वावरच अन्नधान्याच्या किमती ठेवाव्या लागल्या.[5] काही बाबतीत खरेदीच्या किमतीपेक्षाही वस्तूच्या किमती कमी ठेवल्या होत्या. जो तोटा येईल तो गॅरेंटी निधीतून भरून काढला जात असे. दरबारकडून या गॅरेंटी निधीला बिनव्याजी रक्कम रु. ४,००० दिले गेले. शिवाय व्याज न घेता रु.२,५००० कर्जाऊ देण्याचे दरबारने कबूल केले. काही ठिकाणी व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन अन्नधान्याच्या किमती वाढविल्या अशा वेळी दरबारकडून धान्याची खरेदी केली गेली. व तिची विक्री पण ' ना नफा ना तोटा ' या तत्वावर केली. गेली संस्थानातल्या काही ठिकाणी धान्य व्यापाऱ्याजवळ धान्याचा साठा नव्हता, अशा धान्य व्यापाऱ्याला दरबारतर्फे परप्रांतातून धान्य खरेदी करण्यासाठी बिनव्याजी कर्ज दिली गेली. काही ठिकाणी धान्य व्यापाऱ्याचे स्वस्त भावात धान्य विकण्यासाठी मन वळविण्यातही आले. या उपायांनी मर्यादित प्रमाणात यश मिळाले व वस्तूंच्या किमती खाली येऊ लागल्या. ज्या प्रमाणात दरबारने दुकानासाठी मदत केली त्या प्रमाणात त्याचा फायदा लोकांना झाला नाही हे दरबारच्या पाहणीवरून आढळून आल्याने ही पद्धती पुढे १८९९ –१९०० साली बंद करण्यात आली. खुल्या स्पर्धेनेच अन्नधान्याच्या किमती खाली येतील या गोष्टीची जाणीव झाल्याने १८९९–१९०० मध्ये दरबारच्या मदतीने चाललेले दुकान बंद करण्यात आले. यावरून महाराजांनी आपलाच हट्ट पुढे न दामटता वस्तुस्थितीचे महत्व जाणून धोरणात योग्य तो बदल केलेला आढळून येतो.

## २ ) धान्याची आयात

अन्नधान्याची गरज महत्वाची असते याची पुरेपूर जाणीव महाराजांना होती. कोल्हापूर संस्थान पूर्वीपासूनच धान्याच्या बाबतीत तुटीचे हे संस्थानच्या इतिहासावरून दिसून येते. पाऊस पाणी व्यवस्थित असल्यावर सुद्धा

कोल्हापूर संस्थानने धान्याची आयात इतर प्रांतातून केल्याचे दिसून येते. धान्याला असणाऱ्या मागणी पेक्षा जर पुरवठा कमी असेल तर तो तावडतोब भरून काढला पाहिजे व त्यांचे वाटप योग्य तऱ्हेने व्हायला पाहिजे हे साधे-सुधे तत्व महाराजांना अवगत होते. १८९६–९७ व १८९९–१९०० या साली महाराजांनी म्हैसूर संस्थानातून मोठ्या प्रमाणात तांदुळाची आयात केली. खुद्द म्हैसूरच्या राजाला पत्र पाठवून अन्न धान्याची आयात केली ब्रिटिश सरकार कडूनही धान्य मागवून घेतले व त्यांचे वाटप न्याय्यरीतीने होत आहे की नाहीय ाकडे जातीने लक्ष घातले. अन्नधान्याच्या बाबतीत जनते-बद्दल महाराजांना किती कळकळ होती याची अेक आठवण बॅ. शामराव केळवकरांनी दिलेली आहे कोल्हापूरला धान्याची तूट झाली आहे व सरकार (ब्रिटिश) आमची दाद घेत नाही ही गोष्ट महाराजांनी मुंबईई मध्ये बॅ. केळवकरांना सांगितली. महाराजांनी स्वतः या खटपटीत पडू नये असे बॅ केळवळकरांना वाटले. म्हणून त्यांनी ते काम करण्याचे ठरविले. महाराजांनी सुद्धा स्वतः त्याच्या बरोबर जाण्याची तयारी दाखविली पण बॅ. केळवकर तयार होईनात. महाराज आल्याने कदाचित काम होणार नाही असे त्यांनी सांगितले महाराज स्वतः सर्व साधारण लोकांत अेका सध्या नाकावर दोन तास बसून राहिले व बॅ केळवळकरांनी धाटाघाटी करून त्यांचे काम केले. आपल्या प्रजेस धान्य मिळावे ही तळमळ महाराजांची येथे प्रकर्षाने दिसून येते.7

## २) पिण्याचे पाणी–

दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई फार भासू लागली मलकापूर या गावांत तर पिण्यासाठी सुद्धा पाणी मिळेना. आपल्या संस्थानात लोकांना पिण्याचे पाणी भरपूर मिळावे म्हणून महाराजांनी खूप प्रयत्न केले. १८९६-९७ साली नदीकाठी, गांवाजवळ दरबारच्या खर्चाने व लोकांच्या मदतीने नवीन विहिरी खोदण्याचे काम काढले. विहिरीतील गाळ काढून त्या खोल केल्या. लोकांना पिण्यासाठी व कपडे, भांडी धुण्यासाठी भरपूर पाणी मिळेल याकडे महाराजांनी खास लक्षपुरविल्याचे दिसते. वडगांव, रूकडी, शिरोळ,

येथे नवीन तलाव बांधण्याच्या व जुने तलाव दुरूस्त करण्याच्या कामास सुरवात करण्यात आली.

## ४) रस्ते, पूल बांधणी–

दुष्काळी कामामध्ये रस्ते व पूल बांधण्याच्या कामाला फार महत्व असते. अशी कामे दुहेरी फायद्याची असतात. अेक तर दुष्काळात लोकांना रस्ता बांधणीच्या कामामुळे रोजगार मिळतो, ते बेकार राहात नाहीत, त्यांची उपासमार होत नाही. दुसरा फायदा म्हणजे दुष्काळाच्या काळात अेका ठिकाणाहून दुसरीकडे अन्नधान्य पाठवायाचे असेल तर चांगल्या रस्त्याची व नदीओढयावरच्या पुलांची फार आवश्यकता भासते. महाराजांनी दुष्काळाच्या काळात अनेक महत्वाचे रस्ते बांधले. निपाणी–दाजीपूर रस्त्यावरचे तीन मोठे पूल दुष्काळाच्या काळातच बांधले गेले. ब्रिटिश हद्दीतून जाणाऱ्या रस्त्यासाठी खास करून महाराजांनी ब्रिटिश सरकारची परवानगी घेतली, कच्चे व पक्के रस्ते बांधले. कटकोळ, पन्हाळा पेटयात दुष्काळाची तीव्रता १८९६-९७ मध्ये जास्त होती, म्हणून तेथे जास्त प्रमणात रस्ते बांधण्याचे काम महाराजांनी काढले.

## ५) दुष्काळी भत्ता–

महाराजांचे मजुरावर व कमी पगार घेणाऱ्या दरबारातल्या नोकरांवर खास असे प्रेम होते. अुत्पादनामध्ये मजूरांचा फार मोठा वाटा असतो. किंबहुना तो अुत्पादनाचा घटक सर्वात महत्वाचा अशी त्यांची धारणा होती. दुष्काळामध्ये साहजिकच महत्वाच्या वस्तूंच्या किंमती वाढतात व स्थिर मिळकत मिळविणाऱ्या विशेषतः कमी मिळकत मिळविणाऱ्या नोकरांची कुतरओढ होते याची महाराजांना चांगलीच कल्पना होती. दरबारच्या कमी पगार मिळविणाऱ्या नोकरांना त्यांनी दुष्काळीभत्ता १ नोहेंबर १८९६ पासून द्यायला सुरवात केली. ज्वारी हा पदार्थ लोकांच्या खाण्यात प्रामुख्याने असल्याने ज्वारीच्या बदलत्या किंमतीनुसार दुष्काळी भत्ता द्यायचा

असे महाराजांनी ठरविले. ज्वारी जेव्हा रुपायाला १० शेर मिळेल त्यावेळी दरमहा १ रू. दुष्काळी भत्ता म्हणून द्यायचा. तिचा भाव जेव्हा रूपयाला ८ शेर असेल तेव्हा १ रु. ८ आणे असा भत्ता द्यायचा. जेव्हा ज्वारी १ रुपयाला ३ शेर असेल तेव्हा ४ रूपये दुष्काळो भत्ता म्हणून द्यावा असेही ठरविले. ३१ मे १९०० पर्यंत जवळ जवळ १५२६७ रु. कोल्हापूर दरबारने दुष्काळी भत्यावर खर्च केले. [9]

## दुष्काळी भत्ता वाटण्याचे प्रमाण (तक्ता नं. २)

| ज्वारीची किंमत (प्रत्येक रुपयास) | भत्याचा दर (प्रत्येक महिन्यास) रु. आ. पै. | कमीत कमी पगार (भत्यासहित) रु. आ. पै. |
|---|---|---|
| १० शेर | १-०-० | ६-०-० |
| ८ शेर | १-८-० | ६-८-० |
| ६·५ शेर | २-०-० | ७-०-० |
| ५·५ शेर | २-८-० | ७-८-० |
| ४·५ शेर | ३-०-० | ८-०-० |
| ४ शेर | ३-८-० | ९-०-० |
| ३ शेर | ४-०-० | १०-८-० |

(Source – Administrative Report-1896-97 P–76)

महाराजांच्या नजरेतून शिक्षक सुटले नाहीत. शिक्षकाना सुध्दा धान्याच्या स्वरुपात दुष्काळी भत्ता दिला गेला. महाराजांची जडण घडण श्री.फ्रेजर या ब्रिटिश विद्वान व शिक्षकी पेशाला वाहून घेणाऱ्या शिक्षकाकडे झाल्याने अगदी लहाणपणापासून फार चांगले संस्कार महाराजांवर झाले होते. चांगला शिक्षक काय करू शकतो, त्याची सांपत्तिक स्थिती कशी असते याची पुरेपूर कल्पना महाराजांना होती म्हणूनच त्यांचे लक्ष दुष्काळाच्या काळात शिक्षकांच्याकडे वळले.

## ६) तात्पुरत्या दुष्काळी कचेऱ्या–

महाराजांचे अत्यंत विश्वासू दिवाण यांच्या ऑफिसमध्ये खास दुष्काळी कचेरी काढली होती. शिवाय निरनिराळ्या मामलेदार कचेऱ्यातही दुष्काळी विभाग महाराजांनी काढले होते. या कचेऱ्यामध्ये कांही नवीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केली होती. दुष्काळी कामासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू, अवजारे यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली होती. या कचेऱ्यांमध्ये दुष्काळा संबंधी ठिकठिकाणची माहिती मागविली जात असे. निरनिराळी कामे सुरू केली जात असत व प्रजेचे जितके दुःख कमी होईल तितके करावे हीच भावना या पाठीमागे होती. या सर्व कचेऱ्यावर, विकत घेतलेली अवजारे उपकरणे यावरचा खर्च अेका वर्षी रु. २६१६४– १० आणे– ११पै होता.[10] या खर्चावरुनही महाराजांनी दुष्काळाला दिलेल्या झुंजीची थोडी फार कल्पना येईल! कोल्हापूर सारख्या लहान संस्थानने रुपयास अंदाजे २० शेर ज्वारी मिळत असता केलेला हा खर्च यावरून महाराजांच्या कामाचा आवाका कळून येतो. !

## ७) लहान मुलासाठी केलेली योजना–

दुष्काळामध्ये महाराजांचे लक्ष लहान मुलाबाळांकडे फार होते. तरूण स्त्री–पुरुष दुष्काळी कामावर काम करीत असत. पण लहान मुलानी काय करायचे? शिवाय घरातल्या स्त्री-पुरुषांनी दुष्काळी कामावर जायचे तर त्यांच्या लहान मुलांनी कुठे राहायचे ? अशाच एका दुष्काळी कामाची पाहणी करीत असता महाराजांना असे दिसून आले की झाडाखाली सावली-ला लहान मुले खेळतात, रडतात. त्यांच्याकडे पहाण्यास तसा मोठा माणूस नाही, मुलांचे आई वडील, मोठे भाऊ बहीण सर्व कामास गेलेले आहेत, महाराजांना ही परिस्थिती पाहून अत्यंत वाईट वाटले. त्यांनी दरबारच्या खर्चाने या लहान लहान मुलांना सांभाळण्यासाठी ठिकठिकाणी शेडस् उभ्या केल्या. या लहान मुलांचा सांभाळ दरबाराकडून नेमलेल्या आयांकडून केला गेला. या लहान मुलांना दूध, पाणी जे काही लागेल ते सर्व दरबारी खर्चाने

होत असे. काम संपल्यावर या मुलांना परत घरी घेऊन जाताना महाराजांबद्दल या कामगारांना आदर न वाटेल तरच नवल ! कल्याणकारी राज्य म्हणतो ते यापेक्षा दुसरे कसले असणार ? दररोज सरासरीने ४१४६ लहान मुलांना व त्यांच्या पालकांना या योजनेमुळे फायदा मिळत होता व दरबारचा खर्च रु. ३१,३५३ – ८ आ. ८ पै. इतका झाला. अशा तऱ्हेने मदत मिळालेल्या लोकांचे एकूण दुष्काळी कामावर असलेल्या लोकांशी शेकडा ४३ असे प्रमाण होते.[11]

## ८) मोफत मदत–

महाराजांनी दुष्काळाचा तडाखा बसलेल्या गरीब लोकांना सुरवातीला शिजवलेले तयार अन्न द्यायला सुरवात केली. अशाच तऱ्हेनी १९७२-७३ च्या दुष्काळात महाराष्ट्र सरकारने ' सुकडी 'चा प्रयोग केला. मात्र महाराजांनी लगेच ही पद्धत बंद केली. कारण त्या मध्ये अेक तर पैसा जास्त खर्च होत होता. शिवाय ती व्यवस्था ठेवणे गैरसोईचे, त्रासदायक वाटू लागले. सर्वच लोकांना या मधून फायदा होईल यांची शक्यताही नव्हती. महाराजांनी ही पद्धत बंद केली. फॅमिन रिलिफ फंड प्रमाणे महाराजांनी मदत द्यायला सुरवात केली. सातवर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना व आईवडिलांना ज्यांना दुष्काळाचा जबर तडाखा बसला आहे त्यांना पैशाच्या स्वरूपात मदत दिली गेली.

## ९) गरिबांसाठी आश्रम–

जी माणसे कंगाल झालेली आहेत व रोगांनी पीडित व अशक्त झालेली आहेत अशांना सुद्धा महराजांनी मदतीचा हात दिला. कटकोळ, पन्हाळा, बावडा, बाजारभोगांव, गारगोटी, वळीवडा, तिरवडा, गडहिंग्लज व कोल्हापूर या ठिकाणीं गरिबासाठी आश्रम स्थापण्यात आले. ४८७८५ भुकेकंगाल लोकांची अेवणा–खाण्याची सोय तर येथे झालीच पण त्या शिवाय त्यांनी कपडेलत्ते मोफत पुरविण्यात आले. औषधे फुकट वाटण्यात आली. औषधाचा खर्च १८९६–९७ मध्ये अंदाजे रु. ५०० झाला. याशिवाय

संपूर्ण आश्रमावरचा त्यावर्षी महाराजांनी रु.३३९२-१३ आ. ६ पै ।2 इतका खर्च करून भूकबळी पडू दिला नाही. प्रजेचे कल्याण हेच राजाचे कर्तव्य या उक्तीची प्रचिती येथे आपल्याला दिसून येते १८९९-१९०० साल त वडगांव व शिरोळ या ठिकाणी आणखी दोन गरिबासाठी आश्रम उघडले. या लोकांना धान्याच्या स्वरुपातही शिधा वाटण्यात आला. तक्ता नं ३ वरून याची पूर्ण कल्पाना येईल.

## १०) म्हातारे, आंधळे,-पांगळे व दीन-दुबळ्यांसाठी शिधावाटप-

महाराजांची सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी म्हाताऱ्यांना, आंधळ्याना, दीनदुबळ्यांना वाटलेला शिधा. सर्व साधारणतः सरकारच्या दुष्काळी योजनेत दीनदुबळ्यांची सोय होतेच असे नाही. एकतर अशी माणसे काम करू शकत नाहीत. शिवाय मदत केंद्रावर ही माणसे जाऊ शकत नाहीत. महाराजांनी अशा माणसांकडे आपल्या मदतीचा हात दिला. यात महाराजांना दीन दुबळ्यांविषयी वाटणारा कळवळा दिसून येतो. अशा दीन-दुबळयांना घरपोच दरबारतर्फे शिधा वाटण्यात आला. कोल्हापूर संस्थानात गरिबांना, दीनदुबळ्यांना दुष्काळात भुकेने मरण यावे ही कल्पनाच महाराजाच्या मनाला शिवली नाही. महाराजांनी दुष्काळाला तोंड देण्याची ही पद्धती मनापासून ठरविलेली होती हे यावरून दिसते मर्यादित सत्तेचा वापर त्यांनी प्रजेच्या कल्याणासाठी विशेषतः दीनदुबळ्यांच्या कल्याणासाठी केला हे उघडच आहे.

## ११) गरीब विद्यार्थ्यांसाठी स्वस्तात बोर्डिगची सोय-

दुष्काळात महागाईची झळ विद्यार्थ्यांना सुद्धा बसते. खेड्यातून शहरांत येणाऱ्या विद्यार्थ्यांना तर ती जास्तच बसते. राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या खेड्यातून आलेल्या गरीब विद्यार्थ्यांची महाराजांनी खास अशी बोर्डिगची सोय केली होती. दुष्काळापूर्वीच्याच सवलतीच्या दराने रु. ५ महिना या प्रमाणे त्यांच्या कडून जेवणासाठी पैसे घेतले गेले बोर्डिगमध्ये आलेला तोटा दरबारकडून सोसला गेला.

## १२) " काम तसे दाम " (Payment by Results) पद्धति–

१८९९–१९०० मध्ये महाराजांनी दुष्काळी कामाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल केला. पूर्वी केलेल्या चुका जाणून घ्यायच्या व नवीन शास्त्रशुद्ध मार्गाची आखणी करावयाची हे महाराजांच्या कारभाराचे प्रमुख लक्षण होते. १८९६–९७ साली दुष्काळात कामगारांना त्यांच्या राहण्याच्या ठिकाणीच काम दिले जात असे. यामध्ये दोन प्रमुख दोष महाराजांना आढळले. एक तर ज्या माणसाला वास्तविक दुष्काळाची फारशी झळ पोहोचली नाही तो सुद्धा दुष्काळी कामावर जात असे, कारण अगदी घराजवळ त्याला काम मिळत असे. दुसरा दोष म्हणजे आर्थिकदृष्ट्या अनावश्यक अनुत्पादक अशीही कामे काही वेळेस अशा पद्धतीत असण्याची शक्यता असे. अशी कामे उत्पादनाच्या दृष्टीने फायदेशीर असू शकतीलच हे सांगता येत नाही. यावर महाराजांनी एक नामी उपाय काढला. राहत्या गावांत शक्यतो काम द्यायचे नाही असा दंडक महाराजांनी १८९९–१९०० सालात काढला. यामध्ये प्रमुख दोन फायदे होते. अत्यंत गरजू माणसेच दुष्काळी कामासाठी येतील दुसरा व अत्यंत महत्वाचा फायदा म्हणजे दरबारला फायदेशीर, दीर्घकालीन टिकणारी, उत्पादनामध्ये भर टाकणारी अशी योजना आखता येते. हा जो बदल महाराजांनी केला याला अर्थशास्त्रात फार महत्त्व आहे. दुष्काळात भूतदयेने सरकार अशा अनेक योजना हातीं घेते की ज्याचा दीर्घकालीन उपयोग समाजाला होत नाही. याचा अनुभव महाराष्ट्रात कमी आहे असे म्हणता येणार नाही. महाराजांनी दुष्काळात शिजवलेले अन्न वाटण्याची पद्धत, अनुभव चांगला आला नाही म्हणून बंद केली. खडी फोडण्याचे काम, खडी गोळा करण्याचे काम व निवडुंग व वाटेरी झुडूप नष्ट करण्याचे काम पूर्वी दुष्काळात करण्यात येत होते. महाराजांनी नंतर ही पद्धती बदलली. वरील प्रकारच्या कामातून फारशी दीर्घकालीन योजना पुढे येत नसल्याने त्यांनी ती बंद केली व त्याऐवजी रस्ते, पूल बांधणे, नवीन तलाव बांधणे, विहिरी खोदणे इत्यादी कामावर भर दिला.

आणखी एका बाबतीत महाराजांनी फार धाडसाचे पाऊल उचलले. ' काम तसे दाम ' (payment by results) हे तत्व त्यांनी दुष्काळी

कामामध्ये आणले 'काम तसे दाम' या पद्धतीमध्ये एखाद्या कामगाराने अथवा कामगाराच्या गटाने जितके काम केले असेल त्या प्रमाणात जेव्हा वेतन दिले जाते त्यास आपण सर्वसाधारणपणे 'काम तसे दाम' हे तत्व म्हणतो.

'The term "Payment by results" has been u ed by the experts to cover all systems under which wages are related directly to some measurement of the work done by the individual worker or group of workers.[13]'

कुठल्या तत्वावर 'काम तसे दाम' या तत्वाचा वापर करावा या संबंधी विचार विनिमय एप्रिल १९५१ मध्ये जिनिव्हा मध्ये आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेतर्फे केला गेला. जमशेटपूर येथील टाटा लोखंड व पोलाद कारखान्याचे एक अधिकारी श्री. कनिंगहॅम या सभेला हजर होते. म्हणजे वास्तविक या तत्वाचा वापर वेतनाची पद्धत म्हणून १९५१ नंतर शास्त्रशुद्धरीत्या केला गेला. महाराजांनी मात्र या पद्धतीचा प्रयोग १८९९-१९०० साली यशस्वी रीतीने केला. कामगारामध्ये व कामदेणाऱ्यामध्ये जेव्हा मित्रत्वाचे व समजुतीचे वातावरण असते तेव्हाच ही पद्धती यशस्वी होते व उत्पादकता वाढीस लागते अन्यथा सर्व साधारणपणे कामगार वेळेनुसार वेतन (payment by time) याची मागणी करतात. दरबारात श्री. विचारे सारखे कर्तबगार अधिकारी असल्याने व महाराजांवर असलेला विश्वास व प्रेम यामुळे ही पद्धती कमालीच्या बाहेर यशस्वी झाली. प्रथम या पद्धतीला कामगाराचा नकार होता पण महाराजांच्या व श्री. विचारेंच्या योग्य व कुशल धोरणाने ही पद्धती यशस्वी झाली.[14]

## १३) जनावरासाठी केलेली योजना–

दुष्काळात महाराजांचे लक्ष जनावराकडेही गेले. दुधदुभती जनावरे जगली पाहिजेत, वाचवली पाहिजेत असा महाराजांचा दृष्टीकोन होता. भारतीय शेती पद्धतीमध्ये बैलाचे महत्व अजूनही अनन्यसाधारण असे आहे.

महाराजांच्या काळी तर त्याचे महत्व फारच मोठे होते. शेतकऱ्याचे फार महत्वाचे भांडवल म्हणून बैलाकडे आपण पाहतो. ती जगली वाचली तर शेती करता येईल व दुधदुभत्याची सोय होईल. शिवाय भूतदयेने का होईना आपल्याबरोबर जगण्याचा त्यानाही अधिकार आहे या सगळया जाणीवेने अत्यंत प्रभावी व आधुनिक काळातही अनुकरण करण्यासारखे धोरण महाराजांनी आखले होते. महाराजांनी असा जाहीरनामा काढला की ज्याला आपली जनावरे पोषणाचे सामर्थ्य नाही त्याने ती संस्थानच्या पट्टीत पाठवावी. तेथे ती पाळली जातील व जेव्हा मालकाला, जरुरी वाटेल तेव्हा त्याने आपली जनावरे परत न्यावीत. दुष्काळात अन्न–धान्याच्या किंमती बरोबरच गवताची व कडब्याचीही किंमत भरमसाट वाढू लागली. सर्व साधारण नागरिकांना जनावर पोसणे कठीण हूं ऊ लागले. हाडाचा सापळा झालेली जनावरे जिकडे तिकडे दिसू लागली. महाराजांनी फक्त अन्नधान्यच स्वस्तात मिळविण्याची व्यवस्था केली असे नसून त्यांनी स्वत दराने गवत विकण्याची सुद्धा तजवीज केली. इतकेच नव्हे तर जनावरे मोफत चरण्यासाठी संस्थानची जंगले खुली केली. जंगलाची नासधूस झाली तरी चालेल, दरबारच्या खजिन्याला खोट आली तरी चालेल, पण जनावरे जगली पाहिजेत, शेतीतले भांडवल जगवले पाहिजे, लोकाना दुधाचा पुरवठा भरपूर झाला पाहिजे या उदात्त हेतूने त्यांनी जंगले खुली ठेवली ! अशा तऱ्हेने जंगले खुली करण्याचे मार्ग आधुनिक काळात परवाच्या दुष्काळात सुद्धा केल्याचे ऐकिवात नाही. या त्यांच्या कृतीची महाराजावर सतत टीका करणारे 'समर्थ' या वर्तमानपत्राने सुद्धा तोंड भरून सुस्तुती केली.

ज्या वेळेला ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या पंढरपूर, सोलापूर इत्यादी भागात जनावरे तडफडून मरत होती त्या वेळेस वरील प्रमाणे कोल्हापूर संस्थानने उपाय योजना केलेली होती हे विशेष! १८९६-९७ साली जनावरांची संख्या ४२७६२९ वरून ४३४९४९ इतकी झाली. जनावरांची संख्या ७३२० एव्हढयानी वाढली. [16] वास्तविक दुष्काळात जनावरांची संख्या कमी होते पण

कोल्हापूर संस्थान त्याला अदवाद होते! इतर प्रदेशातून कोल्हापूर संस्थानात जनावरे येऊ लागली याचे अेक कारण म्हणजे ब्रिटिश प्रदेशापेक्षा कोल्हापूर संस्थानची गवताच्या दृष्टीकोनातून परिस्थिती चांगली होती व याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे श्री शाहू छत्रपतींचे अत्यंत वास्तव व स्वतंत्र असे दुष्काळा-संबंधी धोरण !

## (क) दीर्घ मुदतीची कामे–

दुष्काळाचा फार खोलवर महाराजांनी विचार केला होता हे त्यांच्या दीर्घकालीन अुपाययोजनेत दिसून येते. कोल्हापूर संस्थानपुरताच त्यांचा मर्यादित विचार नव्हता तर संपूर्ण हिंदुस्थानाच्या संदर्भात दुष्काळाचे उच्चाटन कसे करता येईल अशा तऱ्हेचा व्यापक विचार त्याचा होता. त्याची कृति सुद्धा त्या विचाराशी सुसंगत अशीच होती. हिंदुस्थानात मुख्य व्यवसाय शेतीचा आहे. ही शेती संपूर्णपणें पावसावर म्हणजेच निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. शेतीला नैसर्गिक तडाखा बसला की संपूर्ण अर्थव्यवस्था विस्कळीत होते. तेव्हा शेतीपद्धतीतील अनिश्चितता दूर करणे व आहे त्या साधनसामग्रीचा पुरेपूर वापर आणि तोही कार्यक्षमतेने कसा करता येईल असाच विचाराचा प्रवाह महाराजांचा होता. त्यांची ठिकठिकाणची भाषणे व प्रत्यक्ष आपल्या छोटयाशा संस्थानात अंमलात आणलेली कृति यावरून महाराजांच्या वास्तव क्रांतिकारक भूमिकेची पुरेपूर जाणीव आपल्याला होते. हिंदुस्थान सारख्या खंडप्राय देशात एका ठिकाणी अतिवृष्टी होईल तर त्याच वर्षी दुसरीकडे अनावृष्टी असेल तर, आणखी तिसरीकडे जसा हवा असेल तसा पाऊस होईल. तेव्हा एका प्रदेशात दुष्काळ असेल तर दुसरीकडे तो असेलच असे नाही. शिवाय दुष्काळ नेहमीच नैसर्गिक कारणाने असेल असेही नाही. माणसांनी निष्काळजीपणाने केलेला कृत्रिम दुष्काळ असण्याचीही शक्यता असू शकते. म्हणून दीर्घकालीन झुंज देऊन अर्थव्यवस्थेत आमुलाग्र बदल करून दुष्काळाचे उच्चाटन करता येईल असा आत्मविश्वास महाराजांना होता. त्यांनी अनेक दीर्घमुदतीच्या योजना

आखल्या की त्यांची फळे आजही कोल्हापूरकरांना व आजूबाजूच्या प्रदेशातील लोकांना अनुभवास येतात. इतकेच नव्हे तर खुद्द महाराजांच्या काळात सुद्धा दुष्काळाची तीव्रता इतर ब्रिटिश मुलखापेक्षा कोल्हापूर संस्थानात कमी होती हा इतिहासाचा दाखला आहे. असे असल्याचे कारण म्हणजे श्री शाहू छत्रपतींची दीर्घ कालीन उपाय योजना.

## १) धरणे व पाटबंधाऱ्याची योजना-

निसर्ग जरी लहरी असला तरी मानवी उपाययोजनेनी त्याच्या लहरीपणावर मर्यादा घालता येते हे महाराजांनी दाखवून दिले. थोडा पाऊस पडला तरी ते पाणी वाया न जाऊ देता त्याचा साठा केला तर पिण्याच्या पाण्याचा व शेतीला लागणाऱ्या आवश्यक इतक्या पाण्याचा प्रश्न मिटू शकेल याची जाणीव महाराजांना होती. म्हणूनच आपल्याच देशात प्रवास करीत असताना महाराजांनी धरणाचे अवलोकन केले. इंग्लंडमध्ये गेल्यावर तिथल्या लोकांनी पाण्याचा साठा करून कशी संपन्नता आणली आहे या गोष्टीचा महाराजांनी अक्षरशः अभ्यास केला. इंग्लंडला जायच्या आधी त्यांनी सर क्लॉड हिल यांना इंग्लंडमधील काही उद्योगधंदे पहायला मिळतील तर बरे होईल असे लिहिले. इंग्लंड, इटली मधील धरणे पाहून व नैसर्गिक साधनसामग्रीचा चांगला वापर करीत असलेले पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले. आपल्या देशात असे का होऊ नये असे त्यांना वाटणे साहजिकच होते. इंग्लंडहून आल्यावर १९०७ मध्ये महाराजांना एखादे धरण आपल्या संस्थानात असावे असे फार वाटू लागले. त्याप्रमाणे राधानगरी धरण त्यांनी बांधण्यास सुरवात केली. दुष्काळाला यशस्वी तोंड द्यायचे असेल व कायमची झुंज देऊन त्याची तीव्रता कमी करायची असेल तर नदीला बांध घालून पाण्याचा साठा करून ओलेती खालील जमीन वाढवण्याचा हा निश्चय महाराजांनी केला. राधानगरी धरणापेक्षाही मोठे धरण दाजीपूरच्या वर दूधगंगा नदीवर बांधण्याचाही विचार महाराजांना आला होता. पण ती महत्वाकांक्षी योजना महाराजांनी सोडून दिली. एकतर खजिन्याला खर्च परवडणारा

नव्हता व शिवाय ब्रिटिश हद्दीत तो भाग असल्याने ब्रिटिशांची परवानगी घेणे कटकटीचे होईल अशा दुहेरी अडचणीमुळे त्यांनी लहानशी लक्ष्मी धरणाची उर्फ राधानगरी धरणाची योजना आखली.

या शिवाय निरनिराळ्या रूकडी, वडगांव, शिरोळ, अतिग्रे, सातवे, ज्योतिबा हिल इत्यादी ठिकाणी तलाव बांधण्यास सुरवात केली. विहिरी नव्याने तयार करण्याकडे व आहेत त्या विहिरी खोल करण्याकडे, त्यातील गाळ काढण्याकडे महाराजांचे खास लक्ष असे.पक्क्या व कच्च्या विहिरी जितक्या जास्त बांधता येतील तितक्या बांधल्या जाव्यात अशी त्यांची महत्वाकांक्षा होती. या सगळ्या योजनेपाठीमागे महाराजांची एकच तीव्र इच्छा होती ती म्हणजे ओलेती खाली जमीन जास्त यावी. शेतीतील अनिश्चितता कमी व्हावी व दुष्काळ पडू नये. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सांगितल्या-प्रमाणे –

' सेतुबन्धः सस्यानां योनिः ।
नित्यानुपक्तो हि वर्षगुणलाभः सेतु वापेषु ।।'
' हीनसंधितपुरणम् ' –अर्थशास्त्र-षाड्गुण्य
अध्याय १४, श्लोक ६ ।7

अन्नाच्या उत्पत्तिचे प्रमुख कारण धरण आहे. पावसामुळेच आपल्याला जे अन्न मिळ शकते ते धरण बांधल्यामुळे सतत मिळु शकते. महाराजांचा धरण बांधण्यात हाच दृष्टीकोन होता असे म्हटल्यास किंचीतही अति-शयोक्ति होणार नाही.

## २) रस्ते, पूल बांधण्याची योजना–

दुष्काळाला तोंड देण्यासाठी कायमच्या दीर्घकालीन योजनेमध्ये महाराजांनी मोठे रस्ते, व पूल बांधण्याला अग्रक्रम दिला.या मध्ये महाराजांना तीन प्रमुख फायदे दिसत होते. अेक तर दुष्काळांत लोकांना रस्ता बांधणीचे काम मिळेल, दुसरे अेका ठिकाणचे अन्नधान्य दुसरीकडे नेण्यासाठी चांगल्या

पक्क्या रस्त्याचा फार उपयोग होतो, त्यामुळे दुष्काळाची तीव्रता लगेच कमी करता येते. तिसरा फायदा म्हणजे प्रशासनाच्या दृष्टीनेही चांगले रस्ते असणे आवश्यक असते. महाराजांची रस्ते बांधणीची योजना फार व्यापक होती. आपल्यासंस्थाना पुरतीच मर्यादित अशी ती नव्हती. महाराजांनी ब्रिटिश हद्दीतून जाणारे रस्तेही बांधले. त्यासाठी त्यांनी ब्रिटिश सरकारकडून मान्यता घेतली. निपाणी फोंडा रस्ता महाराजांनी १८९९-१९०० मध्ये चांगला पक्का असा बांधण्यास घेतला. १८९६-९७ मध्ये महाराजांनी नवीन रस्ते बांधल्यावर व जुने दुरुस्त करण्यावर रु. ४०४१२ खर्च केले. परितें ते टिकपुर्ली, काळजवडे ते कोळीक, कोडोली ते कोल्हापूर - अंबारस्ता पन्हाळा बुधवार पेठ ते आंबवडा, गडहिंग्लज ते नेसरी, कापशी ते गड-हिंग्लज, गारगोटी ते पाटगांव, सलहल्ली ते सल्लापूर इत्यादी नवीन रस्ते बांधले. शिवाय मांजरे खिंड ते भंडना, कळे ते अणुस्कूरा, कापशी-पिशवी रस्ता, बोरीवडा ते कोल्हापूर रस्ता, अंबारस्ता, दाजीपूर धर्मशाळा ते भंडना, पन्हाळा तीनदरवाजा रस्ता, इत्यादी रस्त्यावर दुरुस्तीची कामे महाराजांनी सुरू केली. १८९७-९८ मध्ये महाराजांनी जवळ जवळ ७५ मैलाचा नवीन रस्ता बांधला व त्यासाठी रु. १,३७,३९३-० आ. - ११ पै खर्च केले.[18] हातकणंगले ते वडगांव, वडगांव ते कोडोली, शिरोळ रेल्वेस्टेशन ते उधगांव, तारदाळ ते हातकणंगले, कटकोळ ते मनोली, मेंगुर्ली ते सुनाल हे ते रस्ते होत. निपाणी-दाजीपूर रस्त्यावर ओढ्यावर, नदीवर मोठ - मोठे पूल बांधण्याचे काम सुद्धा महाराजांनी सुरू केले. या सर्व दुष्काळी कामाचा फार मोठा फायदा कोल्हापूर संस्थानमधील लोकांना झाला. अेका ठिकाणी भरपूर पिकलेले धान्य दुष्काळ पडलेल्या दुसऱ्या भागाकडे वळविण्यास दरबारला अत्यंत सोयीचे झाले. लोकांनाही अन्नधान्याच्या शाश्वती बाबत खात्री पटली. व्यापाऱ्यांनाही, अडवणूक करता येईना व ह्याचा योग्य तोच परिणाम झाला वस्तूंच्या किंमती खाली येऊ लागल्या. पुढील काळांत दुष्काळाची झळ कमी पोहोचावी यासाठी महाराजांनी वरील प्रमाणे रस्ते बांधून वाहतूकीसाठी सोई करून ठेवल्या.

## (३) शेतकऱ्यांना कर्जे–

शेती व्यवसायात भांडवल गुंतवणुकीचे महत्व अनन्य साधारण असते. शेतीमध्ये भांडवल गुंतवणुकीस सर्वसाधारणत: शेतकरी तयार नसतो. एकतर शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागेल. गुंतवणूक केल्या गेलेल्या भांडवलापासून लाभ मिळेलच तोही अल्पकाळात याची खात्री नसते. शिवाय शेती व्यवस्थापनाच्या वहिवाटीच्या कायदेशीर अडचणी असतात. शेतमालाच्या किंमती थोड्या थोडक्या अुत्पादनाच्या फेरफाराने फार मोठ्या प्रमाणात कमी जास्त होत असतात. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्या शिवाय तरी तरणोपाय नाही याची महाराजांना कल्पना होती. दुष्काळाला तोंड द्यायचे असेल तर शेतीत गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर व्हायला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी अगदी सुरवातीपासूनच शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणांत तगाई देण्यास सुरवात केली. शेती सुधारणेसाठी विहिरी खोदण्यासाठी, बी-बियाणे विकत घेण्यासाठी, खते तयार करण्यासाठी व विकत घेण्यासाठी बैल, अवजारे विकत घेण्यासाठी अशा अनेक प्रकारच्या विधायक कारणांसाठी महाराजांनी बिनव्याजी किंवा अत्यंत अल्पव्याजानी कर्जे दरबारतर्फे दिली.

पहिल्या पहिल्यांदा १८९५-९६, १८९६-९७ या काळांत महाराजांनी दुष्काळी मदत म्हणून खूप पैसे वाटले. पण अशा मदतीचा अुपभोगाकडेच कल आहे अुत्पादनासाठी फार थोडा भाग यातला जातो हे दिसून आल्याने त्यांनी आपल्या दुष्काळी धोरणात आमुलाग्र बदल केला. मदत म्हणून पैसे द्यायच्या ऐवजी कर्जे दिली गेली. ही कर्जे सुद्धा काही अटीवर दिली गेली. शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक व्हावी हाच महाराजांचा हेतू होता दरबारने प्रसंगी तोटा सहन करून का होईना मदतीचा हात दिला. १८९९–१९०० यासाली तगाईसाठी महाराजांनी रु. १,२५००० बाजूला काढून ठेवले होते. यावरून महाराजांचा दृष्टीकोन सहज समजून येईल. सर्वसाधारणत: भारतासारख्या अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांची कर्जाची गरज खूप असते व पैसे मात्र कमी पडतात. पण श्री शाहू छत्रपतीचे नियोजन आश्चर्यकारक म्हटले

पाहिजे ! १८९९-१९०० साली रु. १००० शिल्लक राहिले. करवीर तालुक्यात १०००० रु., पन्हाळा पेटा ३३००० रु., आळते पेटा २००० रु., शिरोळ ३०००० रु., रायबाग १०००० रु., गडहिंग्लज २००० रु., कटकोळ २०००रु., भुदरगड २८,०००रु., असे एकंदर १,२४००० रुपये तगाई म्हणून वाटले गेले.[19]

## (४) सुधारित शेतीचे प्रयोग व शिक्षण–

दुष्काळ जरी निसर्ग निर्मित असला तरी मानवी प्रयत्नाने त्याचे बऱ्याच अंशी अुच्चाटन करता येते या विषयी महाराजाना शंका नव्हती. हिंदुस्थानातील शेतकरी हा अकार्यक्षम आहे हे महाराजांना मान्य नव्हते. त्यांचे म्हणणे असे की, सामाजिक, आर्थिक, राजकीय, परिस्थितीमुळे तो अकार्यक्षम झाला आहे. सुधारित शेती पद्धती त्याने जर अंगीकारली तर तो कार्यक्षम होईल व शेती अुत्पादकता वाढीस लागेल. पाण्याचा पुरेपूर वापर तो करू लागला की आपोआपच अुत्पादन वाढेल व धान्याचा जादा साठा त्याला अथवा समाजाला करता येईल. यामुळे अेकावर्षी पाऊस कमी पडला तरी दुष्काळाची झळ संपूर्ण समाजाला बसणार नाही. अशा तऱ्हेचे सोपे गणित महाराजांचे होते. शेतकऱ्याकडे बऱ्याच वेळा सर्व गोष्टी असतात. पण त्याचा वापर शास्त्रशुद्धरित्या कसा करावा हे त्याला त्याच्या अज्ञानामुळे अडाणीपणामुळे समजत नाही. तेव्हा त्यास सुशिक्षित केले पाहिजे हा महाराजांचा दंडक होता. म्हणूनच प्राथमिक शिक्षणास त्यांनी आपल्या संस्थानात फार महत्व दिले इतकेच नव्हे तर प्राथमिक शिक्षण फुकट व सक्तीचे केले. कुठल्या प्रकारच्या खताने कोणते अुत्पादन जास्त येते यांचे प्रयोग स्वतः त्यांनी कोल्हापुरला केले व चांगल्या प्रकारच्या खताचा प्रचार व प्रसार त्यांनी शेती प्रदर्शनातून वेळोवेळी केला. शेती जर शास्त्रशुद्धपद्धतीने केली तर दुष्काळाची छाया व तीव्रता कमी होईल असेच विचार महाराजांचे होते व त्यांची कृतीही त्याच दिशेनी होती. शेतीच्या शिक्षणासाठी तर त्यांनी प्रत्यक्ष आपल्या मुलांना कै. छ. राजाराम महाराज व कै. युवराज शिवाजी महाराज यांना अलाहाबाद येथे शेती शिक्षणासाठी पाठवून दिले होते. महाराज जसे बोलत तसे करीतही असत याचे हे अेक अुत्तम अुदाहरण आहे असे आपल्याला म्हणावे लागेल.

### (ड) नैतिक मार्ग–

दुष्काळासारख्या नैसर्गिक संकटावर चौफेर हल्ला चढविल्याशिवाय समाजाचे कल्याण होत नाही या उद्देशाने महाराजानी सगळ्या मार्गांने प्रजेचे कल्याण होईल यासाठी दुष्काळाशी झुंज दिली. अेकाद्या रोग्याला डॉक्टरने डोक्यावरून हात फिरवून दिलासा दिल्यावर त्या रोग्याचा निम्मा रोग पळून जातो छ. शाहू महाराजांनी अशा तऱ्हेच्या मानसिक उपायाची सुद्धा अंमलबजावणी केली असे प्रामाणिकपणे सांगावेसे वाटते. आपल्याकडे प्राचीनकाळी शेती व्यवसाय फार पवित्र मानला जात असे. राजाने अेकदा तरी वर्षातून आपल्या हाताने नांगर मारला पाहिजे असा दंडक होता. नंतरच्या काळामध्ये शेती करणे हा कमी प्रतिचा धंदा समजला गेला. महाराजांनी शेती करणे हा कसा अुत्तम धंदा आहे हे लोकांना पटवून दिले. शेतकऱ्यांची शेती कसण्याबाबत नैतिकदृष्टी महाराजांनी अुंचावली. शेतकऱ्यांची न्यूनगंडाची भावना घालविण्यासाठी महाराजांचे प्रयत्न फार मोलाचे आहेत.

दुष्काळाच्या काळात महाराजांनी जवळजवळ सर्व संस्थानचा दौरा केला व लोकांना दिलासा दिला. लोकामधील वैफल्याची भावना यामुळे नष्ट झाली व आपला तरुण राजा आपल्यासाठी निश्चित काहीतरी करणार याची त्यांना खात्री पटली सुरक्षितेची भावना महाराजांच्या प्रत्यक्ष पाहणीमुळे निर्माण झाली. याचे मोजमापन कसे करायचे? मोठ्या लवाजम्याच्या थाटात महाराजांचा दौरा नव्हता हे इथे मुद्दाम लक्षात ठेवणे आवश्यक आहे ! वास्तविक महाराज स्वतः छत्रपती. मोठ्या हत्तीवरून जरी त्यांनी पाहणी केली असती तरी ते त्या काळात शोभूनच दिसले असते! पण महाराजांनी चिखलातून, काट्याकुट्यातून, भुणकाभाकर खाऊन पायी प्रवास केला व लोकांना दिलासा दिला हे कित्येक लोकांना आश्चर्यकारक वाटेल. लोकांचा विश्वास बसणार नाही-पण ही सत्यघटना आहे! दुष्काळामध्ये किंवा कुठल्याही नैसर्गिक संकटामध्ये सर्वसाधारणपणे लोकांची मने भियरलेली असतात. महाराजांनी लोकांची मने जिंकली व निम्मा दुष्काळ

पार पळून गेला ! महाराजांनी सांगूनसवरून कधीही दौरा केला नाही. लोकांनी आपली खास व्यवस्था ठेवावी अशी कधीच त्यांची अपेक्षा नव्हती "मी स्वत: शेतकरी आहे" असे ते नेहमी म्हणत. यामुळे संस्थानमधील लोकांची नैतिक पातळी दुष्काळाला झुंज देण्यासाठी उच्च पातळीवर होती महाराज जेव्हा इंग्लंडहून परत आले त्यावेळी त्यांचे स्वागत करवीर-तर्फे झाले. त्या सत्कार समारंभात हा अठ्ठावीस वर्षाचा तरुण राजा उत्तर देतो "माझ्या संस्थानात डोकावू पहाणाऱ्या दुष्काळाच्या व प्लेगाच्या भीतीने मला अधिक दिवस राहता आले नाही"[20] कासेपारधी शाहू महाराजांना " अरेतुरे " म्हणत. राजा आपला आहे त्याला भरपूर आयुष्य देवाने द्यावे म्हणून लोकांनी उगाच नाही देवापुढे प्रार्थना, शपथा घेतल्या!

महाराजांनी मदत केंद्रावर अचानक वेळोवेळी भेट देऊन कामाची प्रत्यक्ष पाहणी केली व नवीन नवीन कामासाठी तेथेच मंजुरी दिली. व्यापाऱ्यांच्या बाबतीत त्यांची भूमिका अत्यंत वास्तव होती. कायद्याचा बडगा दाखवून व्यापाऱ्यांच्या कडून कामे होत नसतात. किंवा घिसाडघाई करून धान्याचा व्यापार विशेषत: दुष्काळात दरबारने घेण्याने प्रश्न सुटत नसतात याची पुरेपूर कल्पना महाराजांना होती.

## परिणाम-

या सर्व उपाय योजनांचा परिणाम कोल्हापूर संस्थानच्या नागरिकांवर झाला. इतर प्रांतात दुष्काळाचा प्रचंड तडाखा बसलेला असताना कोल्हापूर मध्ये दुष्काळाची तीव्रता फार कमी होती. खुद्द ब्रिटिश मुलुखात सुद्धा अशा तऱ्हेची भूमिका सरकारने घेतली नव्हती. 'समर्थ' सारख्या टीकाकारांकडून उगाच नाही महाराजांचे कौतुक झाले. ! १८९६-९७ साली महत्वाच्या अन्नधान्याच्या किंमती प्रचंड प्रमाणावर वाढल्या. त्या त्याहीपेक्षा वाढल्या असत्या पण रेल्वेने तत्परतेने म्हैसूरकडून आणलेले धान्य, महाराजांनी चौफेर तऱ्हेची उपाययोजना व कोल्हापूर संस्थानात महाराजांनी निर्माण केलेली नैतिक बैठक या अशा अनेक गोष्टींनी वस्तूंच्या किंमती परत खाली येऊ

लागल्या व सर्वांना अन्नधान्य पुरेसे मिळू लागले. त्या काळात अेकही भूक-बळी पडला नाही हे महाराजांच्या प्रशासनाचे, आर्थिक धोरणाचेवैशिष्टय ! कौटिलीय 'अर्थशास्त्रात' अेका ठिकाणी खालील प्रमाणे राजाने दुष्काळात कामे करावीत असे म्हटले आहे.

" दुर्भिक्षे राजा बीजभक्तोपग्रहं कृत्वाऽनुग्रहं कुर्यात् ।
दुर्गसेतूकर्म वा भक्तानुग्रहेण । भक्तसंविभागं वा ।
देशनिक्षेपं वा । मित्राणि वा व्यपाश्रयेत ।
कर्शनं वमनं वा कुर्यात् । "21
कष्ट कशोधन 'उपनिपात प्रतीकार :'
अध्याय ३ श्लोक ३

दुष्काळात राजाने बी-बीयाणे प्रजेला देअून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था बघावी व त्यांचा अनुग्रहकरून घ्यावा अथवा प्रजेच्या जेवणाची व्यवस्था करून त्यांच्या कडून किल्ला किंवा धरण बांधण्यच्या कामास मदत घ्यावी. ही कार्ये जमत नसतील तर त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था राजाने करावी. लोकांना दुसऱ्या ठिकाणी जेथे अन्नधान्य भरपूर आहे तेथे स्थलांतर करण्यासाठी सांगावे. हे जमत नसेल तर मित्र राज्याकडून अन्नधान्याची आयात करावी. श्रीमंत लोकांच्या कडून कराच्या रूपात पैसा-संपत्ती गोळा करावी किंवा त्यांच्या कडून प्रजेच्या हितासाठी प्रसंगी कर्जही घ्यावे व दुष्काळाशी तोंड द्यावे अशातऱ्हेचा स्वैर अनुवाद आपल्याला वरील श्लोकचा करता येईल.महाराजांच्या दुष्काळाच्या कामगिरीकडे अेक दृष्टिक्षेप टाकल्यास आपल्याला हे दिसून येईल की कुठल्याच बाबतीत महाराजांनी कुचराई केली नाही ब्रिटिशांना जे जमले नाही ते महाराजांनी कोल्हापुरसारख्या लहान संस्थानात घडवून आणले. महाराजांचा दुष्काळाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अशा तऱ्हेने फार विशाल व सर्वव्यापी असा होता, हे त्यांच्या कृतीवरून अत्यंत स्पष्ट दिसते. १९३० साली जागतिक मंदीची लाट आल्यावर ज्या यशस्वी रीतीने अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी तोंड दिले त्याच रीतीने महाराजांनी दुष्काळाला तोंड देण्याची तयारी केली. रूझवेल्टच्या !"न्यूडील" चा आपण

मोठया कौतुकाने उल्लेख करतो. त्या न्यूडीलला आर्थिक मंदीच्या काळाचा 'मॅग्नाकार्टा' असे अर्थशास्त्रात म्हटले जाते. पण त्याही आधी ३०-३५ वर्षापूर्वी महाराजानी योजिलेल्या उपायांकडे मात्र आपण द्यावे तितक्या वस्तुनिष्ठ लक्ष देत नाही दृष्टया १९३० च्या सुमारास मंदीची लाट होती व अेकोणीसाव्या शतकाच्या शेवटी दुष्काळाने भारताला वेढलेले होते. या दोन गोष्टी जरी भिन्न असल्या तरी या सगळयांची आर्थिक संकटातच गणणा होते व अशी संकटे सर्वव्यापी उपाय योजने शिवाय हटत नाहीत हेही कटू सत्य आहे. महाराजांच्या वरील अुपाययोजनेकडे पाहिल्यास त्यांच्या दूरगामी आर्थिक धोरणाचे प्रतिबिंब दिसल्यावाचून राहणार नाही. यामध्ये त्यांना संपूर्ण यश मिळाले असा दावा आपल्या करता येत नाही. यशापयश नुसते धोरण ठरवून व त्याची अंमलबजावणी करून ठरत नसते. लोकांच्या सहकार्यावर त्याकाळच्या सामाजिक, राजकीय, नैसर्गिक परिस्थितीवरून ठरत असते नाहीतरी अध्यक्ष रूझवेल्टची कृती शंभर टक्के यशस्वी झाली असे इतिहास सांगत नाही. राज्यकारभाराचा विशेष अनुभव नसताना, तरूण वयात सामाजिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असताना राजकीय वातावरण गढूळ असताना, महाराजांनी वरील अुपाययोजना अंमलात आणली हे पाहाता अजूनही आपल्याला कितीतरी शिकण्यासारखे त्यांच्या विचारात व कृतीत दिसते असेच म्हणावे लागेल.

पुढे दिलेल्या निरनिराळया तक्त्यावरून महाराजांच्या दुष्काळात केलेल्या विशाल कार्याची कल्पना येईल.

## तक्ता नं. ३

## गरिबांसाठी केलेल्या आश्रमावरचा खर्च व इतर माहिती

| अ. नं. | गरिबांच्या आश्रमांचे ठिकाण | पेटा किंवा महाल | आश्रमात जेवन घेतलेल्या लोकांची संख्या | खर्च रु. आ. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | कटकोळ | कटकोळ महाल | २,२१६ | १३१-०७-१० |
| २ | पन्हाळा | पन्हाळा पेटा | ६,०४४ | ४५६-११-११ |
| ३ | बोबवडा | पन्हाळा पेटा | ६,७८५ | ४०४-१०-०९ |
| ४ | बाजार भोगांव | पन्हाळा पेटा | १२,६८८ | ८१८-१५-१० |
| ५ | गारगोटी | भुधरगड | ३,९१२ | १८८-०६-०८ |
| ६ | वळीवडा | भुधरगड | ३४१ | २३-१०-०२ |
| ७ | तिरवडा | भुधरगड | १६८ | ७-०५-०४ |
| ८ | गडहिंग्लज | गडहिंग्लज | ७५२ | ३३-०५-०६ |
| ९ | कोल्हापूर | करवीर पेटा | १५,८७९ | १,४२८-०१-०८ |
| | | एकूण - | ४८,७८५ | ३,३९२-१३-०६ |

( Source – Administrative Report 1896-97. P. 75 )

## तक्ता नं. ४

## १८९६–१८९७ सालच्या दुष्काळ निवारण कार्याची माहिती

| अ. नं. | कामाचे प्रकार | सुरवात केल्याची तारीख | मंजूर केलेली रक्कम रु. | खर्च रु. | सरासरी कामगारांची संख्या | कामासाठी लागलेले दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| (अ) | नवीन रस्ते तयार करणे व जुने रस्ते दुरुस्त करणे | | | | | |
| १ | परिते ते टिपकुर्ली रस्ता | २८-५-९७ | – | १६३ | ८२ | १४ |
| २ | कालजवडे ते कोळीक रस्ता | १२-५-९७ | ३१८७ | ७१८ | २०४ | २८ |
| ३ | कोडोली ते कोल्हापूर अंबा जोडणारा नवीन रस्ता | १४-३-९७ | – | ११४६९ | ९६९ | ८४ |
| ४ | कोल्हापूर अंबा रस्त्याला जोडणारा पन्हाळा बुधवार पेठ ते अंबवडा नवीन रस्ता | ८-३-९७ | ६१०१ | १९९८ | २१३ | ७७ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | गडहिंग्लज ते नेसरी नवीन रस्ता | २७-५-९७ | — | २१० | १४२ | १४ |
| ६ | कापशी ते गडहिंग्लज नवीन रस्ता | ३-६-९७ | — | २१ | २४ | ७ |
| ७ | गारगोटी ते पाटगांव नवीन रस्ता | १-३-९७ | — | १२९३७ | ८८ | ९८ |
| ८ | मांजरे खिंड ते भंडाना जुन्या रस्त्याची दुरुस्ती | १४-४-९७ | — | १०४८ | १३७ | ५६ |
| ९ | सलहल्ली ते सालापूर नवीन रस्ता | १-४-९७ | — | ५०४७ | ६१२ | ७० |
| १० | काळे ते अणुस्कूरा जुना रस्ता दुरुस्ती | ७-३-९७ | ८००० | ४७०२ | ४०० | ९१ |
| ११ | कापशी-पिशवी रस्त्यावर खास दुरुस्ती | २८-३-९७ | — | २८ | १५ | १४ |
| १२ | बोरिवडा ते कोल्हापूर अंबा रस्ता जोडणारा—खास दुरुस्ती | ९-५-९७ | २८० | २०० | ८९ | १४ |
| १३ | दाजीपूर धर्मशाळा ते भंडाना रस्त्यावर खास दुरुस्ती | १९-४-९७ | — | २४६ | ४५ | ४२ |
| १४ | तीन दरवाजा ते पन्हाळा रस्त्यावर खास दुरुस्ती | १६-४-९७ | २००० | १६०४ | ९३ | १४० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | कापशी–गडहिंग्लज रस्त्याची पाहणी. | २५-४-९७ | – | ३१ | १० | १४ |
| | (ब) रस्त्यासाठी खडी फोडण्याचें व गोळा करण्याचे काम. | | | | | |
| १६ | कोल्हापुरच्या आसपासच्या रस्त्यासाठी | १४-४-९७ | २७४७ | २४०४ | ३३४ | ५६ |
| १७ | कोल्हापूर तें कळे रस्त्यासाठी | ६-१-९७ | ४१७९ | ६४९३ | ३०९ | १५४ |
| १८ | कोल्हापूर-अंबा रस्त्यासाठी | २१-११-९६ | ५६५९ | ३२३६१ | १८३० | १३३ |
| १९ | पन्हाळा ब्रँच रस्त्यासाठी | २९-११-९६ | ९९८ | ९१६ | २२१ | २८ |
| २० | पन्हाळा ते आवळी, नावली, वाघोळी इ. रस्त्यासाठी | १०-१-९७ | २०८ | २७ | १७ | १४ |
| २१ | प्रयाग रस्त्यासाठी | ९-३-९७ | ७९५ | ६८४ | ११४ | ४२ |
| २२ | ज्योतिबा डोंगर-रस्त्यासाठी | १७-१-९७ | १६१३ | १६१४ | १७२ | ७७ |
| २३ | कोल्हापूर-मिरज रस्त्यासाठी | २१-३-९७ | ८३०६ | १२९२७ | १००८ | ९१ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २४ | संकेश्वर-खोरटवाडी रस्त्यासाठी | १-१-९७ | ५३५३ | ५०३२ | २१० | १६१ |
| २५ | कापशी ते लिंगनूर रस्त्यासाठी | १-१-९७ | १६०१ | १११७ | ११८ | ११९ |
| २६ | निपाणी-दाजीपूर रस्त्यासाठी | १-१-९७ | १५००० | १९४३४ | ५६९ | १६१ |
| २७ | कोल्हापूर-गैबीखिंड रस्त्यासाठी | १-१-९७ | ८८७० | १६८२२ | ८६० | १४७ |
| २८ | कोल्हापूर-भुधरगड रस्त्यासाठी | १-१-९७ | ६८०५ | ९३५२ | ३६६ | १५४ |
| २९ | कोल्हापूर-गगनबावडा रस्त्यासाठी | ४-४-९७ | ३९५० | १३४० | १३७ | ६३ |
| ३० | नसलापूर-कंकणवाडी रस्त्यासाठी | १-२-९७ | ६६५३ | ९६ | ६ | ५६ |
| ३१ | रायबाग स्टेशन ते चिंचली रस्त्यासाठी | १-२-९७ | २६६१ | १५१० | ८२ | ११९ |
| ३२ | रायबाग स्टेशन ते रायबाग रस्त्यासाठी | २९-५-९७ | १६६३ | २५२ | २३४ | ७ |
| ३३ | कटकोळ-चंदरगी रस्त्यासाठी | १-१२-९६ | ११६४ | १४९७ | १३७ | १०५ |
| ३४ | तोरगळ-रामदुर्ग रस्त्यासाठी | १-१२-९६ | १५८० | १७३६ | १६३ | १०५ |
| ३५ | कटकोळ-सलहल्ली रस्त्यासाठी | १-१२-९६ | ५७५२ | ५६२६ | ३३५ | १५४ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३६ | सलहल्ली–सुनाल रस्त्यासाठी | ७-१२-९६ | ३०२० | ७७९५ | ४७४ | १४७ |
| ३७ | कटकोळ–तोरगळ रस्त्यासाठी | ७-१२-९६ | १७४६ | २२१० | १७८ | ११२ |
| ३८ | कटकोळ–यरगट्टी रस्त्यासाठी | २७-१२-९६ | १४३५ | ९७१ | १६५ | २१ |
| ३९ | वेळगाव–बागलकोट रस्त्यासाठी | ४-१-९७ | ६६५ | १२१५ | १६६ | ७० |
| क) | नवीन तलाव बांधणे व जुन्याची दुरुस्ती करणे. | | | | | |
| ४० | कळंबा तलावाची दुरुस्ती | २७-४-९७ | — | ६५५३ | १३९७ | ३५ |
| ४१ | वडिंगा तलावाची दुरुस्ती | २३-२-९७ | ४१०६ | ७८९२ | ६११ | ९१ |
| ४२ | निगवे तलावातील गाळ काढणे | ७-३-९७ | १७७८ | ४७० | ५०७ | ४२ |
| ४३ | सरूद तलावाची दुरुस्ती | ५-३-९७ | ५७३१ | ७१६९ | ५८९ | ९८ |
| ४४ | शाहापूर जवळ नवीन तलावासाठी | ४-४-९७ | — | १४०२ | १६९ | ५६ |
| ४५ | भेंडसगाव तलावाची दुरुस्ती | २६-१२-९६ | ३८४८ | ५२८१ | २६४ | १६८ |

| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ४६ | कोटोली तलावातील गाळ काढणे | ४-४-९७ | १००० | ७७४ | ११६ | ५६ |
| ४७ | सोनवडा तलावाची दुरुस्ती | २८-३-९७ | १८७४ | १४८३ | २६७ | ४९ |
| ४८ | बांबवडा जवळ नवीन तलावासाठी | — | — | ७१ | २८ | २१ |
| ४९ | वडगाव जवळ नवीन तलावासाठी | १५-४-९७ | १,१७,३८७ | ५३३९ | ११६ | ५६ |
| ५० | अतिम्रे तलावाची दुरुस्ती | २-५-९७ | — | १५६० | ३१२ | ३५ |
| ५१ | रायबागच्या अबू तलावाची दुरुस्ती | १९-३-९७ | ३०७८ | २४३८ | २१५ | ८४ |
| ५२ | कटकोळ तलावाच्या बाकणाची दुरुस्ती | १-१२-९६ | १०५० | ९४४ | १४९ | ६३ |
| ५३ | कटकोळ तलावाची दुरुस्ती | २०-१२-९६ | ६२२१ | ३३५८ | १५७ | १५४ |
| ५४ | बानूर तलावाची दुरुस्ती | १-१२-९६ | २५७३ | २५५९ | १८३ | ११९ |
| ५५ | सुलेकेरी तलावाची दुरुस्ती | ३-१-९७ | ४२०० | ४१३३ | ४५० | ९१ |
| ५६ | पडेगिरी तलावातील गाळ काढणे | ९-१२-९६ | ६१०५० | ९८४ | १९२ | ४२ |
| ५७ | तोरणगट्टी तलावातील गाळ काढणे | १६-१२-९६ | २९६४ | ३३७९ | ३४१ | ९१ |

| [illegible] | [illegible] | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५८ | विजकुपी तलावातील गाळ काढणे | १६-३-९७ | ४२० | ३६८ | १६१ | २१ |
| ५९ | कटकोळ-पडगिरी तलावातील वाकण वळविण्यासाठी | ४-४-९७ | ५२५ | ४६८ | ५२ | ६३ |
| ६० | बनूर तलावातील वाकणाची दुरुस्ती | १९-४-९७ | ४८४ | २७४ | ४३ | ४९ |
| ६१ | कटकोळच्या पडगिरी तलावातील गाळ काढणे | ११-४-९७ | १५७५ | १५४२ | २८१ | ४९ |
| ६२ | तोरगळ तलावाची दुरुस्ती | १-६-९७ | ३२९२ | २०३ | २४१ | ७ |
| ६३ | वाशी तलावाची दुरुस्ती | २३-१२-९६ | १००० | ७१६ | ८२ | ८४ |
| ३४ | तिमापूर तलावाची दुरुस्ती | २-५-९७ | ५०० | २७० | ४१ | ३५ |
| ६५ | वेलवडे तलावाची दुरुस्ती | ८-५-९७ | १०० | ३७ | १५ | २१ |
| (ड) | निवडुंगाची कापणी | | | | | |
| ६६ | कटकोळ जवळच्या निवडुंगाची कापणी. | ६-१-९७ | २००० | १९४१ | १६८ | १०५ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ६७ | कटकोळ-रामदुर्ग रस्त्याच्या बाजूच्या निवडुंगाची कापणी | १६-१-१७ | २५०० | २४७८ | २१३ | ८४ |
| ६८ | बानूर जवळच्या निवडुंगाची कापणी | २४-१-१७ | २००० | १८७५ | १३१ | १३३ |
| ६९ | कटकोळ-सलहल्ली रस्त्याच्या बाजूच्या निवडुंगाची कापणी | ११-४-१७ | २०३७ | २०३१ | ३२२ | ४९ |
| ७० | तोरगळ नवी पेठ ते नदीपर्यंतच्या रस्त्यावरील निवडुंगाची कापणी | २१-४-१७ | १०० | १०० | २० | ३५ |
| **(इ)** | **विहीरी** | | | | | |
| ७१ | पन्हाळा पेट्यातील पन्नास खेड्यातील विहिरीतील गाळ काढणे | ४-४-१७ | २५० | १९ | १० | १४ |
| ७२ | कटकभावी मधल्या विहिरीची दुरुस्ती | १-२-१७ | ४५५ | २३४ | १० | १२६ |
| ७३ | ब्याकूड-विहीर दुरुस्ती | ८-३-१७ | २०० | १३९ | ७ | ९१ |
| ७४ | रायबागा-विहीर दुरुस्ती | २१-४-१७ | २०० | ३५ | ४ | ४९ |
| ७५ | बांडळ-विहीर दुरुस्ती | २५-४-१७ | १०० | ९० | ७ | ३५ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ७६ | बानूर (नागरभावी) विहिरीतील गाळ काढणे | १८-२-९७ | १०० | १४० | ९ | ५६ |
| ७७ (३) | चिलमूर-विहिरीची दुरुस्ती | २६-२-९७ | १५० | १५० | ११ | ७० |
| ७८ | गुडगोप– विहिरीची दुरुस्ती | २४-२-९७ | ५० | ५० | ३ | ४१ |
| ७९ | चंदरगी विहिरीची दुरुस्ती | २४-२-९७ | ४३० | ४३४ | ११ | ९८ |
| ८० | कसबा चंदरगी विहिरीची दुरुस्ती | २१-३-९७ | १३० | १४९ | १० | ४२ |
| ८१ | कटकोळच्या मारवाधावी विहिरीचा गाळ काढणे | १२-३-९७ | ५ | ५ | ३ | १४ |
| ८२ | कटकोळच्या फकीराच्या विहिरीचा गाळ काढणे | ९-३-९७ | १० | ७ | ३ | १४ |
| ८३ | केसरगोर मधील सर्व्हे नंबर दोन मधल्या खळग्यात साठलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी | १६-३-९७ | ५० | ४८ | ५ | ३५ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ८४ | कटकोळच्या तीर्थभावीतील गाळ काढण्यासाठी | १४-३-९७ | १०० | १०० | ९ | ३५ |
| ८५ | कटकोळच्या दरूरभावीतील गाळ काढणे | १५-३-९७ | १५० | १५० | १७ | ४० |
| ८६ | कक्कोळ मधील झांजीभट्टी विहिरीची दुरुस्ती | २२-३-९७ | २०० | १३३ | ३० | ५६ |
| ८७ | कटकोळ मधील वाण्याच्या विहिरीतील गाळ काढणे | २४-३-९७ | १०० | ९९ | ९ | २८ |
| ८८ | चिलमूर व सूनाल सरहद्दीवरील विहिरीची दुरुस्ती | २८-३-९७ | २१० | २१० | ८ | ७० |
| ८९ | कटकोळच्या पट्टणशेट्टी विहिरीतील गाळ काढणे | २-४-९७ | १५ | १५ | ५ | १४ |
| ९० | कटकोळच्या तोलगीभावी विहिरीची दुरुस्ती | ४-४-९७ | २०० | १९८ | २९ | ४२ |
| ९१ | कटकोळच्या भंग्यांच्या विहिरीची दुरुस्ती | ५-४-९७ | १०७ | ९९ | ३६ | ४२ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ९२ | कटकोळच्या धोब्यांच्या तीन विहिरींची दुरुस्ती | ४-४-९७ | ७५ | ७४ | २३ | २१ |
| ९३ | सिदनाळ मधील विहिरीची दुरुस्ती | ७-४-९७ | ५० | ४९ | ६ | ३५ |
| ९४ | तोटगट्टी मधील विहिरीची दुरुस्ती | ४-४-९७ | ५० | ५० | १० | २८ |
| ९५ | कटकोळच्या बेफनभावी विहीरीची दुरुस्ती | १३-४-९७ | २०० | १९७ | ६४ | २१ |
| ९६ | बिडकी मधील विहीरीची दुरुस्ती | २०-४-९७ | ५० | १० | ८ | ७ |
| ९७ | कटकोळमधील महारांच्या विहिरीची दुरुस्ती | २०-४-९७ | १०० | १०० | २७ | २१ |
| ९८ | कटकोळच्या हुरगुनभावी विहिरीची दुरुस्ती | २-५-९७ | १०० | ६८ | ६ | २८ |
| ९९ | खानपेटधातील कावडेभावी विहीर दुरुस्ती | ३०-५-९७ | १५० | ९ | ८ | ७ |
| १०० | तोरगळ किल्ल्यावरील विहिरीची दुरुस्ती | १-६-९७ | २३६ | ९ | ४ | ७ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १०१ | कटकळ मधील हणमंद पेट्यातील महातांच्या विहिरीची दुरुस्ती | ३०-५-९७ | २०० | २६ | १३ | ७ |
| १०२ | तोरगळच्या नवी पेठमधील सिताराम विहिरीची दुरुस्ती | २-६-९७ | १४४ | १८ | २० | ७ |
| १०३ | तोरगळच्या नवी पेठमधील मशिदी समोरच्या विहिरीची दुरुस्ती | ३०-५-९७ | १२४ | १० | १० | ७ |
| १०४ | म्हाकवे मधील विहिरीची दुरुस्ती | १३-५-९७ | १०० | ११ | ९ | १४ |
| १०५ | सोंडूर मधील दोन विहिरींची दुरुस्ती | २४-२-९७ | २०० | १८९ | २५ | ५६ |
| **(ई) झरे खोदणे—इत्यादी** | | | | | | |
| १०६ | बांवबडघाच्या नाल्यामध्ये झरा खोदणे | १४-२-९७ | १०० | १७ | ११ | ७ |
| १०७ | गोडचीच्या ओढ्यात झरा खोदणे | १७-२-९७ | ५० | ५० | ९ | २८ |
| १०८ | कमनकोप माजरे हासूर येथे झरा खोदणे | ३१-३-९७ | १०० | १०० | ४ | ५६ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १०९ | पन्हाळा पेट्यात त्रेसष्ठ खेड्यात नद्यांना बांध | १५-२-९७ | ६०० | ८६ | १०० | ७० |
| ११० | संस्थानातील जंगलाची हद्द आखणे | २-५-९७ | १४००० | १३९ | २९ | २८ |
| | ✱ इतर बाबींवरचा खर्च :- | | | २० | | |
| | एकूण— | | | रु. २,४२,५७७ | | |

✱ रिपोर्टमध्ये दाखविला नाही. पण एकूण बेरीज बरोबर येण्यासाठी घेतलेला आहे.

( Source :– Administrative Report 1896--97 – Pages 72 to 75 )

## दुष्काळ निवारण कार्यावर केलेला खर्च

( १८९६–९७ व १८९७–९८ या दोन वर्षांत )

| अ. नं. | कामाचे स्वरूप | खर्च रुपये |
|---|---|---|
| १ | रस्त्यासाठी खडी फोडण्याचे व गोळा करण्याचे काम | १,३०३९० |
| २ | नवीन रस्ते बांधणे | १,३७३९१ |
| ३ | तलावाची दुरुस्ती व सुधारणा | ७७१९२ |
| ४ | नव्या तलावाची बांधणी | १२२११ |
| ५ | काटेरी निवडुंगाचे निर्मूलन | १४३१५ |
| ६ | क्वारंटाईन कॅम्पमधील कार्याचा खर्च | ७२४४ |
| ७ | सहाय्यक कामे (पाण्याचे नळ पुरवठा करणे इ.) | ४७५५ |
| ८ | इतर दुष्काळी कामावर केलेला खर्च | ३०७३९ |
| | एकूण — | ४,१४,२३९ |

( टीप :— १०० घनाकार फुटास रु. ४–१५ आणे व सरासरी दर मैलास रु. १८३२ असा खर्च आला.)

## दुष्काळाशी झुंज देण्यासाठी केलेला निरनिराळ्या बाबींवरचा खर्च
(१८९६-९७ व १८९७-९८ या दोन वर्षांत केलेला)

| अ. नं. | कामाचे स्वरूप - घटकाचे नांव | खर्च रुपये |
|---|---|---|
| १ | दुष्काळ निवारण कार्यावरचा खर्च | ४१४२३७ |
| २ | काम न करणाऱ्या लहान मुलांना दिलेली मोफत मदत | ७६१०९ |
| ३ | गरिबांच्या आश्रमावरचा खर्च | २९९०८ |
| ४ | खेड्यात वाटलेला शिधा | ६८२८ |
| ५ | कमी पगार घेणाऱ्या नोकरांना धान्याच्या स्वरूपात मोबदला | ४१८७१ |
| ६ | कोल्हापुरमधील धान्य दुकानाच्या हमी निधीला दिलेला वाटा | ९६१५ |
| ७ | गरीब विद्यार्थ्यांसाठी स्वस्त खानावळीवर केलेला खर्च | ९९१ |
| ८ | आस्थापनावरील खर्च | २०१६१ |
| ९ | इतर ( यंत्र सामग्री, साधने इ. ) | ३३७९० |
| | एकूण :— | ६३३५१० |

( Source :— Administrative Report 1897-98 P - 73 to 75 )

## संदर्भ

1. Report of the Commission of Famine in Bengal, Bihar and Orissa 1867 P III, Para 63
2. Report on the General Administration of Kolhapur State 1896-97 P· 72
3. " श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र " आ. बा. लठ्ठे १४४
4. " श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र " आ. बा. लठ्ठे ११७
5. Report on the General Administration of Kolhapur State 1896-97 P. 69
6. Report on the General Abiministration of Kolhapur State 1896-97 P. 75 76
7. " राजर्षि छत्रपति श्री शाहू महाराज यांच्या आठवणी " माधवराव बागल २११, २१२, २१३
8. Report on the General Administration of Kolhapur State 1896-97 P. 76
9· Report on the General Administration of Kolhapur State 1899—1900 P.6I
10 Report on the General Administration of Kolhapur State 1896-97 P.76
11. Report on the General Admidistration of Kolhapur State 1896-97 P.75
12. Report on the General Administration of Kolhapur state 1896-97 P 75

13. Payment By Results-I. L. O. Geneva Fourth Impression 1959 P. 177

14. Report on the General Administration of Kolhapur State 1899–1900 P. 62

15. श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र आ. बा. लठ्ठे ११७

16. Report on the General Administration of Kolhapur State 1896–97 P. 67

17. ' कौटिलीय अर्थशास्त्र " वाचस्पती गैरोला १९६२-६४१

18. Report on the General Administration of Kolhapur State 1897-98 P. 73, 74

19. Report on the General Administration of Kolhapur State 1899–1900 P. 61

20. " श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र " आ. बा. लठ्ठे २०५

21. " कौटिलीयं अर्थशास्त्रम् " पा. रा. शास्त्री ३३८,३३९

★ ★

# सार्वजनिक आयव्यय

"The prince should seek his happiness in the happiness of his subjects and his welfare in theirs. His good is not what pleases himself but what pleases his subjects

—Manusmruti

## तात्विक विवेचन—

अर्थशास्त्रातील सार्वजनिक आयव्यय या क्षेत्राला २० व्या शतकात विशेष महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. तत्पूर्वी या क्षेत्राचा अभ्यास केला जात होता. परंतु ज्या चष्म्यातुन या भागाचा विचार केला गेला तो दृष्टीकोनच वेगळा होता. ॲडॅम स्मिथ पासून अर्थशास्त्राचा एक सुसंगत, व्यावहारिक, सर्वव्याप्त असा विचार केला गेला. स्मिथ, रिकार्डो इ. अर्थशास्त्रज्ञ हे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणून गणले जातात. त्यांच्या मतानुसार राज्याने आपला खर्च कमीतकमी ठेवायचा. राज्याची कल्पनाच मुळी पोलीस स्टेट (police state) या तत्वाशी निगडीत होती. शासनाची किमान काही कर्तव्ये होती. तीच फक्त शासनसंस्थेने पाळायची. बाकीच्या बाबतीत निर्हस्तक्षेपाचे धोरण ठेवायचे. शासनाने कमीतकमी ढवळ.ढवळ प्रजेच्या व्यवहाराबाबत करायची. सर्व काही निर्णय खाजगी विभागावर

सोपवले जात. किंमती, मूल्य, अंतर्गत व्यापार, आंतरराष्ट्रीय व्यापार इ. सर्वच क्षेत्रावर निर्हस्तक्षेपाचे(Laissez faire)तत्व स्वीकारलेले होते. सरकारची भूमिका किमान पातळीवर होती. इतर देशांकडून आक्रमण झाल्यास त्यापासून देशातील लोकांचे संरक्षण करणे, अंतर्गतदृष्टया कायदा व सुव्यवस्था यांचे राज्य ठेवणे, म्हणजेच अंतर्गत शांतता ठेवणे व जी कामे खाजगी व्यक्तींना पार पाडता येणार नाहीत ती सार्वजनिक सोयीची कामे करणे एवढेच मूलभूत कार्य फक्त शासन संस्थेने पार पाडायचे होते. अशावेळेस जितका सरकारी खर्च कमी, जितका सरकारी कर कमी, जितके सरकारी कर्ज कमी तेव्हढे चांगले, तीच शासनसंस्था चांगली अशी सनातन-वादी अर्थशास्त्रज्ञाची भूमिका होती. सरकारने आपले अंदाजपत्रक हे नेहमी संतुलित-संमतोलित 'Balanced ठेवायचे. उत्पन्नापेक्षा खर्च कधीही वाढू द्यायचा नाही अशी विचारसरणी होती. आणि ह्यामुळेच व्यक्तीचे हित, कल्याण साधले जाणार आहे अशी समजूत होती. परंतु ही भूमिका अगदी टोकाची होती. आधुनिक काळात हा काटा दुसऱ्या टोकाला आता झुकलेला दिसून येतो. आता सर्वसाधारणपणे असे तत्व संमत झाले आहे की, समाजाचा कारभार सुरळीतपणे चालण्यास जे जे काही आवश्यक आहे ते ते सर्व सामाजिक सेवामध्यें येते व ते ते सर्व सरकारने करावे. हा बदल एकदम घडून आलेला नाही. काही जागतिक महत्वाच्या, काही अंतर्गत आर्थिक घटना,अशा काही घडूनआल्या की त्यामूळें अर्थशास्त्रज्ञांच्या व शासनसंस्थेच्या विचार प्रणालीत बदल झालेला आढळून येईल. पहिले महायुद्ध, १९२९-३० ची जागतिक मंदी,दुसरे महायुद्ध,व्यापार चक्राच्या तेजी व मंदी या अवस्था, चलनवाढ व भाववाढ यांचा जगातील सगळ्या देशांपुढे ठाकलेला प्रश्न,या सर्वांना तोंड देण्यासाठी, त्याचे वाईट परिणाम निपटून काढण्यासाठी शासन संस्थेने आपली नकारात्मक भूमिका बदलायला हवी व विधायक भूमिका समाजाच्या कल्याणासाठी स्वीकारायला हवी, याची जाणीव निर्माण झाली. आणि त्यातूनच कल्याणकारी राज्याचा (Welfare State)जन्म झाला. सध्या जगातील जवळजवळ सर्वच राष्ट्रांनी प्रजेच्या कल्याणाचे ध्येय स्वीकारले आहे आणि प्रजेच्या आर्थिक कल्याणासाठी जे जे काही शासन

संस्थेला करणे शक्य आहे ते ते सर्व शासनसंस्थेने केले पाहिजे अशी भूमिका स्विकारली आहे. त्यामुळे सरकारचे हात प्रत्येक आर्थिक घडामोडी-पर्यंत पोचलेले आपल्याला दिसून येतात. निर्हस्तक्षेपाचे धोरण जाऊन त्याची जागा आता हस्तक्षेपाच्या धोरणाने घेतलेली आहे. आधुनिक काळात आपल्याला असे दिसून येते की, जवळ जवळ प्रत्येक बाबतीत, प्रत्येक व्यवहारात, प्रत्येक घडामोडीत, प्रत्येक व्यवसायात सरकारने हस्तक्षेप केलेला आहे. शासनसंस्थेने दिवसेदिवस जास्तीत जास्त कार्य अंगीकारा-यचे ठरवलेले आहे. सरकारचे कार्यक्षेत्र वाढतच चालले आहे व त्यात जास्त विविधता येत आहे. अर्थव्यवस्थेतील नैसर्गिक संपत्तीचे व उत्पा-दनाच्या घटकांचे योग्य वाटप करण्यासाठी, आर्थिक विषमता कमी करण्या-साठी, आर्थिकदृष्टया दुबळया घटकांना संरक्षण देण्यासाठी, ज्या वेळेला एखाद्या विशिष्ठ क्षेत्राकडे खाजगी क्षेत्र आकर्षित होत नाही त्या वेळेला त्या क्षेत्रात व्यवसाय सुरू करण्यासाठी, सार्वजनिक सेवा पुरविण्यासाठी, उपभोक्तक्र्यांना संरक्षण देण्यासाठी, बेकारी व भाववाढ कमी करण्यासाठी सरकारने वेगवेगळया क्षेत्रात पुढाकार घेतला आहे. पोलीस स्टेट मधील नकारात्मक कार्याबरोबरच आधुनिक सरकार शासकीय, सामाजिक, आर्थिक आणि व्यापारी कार्य पार पाडीत असते. सामाजिक न्याय घडवून आणण्यासाठी सार्वजनिक आयव्यय हे महत्वाचे अस्त्र गणले जाते. श्रीमंत व गरीब यांच्यामधील विषमतेतील दरी भरून काढण्यासाठी सार्वजनिक आयव्यय या क्षेत्राचा वापर केला जातो. अशा ह्या सार्वजनिक आयव्ययात राज्याचे उत्पन्न व खर्च याचा अभ्यास केला जातो. राज्याचे उत्पन्न कोण-कोणत्या मार्गाने मिळवले जाते व ते कसकसे खर्च केले जाते हे तपासणे जास्त महत्वाचे आहे. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते अंदाजपत्रक अगदी छोटे ठेवणे, ते समतोलीत ठेवणे केवळ उत्पादक कार्याकरिताच कमीत कमी कर्ज काढणे, सार्वजनिक कर्जाची लवकरात लवकर फेड करणे, इत्यादी तत्वे आदर्श मानली जात असत.

परंतु ह्या सनातन तत्त्वावर लॉर्ड केन्स ह्या आधुनिक अर्थशास्त्र-ज्ञाने कडाडून हल्ला चढविला. व्यापारचक्राच्या मंदीच्या अवस्थेत तुटीचे-

अंदाजपत्रक हे वाईट तर नसतेच उलट उत्पादन व रोजगारीची पातळी वाढवण्यास ते मदत करते. याशिवाय ज्या वेळेला उत्पादनाचे घटक मोकळे, बेकार पडून असतात त्या वेळेलाही सरकारने जास्त खर्च करणे आवश्यक आहे. कॅन्सने अर्थशास्त्रीय तत्वात फार मोठी क्रांती घडवून आणली. त्या विचार प्रवाहामुळे सार्वजनिक आयव्ययाचे कार्यक्षेत्र निश्चितच रुंदावले आहे.

विकसित आणि विकसनशील दोन्ही राष्ट्रातही सार्वजनिक आयव्ययाला फार महत्वाची भूमिका पार पाडायची असते. विशेषतः विकसनशील देशात आर्थिक विकासाला चालना देण्यात, ती घडवून आणण्यात रचनात्मक कार्य शासनसंस्थेला करावयाचे असते. आणि हे सर्व घडवून आणण्यासाठी शासनसंस्थेला सार्वजनिक आयव्यय या आर्थिक क्षेत्राचाच उपयोग करावा लागतो. उत्पादनाचे घटक मोकळे पडून असतात, त्यांचा वाजवी उपयोग करून घ्यायचा असतो. खाजगी क्षेत्राला मर्यादा असतात. तंत्रज्ञान अपेक्षेनुसार नसते. वाहतूक वळणवळणाचीची सुधारणा झालेली नसते. शक्ती व पाटबंधारे यांची वाढ त्वरित घडवायची असते. शेती उत्पादन व औद्योगिक उत्पादन वाढवावयचे असते शेतीचे आधुनिकीकरण करायचे असते. राष्ट्रीय उत्पादनाच्या मानाने बचत कमी असते. यामुळे भांडवल गुंतवणूक कमी असते. या सर्व जबाबदाऱ्या सरकारला अेकाच वेळी अंमलात आणायच्या असतात. या सर्वांचा रोख लोकांचे जीवनाचे राहणीमान वाढवणे या लक्ष्यावर असतो. अशातऱ्हेने आधुनिक काळात सार्वजनिक आयव्यय महत्वाचा ठरतो.

## महाराजांची कारकीर्द—

महाराजांच्या वेळेला भारतात परकियांचे ब्रिटिश सरकार होते. त्यावेळेला आधुनिक आर्थिक विचारांना भारतात तरी चालना मिळालेली नव्हती. ब्रिटिश सरकारच्या अंमलाखाली हिंदुस्थान असल्याने हिंदुस्थानची आर्थिक वाढ, हिंदुस्थानमधील लोकांचे जीवनाचे राहणीमान

वाढवणे वगैरे ध्येये तत्कालीन ब्रिटिश सरकारची असणे शक्यच नव्हते. त्यात महाराज ब्रिटिश संस्थानिक होते. त्यामुळे संस्थानची भरभराट त्यांच्याच कर्तृत्वावर अवलंबून होती. संस्थानचे उत्पन्न कसकसे मिळत होते व महाराज ते खर्च कशावर करत होते यावरच संस्थानचा कारभार अवलंबून होता. महाराजांना ब्रिटिश सरकारचा अंकुश सहन करावा लागे. परंतु संस्थानच्या आर्थिक विकासाच्या बाबतीत ब्रिटिशांची मदत काहीच मिळत नव्हती. टीकाकार चोहोबाजूंनी टिकेच्या तोफा डागून बसलेलेच होते. इतर संस्थानिकांप्रमाणे महाराजांनी आपल्या विलासासाठी हा पैसा कारणी लावला असता तर ते तत्कालीन संस्थानिकांच्या परंपरेला अनुसरूनच झाले असते. परंतु आतापर्यंतच्या आपल्या विवेचनात वारंवार याचा उलेख येऊन गेला की, त्यावेळच्या संस्थानिकांपेक्षा महाराज अनेक बाबतीत खूपच वेगळे होते. त्यांनी प्रजेच्या सुखात आपले सुख पाहिले होते. प्रजेचा ऐहिक उत्कर्ष करणे हे त्यांनी आपले ध्येय ठरवले होते. प्रजेच्या जीवनाचे राहणीमान वाढवयाचे हे त्यांनी ठरवले होते. आणि मग त्यांनी आपले सर्व मार्ग त्या बाजुला वळवले होते. ही जबाबदारी त्यांच्यावर कोणी लादली नव्हती आणि जबाबदारी लादल्यावर ती कोणी मनापासून पार पाडत नसतो. पण ही कार्ये त्यांनी आपण होऊन स्वीकारली होती. त्यामुळे स्वयंस्फूर्तीने अनेक कार्यकर्ते हाताशी धरून लोक जागृती करून स्वतः जातीने लक्ष घालून त्यांनी आपल्या २८ वर्षांच्या कारकिर्दीत संस्थानची साधन सामग्री सत्कारणी लावली. त्यांच्यासमोर काही कोणी सार्वजनिक आयव्ययाचे प्रकरण, त्याचे आधुनिक काळातले महत्व वाचून दाखवले नव्हते. परंतु ही जबाबदारी महाराजानी आधुनिक काळात महत्वाची ठरावी अशातऱ्हेने पार पाडली. भांडवल गुंतवणूक व मानवी गुंतवणूक या दोन्ही बाबतीत महाराजांनी सारखेच लक्ष पुरवले, संस्थानातील साधन सामग्री कार्यक्षमतेने वापरण्याचा प्रयत्न केला. निसर्ग निर्मित संकटाच्यावेळी संस्थानतर्फे खर्च वाढवला. अन्नधान्याच्या

किमती वाढल्या तेव्हा वाजवी किमतीला अन्नधान्य पुरविले, दुष्काळ भत्ता दिला, शिक्षण, वैद्यकीय मदत, मनोरंजन यावर भरपूर खर्च केला. अशातऱ्हेने संस्थानचे उत्पन्न त्यांनी खर्च केले. काही वेळेला खाजगीतून हा खर्च पुरविला. याशिवाय पहिल्या महायुद्धात युद्धकर्ज उभे करण्यातही महाराजांनी हिरिरीने भाग घेतला होता. याचाच अभ्यास आपल्याला इथे करायचा आहे. संस्थानचा व जहागिरींचा खर्च व उत्पन्नाचा तक्ता प्रकरणाच्या शेवटी माहिती करिता दिलेलाच आहे.

महाराजांनी ज्या वेळेला अधिकारपदाची सूत्रे ग्रहण केली होती त्या आधी संस्थानची आर्थिक परिस्थिती भरभक्कम नव्हती. बुवासाहेब महाराजानंतर त्यांचे पुत्र शिवाजी महाराज अज्ञानी असताना दिवाणसाहेबांचा कारभार होता. त्यांच्या वेळेला संस्थानचे उत्पन्न तीन लाखापेक्षा जास्त नव्हते. परंतु उत्पन्नापेक्षा खर्च दीडपट असून कर्जाचे ओझे संस्थानवर इतके झाले होते की, संस्थानला यातून मार्ग काढणे मोठे दुरापास्त झाले होते. संस्थानच्या कर्जबाजारीपणाला अेक सारखी भरतीच येत चालली होती. 1

महाराजांच्या अगोदर त्यांचे जन्मदाते वडील रीजंट म्हणून कोल्हापूरचा कारभार पाहात होते त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूरच्या राज्यकारभाराला व अर्थकारभाराला जरा स्थिरता आली होती. त्यानंतर जेव्हा महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला तेव्हा प्रथम त्यांनी आपल्या संस्थानची पाहणी केली. आणि त्यानंतर धोरण आखून आपला राज्यकारभार करायला सुरवात केली. महाराजांनी सुरवातीलाच कडक प्रशासकाचे धोरण स्वीकारले. त्यांचे किती बारीक व काटेकोर लक्ष प्रशासनावर होते हे अेका प्रसंगावरून आपल्याला दिसून येते.

एका विहिरीची दुरुस्ती करण्याकरिता अंदाज पत्रकात अल्पशी रक्कम नमूद झाली असताना देखील या कामी हजारो रुपये खर्च करण्यात आले. तेव्हा हुजूर ऑफिसने एक्झिक्युटिव्ह इंजनियर श्री. शॅनॉन यांना खुलासा विचारला. शॅनॉन थेट महाराजांकडे धावतच आले व त्यांना म्हणाले " जो खर्च मला आवश्यक वाटला त्या बद्दल शंका प्रदर्शित करणारा असा कोणता शहाणा हुजूर ऑफिसमध्ये आहे " हे म्हणणे महाराजांनी अगदी शांतपणे ऐकून घेऊन तितक्याच शांतपणाने पुढील उत्तर दिले. " पुष्कळ वेळा अंदाजापेक्षा जास्त खर्च होत असल्याचे निदर्शनास आल्या-वरून नूतन छत्रपति हेच याबद्दल नाखूष आहेत. व हुजूर ऑफिसने जो खुलासा विचारला तो खुद्द महाराजांनाच हवा होता. "2

स्टेटच्या कौन्सिलने महाराजांच्या आमदानीच्या पहिल्या वर्षी जे अंदाजपत्रक महाराजांकडे सादर केले त्याची आपण कशी वासलात लावली त्याचे महाराजांनी पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

" अंदाजपत्रक प्रथम जेव्हा माझ्या मंजुरीकरिता आले तेव्हा त्यात साठहजार रुपयांची तूट दर्शविण्यात आली होती. त्यामध्ये काही फेरबदल करण्यासाठी सूचना करून उपयुक्त कामाची हरकत न होता त्यात काय फरक करता येईल तो करावा अशी ही मी कौन्सिलास सूचना दिली. त्या प्रमाणे आता तोंड मिळवणी कशी तरी झाली आहे. ५०,००० रुपयांची बचत करण्याचाही माझा हेतू होता, परंतु तसे करणे अशक्य होते. "3

राज्यकर्तांच खुद्द जर संस्थानच्या खर्चाबद्दल जागरूक असेल तर गैर प्रकार कमी घडतात. त्यांना आळा बसतो हे आपल्याला महाराजांच्या कारकिर्दीवरून पटते. 'शासन कर्त्यांतच ' जर लक्ष नसेल तर प्रत्येकजणच वाहत्या गंगेत हात धुवून घेतो ! पण महाराजांचे प्रत्येक बाबीकडे दक्षतेने लक्ष असल्याने व हे लोकांना कळल्याने तसे फारसे प्रसंग निर्माणच

झाले नाहीत. महाराज खर्चात नसते काटकसरही नव्हते हे आपल्याला त्यांच्या पुढच्या कारभारावरूनही दिसून येते. पण अनाठायी खर्च त्यांना आवडत नव्हता आणि ते अगदीच योग्य होते.

महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूर नगरपालिकेचा कारभार अव्यवस्थितपणे चालत नव्हता. भ्रष्टाचार बोकाळला होता. पैशाची अफरा-तफर झालेली होती. नगरपालिकेकडून रस्त्यांची दुरुस्ती करणे, दिवाबत्ती करणे आणि नळतोटयाची चांगली व्यवस्था ठेवणे ही मूलभूत कार्येही अव्यवस्थितरीत्या चालत नव्हती. त्यामुळे दरबारला १९०४ साली नगरपालिकेचे कार्य स्थगित करावे लागले. उत्पन्नात गडबड कोठे झाली हे तपासण्यासाठी महाराजांनी एका खास अधिकाऱ्याची नेमणूक केली. नगरपालिकेच्या कार्याची तपासणी करून उपाय सुचविण्याची जबाबदारी महाराजांनी या अधिकाऱ्यावर सोपवली होती. यामध्येही आपल्याला एक दक्ष व जागरूक प्रशासक दिसून येतो.

## संस्थानचा खर्च व उत्पन्न-

या नंतर महाराजांनी आपल्या काळात उत्पन्न व खर्च कशा प्रकारे ठेवले होते हे आपल्याला बघायचे आहे. उत्पन्न व खर्चाचे एकूण विधान शेवटी दिलेलेच आहे. त्यावरून आपल्याला एकूण स्वरूप कळूनच येईल. त्यामध्ये सतत एक प्रवृत्ती आपल्याला दिसून येते की, या दोन्हीमध्ये सतत वाढ होत आहे. संस्थानच्या उत्पन्नात भर पडत गेलेली आहे कारण लागवडी खालील जमीन वाढत गेली, बागाईत जमीनही वाढत गेली. व्यापार व उद्योगाला चालना दिल्याने निर्यातही वाढली, रेल्वेचा विकास झाल्याने रेल्वेची मिळकत वाढत गेली. वेगवेगळे निधी अस्तित्वात आले. खर्चामध्ये भर पडत गेली ती वेगळ्या कारणामुळे. खर्चाचे एक महत्वाचे वैशिष्ठ आढळून येते व ते म्हणजे संस्थानचा खर्च हा केवळ प्रजेचे आर्थिक व सामाजिक हित-कल्याण ध्यानात ठेवूनच होत होता. विसाव्या शतकातील कल्याणकारी राज्याचे ध्येय महाराजांनी आपल्या डोळयासमोर ठेवले होते.

काही खर्च महाराजांना संकटाशी झगडण्यासाठी करावा लागला. आमदानीच्या सुरवातीलाच महाराजांना प्लेग व दुष्काळ यांच्याशी दोन हात करावे लागले. प्लेगचे संकट निवारण्यासाठी खर्चात वाढ झाली व दुष्काळात लोकांना सर्व प्रकारची मदत देण्यासाठीही खर्चात वाढ झाली. कारकिर्दीच्या शेवटी इन्फ्युएंझाची साथ आली. त्यासाठीही महाराजांनी आपला हात सढळच ठेवला होता. पण हे झाले केवळ प्रतिबंधात्मक खर्च. याशिवाय पण जास्त महत्वाच्या बाबतीत महाराजांनी जो खर्च केला तो शेती, उद्योग, व्यापार, वैद्यकीय सोयी, शिक्षण, मानवी गुंतवणूक, पाट-बंधारे, जंगले यावर. अशा तऱ्हेने त्या काळच्या उत्पन्न व खर्च या बाबतीत या महत्वाच्या प्रवृत्ती आपल्याला दिसून येतात.

१८९३-९४ साली सुरवातीला सार्वजनिक कामे हे खाते थॉनॉन यांच्या ताब्यात होते या खात्याचा खर्च नविन कामावर व जुन्या कामाच्या दुरूस्तीवर होत होता. या वर्षातील सर्वात महत्वाचे काम म्हणजे कोल्हापूर स्टेट रेल्वेच्या विस्ताराची पाहणी. आतापर्यंत रेल्वेवर भांडवली खर्च रु. २३,०५,९१२ केला गेला होता. या खात्याच्या कक्षेत रेल्वे, इमारती, रस्ते व पूल, झाडे, तलावाची कामे, शैक्षणिक इमारती, इत्यादी बाबी येत असत. स्थानिक निधी सह सात प्रकारचे होते. त्यातून प्राथमिक शिक्षण, सार्वजनिक कार्य वैद्यकिय मदत यावर खर्च केला जात असे. १८९६-९७ मध्ये सार्वजनिक कामे हे खाते रावसाहेब डी. अे. विचारे यांच्या ताब्यात देण्यात आले. त्यावेळेला प्लेगचे संकट संस्थानात असल्याने व त्यासंबंधी प्रतिबंधक उपाय योजल्याने रेल्वेच्या मिळकतीत घट झाली. पण त्यामुळे संस्थानच्या खर्चात मात्र वाढ झाली. क्वारंटाईन कँप त्यामधील सर्व सोयी, लोकांना रहायला तात्पुरत्या झोपड्या, जंतुनाशके इत्यादीवर हा खर्च करण्यात आला. १८९७-९८ मध्ये वडगांव, अतिग्रे येथील तलावाचे बांधकाम हाती घेण्यात आले. कोल्हापूर इन्फंट्रीकरिता दवाखाना, महारोग्यांकरिता दवाखाना इत्यादी कामेही त्याच वेळेला सुरू करण्यात आली. याच्या पुढच्याच वर्षी निपाणी-फोंडा घाटरोडवर तीन पूल बांधण्याचेही काम हाती घेतले

गेले व भुधरगड पेट्यात तारळे येथे शाळाही बांधण्यात आली. सोमवारपागा पन्हाळापागा, हुजूरकचेरी, पाटगांव शाळा, रस्त्याकडेला झाडे ही महत्वाची कामे पूर्ण करण्यात आली. १८९९-१९०० मध्ये दुष्काळाची तीव्रता फार जाणवत असल्याने दुष्काळी कामावर बराच भर देण्यात आला. मोठमोठी दुष्काळी कामे हाती घेण्यात आली. अशा तऱ्हेने प्लेग, दुष्काळ यामुळे संस्थानच्या खर्चात भर पडत गेली. वडगांव, शिरोळ, सातवे व जोतिबा डोंगरावरील तलावाची कामे जारी करण्यात आली भुधरगड, आळते रायबाग, करवीर, पन्हाळा भागातही किरकोळ कामे सुरू करण्यात आली. दुष्काळावर खर्च किती व कसा करण्यात आला या बद्दलचे सविस्तर विवेचन ' दुष्काळ ' या प्रकरणात येऊन गेलेच आहे.

१९०१-०२ या सुमारास पाटबंधाऱ्याच्या कामाचा विस्तार विचारात घेण्यात आला. आत्तापर्यंतची दुष्काळाची कामेही बरीचशी तात्पुरत्या स्वरूपाची होती. परंतु दुष्काळाचे चटके प्रजेला सारखे भासू नयेत याकरिता महाराजांनी काही कायम स्वरूपाचे उपायही करायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी अेका अधिकाऱ्याची नेमणूक केली. पाटबंधारे निर्माण करण्याची शक्यता तपासण्यासाठी व अहवाल तयार करण्यासाठी हा अधिकारी नेमण्यात आला. १९०२-०३ मध्ये सोळा तलावाची यासाठी पाहणी करण्यात आली. सरूड व मेडसगाव तलाव जवळची जागा पसंत करण्यात व ठरवण्यात आली. अतिग्रे तलावासंबंधीही विचार करण्यात आला. १९०३-०४ मध्ये याच कामाबरोबर व्यापारातही विस्तार करण्याच्या दृष्टीने महाराजांनी वैयक्तिक लक्ष घातले. व्यापाऱ्यांना खास सोयी व सवलती देण्याचे ठरवले व त्या देण्यात आल्या. अशा तऱ्हेने व्यापाराला चालना देण्यात आली. त्यामुळे रेल्वेउत्पन्नातही भर पडली माल-वाहतूक व प्रवासी वाहतूक प्रतिवर्षी वाढत गेली. १९०५-०६ मध्ये पाऊस सरासरी पेक्षा खूपच कमी पडला. बरेच पीक आले नाही. श्रमिकांनाही रोजगार हवा होता. म्हणून शिरोळ, रायबाग, व

कोल्हापूर येथे तलावाची कामे सूरु करण्यात आली. मजूरांना मजुरी देताना 'काम तसे दाम' हे तत्व स्वीकारण्यात आले. अर्थात ह्यावेळी दुष्काळाची तीव्रता पूर्वीइतकी नव्हती परंतु उपाययोजना मात्र सर्वच प्रकारची केली. १९०६-०७ मध्ये अे. ई. हॉस्पिटल मध्ये संसर्गजन्य रोगांसाठी वॉर्डस्, नर्सेस करिता आठ खोल्या यांची तरतूद करण्यात आली. पन्हाळा मामलेदार कचेरीत वाढ, हुजूररेकॉर्ड ऑफिसात वाढ, पन्हाळा, कोल्हापूर व रजपूतवाडी येथे राजवाडयांचे काम, मुलांकरिता चार शाळा, चिकोत्रा, वळिवडा व सावर्डे नाल्यावर तीन पूल, कोल्हापूर स्टेट रेल्वेवर रेल गर्डर्स, कळंबा तलावाचा बांध सुधारणे, शिरोळचा काळेश्वर तलाव रुंद करणे, कोटितीर्थ व रंकाळ्याचे पाण्याचे क्षेत्र वाढवणे, कळंबा तलावापासून कोल्हापूर पर्यंत ९ इंची पाईप टाकणे ही कामे करण्यात आली. याचवर्षी भोगावती व दुधगंगा यावरही धरण बांधण्याचा विचार चालूच होता. त्या दृष्टीने पाहणी करण्यात आली १९०७-०८ मध्ये निपाणी फोंडा घाट रस्त्यावर सरवडे येथे दुधगंगेवर पूल बांधण्यात आला. कळंबा तलावाचे पाणी पाईप टाकून शाहूपुरीला पुरविण्यात आले. राधानगरी धरणाचे कामही सुरु करण्यात आले. त्यामुळे संस्थानच्या खजिन्यावरचा ताण मोठ्या प्रमाणावर वाढतच गेला. १९११-१२ मध्ये जुन्याराजवाड्यातील अब्दारखाना चौकात खास दुरुस्ती, सेंट्रल जेलमध्ये कैद्यांकरिता खोल्या, पंचगंगा नदीच्या देवळा जवळील मंडपाची खास दुरुस्ती, कोल्हापूर येथील नर्सरी बागेत सात देवळे बांधणे, रजपूतवाडी येथे साठमारी ही कामे केली गेली. १९१७-१८ मध्ये काही महिन्याकरिता राधानगरी येथील काम थांबविण्यात व १९१८-१९ मध्ये राधानगरी काम बंद करण्यात आले. याच वर्षी शैक्षणिक उत्पन्न वाढविण्यासाठी शैक्षणिक कर ( Education Cess ) बसविण्यात आला. दिवसेंदिवस शिक्षणावरचा खर्च वाढतच गेला रावबहादूर डोंगरे यांच्या ताब्यात यासंबंधीचा कारभार देण्यात आला.

| वर्ष | शैक्षणिक करापासून उत्पन्न |
|---|---|
| १९१८–१९ | २२,४६३ |
| १९१९–२० | ३२,०१७ |
| १९२०-२१ | ३३,४९२ |
| १९२१–२२ | १६,१०१ |
| १९२२–२३ | ५२,५७८ |

वरील तक्त्यावरून शैक्षणिक करापासून किती उत्पन्न मिळाले हे समजून येते.

युद्धकर्ज ( War Loan )–

या नंतरचे महाराजांचे कार्य आपल्याला युद्धकर्जासंबंधी दिसून येते. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सूरू झाले. ब्रिटिश सरकारला युद्धखर्च चालविण्यासाठी पैशाची गरज होती. त्यासाठी युद्धकर्ज उभे करण्याचे काम चाललेच होते. त्याला महाराजांनी आपल्या संस्थानातून बराच हातभार लावण्याचे कार्य केले. या बाबतची त्यांची भूमिका आपल्याला खालील वाक्यावरून दिसून येते.

" It is not a time to spend our money over palaces and theatres and I may even say over buildings and roads, but every pie that can be spared must be devoted war " 4

युद्धकर्जाचे महत्त्व त्यांना पटलेले होते. त्यामुळे त्यांनी ४ मार्च १९१६ ला मुंबई येथील आपल्या एका मित्राला लिहले– " वॉरलोन संबंधी एक जाहिरात मी वर्तमानपत्रात नुकतीच वाचली. या फंडाला आपल्या शक्तीनुसार मदत करावी म्हणून जहागिरदार, इनामदार व माझ्या संस्थानातील

श्रीमंत व गरीब अशा सर्व लोकांना उत्तेजन देण्याचा माझा विचार आहे. संस्थानात कडकरीतीने खर्चाची बचत चालविली आहे. तूर्त जरूर नसलेल्या कामकाजातील खर्च तहकूब केला आहे. मोठया पाटबंधाऱ्याचे काम तूर्त बंद ठेवण्यास मी हुकूम केला आहे"5

त्या आधी ३०जुलै १९१५ ला महाराज रेसिडेंट साहेबांना कळवतात-

"माझे सरदार,इनामदार, संस्थानचे नोकर व माझ्या संस्थानची रयत यासर्वांनी वॉररिलीफ फंडाकरिता म्हणून सुमारे ३९,००० रु. ची रक्कम वर्गणीने जमविली आहे. जखमी लोकांच्या गाडयाची तरतूद करण्याकडे व त्या व्यवस्थित राखण्याकडे या रकमेचा उपयोग करावा, अशी जी आपण थोडया दिवसापूर्वी सूचना केली होती, ती मला अगदी पसंत आहे. मला जे आकडे मिळाले आहेत त्यावरून आता गोळा झालेल्या रकमेतून अेक वर्षपर्यंत तूर्त पाच गाडयाची तरतूद करता येईल असे आम्हास वाटते... आपणाकडून काय ते कळताच या रकमेची हुंडी आपणाकडे पाठविण्यात येईल"6

महाराजांनी युद्धकर्जाला मदत करताना केवळ पैसे जमा करून दिले की आपले काम संपले अशी प्रवृत्ती ठेवली नाही. इतरही ज्या ज्या बाबतीत मदत करता येणे शक्य आहे त्या त्या बाबतीत त्यांनी ती केली. सुरवातीला वॉररिलीफ फंडाला महाराजांनी स्वतः २०,००० रूपयाची वर्गणी दिली. लेडी विलिंग्डन यांनी स्त्रियांच्या कल्याणासाठी फंड सुरू केला होता त्यासाठी रु. ४,००० ची देणगी दिली. त्यावेळचे इनचार्ज कर्नल कॅडॉन यांच्या अध्यक्षतेखाली वॉरलोनसंबंधी एक सभा महाराजांनी घेतली.या सभेत५,००,००० रुपये घालण्याचा उद्देश महाराजांनी स्पष्ट केला. याचा चांगलाच परिणाम झाला व कोल्हापूर दरबार, मांडलिक जहागिरदार व कोल्हापूर संस्थानातील प्रजाजन यांनी सर्वांनीच वॉरलोनला भरपूर मदत केली. सैन्यभरती मध्येही अनंत अडचणी उभ्या राहिल्या. या संबंधानेही महाराजांनी मोठया उत्साहाने कार्य केले. त्यासाठी महाराजांनी एक जाहीरनामा काढला तो खालील प्रमाणे होता.

"१) कमीतकमी २५ रिक्रूट गोळा करून देणाऱ्या ग्रामाधिकाऱ्यांच्या कामगिरीचे महत्त्व लक्षात घेऊन पाटलाला ढाल, तलवार व कुलकर्ण्याला एक रुप्याचे पदक बहाल करण्यात येईल व दसरा दरबारला निमंत्रण देण्याच्या हक्काची त्यांना सनद करून देण्यात येईल २) रिक्रूट आणणाऱ्या कोणत्याही इसमाला प्रत्येक लढवय्या रिक्रूटमागे दहा रुपये व प्रत्येक बाजारबुणग्यामागे तीन रुपये आणि २५ अगर अधिक रिक्रूट त्याला मिळवून देता येईल तर एक रुप्याचे पदक बहाल करण्यात येईल. निघण्यापूर्वी आपल्या कुटुंबांची व्यवस्था करता यावी म्हणून प्रत्येक लढाऊ रिक्रूटाला ४० रुपये देण्यात येतील. बिन लढाऊ रिक्रूटला प्रत्येकी २० रुपये मिळतील. संस्थानचे नोकर लढाऊ रिक्रूट म्हणून गेल्यास लष्करी नोकरीत असलेल्या मुदतीत त्यांना त्यांचा अर्धा पगार मिळेल. ते परत आल्यावर त्यांना आपल्या नोकरीवर परत हजर करून घेण्यात येईल व गैर असलेल्या मुदतीचा काळ पेन्शनच्या वेळी जमेस धरण्यात येईल."[7]

रिक्रूटिंग होण्यासाठी संस्थानातील लोक तयार नव्हते. त्यामुळे त्यांना वेगवेगळया प्रकारचे प्रोत्साहन देणे आवश्यक होते. त्यासाठी ही योजना तयार करण्यात आली. युद्धात जे लोक जखमी होतील त्यांच्यासाठीही महाराजांनी अेक योजना पुढे मांडली. या लोकासाठी दक्षिण महाराष्ट्रातील हॉस्पिटलात सोय करण्याबद्दलची ही योजना होती. या योजनेच्या खर्चाचा बराचसा भार महाराजांनी स्वतःच उचलायचे ठरवले. दक्षिण महाराष्ट्रातील इतर संस्थानिकांनाही मदतीचे आवाहन करायचे महाराजांनी ठरवले. या कामासाठी सुखवस्तु लोकांनीही उदार अंतःकरणाने मदत केल्यास त्यांचे स्वागतच करायचे महाराजांनी ठरवले. स्थानिक लोकांनीही या योजनेला हातभार लावल्यास हरकत नाही असे महाराजांचे मत होते. म्हणजे युद्धकर्ज, गाड्या, दवाखाने या सर्वच बाबतीत महाराजानी मदत केली.

वॉरलोनची चळवळ यशस्वी करण्याचे काम युवराज महाराजांवरही सोपविण्यात आले होते त्यांनी ११-७-१९१७ च्या पत्रात लिहिलेले होते की, अदमासे वर्गणी २,००,००० रुपये जमली होती. आणखी ४-५ लाख रुपये जमविण्याची त्यांची महत्वाकांक्षा होती. पुष्कळ लोक लहान लहान रकमेमध्ये वर्गणी देत होते. पण रक्कम अगदीच लहान असल्याने प्रत्येकाला व्यक्तिश: पोस्टाचे कॅश सर्टिफिकेट मिळवून देणे शक्य नव्हते. म्हणून पैसा एक रकमेने गोळा करून दिला गेला. वॉर बॉंडच्या बाबतीत सरकारकडून जे व्याज दिले जात होते त्याच व्याजाच्या दराने संस्थानच्या जमावर्दीतून प्रत्येक इसमाला रक्कम परत करण्याची व्यवस्था करण्यात आली व पोच झालेल्या रकमेबद्दल पावत्या देण्यात आल्या. ही रक्कम कोल्हापूर दरबारच्याच नावाने वॉरलोन मध्ये घालावी असे युवराज महाराजानी सुचविले.

रु. ३९,५२७ हे वर्गणी मार्फत पाच अँब्युलंस गाड्या विकत घेण्यासाठी जमा करण्यात आले. ह्या गाड्या सरकारकडे देणगी म्हणून पाठवण्यात येणार होत्या. इंपीरियल वॉर रिलीफ फंडाला दरबारने रु. ८२,७३९ ची देणगी दिली. स्त्रियांच्या शाखेला १६, १४७ रुपयाची देणगी दिली. १४,७३१ रु. ' Hour Day Fund ' ला, ८,१४७ रु. सिल्व्हर वेडिंग फंडला देण्यात आले. ५,३१२ रुपयाचे साहित्य घेऊन देण्यात आले. कोल्हापूर दरबारने ५,५४,२०० चे वॉर बॉंड्स विकत घेतले. प्रजेने १३,८०,४१७ चे युद्धकर्ज दिले. एकूण वॉरलोनचाच आकडा १९,३४,६१७ रु. पर्यंत गेला. इतर मदत झाली ती वेगळीच. अशातऱ्हेने युद्धकर्जाला भरघोस मदत महाराजांकडून व कोल्हापूर संस्थानकडून ब्रिटिश सरकाराला झाली.

या सर्व विवेचनावरून आपल्याला असे दिसून येते की, महाराजांनी संस्थानच्या उत्पन्नातून आपल्या आमदानीच्या प्रतिवर्षी जो खर्च केला तो प्रामुख्याने प्रजेच्या कल्याणा करिताच केला. हेच ध्येय त्यांनी सुरवाती पासूनच आपणापुढे ठेवले होते.

## सार्वजनिक उत्पन्न (कोल्हापूर सुद्द) प्रमुख बाबी

( रुपये – हजार )

| वर्ष | शेतसारा | जंगले | अबकारी | शिक्षण | रेल्वे | सार्वजनिक कामे | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९२-९३ | ११९१ | ८५ | १३९ | ३० | – | ६९ | १६८४ | ३१९८ |
| १८९३-९४ | ११७८ | १८६ | १४० | ३४ | १०९ | ४५ | १६९८ | ३३९० |
| १८९४-९५ | ११६९ | ७४ | १५६ | २३ | ६४ | ४७ | १७७९ | ३३१४ |
| १८९५-९६ | ११८५ | २० | १८४ | २६ | ५२ | ४७ | १७८७ | ३३०१ |
| १८९६-९७ | ११५३ | १५४ | १२० | १९ | ५४ | ४२ | १८२५ | ३३६७ |
| १८९७-९८ | १११७ | १२ | ११० | २४ | ४२ | ३० | २१०७ | ३४४२ |
| १८९८-९९ | ११३४ | ३४५ | १३१ | १९ | २२ | ४५ | १९३२ | ३६२८ |
| १८९९-१९०० | १११४ | १३ | १२५ | १४ | २२ | ५१ | १९७६ | ३३१५ |
| १९००-०१ | ११३४ | १८७ | ११६ | १५ | ५७ | ६५ | २०२६ | ३६०० |
| १९०१-०२ | ११५९ | १६ | ११२ | १३ | २५ | ६० | २२४२ | ३५२७ |
| १९०२-०३ | ११७५ | १५२ | ११० | १३ | ५७ | ५८ | १९४६ | ३५११ |
| १९०३-०४ | १२१३ | १४ | १४५ | १७ | ४८ | ४९ | २९०५ | ४३९१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०४-०५ | १२१० | १७० | १७९ | १७ | ५३ | ५५ | २८४१ | ४५२५ |
| १९०५-०६ | ११३५ | ७२ | १९८ | ७३ | ७० | ५२ | ३००४ | ४६०४ |
| १९०६-०७ | १३३३ | १५५ | २०७ | ८७ | ७१ | ५५ | ३१५० | ५०५८ |
| १९०७-०८ | १३०६ | १७४ | २२५ | ८२ | ७७ | ५८ | ३१६३ | ५८८५ |
| १९०८-०९ | १४२४ | ३४ | २०६ | ८४ | ८८ | ६७ | ३८९२ | ५७९५ |
| १९०९-१० | १३५३ | १९५ | २३१ | ९३ | ९२ | ५१ | ३४१५ | ५४३० |
| १९१०-११ | १३०५ | १६२ | २८ | ८३ | ७२ | ४७ | ३७०५ | ५४०२ |
| १९११-१२ | १३१९ | २१४ | ३२७ | ८५ | १६२ | ७१ | ४२३९ | ६४१७ |
| १९१२-१३ | १२१२ | २०७ | ३६५ | ८७ | ९० | ८३ | ४२४९ | ६३९३ |
| १९१३-१४ | १३२९ | ११४ | ४१६ | ९१ | ११२ | ७६ | ४१२० | ६२५८ |
| १९१४-१५ | १३३२ | २१५ | ३९६ | १२० | २१९ | ६६ | ४१९८ | ६५४६ |
| १९१५-१६ | १३८१ | २५६ | ४२१ | १२३ | १५४ | ६६ | ४००४ | ६४०५ |
| १९१६-१७ | १३९४ | १९८ | ४५६ | १२४ | २३८ | ९३ | ४०२४ | ६५३७ |
| १९१७-१८ | १४१७ | १६२ | ५९२ | १२० | ९५ | ६८ | ५५३३ | ७९०७ |
| १९१८-१९ | १३५५ | ४१ | ६५१ | ११० | २१९ | ७४ | ५९९४ | ८४४४ |
| १९१९-२० | १३९९ | ३० | ७३० | १०८ | २०७ | ९४ | ६७७२ | ९३७० |
| १९२०-२१ | १३५३ | १६३ | ७२२ | ११९ | २८९ | ६३ | ४६४५ | ७३५४ |
| १९२१-२२ | १४९१ | ६३ | ७३१ | १२० | १९१ | ९१ | ५६०१ | ८२८८ |

( Source - Administrative Reports from 1892 to 1922 )

## —प्रमुख बाबींवर केलेला सार्वजनिक खर्च (कोल्हापूर सुद्ध)

(रुपये – हजार)

| वर्ष | शेती | जंगल | अबकारी खाते | शिक्षण | वैद्यकीय | सार्वजनिक कामे | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९२-९३ | १०५ | ४२ | ३६ | ११४ | ४५ | ५४० | २४१६ | ३३०२ |
| १८९३-९४ | १३१ | ६१ | २८ | ६३ | ३० | ३३७ | २७२९ | ३३७९ |
| १८९४-९५ | १७४ | २५ | २८ | ६९ | २७ | ३५४ | २४७६ | ३१५३ |
| १८९५-९६ | १६७ | ७२ | ३० | ६३ | २१ | २७३ | २६८५ | ३३१९ |
| १८९६-९७ | १६८ | ५३ | २७ | ६३ | ३० | ४९४ | ३१४४ | ३९७९ |
| १८९७-९८ | १६८ | ११३ | २९ | ७६ | ३२ | ५४६ | २८१० | ३७६० |
| १८९८-९९ | १६० | ८२ | १४ | ६३ | ३२ | २९५ | २९४४ | ३५९० |
| १८९९-१९०० | १६१ | ६३ | ३० | ५५ | ३२ | ३२४ | २५६० | ३३२५ |
| १९००-०१ | १५७ | ७२ | १८ | ५४ | ३८ | २१४ | २९६३ | ३५१६ |
| १९०१-०२ | १५५ | ३५ | १७ | ६० | ४३ | २५३ | २९२२ | ३४८९ |
| १९०२-०३ | १४३ | ५४ | १७ | ५५ | ३८ | २५४ | ३०२१ | ३५८२ |
| १९०३-०४ | १४८ | ४४ | १२ | ५८ | ३७ | २९२ | ३६९५ | ४२८६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०४-०५ | १५५ | ८३ | १९ | ६२ | ४१ | २७६ | ३५९७ | ४२३३ |
| १९०५-०६ | १७७ | ५७ | १९ | १२१ | ६४ | ३८२ | ३९५२ | ४७७२ |
| १९०६-०७ | १७९ | ११४ | ६२ | १३३ | ५७ | ४५६ | ४३५१ | ५३५२ |
| १९०७-०८ | १७२ | १५२ | ३० | १२७ | ६३ | ३९१ | ४८११ | ५७४६ |
| १९०८-०९ | २६३ | १११ | ८४ | १२५ | ७३ | ४२६ | ४०६४ | ५१४६ |
| १९०९-१० | २०३ | १६७ | ३६ | १४३ | ५९ | २६९ | ४३५५ | ५२३२ |
| १९१०-११ | १७८ | ६६ | ६५ | १३४ | ६० | ८६ | ४९१८ | ५५०७ |
| १९११-१२ | १८८ | ६६ | ३६ | १४२ | ६१ | ५६२ | ५४६३ | ६५१८ |
| १९१२-१३ | १८६ | ८१ | २९ | १९९ | ६४ | ४४० | ४९८२ | ५९८१ |
| १९१३-१४ | २१८ | ५५ | ३९ | १३८ | ५७ | ७७८ | ५२१८ | ६५०३ |
| १९१४-१५ | २६१ | ९७ | ६९ | १६४ | ६२ | २९७ | ५८५३ | ६८०३ |
| १९१५-१६ | २०५ | ११९ | ३८ | १३३ | ६१ | १७१ | ५४२५ | ६१५३ |
| १९१६-१७ | २४२ | १०४ | ३५ | १२९ | ६१ | ३४९ | ५०८६ | ६०१६ |
| १९१७-१८ | २१८ | १०६ | ३८ | १४५ | ६१ | १३९ | ८४१९ | ९१२६ |
| १९१८-१९ | ५३५ | ४७ | ५२ | १७७ | ७४ | ८७२ | ६६१८ | ८३७५ |
| १९१९-२० | २८८ | ५७ | ४० | २२९ | ७० | १००८ | ७९०४ | ९५९६ |
| १९२०-२१ | ३३५ | ११९ | ३९ | २१९ | ७३ | ४२६ | ६३१७ | ७५२८ |
| १९२१-२२ | ३६० | ९६ | ८८ | २१४ | ६४ | १७७ | ६८६९ | ८०६८ |

( Source - Administrative Reports from 1892 to 1922 )

## कोल्हापूर संस्थानचे जहागिरीसह एकूण उत्पन्न

( रुपये – हजार )

| वर्ष | कोल्हापूर | विशाळगड | बावडा | कापशी | कागल थोरली पाती | इचलकरंजी | कागल धाकटी पाती | तोरगळ | हिंमत बहादुर | सरलष्कर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९२–९३ | ३१९८ | १५७ | ११९ | १६ | २२९ | २९६ | * | * | * | * | ४०१५ |
| १८९३–९४ | ३३९० | १६५ | १२६ | ६९ | १९५ | २७० | * | * | * | * | ४२१५ |
| १८९४–९५ | ३३१४ | १६९ | १०९ | ५१ | २१९ | ३१५ | * | * | * | * | ४१७७ |
| १८९५–९६ | ३३०१ | १३० | १२३ | ५६ | २७६ | ३०१ | * | * | * | * | ४१८७ |
| १८९६–९७ | ३३६७ | १३७ | १३६ | ७९ | २९७ | ३०२ | | * | * | * | ४३१८ |
| १८९७–९८ | ३४४२ | १९० | १३८ | ६८ | २७१ | ३९६ | * | * | * | * | ४५०५ |
| १८९८–९९ | ३६२८ | १४६ | १२० | ५६ | २६५ | ३२५ | ५४ | * | * | * | ४५९४ |
| १८९९–१९०० | ३३१५ | १५७ | ११३ | ५० | ३१३ | ३८१ | ५४ | * | * | * | ४३८३ |
| १९००–०१ | ३६०० | १६० | ११२ | ५६ | ३०५ | ३४४ | ६३ | * | ८१ | ६८ | ४७८९ |
| १९०१–०२ | ३५२७ | १७७ | १२० | ८४ | ३८८ | ३६६ | ५६ | * | ८५ | ६३ | ४८६६ |
| १९०२–०३ | ३५११ | १६८ | १३६ | ६० | ४१७ | ३४० | ६८ | * | ८३ | ७५ | ४८५८ |
| १९०३–०४ | ४३९१ | २०३ | १४४ | ६० | ३२६ | ३२९ | ६७ | * | ८५ | ६९ | ५६७४ |
| १९०४–०५ | ४४२५ | १५४ | ११८ | ६७ | ३६७ | ३२४ | ६७ | ४९ | ८८ | ६९ | ५८२८ |
| १९०५–०६ | ४६०४ | १८८ | १२८ | ६० | २९२ | ३७४ | १५० | ४१ | ९१ | ५३ | ५९८१ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०६–०७ | ५०५८ | १८६ | १४५ | ६५ | २५७ | ४२८ | ५६ | ५४ | ९२ | ७४ | ६४१५ |
| १९०७–०८ | ५८८५ | १९३ | १४६ | ५५ | २१४ | ४५५ | १२६ | ६१ | ९५ | ६८ | ७२९८ |
| १९०८–०९ | ५७९५ | २३५ | १४९ | ५८ | २२७ | ४८१ | २१३ | ६५ | ९५ | ६७ | ७३८५ |
| १९०९–१० | ५४३० | २२३ | १५० | ६६ | ५४८ | ४८२ | ७६ | ५७ | ९८ | ८८ | ७२१८ |
| १९१०–११ | ५४०२ | १८० | १६४ | ७२ | २२४ | ५४३ | ९० | ६५ | ९७ | ७१ | ६९०७ |
| १९११–१२ | ६४१७ | २२३ | १५४ | ८३° | २८९ | ६१० | ८० | ६२ | १०५ | ८० | ८१०३ |
| १९१२–१३ | ६३९३ | २७८ | १५७ | ११३ | २५२ | ६५५ | १०८ | ८४ | ९८ | ७८ | ८२१६ |
| १९१३–१४ | ६२५८ | २४३ | १४९ | १०३ | २३२ | ६६५ | ८२ | ७७ | १०५ | ७२ | ७९८६ |
| १९१४–१५ | ६५४६ | २९२ | १८३ | १३८ | ३७७ | ४६७ | ६५ | ९८ | ९२ | ७३ | ८३३१ |
| १९१५–१६ | ६४०५ | २१६ | १८३ | १३५ | ३६४ | ४९० | ८४ | ८० | ९५ | ८६ | ८१३८ |
| १९१६–१७ | ६५३७ | २५५ | १६५ | १११ | ३४० | ५२१ | ७६ | ७९ | ९३ | ७८ | ८२५५ |
| १९१७–१८ | ७९०७ | २५९ | १८७ | १४९ | ३३० | ५१४ | १३३ | ८५ | १०० | ८१ | ९७४५ |
| १९१८–१९ | ८४४४ | २४७ | १५० | १०६ | २१० | ५५९ | ७४ | १२७ | ७४ | ९३ | १००८४ |
| १९१९–२० | ९३७० | १८४ | १५९ | १४५ | ६४५ | ४९२ | ९० | ११९ | ९९ | ७२ | ११३७५ |
| १९२०–२१ | ७३५४ | ३१९ | १७४ | १४३ | ५१० | ६४७ | ११२ | ८४ | १०१ | ७२ | ९५१६ |
| १९२१–२२ | ८२८८ | ३०४ | १६५ | ११२ | ४६५ | ६०४ | १०० | १२९ | ११३ | ८२ | १०३६२ |

( Source–Administrative Reports from 1892 to 1922)

( आकडे उपलब्ध नाहीत . )

## कोल्हापूर-संस्थानचा जहागिरीसह एकूण खर्च

(रुपये – हजार)

| वर्ष | कोल्हापूर | विशाळगड | बावडा | कापशी | कागल थोरली पाती | इचलकरंजी | कागल धाकटी पाती | तोरगळ | हिंमत बहादुर | सरलष्कर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९२–९३ | ३३०२ | १४० | १२१ | १५९ | ३१८ | ३३० | — | — | — | — | ४३७० |
| १८९३–९४ | ३३७९ | १४७ | ११७ | ६४ | २३४ | २८१ | — | — | — | — | ४२२२ |
| १८९४–९५ | ३१५३ | १६३ | १४१ | ५४ | २२५ | २९९ | — | — | — | — | ४०३५ |
| १८९५–९६ | ३३११ | १५५ | १२० | ६० | ३१३ | ३०५ | — | — | — | — | ४२७२ |
| १८९६–९७ | ३९७९ | १८८ | १४१ | ७४ | २६६ | ३४३ | — | — | — | — | ४९८१ |
| १८९७–९८ | ३७६० | १८८ | १३६ | ७४ | २६६ | ३४८ | | — | — | — | ४७७२ |
| १८९८–९९ | ३५९० | १५१ | १२१ | ५६ | २७० | ३३१ | ५५ | — | — | — | ४५७४ |
| १८९९–१९०० | ३३२५ | १६२ | ११७ | ५० | ३३५ | ३१९ | ५३ | — | — | — | ४३६१ |
| १९००–०१ | ३५१६ | १६० | ११२ | ५६ | ३१३ | ३९९ | ६५ | — | ८५ | ६९ | ४७६८ |
| १९०१–०२ | ३४८९ | १४६ | १२१ | ८१ | ४४३ | ३५८ | ५७ | — | ७२ | ५६ | ४८२३ |
| १९०२–०३ | ३५८२ | १७२ | १३९ | ६२ | ४११ | ३१२ | ७३ | — | ७१ | ८५ | ४८९८ |
| १९०३–०४ | ४२८६ | १७४ | १३९ | ५७ | ३७८ | २९४ | ७१ | | ८९ | ७० | ५५३८ |
| १९०४–०५ | ४२३३ | १६६ | १२९ | ६८ | ३६३ | ३१७ | ८७ | ५१ | ९० | ७० | ५५७४ |

(पुढे चालू)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०५–०६ | ४७७२ | १९५ | १२७ | ६० | २९३ | ३८६ | १४६ | ४४ | १०० | ५८ | ६१८१ |
| १९०६–०७ | ५३५२ | २१५ | १४७ | ६४ | २७९ | ५०८ | ५८ | ४९ | १०९ | ८९ | ६८७० |
| १९०७–०८ | ५७४६ | १९० | १४७ | ५७ | २१४ | ४७९ | १२३ | ६१ | ९७ | ६९ | ७१८३ |
| १९०८–०९ | ५१४६ | २४० | १४६ | ५८ | २२९ | ४८८ | ९७ | ६७ | ९६ | ६६ | ६६३३ |
| १९०९–१० | ५२३२ | २१९ | १५० | ६५ | ५३१ | ४६५ | ७९ | ५४ | ९६ | ८९ | ६९८० |
| १९१०–११ | ५५०७ | १७८ | १६४ | ६७ | २४१ | ५२७ | ८४ | ५२ | ९९ | ७१ | ६९९० |
| १९११–१२ | ६५१८ | २२२ | १५१ | ८९ | २७६ | ६२० | ८० | ८४ | १०४ | ८२ | ८२२६ |
| १९१२–१३ | ५९८१ | २७८ | १५७ | ११२ | २३० | ६७१ | १०३ | ८४ | ९७ | ७८ | ७७९१ |
| १९१३–१४ | ६५०३ | २५२ | १५१ | १०२ | २२१ | ६०१ | ७६ | ७७ | १०३ | ७३ | ८१५९ |
| १९१४–१५ | ६८०३ | २९६ | १८६ | १३८ | ३२३ | ४६८ | ६४ | ६० | ९६ | ७३ | ८५०७ |
| १९१५–१६ | ६१५३ | १९५ | १८२ | १३५ | ४७५ | ५५५ | ८० | ८० | ९४ | ८७ | ८०३६ |
| १९१६–१७ | ६०१६ | २६० | १६१ | १११ | ३६४ | ४९८ | ७३ | ७५ | ९१ | ८० | ७७२९ |
| १९१७–१८ | ९१२६ | २४० | १८३ | १५० | २५४ | ५०८ | १४३ | ७८ | १०१ | ८० | १०८६३ |
| १९१८–१९ | ८३७५ | २७० | १५८ | १०६ | २४९ | ५८९ | ७८ | ९२ | ९६ | ९३ | १०१०६ |
| १९१९–२० | ९५९६ | २११ | १६० | १४५ | ६६२ | ५१० | ९८ | १२३ | ९८ | ७३ | ११६९६ |
| १९२०–२१ | ७५२८ | ३९७ | १७२ | १४२ | ५१० | ६३८ | ११७ | ९२ | १०१ | ७३ | ९७७० |
| १९२१–२२ | ८०६८ | २७६ | १६६ | ११३ | ४९५ | ५४३ | १११ | १०१ | ११५ | ७८ | १००६६ |

( आकडे उपलब्ध नाहोत. ) ( Source Administrative Reports from 1892 to 1922 )

## संदर्भ


1. "श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र" आ. बा. लठ्ठे १४
2. "श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र" आ. बा. लठ्ठे ८०
3. "श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र" आ. बा. लठ्ठे ८१
4. "राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे" भगवानराव जाधव १५८
5. "श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र" आ. बा. लठ्ठे ३६४
6. "श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र" आ. बा. लठ्ठे ३५५
7. "श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र" आ. बा लठ्ठे १६६


★ ★

# परिशिष्ट – १

## अन्नधान्याच्या किमतीतील चढ–उतार

(१८९२ ते १९२२) (प्रमाण १ रुपयास किती पौंड)

| (साल महिना मार्च) | तांदूळ | गहू | तूर | हरबरा | ज्वारी | बाजरी | नागली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९३ | २०·३० | २२·४० | २५·७८ | २७·३३ | ३३·१९ | ४१·०० | ✚ |
| १८९४ | २३·६० | २९·२८ | २०·४४ | ३९·८० | ४१·०० | ३९·०४ | ✚ |
| १८९५ | २२·६५ | ६३·७४ | २१·६९ | ३४·५९ | ४१·८४ | ४०·१९ | ✚ |
| १८९६ | २३·०३ | ३०·६१ | २५·७८ | ३२·८० | ४३·१५ | ४३·१५ | ✚ |
| १८९७ | १७·८० | १७·३४ | १४·८२ | १८·६७ | २१·४० | २०·१९ | ✚ |
| १८९८ | २३·८३ | १९·६७ | २२·२९ | ३२.६८ | ३१·२९ | ३०·३८ | ✚ |
| १८९९ | २३·४२ | २७·९९ | २६·६२ | ३२·८० | ४०·१९ | ३९·८० | ✚ |
| १९०० | १८·५१ | १४·६७ | १२·८१ | १६·७० | १७·६७ | १८·८५ | ✚ |
| १९०१ | २०·२४ | १४·६७ | १३·७१ | ११·९८ | २५·८७ | २४·६२ | ✚ |
| १९०२ | २७·८९ | १६·६७ | २४·५५ | १९·३४ | ३०·१५ | ३२·४१ | ✚ |
| १९०३ | २१·८१ | २०·१९ | २०·६० | २१·३५ | ४०·३९ | ३९·६१ | ✚ |
| १९०४ | २५·०० | २९·२८ | २२·९७ | २७·५१ | ५१·८९ | ५३·२९ | ✚ |

(पुढे चालू)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०५ | २२·०८ | २५·७८ | २०·१९ | २९·८१ | ३५·०४ | ३३·७४ | |
| १९०६ | १५·२८ | १५·२७ | १४·७५ | १४·८२ | १९·३८ | २०·८७ | २६·७१ |
| १९०७ | १२·८८ | १३·९१ | ✦ | ✦ | २६·४८ | २७·८१ | |
| १९०८ | १२·८८ | ११·८५ | ✦ | ✦ | १९·५७ | १९·०६ | |
| १९०९ | १५·४० | ✦ | ✦ | ✦ | २३·९० | २५·१८ | २७·८३ |
| १९१० | १५·४० | ✦ | ✦ | ✦ | २३·६९ | २३·९१ | २७·९० |
| १९११ | १५·०० | ✦ | ✦ | ✦ | २३·०० | २१·०० | २६·०० |
| १९१२ | १४·०० | ✦ | ✦ | ✦ | २३·०० | १६·५० | २२·५० |
| १९१३ | १३·०० | ✦ | ✦ | ✦ | १९·२० | १४·२५ | २४·०० |
| १९१४ | १३·७० | ✦ | ✦ | ✦ | २०·२० | १६·१४ | २०·५० |
| १९१५ | १४·४० | ✦ | ✦ | ✦ | २३·३० | २२·०० | २५·०० |
| १९१६ | १४·५० | ✦ | ✦ | ✦ | २४·०० | २२·८० | २९·०० |
| १९१७ | १४·०० | ✦ | ✦ | ✦ | २२·७० | २२·०० | २८·६० |
| १९१८ | १३·५० | ✦ | ✦ | ✦ | २२·१० | २०·३० | २६·३० |
| १९१९ | ०८·६० | ✦ | ✦ | ✦ | १०·०० | ०९·१० | ११,५० |
| १९२० | ०८·१० | ✦ | ✦ | ✦ | १०·४० | ०८·६० | ०९·४० |
| १९२१ | ०९·०० | ✦ | ✦ | ✦ | ११·०० | ०९·०० | १०·३० |
| १९२२ | ०८·६० | | | | १८·५० | १०·५० | १५·१० |

(✦ आकडे उपलब्ध नाहीत.)

(Source–Administratvie Reports from 1892 to 1922)

## अन्नधान्याच्या किंमतीतील चढउतार

१८९३ ते १९२२ — प्रमाण १ मणास (८२पौंड) किती रुपये

| साल (महिना मार्च) | तांदूळ | गहू | तूर | हरबरा | ज्वारी | बाजरी | नागली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९३ | ४·०० | ३·७ | ३·२ | ३·० | २·५ | २·६ | [illegible] |
| १८९४ | ३·५ | २·८ | ४·० | २·० | २·० | २·१ | |
| १८९५ | ३·६ | २·४ | ३·८ | २·४ | २·० | २·० | |
| १८९६ | ३·६ | २·७ | ३·१ | २·५ | २·० | २·० | |
| १८९७ | ४·६ | ४·७ | ५·५ | ४·४ | ३·८ | ४·१ | |
| १८९८ | ३·५ | ४·१ | ३·७ | ३·५ | २·६ | २·७ | |
| १८९९ | ३·५ | ३·० | ३·० | २·५ | २·० | २·० | |
| १९०० | ४·४ | ५·६ | ६·४ | ४·९ | ४·६ | ४·४ | |
| १९०१ | ४·९ | ५·६ | ६·० | ६·८ | ३·१ | ३·३ | |
| १९०२ | ३·० | ५·० | ३·३ | ४·३ | २·७ | २·५ | |
| १९०३ | ३·५ | ४·० | ४·० | ३·८ | २·० | २·० | |
| १९०४ | ३·३ | २·८ | ३·६ | ३·० | १·६ | १·५ | |
| १९०५ | ३·८ | ३·१ | ४·० | २·८ | २·३ | २·४ | |

(पुढे चालू)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०६ | ५·४ | ५·३ | ५·६ | ५·५ | ४·२ | ४·० | ३·० |
| १९०७ | ५·५ | ५·९ | ✚ | ✚ | ३·१ | ३·० | ✚ |
| १९०८ | ५·५ | ७·० | ✚ | ✚ | ४·१ | ४·३ | ✚ |
| १९०९ | ५·३ | ✚ | ✚ | ✚ | ३·४ | ३·३ | ३·० |
| १९१० | ५·३ | ✚ | ✚ | ✚ | ३·५ | ३·४ | ३·० |
| १९११ | ५·५ | ✚ | ✚ | ✚ | ३·६ | ४·० | ३·१ |
| १९१२ | ५·९ | ✚ | ✚ | ✚ | ३·६ | ५·० | ३·७ |
| १९१३ | ६·३ | ✚ | ✚ | ✚ | ४·३ | ५·७ | ३·४ |
| १९१४ | ६·० | ✚ | ✚ | ✚ | ४·० | ५·० | ४·० |
| १९१५ | ५·७ | ✚ | ✚ | ✚ | ३·७ | ३·७ | ३·३ |
| १९१६ | ५·७ | ✚ | ✚ | ✚ | ३·४ | ३·६ | २·८ |
| १९१७ | ५·९ | ✚ | ✚ | ✚ | ३·१ | ३·७ | २·९ |
| १९१८ | ६·० | ✚ | ✚ | ✚ | ३·६ | ४·० | ३·३ |
| १९१९ | ९·५ | ✚ | ✚ | ✚ | ८·२ | ९·० | ७·१ |
| १९२० | १०·१ | ✚ | ✚ | ✚ | ७·९ | ९·५ | ८·७ |
| १९२१ | ९·१ | ✚ | ✚ | ✚ | ७·५ | ९·१ | ८·० |
| १९२२ | ९·५ | ✚ | ✚ | ✚ | ४·४ | ७·८ | ५·४ |


( ✚ आकडे उपलब्ध नाहीत)


(Source - Administrative Reports from 1892 to 1922)


किमतीच्या या परिशिष्टात सुरवातीला महाराजांच्या काळात वस्तूंच्या ज्या किमती होत्या त्या दिलेल्या आहेत.वास्तविक किमतीवर परिशिष्ट लिहिताना सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या किमती घेणे आवश्यक होते. परन्तु १८९३ पासून १९२२ पर्यंतच्या अहवालात ज्या व जशा किमती दिलेल्या आहेत तशाच घ्याव्या लागल्या. सर्व वस्तूंच्या किमती सलग काळात मिळू शकल्या नाहीत. तांदूळ, ज्वारी व बाजरी या तीन वस्तूंच्या किमती संपूर्ण काळातील मिळालेल्या आहेत. गव्हाच्या किमती १९०२ पर्यंत, तुरीच्या १९०६ पर्यंत, हरबऱ्याच्या १९०६ पर्यंत व नागलीच्या १९०९ पासून पुढे किमती उपलब्ध आहेत, त्याच घेतलेल्या आहेत. परिशिष्टात किमतीचे दोन तक्ते दिलेले आहेत. पहिल्या तक्त्यात अेक रुपयास किती पौंड धान्य मिळते हे दाखविले आहे. म्हणजेच रुपयाची खरेदीशक्ती दाखविली आहे. दुसऱ्या तक्त्यात अेका मणास ( ८२ पौंडास ) किती रुपये ही किमत दाखवली आहे. अहवालात ज्या किमती मिळाल्या त्या दोन प्रकारच्या होत्या. १८९३ ते१९०६ या काळात किमती अेका मणास किती रुपये – आणे – पै. अशा दर्शविल्या होत्या. त्याचे रूपान्तर रुपये व पैशात केले. आहे. १९०७ व १९०८ या वर्षी अेका रुपयास किती शेर अशा स्वरुपात किमती दिलेल्या होत्या. त्याचेही रूपान्तर रुपये – पैसे यात केले. आणि त्या पुढील वर्षांच्या किमती अेका रुपयास किती पौंड अशा स्वरुपात अहवालात होत्या. माहितीसाठी व तुलनेसाठी या उपलब्ध आकडेवारीचे अेका स्वरुपात एकत्रीकरण करणे आवश्यक होते. त्यामुळे त्या सर्व साधन सामग्रीचे रूपान्तर दोन तक्त्यात करून ह्या पुस्तकात दिले आहे. जेथे उत्तर अपुर्णांकामध्ये आलेले आहे तेथे त्याचे रूपांतर जवळच्या पुर्णांकामध्ये करून घेतलेले आहे. या सर्व किमतींतील चढउतारांचे आलेखात्र रूपान्तर केले आहे.


यावरून पुढील प्रमाणे काही सर्व साधारण अंदाज किमतीबाबत


बांधता येतात तांदळाच्या किमतीमध्ये फार तीव्र स्वरूपाचे चढउतार अेक-दम अचानक दिसून येत नाहीत. ज्वारी व बाजरी या मधील किमतीमध्ये चढउतार बऱ्याच अंशी समान पातळीवर दिसून येतात. परंतु ज्वारी पेक्षा बाजरी ही जवळजवळ सतत स्वस्त राहिलेली दिसुन येते. गहू, तूर, व ज्वारी यामध्ये आपल्याला चढउतार सारखे दिसून येतात. सर्व धान्याच्या दृष्टीने १९०४ हे साल स्वस्ताईचे म्हणावे लागेल. या वर्षी सर्व वस्तूंच्या किमती या उतरलेल्या दिसून येतात. १९१७–१८ पर्यंत वस्तूंच्या किमतीत फारसे तीव्र बदल आढळून येत नाहीत. परन्तु १९१९–२० या वर्षी सर्वच उपलब्ध वस्तूंच्या किमती अेकदम वाढलेल्या दिसून येतात. ही दोन वर्षे पहिल्या महायुद्धाच्या काळात येतात. १८९७ मध्येही ह्या किमतीमध्ये अचानक वाढ झालेली दिसून येते. त्याचे कारण म्हणजे ह्या कालावधीत एकूण ब्रिटिश हिंदुस्थानातच व संस्थानातही असलेले दुष्काळाचे साम्राज्य ! दुष्काळाची सविस्तर हकिकत 'दुष्काळ' ह्या प्रकरणात येऊन गेलेलीच आहे. हवामान प्रतिकूल झाले, पाऊस पडला नाही, म्हणून संस्थानात पीक नेहमीच्या अपे-क्षे इतके आले नाही. अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. त्यांच्या किमती या काळच्या मानाने वाढू लागल्या. किमती ताब्यात आणण्यासाठी महारा-जांनी उपाय योजना केली. त्यामुळे किमती १८९९ मध्ये परत उतरलेल्या आढळून येतात. १९००—१९०१ या वर्षी परत वस्तूंच्या किमती वरच्या दिशेने हललेल्या दिसतात. त्यानंतर तांदळाची किंमत १९१९–२० च्या सुमारास अेकदम वाढलेली दिसून येते. तोपर्यंत फार महत्वाचे बदल तांदळाच्या किमतीत झालेले नाहीत. तांदूळ, ज्वारी व नागली हे अन्नधान्य संस्थानामधील प्रमुख म्हणून उपभोगात येत होते. महाराजांच्या अेकूण अठ्ठावीस वर्षांच्या कारकिर्दीत १९०४ हे वर्ष स्वस्ताईचे व १८९७व१९१९-२० ही महागाईची वर्षे आढळून येतात.



गहू-किंमतीतील चढउतार
वर्ष



हरभरा-किंमतीतील चढउतार
रुपये (१ मणास=८२ पौंड)
वर्ष


तांदूळ-किंमतीतील चढउतार
वर्ष


बाजरी-किंमतीतील चढउतार
वर्ष


नागली-किंमतीतील चढउतार
वर्ष


तूर-किंमतीतील चढउतार
रुपये (मणास = ८२ पौंड)
वर्ष
१८९३
१९००
१९१०


ज्वारी-किंमतीतील चढउतार
रुपये
वर्ष

# परिशिष्ट—२

## कोल्हापूर संस्थानातील जनन-मृत्यूचे प्रमाण
## (१८९१ ते १९२२)


| वर्ष | जन्मसंख्या | मृत्यूसंख्या | एकुण लोकसंख्या (शिरगणतीप्रमाणे) | जन्म (दर हजारी) | मृत्यू (दर हजारी) |
|---|---|---|---|---|---|
| १८९२-९३ | २९९१४ | २३६८६ | ९१,३,१११ | ३१ | २८ |
| १८९३-९४ | ३१६२७ | २२९०१ | ,, | ३३ | २६ |
| १८९४-९५ | ३१८०९ | २५२३१ | ,, | ३५ | २८ |
| १८९५-९६ | ३०७३४ | २६८०३ | ,, | ३४ | २९ |
| १८९६-९७ | ३१०६२ | २६६४६ | ,, | ३४ | २९ |
| १८९७-९८ | २२४२३ | ३३०९९ | ,, | २५ | ३६ |
| १८९८-९९ | २७९३४ | १७९९० | ,, | ३१ | २० |
| १८९९-१९०० | २७७४६ | २४८१९ | ,, | ३० | २७ |
| १९००-०१ | २०८२८ | ३६८३८ | ९१,००,११ | २३ | १४ |
| १९०१-०२ | १८७४२ | ४४२६६ | ,, | २१ | ४९ |
| १९०२-०३ | २६७७४ | ४०११८ | ,, | २९ | ४४ |
| १९०३-०४ | २७१६३ | ४५३६५ | ,, | ३० | ५० |

(पुढे चालू)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९०४-०५ | २८२४० | ३४५४६ | " | ३१ | ३८ |
| १९०५-०६ | २६०१७ | १२७१६ | " | २९ | ३० |
| १९०६-०७ | २४२११ | ३६०१३ | " | २७ | ४० |
| १९०७-०८ | २६७८९ | ४८५८० | " | २९ | ५३ |
| १९०८-०९ | १२८९६ | १७३८४ | " | ३२ | १९ |
| १९०९-१० | २७७७५ | १९७०९ | " | ३१ | २४ |
| १९१०-११ | २८९५४ | २१७९७ | ८३३४४१ | ३२ | २६ |
| १९११-१२ | ३३२८९ | १८१६७ | " | ४० | २३ |
| १९१२-१३ | २८४७९ | २५४८५ | " | ३३ | ४३ |
| १९१३-१४ | ३२७९३ | १२६५२ | " | ३१ | २१ |
| १९१४-१५ | ३०६८६ | २९००० | " | ३२ | ३६ |
| १९१५-१६ | ३०९७२ | २२९११ | " | ४० | ३१ |
| १९१६-१७ | ३१०४२ | २४०६८ | " | ३७ | २८ |
| १९१७-१८ | ३०१३३ | ३२३४५ | " | ३६ | ३९ |
| १९१८-१९ | २५८२० | ७२९०१ | " | ३९ | ४२ |
| १९१९-२० | २४३२३ | २५००३ | " | २५ | ६३ |
| १९२०-२१ | २४२८४ | २५७१८ | ८३३७२६ | ३० | ३२ |
| १९२१-२२ | २६०५६ | १६४०१ | " | ३१ | २० |

(Source–Administrative Reports from 1892 to 1922)

परिशिष्ट२ मध्ये लोकसंख्या, जन्मसंख्या, मृत्यूसंख्या व दर हजारी जन्म मृत्यूचे प्रमाण हे दिलेले आहेत. आधुनिक काळात भारत व इतर विकसन-शील राष्ट्रात लोकसंख्येचा प्रश्न हा अत्यंत महत्वाचा ठरला आहे. अेका बाजूने राष्ट्रीय उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण दुसऱ्या बाजूने लोकसंख्या ही आवश्यकतेपेक्षा जास्त वाढत असलेली दिसून येते. त्यामुळे दरडोई उत्पन्न अपेक्षेनुसार वाढत नाही. त्याचा परिणाम लोकांच्या जीवनाच्या राहणीमानावर प्रतिबिंबित होतो. जेव्हढी लोकसंख्येतील निव्वळ वाढ ताब्यात ठेवायला पाहिजे, तेव्हढी ठेवली जात नाही. लोकसंख्येच्या स्थित्यंतराच्या सिद्धान्तानुसार दुसरी अवस्था—लोकसंख्येचा स्फोट – ही विकसनशील देशात अनुभवाला येते. त्यामुळे प्रत्येक आर्थिक प्रश्न सोडवि-ण्यामध्ये तो घातक जातो. परन्तु ही भारतातील लोकसंख्येची वाढ आपल्याला १९२१ पासून अनुभवास येते. समस्या जास्त तीव्र बनली १९५६ पासून. त्यामुळे महाराजांच्या अमदानीत ( १८९४-१९२२ ) लोकसंख्येचा प्रश्नच आधुनिक संदर्भात उपस्थित नव्हता. म्हणून त्या काळच्या लोकसंख्येचा व तत्संबंधित आकडेवारीचा अभ्यास आपल्याला त्या संदर्भात करावयाचा नाही. परंतु त्या काळातील लोकसंख्येचे अेक दोन टप्पे आपल्याला विचारात घेणे आवश्यक आहे. महाराजांच्या कारकिर्दीत महाराजांना मुख्यतः तीन संकटाना तोंड द्यावे लागले- दुष्काळ, प्लेग, व इन्फ्ल्यूअेंझा. दुष्काळामध्ये महाराजांची उपाययोजना इतकी तातडीची, दूरगामी व सर्वव्यापी होती की, दुष्काळामध्ये भूकबळी पडले नाहीत व त्यावेळी मृत्यूमध्ये भर पडली नाही. परन्तु प्लेग व विशेषतः इन्फ्ल्यूअेंझामुळे मृत्यूसंख्येमध्ये भर पडली. एकूण मृत्यूची संख्या व दर हजारी मृत्यूदर हा वाढलेला दिसून येतो. परन्तु या बाबतीत महाराजांनी केलेली उपाय योजना लक्षात घेता हा वाढणारा मृत्यूदर आटोक्यात आलेला दिसून येतो. या साथी नियंत्रणात आणण्यासाठी केलेल्या उपाययोजनेशिवाय महाराजांनी संस्थानात प्रतिवर्षी वैद्यकीय बाबींवर केलेला खर्चही वाढत्या स्वरूपात दिसून येतो. वैद्यकीय बाबींवर महाराज गादीवर आले तेव्हा रु.२६६५० इतका खर्च झाला होता.


कोल्हापूर संस्थानमधील जनन-मरणाचा आलेख
(दर हजारी)
जनन वक्र
मरण वक्र
(१८९२-९३ ते १९३१-३२)
जनन-मरण (दर हजारी)
वर्ष

# — मराठी संदर्भ ग्रंथ —


| अ. नं. | लेखकाचे नांव | पुस्तकाचे नांव | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|
| १ | कीर, धनंजय | 'प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती ' श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, पुष्प पहिले,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १९७० |
| २ | कीर, धनंजय | 'लोकमान्य टिळक आणि राजर्षी शाहू' -अेक मूल्यमापन | १९७१ |
| ३ | कुरणे, द. य. | ' कै. राजर्षी छत्रपति श्री शाहू महाराज यांच्या आठवणी ' | १९६८ |
| ४ | 'केसरी-मराठा' संस्था | ' टिळकांचे केसरीतील लेख ' भाग पहिला | १९२२ |
| ५ | कोलंगडे, रा. गो. | ' ऋग्वेद-दर्शन ' | १९५४ |
| ६ | कोलंगडे, रा. गो. | ' ऋग्रत्न-भांडार ' | १९५१ |
| ७ | गर्गे | ' करवीर रियासत ' | |
| ८ | गर्गे | ' करवीर रियासतीची कागदपत्रे ' भाग १ ते ३ | |
| ९ | जाधव, भगवानराव | ' राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे' | १९७१ |
| १० | ठाकरे, के. सी. | ' माझी जीवनगाथा ' | |
| ११ | तळवलकर, गोविंद | ' नवरोजी ते नेहरु ' | १९६९ |
| १२ | तोफखाने, बा. द. | ' राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग ' | १९६३ |
| १३ | दरेकर, द. स. | ' बहुजन समाजातील कर्मवीर ' | १९४४ |
| १४ | देशपांडे, गंगाधरराव | ' माझी जीवनगाथा ' | १९६० |
| १५ | देशपांडे, मु. गो. | ' प्रो. विजापूरकर यांचे लेख ' | १९६३ |
| १६ | नाईक, तु. बा. | ' छत्रपती राजर्षी शाहू महाराज ' | १९७४ |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १७ | पंडित, नलिनी | 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास' | १९५५ |
| १८ | फाटक, न. र. | 'श्री शाहू छत्रपती-सामाजिक सुधारणेबाबत विचार जागृती' श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला-पुष्प तिसरे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | १९७२ |
| १९ | बसे, डी. एस् | 'राजर्षी शाहू स्मारकग्रंथ' | |
| २० | बागल, माधवराव | 'राजर्षी छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या आठवणी' | १९५० |
| २१ | बागल, माधवराव | 'बहुजन समाजाचे शिल्पकार' | |
| २२ | बेडेकर, दि. के; भणगे. भा. शं. | 'भारतीय प्रबोधन – समीक्षण व चिकित्सा' | |
| २३ | मोटे, ह. वि. | 'विश्रब्ध शारदा' खंड पहिला १८१७-१९४७ | १९७२ |
| २४ | येडेकर, श्याम | 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे' | |
| २५ | ठ्ठोले, बा. बा. | 'श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र' | १९२५ |
| २६ | शिर्के, दा. म. | 'कोल्हापूरचा राज्यकारभार' | १९३५ |
| २७ | शिंदे, मा. श्री. | 'विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे' | १९७३ |
| २८ | सरदार, गं. बा. | 'महाराष्ट्र जीवन, परंपरा, प्रगति आणि समस्या' खंड पहिला. | |

## – संस्कृत संदर्भ ग्रंथ –

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गैरोला, वाचस्पति | 'कौटिलीय अर्थशास्त्रम्' | १९६२ |
| २ | लाटकरशास्त्री, वा.आ. | 'श्रीशाहूचरितम्' | १९३९ |

# English Reference Books

| Sr. No. | Name of the Writer | Name of the Book | Year of Pub. |
|---|---|---|---|
| 1 | Bhatia, B. M. | ' Famines In India 1850-1945' | 1963 |
| 2 | Cox, Edmund.C. | ' A Short History of the Bombay Presidency ' | 1887 |
| 3 | Cox, Edmund.C. | ' My thirty years in India ' | |
| 4 | Dandekar V. M. & Rath | ' Poverty in India ' | |
| 5 | Dass, Jarmani | ' Maharaja ' Lives, Loves and Intrigues of Indian Princes | 1970 |
| 6 | Desai T. B. | ' Economic History of India ' 1757 to 1947 | 1968 |
| 7 | Gadgil D. R. | ' Economic Effects of Irrigation ' | 1948 |
| 8 | Gadgil D. R. | ' The Industrial Evolution of India In Recent Times ' | 1944 |
| 9 | International Labour Organization-Geneva | ' Payment By Results ' | 1959 |
| 10 | Krishnarao M. V. | ' Studies in Kautilya ' | 1953 |
| 11 | Latthe A. B. | ' Memoirs of His Highness shri Shahu Chhatrapati Maharaj of Kolhapur' Vol.I and Vol. II | 1924 |
| 12 | Malgonkar, Manohar | ' Chhatrapatis of Kolhapur ' | 1971 |

| 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|
| 13 | Myrdal, Gunnar | 'Asian Drama' An Inquiry into the Poverty of Nations Vol I, II & III | 1968 |
| 14 | Patil, P. C. | 'Food Problem in India in General and In Kolhapur State in Particular | 1948 |
| 15 | Santhanam, K. | 'The Cry of Distress' | 1943 |
| 16 | Sovani, N.V. & Rath, Nilakanth | 'Economics of A Multiple-Purpose River-Dam' Report of an Inquiry into the Economic Benefits of the Hirakud Dam | 1960 |
| 17 | Sreenivasan, K. | Productivity and Social Environment | 1963 |

## Reports

1. Statistical Report of Kolhapur – Graham
2. Maharashtra State Gazetteers History - Part III— H. N. Sinha
3. Report on the General Administration of Kolhapur State From 1883-84 to 1922-23
4. Report of Commission of Famines in Bengal, Bihar & Orissa 1867 Part III

# सूची


अॅक्टन ७
अखिल भारतीय अस्पृश्य परिषद दिल्ली ११०
अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद खामगांव, ७६,१०८,११०
अखिल भारतीय कूर्मी क्षत्रिय सामाजिक परिषद कानपूर ४०
अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद १५
अतिग्रे तलाव ५३
अय्यर, सुब्रम्हण्य ४
अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक ४१
अलबर्ट एडवर्ड हॉस्पीटल १३२, १९९
असायलम व्हिक्टोरिया डायमंड ज्युबिली लेपर १३८
अस्पृश्योद्धार १५,१७
अस्पृश्यजनता परिषद, माणगाव ३७,९५
अहिल्यादेवी गर्लस् हायस्कूल १२६
आगरकर गो. ग. ७
आर्थिक वाढ १२, ४३, १०१
आर्य समाज १२३
इन्फ्ल्यूएंझा १३२, १९७
कल्याणकारी राज्य ६, १९१
कळंबा तलाव ५३
कॉफी लागवड २९,३०,४६,६६
काम तसे दाम पद्धति १५८, १५९, १९९
काळेश्वर तलाव ५३
काळम्मावाडी प्रकल्प ३९
किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूट३२-३४,४३,१११,११३
कोद, धनंजय ४३
केन्स १९१
कोको ३१,३२,
कोरफडीची लागवड ३०
कोल्हापूर रेल्वे ६३,७७
कौटिलीय अर्थशास्त्र १६३,१९९
कंडी १११
क्लार्क जॉर्ज ५६,५७
क्वारंटाईन कँप १९७
खानविलकर गुणाजीराव ९
गंबन गवत ३०,७०
गाडगीळ, ध. रा. १६
गांधी, महात्मा ९४
गोखले, गो. कृ., ३,५,६,१०,१०९
ग्राईंडिंग फॅक्टरी ७१
घाटगे, जयसिंगराव ९

चहाची लागवड २९,३०,३२, ४५,६६
चिपळूणकर विष्णुशास्त्री ७
जयप्रकाश नारायण ९४
जॉईल्स १०९
जिनगर विद्यावर्धक समाज परिषद ११९
जिनगर समाज ७३
जिनिंग फॅक्टरी ६७,६८
जोशी, ग. व्यं. ३,५,
जॅक्सन १४२
टिळक बा. गं. ७,१०.
टॅपिओका ३१
डेक्कन असोसिएशन १२६
डोंगरे, रावबहादुर ४२,१२६
तेलाची गिरणी ७१
तोफखाने, वा. द. १०९,१२८,१३२
दत्त, रमेशचंद्र ४
दयानंद मोफत गुरुकुल १२१
दरेकर, द. स. १७
दास, जर्मानी २
देशमुख, गोपाळराव ७
दूधगंगा ५६
निर्हस्तक्षेपाचे तत्त्व १९०
नेहरू, जवाहरलाल ४
नौरोजी, दादाभाई ३,४,६
न्यू डील १६९
परळ कामगार सभा ९०
पाटील शाळा १११
पीपल्स युनियन ४०, ९०, ९१
पोलीस स्टेट ६, १८९
प्लेग १३२, १३३-१३८, १९७
फुले, ज्योतिराव ७, १५
फेजिवडे ५५
फॉक्स ७२
फ्रेबर ९, १२
बलभीम को-ऑप. सोसायटी ४१
बलुतापद्धति १६, ३७, १३०
बाळकृष्ण, डॉ. १२३
बुंदाची लागवड ३०
बोले, सी. के. ९१
ब्राम्हण-ब्राम्हणेतर चळवळ १७
भावे, विनोबा ९४
भांडवल संचय १०४
भोगावती ५५
महार वतनें ३७, ९५
मॅन, हॅरॉल्ड ३५
मार्क्स, कार्ल ८९
माळगावकर, मनोहर १९
मॉडेल फार्म ३५
मोटे, ह. वि २०
युद्धकर्जें २००-२०३
रंकाळा तलाव ५३
रंगकाम ६९
रजपुतवाडी ६७
रबर ३१, ३२
राजाराम इंडस्ट्रियल स्कूल ३८, ४०, ४१, ६३, ११९

राजाराम कॉलेज १२२, १२३
१२५
राजाराम हायस्कूल ३५, १२३,
१२५
राधानगरी धरण ३८, ५४–५९,
१६२
रानडे, म. गो. ३,४,५,७,१०९
रायबाग ९९,९६
राष्ट्रीय उत्पन्न समिती २३
रास्ते, एम्. अे. १११
राळ ३०,३१,७०
रूझवेल्ट १६९
रे, कर्नल १४६
रेशीम ३१
लॅमिंग्टन, लॉर्ड १८,
लाकूड शुद्धीकरण कारखाना ७२
लॉइड्स, सर ११,१११,११५
वसतीगृह १६,११७,११८,११९
विलिंग्डन, लेडी २०१
विव्हिंग फॅक्टरी ६८,६९
वेलधोडे ३१,४६
वॉनॉन १९५,१९७
शाहूपुरी ७३,७७
शाहूमिल ४०,४१,६३–६५,७२
शिंदे, वि. रा. १६
शिंदे, श्रीपतराव १२५
शिक्षण ६,
शिक्षण, प्राथमिक ,६,११,१६,२५
१०७,११३–११६,१६६
शेती प्रदर्शने ३४,३५
शेती संशोधन २४,२९,३३,३५
शेतकी व शेतकरी ३३
समर्थ १६०,१६८
सरदार शाळो १११
सहकारी कायदा ४१
सहकारी चळवळ ९२
सहकारी पतपेढया २६,४०,४१,
४२
सॉ मिल ७१
सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन २३
हजेरी पध्दत ९४,९५,१३९
हरितक्रांती २४,३९,५१,५८
हिल,क्लॉड ३९,१३१,१३२
होळकर, तुकोजीराव, ३९

## ❋ सौ. मीना कुलकर्णी

( जन्म १९४० )

एम्. ए. ( अर्थशास्त्र ) १९६२, बी. लिब् एस्सी. १९६६, पुणे विद्यापीठात 'वर्गीकरण' व 'तालिकीकरण' या विषयात पहिल्या व "पारखी बक्षिस" त्यांना मिळाले. वाई कॉलेजमध्ये दोन वर्षे, गोपाल कृष्ण गोखले कॉलेजमध्ये तीन वर्षे व सध्या श्री शहाजी छत्रपती कॉलेजमध्ये अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका.

## ❋ ब. शि. कुलकर्णी

( जन्म १९३७ ) एम्. ए.

(अर्थशास्त्र) १९६२, गोखले इन्स्टिटयूट, पुणे येथे "सामाजिक शास्त्राच्या संशोधन पद्धतीच्या प्रशिक्षणासाठी" एक वर्षाचे विद्यावेतन मिळाले. "निपाणी येथील विडी कामगारांचे सामाजिक, आर्थिक जीवन" संशोधनपर प्रबंध पूर्ण. कोल्हापूर येथील एका ख्यातनाम महाविद्यालयात प्राध्यापक.